म. ग्रं. सं. ठाणे.
विषय प्रवास
सं. क्र. ८८१

REFBK-0025155

३२८

14 FEB 1990

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, सदर न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा दंड भरावी लागेल.

23 NOV 1986

27 MAY 1987

DEC 1986

28 JUL 1987

14

JAN 1987

4 OCT 19

5 JAN 1987

28 OCT 1987

1 FEB 1987

4 NOV 1987

1 MAR 1987

9 MAR 1989

9 OCT 1988 (ग. मा. पहा)

१०-३-८४

20 APR 1998

MAR 1989

म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू.प
सं. क्र. ६८४
मपग्रं भूप
६८४
२५९५५
१९।१०।८६

# अनुभवाचं जग

डॉ. पु. ज. देवरस

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
६८४
२५९५५
१९।१०।८६
REFBK-0025155

वसंत बुक स्टॉल मुंबई

प्रकाशक
अरविंद तेंडुलकर
वसंत बुक स्टॉल
न चिं केळकर रोड,
हनुमान मदिराजवळ,
दादर, मुबई ४०० ०२८
*
© डॉ पु ज देवरस
*
प्रथमावृत्ती
ऑगस्ट १९८६
*
मुखपृष्ठ
रविमुकुल
*
मुखपृष्ठछपाई
ज्योति आर्ट प्रिंटर्स मुबई १३
*
लॅमिनेशन
दुर्गा लॅमिनेटस् मुबई
*
बाधणी
मे गोविंद महादेव सुर्वे, मुबई
गजानन पुस्तक बाधणी, पुणे
*
मुद्रक
सुनील अनत चिचणीकर
माधुरी प्रिंटरी
४४३, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
*
मूल्य : पचेचाळीस रुपये

ज्याच्या वात्सल्यामुळे हा देह वाढला, व ज्याच्या मार्गदर्शनामुळे ही सृष्टिनिरीक्षणाची दृष्टी लाभली, ते माझे पूज्य पिता, कै. श्री. जयकृष्ण सदाशिव देवरस व पूज्य मातोश्री कै. सौ. राधाबाई देवरस यांच्या चरणी--

— पुरुषोत्तम

## – मागोवा –

प्रवास करताना काही घटना अगदी मनात जडून बसतात त्याचे ठसे स्मृतिपटलावर शिक्कामोर्तब करून रहातात अशा कैक घटना, माझ्या देश-विदेशीच्या भ्रमणात माझ्या मनात चिरस्थायी होऊन राहिल्या होत्या त्या कुठेतरी प्रकट व्हाव्यात असे वाटत होते

१९६९ मध्ये मी साहित्य सहवासात रहावयास आलो सेवानिवृत्त झाल्यामुळे मोकळा वेळ मिळत होता त्या वेळात वसाहतीमध्ये मी बाग लावली सुरवातीला हाताशी माळीसुद्धा नव्हता भर पावसात अगदी अधारा-तही पाण्याचा पाट काढला वर्षभरात बाग हिरवीगार झाली बागेतील त्या झाडाचे आणि फुलाचे कौतुक करणारे दोनच साहित्यिक मला भेटले एक होते, श्री नारायणराव आठवले आणि दुसरे.. मला स्वत'च्या मुली-प्रमाणे असलेली सौ गिरिजा कीर

गिरिजा वेळीअवेळी माझ्या घरी येऊन बागेबद्दल बोलत असे आणि माझ्या गतजीवनाविषयी विचारपूस करीत असे माझा जगभरचा प्रवास आणि विविध अनुभव ऐकून तिला विस्मय वाटला एकदा ती मला म्हणाली, ' काका, तुमचे हे प्रवासातले अनुभव फारच उत्तम आहेत तुम्ही हे सगळ लिहून काढा ना !' .बस्स ! इथूनच मी हे ठसे लिहू लागलो माझे असे नऊ लेख, गिरिजाने ' अनुराधा ' मासिकात प्रसिद्ध केले आणि माझ्या ललित लेखनाचा ' श्रीगणेशा ' झाला गिरिजाने माझ्या लेखनाविषयी दाखविलेली आपुलकी मला फार महत्त्वाची वाटते या सदर्भात मी एवढेच म्हणू शकतो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२८
क्र. २५५५५
१८।४।८६

की, गुणाचे पारखी दुर्मिळ असतात नियतीच्या योगायोगानेच ते समोर येतात

यानतर मी विविध नियतकालिकातून आणि विशेषत दिवाळी अकातून नियमित लिहू लागलो नवशक्ती, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, सकाळ, तरुण भारत, केसरी, सह्याद्री, सुगध, राजश्री, किर्लोस्कर, मनोहर, विवेक, राजस, दीपलक्ष्मी आदि नियतकालिकानी माझे लेख प्रसिद्ध केले अनेक वाचकानी मला पत्रे पाठवून हे लेख मी पुस्तकरूपाने ग्रथित करावेत अशी मला सूचना केली

योगायोग असा की, याच सुमारास सौ गिरिजाने मला एका प्रकाशन सोहळ्याचे ( मार्च १९८२ ) निमत्रण दिले त्या ठिकाणी एका धडाडीच्या प्रकाशकाशी— श्री० अरविंद तेंडुलकर यांच्याशी— तिने माझा परिचय करून दिला नतर चारच दिवसात श्री० तेंडुलकर माझ्या घरी आले त्यानी लेखाची कात्रणे पाहिली आणि हे पुस्तक मार्गस्थ झाले

आज हा निवडक प्रवास-आठवणीचा सग्रह वाचकासमोर येत आहे श्री० तेंडुलकर यानी ही प्रकाशनाची जबाबदारी पार पाडली म्हणून त्याचे मन पूर्वक आभार

माझ्या या अनुभवसिद्ध आठवणी रसिकानी गोड मानून घ्याव्यात एवढी माझी विनती आहे

आनदवन, साहित्य सहवास,
वांद्रे ( पूर्व ), मुबई–५१

— पु० ज० देवरस

## प्रकाशकाचे दोन शब्द

जागतिक कीर्तीचे वज्ञानिक आणि सशोधक डॉ० पुरुषोत्तम जयकृष्ण देवरस याच्या अनुभवी लेखणीतून प्रकट झालेला 'अनुभवाच जग' हा रजक ग्रथ रसिकाना सादर करताना मला अत्यत आनद वाटतो

डॉ० पुरुषोतम जयकृष्ण देवरस याचा जन्म २० जुलै १९०९ रोजी मध्य प्रदेशातील बिलासपूर शहरी झाला नागपूर विश्वविद्यालयातून त्यानी एम० एस्सी० व एल्एल्० बी० डिग्री घेऊन, इग्लडच्या डरहॅम विश्वविद्यालयातून १९४० साली पीएच्० डी० पदवी सपादन केली प्रयाग हिंदी साहित्य समेलनाचे ते १९२९ मधे साहित्य विशारद झाले

पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमधे प्राणीशास्त्राचे प्राध्यापक, कृषिसशोधन सस्था दिल्ली इथे कीटकशास्त्रज्ञ व मुबईच्या हाफकिन सस्थेचे उपसचालक अशा उच्च पदांची अधिकारसूत्रे त्यांनी सांभाळली व १९६९ साली ते सेवानिवृत्त झाले

कीटक, विषारी प्राणी व पर्यावरण या विषयांवर त्यांनी संशोधन करून दोनशेच्या वर प्रबंध प्रसिद्ध केले. या कार्यात त्यांनी फार मोठा नावलौकिक संपादन केला

पहिल्या जागतिक सर्प परिषदेचे ते सन्माननीय अध्यक्ष झाले त्याचप्रमाणे रॉकफेलर फेलोशिप व डॉ भन्साली लेक्चर अॅवॉर्डचेही ते मानकरी ठरले १९८० साली भरलेल्या पहिल्या अखिल भारतीय प्राणी-विज्ञान संस्थेच्या अधिवेशनात त्यांना सुवर्णपदक बहाल करण्यात आले

युनायटेड नेशन्सची मानव पर्यावरण परिषद, ब्राझील येथील आंतरराष्ट्रीय विषारी प्राणीपरिषद, डब्लीन येथील प्रायोगिक प्राणीपरिषद, पॅसिफिक विज्ञान परिषद, जागतिक सर्प परिषद, जागतिक स्वास्थ्य संस्थेची प्लेग-कीटक परिषद आदि अनेक परिषदांना हजर राहून त्यांनी ३० वर्षे जगभर प्रवास केला

इंडियन बुक ट्रस्ट, अॅकॅडेमिक प्रेस लंडन, न्यूयॉर्क, पर्गमन प्रेस, ऑक्सफोर्ड यांनी त्यांची, सर्प व विषारी प्राण्यांची पुस्तके व प्रबंध प्रसिद्ध केले

पुण्याची विज्ञानवर्धिनी, मुंबईची मराठी विज्ञान परिषद, आंतरराष्ट्रीय जीव-संहारक परिषद आदींचे ते आद्य संस्थापक असून अनेक संस्थांचे आजीव सभासद आहेत

१९२४ साली त्यांनी मराठी लेखनास व १९३० साली हिंदी लेखनास सुरवात केली आता इंग्रजी, मराठी व हिंदी या तीनही भाषातून ते सातत्याने लेखन करीत असतात

' भारतातील सर्प ' हा त्यांचा ग्रंथ भारतीय १० भाषातून अनुवादित झाला आहे मराठी विज्ञान परिषदेच्या अध्यक्षपदी असताना त्यांनी ' विज्ञान गवाक्ष ' प्रसिद्ध केले जोधपूर विश्वविद्यालयाच्या बी ए च्या अभ्यासक्रमात त्यांच्या हिंदी भाषेतील लेखाचा समावेश आहे

आकाशवाणी व दूरदर्शन यावर त्यांची सातत्याने भाषणे व चर्चा होत असतात. संबंधित विषयावर अत्यंत कळकळीने व अधिकाराने ते दैनिकातून व साप्ताहिकातून लिहीत असतात त्यांच्या विषयाशी संबंधित संस्थांचे ते सभासद व मानद अधिकारी आहेत

आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त झालेल्या डॉक्टरसाहेबांचा देशाच्या इतिहासाचा अभ्यास आजही चालूच आहे अध्यात्म हा त्यांचा खास आवडीचा विषय असून त्याचाही त्यांचा गाढा व्यासंग आहे

डॉ देवरस यांच्या प्रस्तुत ग्रंथाचे रसिकांकडून यथोचित स्वागत होईल अशी आशा आहे

-अरविंद तेंडुलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

सन १९६५ च्या श्रावण महिन्यात प्रयोगशाळेतील फुरश्यांची शिरगणती करीत होतो त्याच दिवशी भिवडीहून इस्माईल आला व काळ्याभोर इगळ्या आणल्याची खबर मिळाली तोपर्यंत माझ्या सग्रहालयात २००० फुरशी होती विंचवाचा नबर आता ९००० पर्यंत आला होता मोजमाप केली कापून उदीर त्याना भोजनाला दिला व वर ऑफिसात नवीन प्रयोगाबद्दल विचार करीत बसलो तेवढ्यात पोष्टमनने एक रजिस्टर्ड पत्र आणले

पाकीटावर लडनचा स्टॅंप होता व बाजूला कारशलटन प्रयोगशाळेच्या सचालकाची सही दिसली हे सचालक चार महिन्यापूर्वी भारतात आले होते व माझे घरी अगदी कढी-भात खाऊन गेले होते डब्लीनला आतरराष्ट्रीय ‘प्रयोग प्राणी सशोधन’ परिषद भरणार होती व मला अगत्याचे आमत्रण दिले होते माझ्या सस्थेतर्फे जाणे त्रासदायकच होते कारण सरकारी खर्चाने एकदोन ट्रिप केल्यावर त्या टी ए बिलाची भानगड दोन वर्षे चालली होती, पण या परिषदेने येण्याजाण्याचा खर्च व ब्रिटनचे राहणे देण्याचे कबूल केले या अटीमुळे ‘पी’ फॉर्म लवकर मिळाला खर्चाला रिझर्व बँकेकडून ५० डॉलरची मागणी केली, पण ती परत आल्यावरसुद्धा मिळाली नाही

दोन निबध वाचावे व मी नवीनच सशोधित केलेली विंचवावरची प्रक्रिया व तिचे प्रात्यक्षिक करून दाखवावे असे ठरविले हे विंचू तिकडे जाणार कसे हा एक प्रश्नच होता एअरइडिया ते पार्सल घेण्यास तयार होईना डॉ लेन पीटर याना खासगी पत्र लिहून या विशेष वजनाबद्दल मोबदला द्यावा याचा खुलासा केला व सर्व कस्टम्स आणि पोलीस याना माहिती द्यावी असे कळविले माझा तोपर्यंत पासपोर्ट साधा होता भारताचे एक-मेव प्रतिनिधी असल्यावर काही विशिष्ट जागी त्रास होऊ नये म्हणून एका जागरूक पास

## विंचवाची सफर

पोर्ट ऑफिसरने पासपोर्टला 'डिप्लोमॅटिक' केला यामुळे मला विसाचे पैसे कुठेच लागले नाहीत व इमिग्रेशन किंवा इतर विभागाचा त्रास कुठेच झाला नाही

इकडे माझ्या यात्रेची तयारी सुरू झाली व तिकडे भारतात युद्धाचे वारे वाहू लागले १९६५ सालचे युद्ध होते व नक्की कधी सुरू होणार याची शाश्वती नव्हती तरी मी भिवंडीहून चांगल्या मोठ्या काळ्याभोर इंगळ्या बोलाविल्या सिगारेटच्या टिनाच्या डब्यात ओलसर लहान लहान फाद्या ठेवल्या व प्रत्येक डब्यात तीन विंचू कोंबले आत ठेवण्यापूर्वी त्यांचा खाना-पाणी उरकून घेतले होते ते बारा विंचू चार डब्यात ठेवून डबे बद केले झाकणावर बारीक छिद्रे केली व त्यावर ओला कापूस ठेवला एका लाकडाच्या खोक्यात त्यांना पॅक केले व वरून टिनची एक पट्टी पण ठोकून घेतली

सांताक्रूझ विमानतळावर कस्टम्सने हटकले त्या डब्याचे वजन दोन किलो भरले विमान कपनी तो डबा इतर सामानाबरोबर घेईना मला हातीच धरावा लागला व शेवटच्या टप्प्यात कस्टम्सने कुरकुर सुरू केली शेवटी, 'नेले तरी परत आणू नका–,' 'आणल्यास परवानगी व जकात भोगावी लागेल,' असे बजावून मला जाऊ दिले केबिनमध्ये स्टुवर्डचे लक्ष डब्याकडे गेले 'वर ठेवू नका' 'खाली टाकू नका' अशीच तो ऑर्डर देत सुटला ठेवावे तरी कुठे? 'मांडीवरच घेऊन बसा,' झाले, तो डबा मांडीवर घेऊनच रात्र काढावी लागली बाथरूममध्ये गेल्यास, 'डबा सोबत न्या,' असा आदेश येई या आदेशामुळे इतर प्रवासी पण जरा फटकून वागू लागले अगदी पॅकबद आहे कळले तरी लोकांचा विश्वास बसेना

सकाळी झूरिक आले बाहेर पाऊस पडत होता, पण खाली जावे लागले डबा काखोटीत धरावा लागला लाल अक्षराने 'खबरदार विंचू!' शब्द त्या डब्यावर लिहिले होते प्रवासी आणि स्थानकवासी सगळेच कुतुहल आणि भीती या दृष्टीने पहात, होते त्यावेळी 'बांब'ची भीती नव्हती नाहीतर आणखी घोटाळा झाला असता लडनला १० वाजता विमान उतरले सामान गोळा केले व कस्टम्सकडे आलो लाल अक्षरातले शब्द पाहून ते जरा विचकले 'हे का आणले– परवानगी कुठे आहे– व त्यात नक्की काय पहाव लागेल!' कित्येकाना विंचू कसा असतो माहीत नव्हते कागदावर रेखीव चित्र दाखवून सांगितले ब्रिटिश म्युझियमला त्यानी फोन केला, अशा जातीचे प्राणी असतात काय विचारले व ते भारतात मिळतात काय? आणि ते काय अपाय करतात आदि माहिती काढली तब्बल तासभर थाबलो होतो शेवटी म्हणालो, 'पहा, आता मी खोका उघडतो' डबा खाली ठेवून हातोडी व प्लायर्स हाती घेताच सगळे कस्टम्सचे ऑफीसर लांब पळाले 'डबे– घेऊन जा– पण इथे तोडू नका' म्हणत त्यांनी परवानगी दिली

लडनला विमान बदलले व आयर्लंडच्या विमानात बसलो आयरिश लोकाना भारतीयाबद्दल बरीच सहानुभूती दिसली डब्याकडे पाहून 'ठेवा कोपऱ्यात,' स्टुअर्ड म्हणाला. नतर जलपान वगैरे झाल्यावर फार कुतूहलाने विंचवाबद्दल सगळे विचारू

लागले 'आम्ही पाहिले नाहीत–आमच्या देशात सर्प नाहीत व विंचू पण नाहीत'

डब्लीन विमानतळावर कस्टम्सने अजिबात त्रास दिला नाही 'तुम्ही असे प्राणी आणणार अशी आम्हाला खबर होती– आम्ही त्या व्यवस्थेत आहोत,' असे ऑफिसर म्हणाले परिषदेची मडळी भेटली व्यवस्था 'डनलेयरी' येथील समुद्र तटाकीच्या हॉटेलात झाली आहे असे कळविले हे स्थान शहरापासून वीस मैल दूर होते व अगदी समुद्रकाठी असल्यामुळे फारच रम्य दिसे समुद्र लहानसा पलिकडे सडक व सडकेपलिकडे सुंदर चार एकरी फुलझाडाची बाग व बागेपलिकडे उंचवटयावर हे हॉटेल होते दिवस-रात्र खूप वारा, लाबचा सूर्यास्त, गलबते, समुद्राच्या लाटा व गुलाब, डेलिया, फ्लाक्स आदि फुलावरून येणारे वारे– सारे सारे खिडकीतून चलायमान जगाची आठवण देत होते

आमच्या हॉटेलमध्ये माझ्या सोबतीला एक अमेरिकन तरुण वैज्ञानिक होता त्याचा व माझा पलग लागूनच होता मी तिथे दुपारी तीनच्या सुमाराला पोचलो. विंचवाचा डबा मोकळा केला व सगळे विंचू काचेच्या उंच टँकमध्ये टाकले त्याना पहिले ओला कापूस थोडा मधात बुडवून दिला दोन दिवसाचे तृषित होते पाणी म्हणून कापसावर तुटून पडले थोडी तहान गेल्यावर टँकमध्ये भटकू लागले. यामुळे थोडा टक् टक् आवाज होत असे तो टँक मी आपल्या पलगाखाली ठेवला होता हे अमेरिकन गृहस्थ आले टाय ढिला करून जोडे काढून पलगावर पहुडले मी पेपर वाचीत होतो मधून मधून डोळे उघडून ते उठून माझ्याकडे पाहू लागले बऱ्याच वेळा हे असे झाल्यावर मी त्यांना विचारले, 'काय होत आहे ?' ते म्हणाले, 'खोलीत कुणीतरी ठोकाठोकी केल्याचा आवाज येत आहे' मी चहूकडे पाहिले, कुणी दिसेना 'लुक, लुक – ते पहा कसे खटखट पलगाजवळ होत आहे–' अस म्हणून मी पलग सरकविला त्या गृहस्थाला काळेभोर विंचू टँकमध्ये दिसले 'What ?' म्हणत सरळ उठला व खोलीबाहेर गेला रात्रीला झोपण्यास पण आला नाही दुसऱ्या दिवशी सकाळी मी एक पाढरा उदीर आणला गुंगी देऊन टँकमध्ये सोडला विंचू बरेच उपाशी होते त्या उदरावर ताव मारू लागले– अगदी शाततेने सकाळी ८–३० ला ते अमेरिकन गृहस्थ व हॉटेल मॅनेजर आत आले दोघेही पलगावर बसले व इकडच्या तिकडच्या गोष्टी करू लागले का आले मी ओळखले पण चूपच होतो दहा मिनिटाने मॅनेजर म्हणाला, 'टुमटुम कुठे आहे ?' अमेरिकन गृहस्थ ओशाळला कारण आवाज नव्हता व त्याचे गाऱ्हाणे खोटे ठरत होते 'इथेच होता–' म्हणत त्याने पलग दूर केला तो काय– त्या रक्तबबाळ झालेल्या उदरावर विंचू आनदाने ताव मारताना दिसले अमेरिकन गृहस्थ कुतूहलाने पाहू लागला व त्या मॅनेजरने डोळ्यावर हात ठेवले व 'Oh God !' म्हणत पळता पाय काढला

सगळीकडे खबर पसरली खोली स्वच्छ करणारी मेड खोलीत शिरेना आलेले बरेच पाहुणे विंचू-दर्शन घेण्यास येऊ लागले दुपारी १२ वाजता टेलिविजन व रेडियो

कंपनीचा फोन आला ते कॅमेरा घेऊन येणार होते दुपारी ४ ला ही गर्दी आली दोन कॅमेरे, दोन रेकॉर्डिंग यंत्रे, ती मोठी लाऊडस्पीकरची होडी आणि तीन बातमीवाले पत्रकार पहिले बातमीदाराने सगळे वेडेवाकडे प्रश्न विचारून घेतले नंतर टी व्ही ने विंचू बाहेर काढण्यास विनंती केली चिमटयाने विंचू समोर धरले प्रकाशज्योत त्याच्यावर पडत होती, तो तडफडत होता कॅमेरा त्याच्याकडे सुरू झाला अगदी ६ इंचावर कॅमेरा धरला गेला 'धोका तर नाही ना ?' विचारीत फोटो घेऊ लागले नंतर माझ्यावर प्रकाशज्योत आली व प्रश्नाचा भडिमार सुरू झाला कुठून आणले– किती आहेत– काय खातात– विषाचा परिणाम काय– किती लोक दगावतात आदि सर्व प्रश्नाची उत्तरे त्या झगझगाटात देत होतो मधून मधून चिमटयातील विंचू त्याचे जवळ केला की, ते किंचाळावयाचे सर्व १० मिनिटे कार्यक्रम झाला व 'By God We did it !' म्हणत सगळे अगदी पळत बाहेर गेले

संध्याकाळपर्यंत तो अमेरिकन परत आला आम्ही खाली भोजन शाळेत गेलो रात्रीचे ७–३० झाले होते अगदी शिडीच्या पायथ्याशीच वेटर भेटला मागे एक तरुण परिचारिका होती 'अभिनंदन ! आज तुम्ही हीरो झाला ! अख्ख्या डब्लीन शहरात टी. व्ही वर तुमची प्रतिमा दिसली तुमच्या भाषणाने आमची भीती कमी झाली मेड जर खोली स्वच्छ करणार नाही तर मी करेन !'

जेवताना मुख्य शेफ, दोन तीन वेटरपण अभिनंदन देऊन गेले भोजनानंतर गावात जरा फेरफटका केला एका तंबाकूच्या दुकानात पेपर घेत होतो चार-पाच मुले व म्हातारी दुकानदारीण ओरडली 'यी यी-इंडियन टी व्ही स्टार यू होल्ड स्कारपियन,' झाले घोळका सुरू झाला व या टी व्ही स्टारने पळता पाय काढला दुसऱ्या दिवशी सकाळी भारतातील पाकिस्तान युद्धाची बातमी वाचण्यास लंडनचे पेपर घेतले जम्मूवर स्वारी ' आदीची वर्णने तर होतीच, पण मधल्या पानावर अर्धा इंच मोठी अक्षरे वाचताच दिसले की, पेपरने पण आमचा हीरो केला '२१ नंबरच्या खोलीत जहरी विंचू ' शीर्षक होते सगळा पेपरचा पूर्ण कॉलम विंचवाच्या लीलेने व आमच्या 'धाडसाने ' भरला होता

डब्लीनच्या वर्तमानपत्रात सप होता ब्रिटीश पत्रात खूप भडक बातम्या येत होत्या पाकिस्तानने काश्मीरचा मार्ग तोडला भारतीय सैन्याचा धुव्वा– शिख पल्टनी खलास झाल्या व गिधाडे दाढी ओढीत आहेत याची चित्रे दिली होती शिवाय शेवटी तर 'भारतीय सरकार धोक्यात ' असा चक्क मथळा होता बातमीने अस्वस्थ झालो पुढे तर 'मुंबईवर बॉंबफेक होऊन शहराची अतोनात हानी ' असा तिसऱ्या दिवशी मथळा आला एकीकडे टी व्ही चा हीरो व दुसरीकडे मानसिक अस्वस्थता खरे वर्तमान काढण्याकरता भारतीय दूतावासात गेलो तेथील सेक्रेटरीला भारतीय वैज्ञानिकाचे हीरो बनणे कळवायचे व भारतातील खरी माहिती काढावयाची याकरता दूतावास यांना भेटावयाचे आहे असे कळवले बाहेर बसवले ४० मिनिटे वाचत बसलो, पण बोलावणे येईना गुपचुप दार उघ-

डून पाहिले, तर वकीलसाहेब ऑफिसला कोणता रंगीत कागद लावावा याबद्दल एका ललनेशी बोलण्यात गर्क होते 'वेट सम टाईम-' म्हणाले 'आय हॅव नो टाईम थँक यू !' म्हणत मी परिषदेकडे गेलो सगळ्या डब्लीनभर त्या विंचवाचे कौतुक-भारताचे नाव गाजत होते, पण दूतावासांना ते वाचण्याची फुरसत नव्हती हा सगळ्या भारतीय दूतावासाचा कित्येकांना अनुभव आहे

गिनेस एक अति प्रख्यात बीर करणाऱ्या कंपनीचे नाव होय आमची सहल तिकडे गेली मार्गात प्राणिसंग्रहालयात दाखविले काही सर्प पिंजऱ्यात होते 'जागतिक सर्प-तज्ज्ञाची भेट'-शीर्षक दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात झळकले

गिनेसच्या प्रचंड कारखान्यात बीर तयार करणारे उत्तम यंत्र व पूर्णकृती पाहिली कुठेही जा, 'टी व्ही हीरो' याच नावाने बरेच कामगार मजकडे बघत होते संपूर्ण कारखाना पाहिल्यावर फराळाची वेळ आली प्रत्येकाला एक टँकर्ड भरून बीर दिली वाटल्यास व्हिस्की होती तो फेसाने भरलेला टँकर्ड-ज्यात सहा-सात पेले बीर असेल-ऑरेंज टाकून घ्यावा लागला गिनेसचा स्वाद लागल्यावर भारतीय बीर पिण्याची इच्छा पण होणार-नाही

आठ सप्टेंबरला माझे निबंधवाचन होते सहाल्याच रात्री डब्लीन टी व्ही वर भारतीय युद्धवार्तेत कळवले की, लाहोरवर भारताने स्वारी केली ब्रिटिश वर्तमानपत्रे व रेडिओ भारताविरुद्ध कमालीची खोटी बातमी देत, तर आयर्लंड रेडिओ ब्रिटिशांविरुद्ध बोलत नक्की कळत नसे यामुळे मनःस्थिती चिंतित होती निबंध वाचण्यापूर्वी माझ्या प्रयोगाचे प्रात्यक्षिक दाखवावयाचे आमच्या बैठकी उत्तम दिवाणखान्यात होत इथे सुबकसे टेबल घेतले सोफासेटवरच बसलो दोन-तीन तरुण वैज्ञानिकांना विनंती केली व विजेचे करंट आणून विंचू सोफ्यावर ठेवला सरळ करून नांगी चिमटयाने धरून टेबलावर आणला वर पेट्रीडिश टाकून तोंड झाकले व करंट ट्रॅन्सफॉर्मरवर घेऊन सहा वोल्ट केला चिमटा नांगीवर व सुई पोटाच्या मध्यभागी हळूच हलवली भारतातील गरम हवेतील प्राणी या थंड देशात कसे वागती? याची शाश्वती नव्हती डोळे मिटले कसोटीची वेळ जाणून पुन्हा सुई खुपसली देव पावला चौथ्या वेळी विंचवाच्या नांगीतून विषाचा एक थेंब बाहेर पडला मला हायसे झाले लोकांनी टाळ्यांचा गजर केला पटापट फोटो काढण्यात आले जवळ बसलेल्या बायकांनी अभिनंदन केले मी कपाळावरील घामाचे थेंब पुसत 'थँक यू' चा जपच करत होतो

आठ सप्टेंबरला मोठा बॉल डान्स झाला व बाराला आम्ही ग्लेडोलिघ येथील पुरातन थडगे पहावयास गेलो आयर्लंडमध्ये घोडे खूप रेस म्हणजे यांचा राष्ट्रीय खेळ मेंढ्या आणि लोकर हा घरातील धंदा आणि बटाटे येथील विशेष वाखाणलेले पीक होय नद्या लहान लहान होत्या, लहान डोंगर होते सुबकशा झोपडीवजा बंगल्या होत्या वर सर्व कसे हिरवेगार शेतात लाकडाचे कुंपण व घोडे, मेंढ्या, गाई व मधूनमधून बदके. चौदा सप्टें-

बरला ट्रिनिटी कॉलेज डब्लीनचे पाहिले पधराव्या शतकातील या सस्थेत गेटनबीसारखे दशानिकाची नावे दिसली डब्लीनच्या मुख्य रस्त्यावर ब्रिटिशाशी जी झुज दिली त्याचे जागेजागेवर प्रतीक होते कडवा ब्रिटिश द्वेष अद्याप तरी दिसत होता सोळा सप्टेंबरला तेथील शेतकीमत्र्यांनी स्वागतसमारभ केला त्या भव्य इमारतीत इतमामाने मत्री आले आमच्या प्रत्येकाचे नामोच्चारण व हुद्दा आणि देश अनाउन्सर सागी आम्ही पुढे आल्यावर पहिले सौ मत्री व नतर मि मत्री यांचे हस्तांदोलन होई मी बद कोट व काळी टोपी परिधान केली होती बाईने पाहिले व म्हणाली, 'यु लुक डिफरट द टी व्ही स्कॉरपियन हीरो' लोक खूप प्याले व नतर माझ्याकडे पहात नाचू लागले

सतरा सप्टेंबरला खरेदी करण्यास मार्केटमध्ये गेलो सोबत अमेरिकन गृहस्थ होतेच भारतात इग्लिशचा ग्रॅजुएशनपर्यंत अभ्यास झाल्यामुळे तेथील कवी आणि लेखकाचा परिचय होता एका पुस्तकविक्रेत्याची पत्नी म्हणाली, 'तुम्हाला इग्लिश बरे येते' मी म्हणालो की, भारतीय तुम्हाला चागले इग्लिश शिकवतील ज्यायमीच्या स्मारकातून फिरून सुपर मार्केटमध्ये खरेदी केली

रात्रीला शेवटचा समारभ होता सायकाळी सहाला वेटर म्हणाला की, 'तुम्हाला साडेसातला खाली यावे लागेल' इतर मडळी सातलाच गेली मी खोलीतच होतो

साडेसातला भोजनालयात आलो वेटर मला लांब ठेवलेल्या टेबलाकडे घेऊन गेला हळूच त्याने अन्नावरील झाकण काढले मोठा केक आणि त्यावर विचवाची आकृती मी 'हा' म्हणताच सगळीकडे टाळ्या सुरू झाल्या सगळ्या अन्नावर विचू दिसले जेवताना पहिलेच चिक्कार प्यालेले लोक खिदळू लागले एकाने बारीक दोरी ओढली सर्रकन् विचू आला नांगी हलवू लागला ते सगळे 'हे.. हे ' करून खिदळावयाचे व माझी थट्टा करावयाचे नतर कळले की गेल्या चार दिवसात एका कपनीने लक्षावधी प्लास्टिकचे विचू तयार केले व बाजारात ठेवले तो रबरासारखा लवचिक विचू दोरीला बाधून टेबलावर ओढावयाचे व हसणे सुरू लोक किती प्याले याची सीमाच नाही 'विचवांनी परिषद गाजवली !' म्हणून टाळ्या पिटत बाहेर पडलो पण पिणे पुढे दिवाणखान्यात चालूच होते· वर आलो व पलगाखालील टॅकमधील विचवाकडे पाहिले सथपणे कोपऱ्यात पडले होते–

डब्लीन अठराला सोडले लडनला थोडी विश्राती घेतली तोपर्यंत युद्ध थाबलेले कळले पुढे रोमच्या विमानतळावर आश्चर्यच दिसले धावपट्टीवरून लांब नऊवारी साडी नेसलेली भारतीय स्त्री दिसत होती पुन्हा पुन्हा पाहिले या परदेशात नऊवारी पातळ ? लगबग जवळ गेलो 'काय साहेब–' मराठीत म्हणताच वळून पहाणारी व्यक्ती श्रीमत राखारे होती– सपत्नीक युरोपचा दौरा करत होते तिथूनच मग घराची आठवण येऊ लागली

स्टॉकहोम विमानतळावरून उड्डाण करून दुपारी अकरा वाजता हॉलंडच्या शुपोल-तळावर पोचलो आकाश ढगाळ होते व ॲमस्टरडॅमचे विमानतळ धुके आणि ढगानी आच्छादले होते. स्वीडनच्या तळासारखी झाडी जवळपास नसून भरती घालून उपसलेली जमीनच चोहीकडे दिसत होती विमान नेहमीप्रमाणे अगदी व्हरांड्यात थांबले होते व आम्ही लाल कारपेटवरच पाय ठेवले अगदी आत आल्यामुळे इमारतीची भव्यता दिसली नाही लांब पल्ल्याचे शिडीवजा लिफ्ट पार करत एका भव्य लाऊंजमध्ये येऊन आम्ही थबकलो एवढे मोठे लाऊंज ना लंडनला ना न्यूयॉर्कला कुठेही दिसले नाही डावीकडे रांगेने दुकाने होती त्यांच्यामागे फराळाची व्यवस्था दिसली उजवीकडे उतारू बसण्याची व पुन्हा डच चीज, चॉकलेट, सिगारेट आदींची दुकाने

जगातील सर्व विमानतळामध्ये शुपोलचे नाव तेथील दुकानदारीकरता प्रसिद्ध आहे इथे परदेशातील ड्यूटी फ्री वस्तू चिक्कार स्वस्त भावात मिळतात फाऊंटन पेन, अत्तरे, मदिरा, सिगारेट, रेशीम, लोकर, कॅमेरे, सिनेमामशीन, मोटारी, चॉकोलेट, टी व्ही, रेडिओ, घड्याळे, टेपरेकॉर्डर, टाईपरायटर अगदी सगळ्या वस्तू त्या दुकानात मिळतात या सर्व सामानाची यादी काऊंटरवर छापून ठेवली आहे व तेथे किंमती पण दिल्या आहेत हा चैनीचा व्यापार किंवा खरेदी करण्याला कैक हौशी प्रवासी शुपोलला हटकून येतात पण बरोबर डॉलर, पौंड किंवा स्कॅन्डीनेविन नाणी हवीत परकीय चलन मिळवण्याचे ते एक मोठे आकर्षक केंद्र होय. पारकर ५१ किंवा शेफर ६४ रु, रंगीत फिल्म ७ रु, ब्लॅक डॉग विस्की ४० रु., कमीत कमी किंमती असलेल्या मोटारीची रेनो ५०४० रु, फियाट ५९६० रु, सिट्रोन ७६७२ रु, फोर्ड १४०८८७ रु, फॉक्सवॅगन ७८८० रु व मर्सिडीझ बेंझ ३१०४८ रु सिगारेटसूपैकी स्टेट एक्सप्रेस फिल्टर २०० ला २० रु, टाईपरायटर

## मोन्याच्या गाडीत

रेमिंग्टन (१०४०) २५० रुपये अशा कितीतरी वस्तू स्वस्त दिसल्या, पण डॉलर आणि पौंड आणायचे कुठून ? दुकाने न्याहाळीत खाली आलो त्या देशाचे पासपोर्ट ऑफिस तिथेच होते. जवळपास पुलिस गोरे नव्हते इंडोनेशियन लोकांचा भरणा दिसला त्या देशाचा तात्पुरता विसा अवघ्या ५ मिनिटात मिळाला असे कुठल्याही देशात इतक्या लवकर होत नाही के एल एम एअरलाईनच्या रिसेप्शनिस्टची माझ्यावर नजर पडली 'शहर पहाणार काय ?' अशी विचारणा करत त्यातली एक तरुणी जवळ आली एक मिनी बस २०० मिनिटांकरता शहरात दर दोन तासानी सुटते व त्याचे तिकीट ८ डॉलर पडेल असे उत्तर मिळाले पण दाखवणारा कोण ? अशी पृच्छा केल्यावर 'एक अगदी तरुण मुलगी—ती पहा लांब उभी आहे—तीच बस चालवेल' असे उत्तर मिळाले मलातरी मागून ती 'फार तरुण' दिसत नव्हती एकदर तिकीट काढले व चॉकलेट, ब्रेड, कॉफी घेत तिथच बसलो

दुपारी एकला मिनी बस तयार आहे—' अशी घोषणा कानी पडली एक तरुण मुलगी 'चला, बसपर्यंत पोचविते—' म्हणून मला बसस्टॉपपर्यंत घेऊन गेली 'इथेच थांबा बस इथेच येईल—' सांगून ती निसटली १० मिनिटानी एक अगदी लहान पिजूगाडी —जिच्यात अवघे तीन प्रवासी बसू शकतील— माझ्याजवळ थांबली स्टीयरिंगवर ती मघाचीच मुलगी होती चला बसा—' म्हणत तिने गाडीचे दार उघडले 'पण बस ?' मी विचारताच 'हीच ती बस व मीच ड्रायव्हर मीच गाईड व माझे नाव मोन्या जोरडेन्स आहे' असे म्हणून ती मिस्किलपणे हसली 'पण इतर पॅसेजर्स कुठे आहेत ?' विचारताच 'आज एकच पॅसेजर असून ड्रायव्हर फार तरुण दिसत नाही' असा मला तिने टोमणा मारला मी पण जरा वरमलो

ती लहान लाल पिजू गाडी सुरू झाली व्हीलवर ती मुलगी व बाजूला मी एवढेच प्रवासी एका हाताने स्टीयरिंग फिरवीत व माझ्याकडे जरा बघून कुठे कुठे जाणार याची यादी मागितली तुम्हीच सांगा, काय काय दाखविणार ?' असे मी विचारताच तिने वस्तु संग्रहालय, प्राणिसंग्रहालय, बोट क्लब आदींची यादी दिली या तर मुंबईला पण आहेत मला त्या शहरातील अशी स्थळे दाखवा की जिथे जुजबी प्रवासी नेहमी जात नसतील

अरे वाऽह, तुम्ही एक आगळेच प्रवासी भेटलात माझे नाव मोन्या, आपले काय ? धंदा काय, कुठे असता ?' आदि प्रश्नाची सरबत्ती सुरू झाली एका हाताने स्टीयरिंग व एका हाताने आजूबाजूचा प्रदेश दाखवीत व बोलण्यासंगे हातवारे करीत ती गाडी हाकू लागली वयपरत्वे वेग पण जोराचाच होता अगदी लहान गाडी व एवढा वेग पाहून मी 'हळूहळू' म्हणत होतो 'काय भीती वाटते ?' म्हणत ती खिदळली 'पण का हो तुम्ही भारतातले— मग तुम्हाला जात असते ना तिकडे ?' मी 'हिंदु' म्हणताच 'हिंदु मधील मोठी जात मला माहीत आहे—सर्वात उच्च हिंदु म्हणजे शिख असतो', असे ठणकावून

तिने सांगितले मी थक्कच झालो कुण्या सरदारजीने हिला बनवले असावे

गाडी आता गावात आली सडका दोन होत्या मधून वाटसरू व सायकल स्वाराना मार्ग होते दुतर्फा उच्च हिरवी झाडे होती तीन किंवा चार मजली इमारती दोन्हीकडे होत्या मधून मधून नुकतेच बांधत असलेल्या कैक मजली इमारती दिसल्या त्या लाल कवेलुच्या जुन्या युरोपियन घरामध्ये विचित्रच दिसत असत डावीकडे वळण घेतल्यावर कालवे दिसले. त्यावर सुदर पूल दोन्हीकडून सडका, मधे कालवे, कालव्यात बोटी–दुतर्फा वृक्षराजी. मधे मधे जुने चर्च एक नवीनच दृश्य दिसत होते सडकेवर किंवा फूटपाथवर गर्दी नव्हती पण पुलावर लोक दिसते एक दोन ठेलेवाले पैण आले. इथे मात्र जाड लाकडी हिल व तळ असलेले जोडे घातलेले स्त्री–पुरुष, गळयात पोवळयाच्या माळा परिधान केलेल्या उच्च नाकाच्या मुली व स्त्रिया दिसल्या तोंडावर विशेष पावडर नव्हती, लिपस्टिक पण फारच थोडी दिसली पण प्रत्येक बाईच्या लाब फ्रॉकवर एक बिब दिसले त्या पांढऱ्याशुभ्र आवरणाखाली तो लालट पाढरा चेहरा, निळे किंवा हिरवे डोळे, गालावरील उच्च हाडाने विशेष खुलून दिसत होते मी मोन्याकडे पाहिले–पण तिने पावडर व लिपस्टिक बरीच वापरलेली दिसली बोटीच्या तांड्याजवळ गाडी उभी केली व चला बोटिंगला म्हणाली मी एकटे जाण्यास नकार दिला शिवाय बोटिंग पुष्कळ केले आहे म्हणत ' पुढे चला ', म्हणाली तिचा विचार जरा भटकून येण्याचा दिसला. एकदोन तरुण तिथे आलेच व त्यांच्या गप्पा सुरू झाल्या वेळ जात होता तरी मी उतरलो व पुलाजवळ आलो लांबून एक सूट घातलेला काळा सावळा गृहस्थ इकडे येताना दिसला त्याच्या डाव्या हातात हात घातलेली एक डच ललना होती मी सहजच ' मॉर्निंग म्हणालो ' आपण भारताचे काय ' अशी त्याने पृच्छा केली होय म्हणताच तो म्हणाला, ' मी डॉ सेन व ही माझी पत्नी हेलन या शहरी मी विश्वविद्यालयात प्राच्य विद्या विभागात शिक्षक आहे, चला आमचे घरी जेवण करूया ' भारतीय तशा स्थळी भेटताच मला जरा आनद झाला तोपर्यंत मोन्या परत आली व ' लेट अस गो ' म्हणत हेलनकडे पाहून स्मित हास्य केले. बस ! त्या हास्याने कळी खुलली नेहमीच्या प्रकाराप्रमाणे बायकांचे सभाषण सुरू झाले तीन चार मिनिटाने मोन्या बोलता बोलता जरा कचरली व खांदे वर करून हासली. हेलन ' ओ सॉरी ! ' म्हणाली तिला वाटले की मोन्या व मी असेच प्रवासी होत

खिदळत थट्टा करीत मोन्याने बोळाबोळातून गाडी हाकली व एका बोळाच्या टोकाला थाबून ' तुम्ही जा, मी पुढे येणार नाही–' म्हणाली. मी उतरलो तो काय ? अगदी फॅशनेबल कामाठीपुराच दुकाने भरगच्च भरली होती वर दिगबर ललनाचे चित्र व लिंगभोगाच्या सामानाची जाहिरात चोहिकडे फडकत होती चागल्या फॅशनेबल लाउजमधुन

रेमिंग्टन (१०४०) २५० रुपये अशा कितीतरी वस्तू स्वस्त दिसल्या, पण डॉलर आणि पौंड आणायचे कुठून ? दुकाने न्याहाळीत खाली आलो त्या देशाचे पासपोर्ट ऑफिस तिथेच होते जवळपास पुलिस गोरे नव्हते इंडोनेशियन लोकांचा भरणा दिसला त्या देशाचा तात्पुरता विसा अवघ्या ५ मिनिटात मिळाला असे कुठल्याही देशात इतक्या लव-कर होत नाही के एल एम एअरलाईनच्या रिसेप्शनिस्टची माझ्यावर नजर पडली 'शहर पहाणार काय ?' अशी विचारणा करत त्यातली एक तरुणी जवळ आली एक मिनी बस २०० मिनिटाकरता शहरात दर दोन तासांनी सुटते व त्याचे तिकीट ८ डॉलर पडेल असे उत्तर मिळाले पण दाखवणारा कोण ? अशी पृच्छा केल्यावर 'एक अगदी तरुण मुलगी--ती पहा लांब उभी आहे--तीच बस चालवेल' असे उत्तर मिळाले मलातरी भागून ती 'फार तरुण' दिसत नव्हती एकदर तिकीट काढले व चॉकलेट ब्रेड, कॉफी घेत तिथच बसलो

दुपारी एकला मिनी बस तयार आहे--' अशी घोषणा कानी पडली एक तरुण मुलगी 'चला, बसपर्यंत पोचविते--' म्हणून मला बसस्टॉपपर्यंत घेऊन गेली 'इथेच थांबा बस इथेच येईल--' सांगून ती निसटली १० मिनिटानी एक अगदी लहान पिजुगाडी --जिच्यात अवघे तीन प्रवासी बसू शकतील-- माझ्याजवळ थांबली स्टीयरिंगवर ती मघा-चीच मुलगी होती चला बसा--' म्हणत तिने गाडीचे दार उघडले 'पण बस ?' मी विचारताच 'हीच ती बस व मीच ड्रायव्हर मीच गाईड व माझे नाव मोन्या जोरडेन्स आहे' असे म्हणून ती मिस्किलपणे हसली 'पण इतर पॅसेंजर्स कुठे आहेत ?' विचारताच 'आज एकच पॅसेंजर असून ड्रायव्हर फार तरुण दिसत नाही' असा मला तिने टोमणा मारला मी पण जरा वरमलो

ती लहान लाल पिजू गाडी सुरू झाली व्हीलवर ती मुलगी व बाजूला मी एवढेच प्रवासी एका हाताने स्टीयरिंग फिरवीत व माझ्याकडे जरा बघून कुठे कुठे जाणार याची यादी मागितली 'तुम्हीच सांगा, काय काय दाखविणार ?' असे मी विचारताच तिने वस्तु संग्रहालय, प्राणिसंग्रहालय, बोट क्लब आदींची यादी दिली या तर मुंबईला पण आहेत मला त्या शहरातील अशी स्थळे दाखवा की जिथे जुजबी प्रवासी नेहमी जात नसतील

'अरे वाऽह, तुम्ही एक आगळेच प्रवासी भेटलात माझे नाव मोन्या, आपले काय ? धंदा काय, कुठे असता ?' आदि प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली एका हाताने स्टीयरिंग व एका हाताने आजूबाजूचा प्रदेश दाखवीत व बोलण्यासंगे हातवारे करीत ती गाडी हाकू लागली वयपरत्वे वेग पण जोराचाच होता अगदी लहान गाडी व एवढा वेग पाहून मी 'हळूहळू' म्हणत होतो 'काय भीती वाटते ?' म्हणत ती खिदळली 'पण का हो तुम्ही भारतातले-- मग तुम्हाला जात असते ना तिकडे ?' मी 'हिंदु' म्हणताच 'हिंदु मधील मोठी जात मला माहीत आहे--सर्वात उच्च हिंदु म्हणजे शिख असतो', असे ठणकावून

तिने सांगितले मी थक्कच झालो कुण्या सरदारजीने हिला बनवले असावे

गाडी आता गावात आली सडका दोन होत्या मधून वाटसरू व सायकल स्वारांना मार्ग होते दुतर्फा उंच हिरवी झाडे होती तीन किंवा चार मजली इमारती दोन्हीकडे होत्या मधून मधून नुकतेच बांधत असलेल्या कैक मजली इमारती दिसल्या त्या लाल कवेलुच्या जुन्या युरोपियन घरामध्ये विचित्रच दिसत असत डावीकडे वळण घेतल्यावर कालवे दिसले त्यावर सुंदर पूल दोन्हीकडून सडका, मधे कालवे, कालव्यात बोटी–दुतर्फा वृक्षराजी. मधे मधे जुने चर्च एक नवीनच दृश्य दिसत होते सडकेवर किंवा फूटपाथवर गर्दी नव्हती पण पुलावर लोक दिसते एक दोन ठेलेवाले पैण आले. इथे मात्र जाड लाकडी हिल व तळ असलेले जोडे घातलेले स्त्री–पुरुष, गळ्यात पोवळ्याच्या माळा परिधान केलेल्या उंच नाकाच्या मुली व स्त्रिया दिसल्या तोंडावर विशेष पावडर नव्हती, लिपस्टिक पण फारच थोडी दिसली पण प्रत्येक बाईच्या लांब फॉकवर एक बिंब दिसले त्या पांढऱ्याशुभ्र आवरणाखाली तो लालट पांढरा चेहरा, निळे किंवा हिरवे डोळे, गालावरील उंच हाडाने विशेष खुलून दिसत होते मी मोन्याकडे पाहिले–पण तिने पावडर व लिपस्टिक बरीच वापरलेली दिसली बोटीच्या तांड्याजवळ गाडी उभी केली व चला बोटिंगला म्हणाली मी एकटे जाण्यास नकार दिला शिवाय बोटिंग पुष्कळ केले आहे म्हणत ' पुढे चला ', म्हणाली. तिचा विचार जरा भटकून येण्याचा दिसला एकदोन तरुण तिथे आलेच व त्याच्या गप्पा सुरू झाल्या वेळ जात होता तरी मी उतरलो व पुलाजवळ आलो लांबून एक सूट घातलेला काळा सावळा गृहस्थ इकडे येताना दिसला त्याच्या डाव्या हातात हात घातलेली एक डच ललना होती मी सहजच ' मॉर्निंग ' म्हणालो ' आपण भारताचे काय ' अशी त्याने पृच्छा केली होय म्हणताच तो म्हणाला, ' मी डॉ सेन व ही माझी पत्नी हेलन या शहरी मी विश्वविद्यालयात प्राच्य विद्या विभागात शिक्षक आहे, चला आमचे घरी जेवण करूया ' भारतीय तशा स्थळी भेटताच मला जरा आनंद झाला तोपर्यंत मोन्या परत आली व ' लेट अस गो ' म्हणत हेलनकडे पाहून स्मित हास्य केले बस ! त्या हास्याने कळी खुलली नेहमीच्या प्रकाराप्रमाणे बायकांचे संभाषण सुरू झाले तीन चार मिनिटाने मोन्या बोलता बोलता जरा कचरली व खांदे वर करून हासली हेलन ' ओ सॉरी ! ' म्हणाली. तिला वाटले की मोन्या व मी असेच प्रवासी होत

खिदळत थट्टा करीत मोन्याने बोळाबोळातून गाडी हाकली व एका बोळाच्या टोकाला थांबून ' तुम्ही जा, मी पुढे येणार नाही–' म्हणाली मी उतरलो तो काय ? अगदी फॅशनेबल कामाठीपुराच दुकाने भरगच्च भरली होती. वर दिगंबर ललनांचे चित्र व लिंगभोगाच्या सामानांची जाहिरात चोहिकडे फडकत होती चांगल्या फॅशनेबल लाउंजमधुन

नुसत्या चड्ड्याच घातलेल्या व अगदी पावडरने बरबटलेल्या मुलीच दिसल्या त्यात युरोपियन, काही जपानी, काही इंडोनेशियन व काही निग्रो पण होत्या. मात्र कामाठीपुरासारखी गर्दी नव्हती मी वैतागून गाडीत परत आलो मोन्या 'कशी जिरली !' म्हणत हसत होती पुन्हा गाडी सोडली आता वस्ती जुनाट होती दुहेरी रस्ते नव्हते कालव्यात सामानवाहू बोटी दिसल्या अशा जुनाट भागातून एका दुमजली जुनाट घराजवळ आणले दगडाच्या शिड्या त्या घराला होत्या व बाजूला पितळेची रेलिंग जुने हिरव्या रंगाचे लाकडी दार व बाजूला पितळेची पाटी होती हे होते त्या देशातील प्रख्यात पेंटर रेम्ब्रां याचे जुने निवासस्थान आत मात्र गर्दी दिसली लोक अगदी यात्रेला जावे त्या भावनेने तिथे आले होते रेम्ब्राचे शयनागार, त्याचा दिवाणखाना, त्याचे जेवणघर आदि अगदी जसे जुन्या काळी होते तसेच ठेवलेले आढळले भिंतीवर त्यानी रेखाटलेली चित्रे लावली होती. आत काही पिक्चर कार्डस घेतली व बाहेर पडलो. मोन्या बाहेरच उभी होती जवळच एक हिप्पी दिसला त्याच्याशी मी संभाषण केले तो प्रिन्स्टन विश्वविद्यालयाचा पदव्युत्तर विद्यार्थी होता त्याने राणीच्या वाड्यासमोर दृश्य पहावे असे सुचविले त्या हिप्पीला पाहून मोन्याच्या कपाळावर आठ्या पडल्या 'यू वॉन्ट टू सी देम, कम ऑन—' म्हणत गाडी भरधाव सोडत खूप गर्दीतून काढत तिने राजवाड्यासमोर उभी केली इथे मात्र अगदी काळबादेवीसारखी रहदारी दिसली रस्ता पार करणे कठीणच होते डावीकडे उंच राजवाडा होता व समोर पटांगण होते. तिथे कबूतरे दाणे टिपत होती 'तिथे नाही, तिकडे' म्हणत तिने लांब गाडी उभी केली व दूर जयस्तंभ असलेल्या चबुतऱ्याकडे बोट दाखवत 'सा दि स्पेसीमेन ऑफ ह्यूमॅनिटी' म्हणाली मी चालत त्या स्तंभाजवळ गेलो त्या पायऱ्यावर अदमासे २०० हिप्पी–हिप्पीणी सामानासहित लोळत होते कुणी सिगारेट फुकत तर कुणी काही चघळत तर काही सहज हसत, कुणी गळ्याला बिलगून झोपलेले, तर कुणी आकाशाकडे पहात असलेले, असा हा हिप्पी समाज दिसला विचारून फोटो काढला साधू लोक जसे आशीर्वाद देतात तसे 'गो अहेड' म्हणाले सगळे कसे आळशी पारोसे पहुडले होते जग जणू काय त्यांच्याकरिता स्तब्ध झाले होते दिवसभर असे बसून काढावे रात्रीला जवळच्या कालव्यातील मचव्यात डेकवरच झोपून रात्र काढावी हा असा कालापव्यय होता या गर्दीत ब्रिटिश, जर्मन, फ्रेंच, स्कॅनडिवियन व अमेरिकन तरुण होते—पण रशियन दिसले नाहीत

मोन्या लांबच उभी होती मध्य रस्त्यातून इथे ट्राम चाले—पण मुंबईच्या ट्रामपेक्षा बरीच व्यवस्थित होती राजवाड्यासमोरील पटांगणात डच लोक उभे होते राणीबद्दल व राजघराण्याबद्दल बोलणे चालले होते खेड्यातून आले असावेत. जुन्या काळी कोल्हापूर, सांगली संस्थानातून राजधानीत आल्यावर प्रजा जशी बोले, करी त्याप्रमाणे—पण राजघराणे काही फार मोठे व अश्लाघ्य आहे अशी भावना नव्हती थोडे ऊन पडले व काही खेडून एकत्रित येऊन त्या प्रांगणात लोकनृत्य करू लागले दोघे ॲकॉर्डियन वाजवीत होते

व प्रेक्षक टाळ्या वाजवून साथ देत होते पुरुष व स्त्रिया इथ देशावरीचा पोशाख करून होत्या.

आता गाडी भर बाजारात आली सकाळच्या व्यापाराचे अवशेष एका जागी दिसले या विशिष्ट बाजारात कावड बांधून शेतकरी चीजचे गोळे विकावयास आणतो हा चीजचा ठोक आणि घाऊक व्यापार चालताना जुन्या भेटीगाठी तर होतातच पण नवीन ओळखी होऊन लग्ने जमतात

एका लहान बोळात शिरलो, गाडी थाबली त्या अधारबोळीत मला बनारसची आठवण झाली बाजूला तशीच दगडांची मोठी दुकाने होती ती पण फार धनिक व्यापाऱ्याची एका दुकानात तिने नेले हे एक ज्यू जवाहिऱ्याचे दुकान होते आफ्रिकेहून कच्चे हिरे आणून इथे त्याना कापून पैलू पाडण्याचा आलिशान कारखानाच होता मशीनने कापण व पैलू पाडणे चालू होते सर्व प्रकार व्यवस्थित सागितला कुतूहलाने किंमती विचारल्या कमीत कमी किंमत ५०० रु (एका नगाची) सागितली बारीक हिरकण्या कशा चकाकत होत्या ! मद प्रकाश केल्यावर त्याची प्रभा काही विशेषच दिसे भारतात श्री कन्याकुमारी देवीच्या नाकातले हिरे तेथील पणतीच्या प्रकाशात कसे लांबूनच चकाकतात. भारतात हिऱ्याना पलू पाडणारे सुरत आणि मुबई शहरी आहेत अशी माहिती मी दिली मुबईच्या एका मराठी व्यापाऱ्याचे नाव पण सागितले भारतीय पैलू व याच्या पलूतील फरक दाखविला व नतर आगठ्या, ब्रोच, चाप आदि दागिने समोर आले या दागिन्यांना सोन्यात मढवलेले दिसले पण प्रत्यक्षात हिरा प्रथम प्लाटिनमच्या कवच्यात ठेवला होता व हे कवच सोन्यात मढवले होते भारतात प्लाटिनमचे काम अद्याप सुरू झाल नाही।

बाजारपेठ ओलाडून फरशीच्या रस्त्यावरून रेस्तोरांत शिरलो अमस्टरडॅमची विशिष्ट प्रकारची केक आणि पाई मोन्याने ऑर्डर केली तेथील अन्नाचा गोडवा ती गात होती जवळपासचे ग्राहक मधुन मधुन आमच्याकडे निरखून पाहू लागले 'आय लाईक दी ईस्ट' म्हणत एक डच समोर आला अर्धे इंग्लिश, अर्धे डच बोलत हातवारे करीत हे राव जवळ आले मोन्याने समजूत घातली बहुतेक मदिरेच्या गुंगीत होता

जवळील काचेच्या दुकानातून कट ग्लासचे प्रदर्शन पाहिले माल मात्र मुबईपेक्षा महागच होता गाडी कालव्याच्या बाजूने जाऊ लागली पुढे शहराबाहेर आलो व बधाऱ्याने बंदिस्त शेती दिसली घरे तुरळकच होती व एक मजलीच होती विंडमिल्स दिसल्या, वाऱ्याने चालणारे हे पखे मागील बाजूस चाके चालवीत होते त्या चाकाद्वारे खालील शेतातील पाणी वर चढवीत होते कुठे कुठे गहू दळण्याच्या गिरण्या पण यावरच चालताना दिसल्या पाढऱ्या फ्रिलचे कापड डोक्यावर घातलेल्या, लाब फ्रॉकवर बिब लावलेल्या स्त्रिया उच खडावाचे जोडे घालून खांद्यावर लाकडी कावडी धरून चालल्या होत्या

लांब आकाशात आता शुभ्र ढग होते सूर्य पण डोकावू लागला होता. त्या विंड-

मिलच्या परिसरात नयनमनोहर रंगाचे ताटवे दिसू लागले. सगळी शेती नुसत्या ट्यूलिप फुलांची होती. पिवळ्या, लाल, निळ्या, जांभळ्या, केशरी, गुलाबी आदि रंगांचा शेतावर जणू गालीचाच पसरला होता. भूमितीच्या चौरवहीप्रमाणे लांबच लांब सुरेख सुंदर रंगाने भरलेली शेते किती नयनरम्य होती ! हॉलंडहून दरवर्षी काही कोटी रुपयांची फुले (ट्यूलिप) व त्याचे कांदे निर्यात होतात. हे फूल लहान जास्वंदी फुलाएवढे असून, पाकळ्या कडक असतात. घरात फुलदाणीत सात दिवस तरी फूल टिकते. भारतात चंदी-गढला एक मोठी गुलाबाची बाग आहे, तिथे पण सुंदर गुलाबांची फुले येतात— पण हॉलंडच्या टुलिपची शेते नुसती फुलेच दाखवितात.

आमची २०० मिनिटे संपली होती. गाडी विमानतळाकडे वळली. आता मोन्या गप्पा मारू लागली. डाव्या हाताने स्टीअरिंग धरून तिने चक्क माझ्यासमोर हात उघडला व 'हस्तरेषा काय सांगतात बघा तर—' म्हणाली. मी पण जरा आव आणला. हातात हात घेतला. नखे रंगलेली होती यामुळे 'मून' दिसेनात, नखाची परीक्षा करता आली नाही. आयुष्यरेखा जबर होती व शेवटी मत्स्य पण होता. शुक्राचा उंचवटा जबर होता. करंगळीखाली दोन चार रेषा दिसल्या. 'काय विचारावयाचे ?' मी म्हणालो. 'आयुष्य किती ?'—ती. 'ऐंशीच्यावर' मी. 'कमाई कशी ?' 'वयाच्या बाविशीपासून सुरू झाली'— 'पुढे कसे होईल ?' 'अस्स— लग्न या वर्षी झालेच असेल किंवा होणार'. 'पण मी लग्न करणार नाही,' ती. 'अशा बोलणाऱ्या मुलीच लग्नाला आतुर असतात—' 'बर मग कधी होईल ?'—'बाई, तुमच्या आयुष्यात या रेषेप्रमाणे चार तरी पुरुष नक्की आहेत व प्रयत्न सुरू झाले असतील.' 'मला लग्नाचे बंधन नको'— 'अगदी खरे, तुम्ही तर बंधनापलीकडे जाणार असे दिसते'—हस्त सामुद्रिक, नंतर देशादेशातील मानवाच्या कातडीचा रंग, डोळ्यांचा रंग, चालीरीती आदिवर चर्चा सुरू असतानाच तिने डोळ्यावर हात ठेवला व 'ओ गॉड, आय कान्ट ड्राइव्ह' म्हणत गाडी बाजूला घेतली व स्टिअरिंगवर डोके टाकले. मला वाटले की काही फीट तर आली नसेल. म्हणून हलवली. 'तिकडे बघा ॲक्सीडेंट, ट्रकखाली झाला आहे. मला— लहान मूल दिसत आहे— तुम्ही डॉक्टर आहात, त्वरेने तिकडे जा.'

ठीक ३०० फुटावर ट्रक थांबला होता. एक मूल समोर पडले होते. पण त्या रहदारीत कुणी आले नव्हते. मी झपाझप पावले टाकीत तिकडे जात होतो व मोन्या डच भाषेत 'डॉक्टर आले आहेत, दूर व्हा'— असे ओरडत होती. ट्रकच्या समोरील डावीकडील चाकापासून पाच फुटावर एक मूल रडत विव्हळत सडकेवर पडले होते. मी पटकन त्या मुलाचे डोके मांडीवर घेतले, नाडी पाहिली. ठीक होती. हातापायाची हाडे तपासली. दुःख नव्हते—तुटली नसावी. तोंडाला, ढोपराला, डोक्याच्या मागे बरेच खरचटले होते. जखम भारी नव्हती—पण मूल घाबरले होते. त्याची भाषा मला येत नव्हती पण मांडीवर डोके घेताच त्याची करुणा भाकणारी दृष्टी माझ्या दृष्टीस पडली. गालावरून हात फिरवला, डोक्यावरून, पाठीवरून मायेचा हात फिरवला व मुलाने रडणे कमी केले. आता

मात्र गर्दी झाली पोलिसच्या गाडीचे सायरन ऐकू आले. ड्रायव्हरला खाली बोलावले मुलाला त्याच्या खाद्यावर दिले व मोनाच्या गाडीकडे निघालो. जखमी मूल एकटक माझ्याकड न्याहाळीत होते लोकानी गर्दीतून मला वाट करून दिली 'आपण याच गावी रहा–आपण फार दयाळू डॉक्टर आहात'–असे बोलत होते मी गाडीत बसलो व मोन्याला सरळ विमानतळावर नेण्यास फर्माविले 'ओ यू आर सो फाईन'– म्हणत तिने गाडी सरळ शुपोलला आणली खाली आलो, तिने हस्तांदोलन केले 'आपणाला फिरविण्यास मला फार आनद झाला– मला पत्र लिहा व पुन्हा या' '–असे नेहमीच प्रत्येक ग्राहकाला म्हणत असाल–पत्र लिहीन–पण उत्तर पाठवाल ?'–मी विचारले 'नाही तुम्ही फार चागले आहात–' म्हणत तिने ओठावर बोटे ठेवून हवेत उडविली व 'बाय बाय' करत खिदळत निघून गेली–

✿

आतरराष्ट्रीय प्रदूषण परिषदेच्या अधिवेशनाला सन् १९७२ सालच्या जून महिन्यात गेलो होतो स्टॉकहोम येथील आमची परिषद १३ लाच सपली स्कँडिनेवियातील ऐतिहासिक व धार्मिक शहर अशी ' उपसाला ' या शहराची ख्याती आहे स्टॉकहोमपासून रेल्वेने ७५ मैल अतरावर हे शहर वसले आहे व मुबईप्रमाणे काम करणारे लोक त्या सुदर लहान शहरात राहतात व रोज स्टॉकहोमला गाडीने कामाकरिता यतात

सेट्रल रेल्वे स्टेशनच्या सबर्बन लाईनवर ती गाडी उभी होती प्लॅटफॉर्म होता– पण उची अगदी कमी असल्यामुळे डब्याच्या पायऱ्याच चढून जावे लागले प्लॅटफॉर्मवर ठेलेवाली लाब उभी होती व आईस्क्रीमची विक्री करीत होती याशिवाय गर्दी व आवाज दोन्ही कमीच होते ठीक पाच वाजता शीळ झाली व गाडी सुटली डब्यात सामान नव्हते अगदी सोफाटाईप बसण्याची जागा होती व त्या सहा सीटावर आम्ही दोघेच होतो त्या दुसऱ्या उतारूला इग्लिश जेमतेम येत असे व मला स्विडिश भाषेचा तर गधच नव्हता तो वर्तमानपत्र वाचू लागला मी बाहेरील दृश्य पाहण्यात आणि डुलक्या घेण्यात वेळ घालवू लागलो रेल्वेच्या दोहोकडे इलेक्ट्रिकचे खाब लाकडाचे होते टेलिफोनच्या तारा पण लाकडी खाबावरच होत्या शेती कशी हिरवीगार होती बारली– ( जव ) व एक प्रकारची राई– पिवळी फुले येणारी– दोन्ही बाजूला दिसली मुबई–पुणे मार्गावर पावसाळ्यात हिरवी शेते दिसतात त्याहून सुदर शेते येथे होती व चिखल कुठे दिसत नव्हता गुरे उघड्यावर चरताना दिसत नव्हती तसेच शेतात राबणारे शेतकरी पण तुरळकच दिसले शेतांच्या पलीकडे व मधून-मधून बर्च व पाईन वृक्षाची बने होती व लांब पर्वतराजी तिच्यावरसुद्धा पाईन वृक्षांची हिरवळ दाटलेली दिसली जेवढी शेती तेवढेच वन असा येथील शेतीविभागाचा नियम होता मधून-मधून गाडी तुरळक

## प्राचीन ऐतिहासिक शहर – उपसाला

स्टेशनावर थांबे प्लॅटफॉर्म अगदी लहान. स्टेशन अगदी बगलीवजा व मागे रस्त्यावर एक–दोनच मोटारी दिसल्या या देशात बसनेच प्रवास करण्याची प्रथा सुरू झाली आहे कारण मोटारीने प्रदूषण वाढून खर्च वाढतो कुठल्याही स्टेशनवर कुली नव्हता व ठेलेवाले विक्रेते नव्हते भारतातील ‘ पानबिडी, माचीस ’ ओरडणारे कुठेही दिसले नाहीत

सायकाळी ६ ला उपसाला स्टेशन आले प्लॅटफॉर्म लाब होता व वर छत पण होते पण डब्याच्या सगळ्या पायऱ्या उतरूनच खाली यावे लागे माझी बॅग जड व ती उचलण्याची सवय नाही– या सोबतच्या उतारूने बॅग उचलून आणली पहिलाच फोन गेला होता. त्याप्रमाणे डॉ एरिकसन आले होते ही वामनमूर्ति लेपलँड प्रातात जन्माला आली होती, व तीन वर्षापूर्वी स्वीडनहून जपानचा प्रवास कधी पायी तर कधी बसने त्याने एक महिन्यात केला होता बॅग त्यांनीच घेतली व स्टेशन ओलाडून टॅक्सी स्टँडजवळ आलो स्टेशनच्या बाहेर एक उत्तम कारजा होता तिथे चित्रविचित्र प्राणी कोरले होते पण मुख्य शिल्प एका विद्रूप मनुष्याचे होते तो नग्न असून त्याच्या शरीरा-पेक्षा त्याचे लिंग भयकर मोठे दर्शविले होते मी अवाक् होत ते न्याहाळत होतो. जवळच रगीबेरगी लेंगे, मॅक्सी फ्रॉक, लाब ब्लाऊज व टोपी परिधान केलेल्या मुली उभ्या राहून फोटो काढताना दिसल्या शिल्पाबद्दल कुठेच विकार दिसेना

टॅक्सीने दगडी बोळ आणि सडका पार करीत विश्वविद्यालयाच्या हॉस्टेलवर आलो आता जुनी वस्ती इथे सपली होती व आधुनिक इमारती दिसत होत्या वसति-गृहाच्या चौथ्या माळ्यावर एक खोली दिली होती लिफ्टची व्यवस्था नव्हती प्राध्यापक पाहुणे व अध्यापक यांच्या वहा खोल्या रांगेने असलेल्या दिसल्या खोली प्रशस्त, दोन खाटाची व बाथरूम बाहेर, मधील व्हरांड्यात होते खिडकी उघडली बाहेर चागलाच सूर्यप्रकाश होता, पण सायकाळचे सात वाजणार होते लाबवर लहान-लहान बगली, लॉन व सुबक बागाच्या रांगा दिसल्या

सायकाळची न्याहरी करायला खाली आलो कॅन्टिन कॉलेजला शोभेल असेच दिसले बरेच युवक–युवती फराळ करीत, मद्यपान करीत खिदळत बसले होते एका टेबलावर दोन स्वीडिश मुली होत्या समोर एक निग्रो व एक निमगोरा तरुण असून बाजूला पाचवी खुर्ची रिकामी दिसली त्या निमगोऱ्याला ‘ भारतीय ’ का ? विचा-ताच ‘ पाकिस्तानी ’ म्हणाला मग काय ! मी शुद्ध उर्दूत बोललो ‘ या बसा–’ म्हणाला मी कोण सागितल्यावर ओळखी झाल्या जेवण मागविले एक सुबक मुलगी त्या उस्मानला व्हिस्की आणि बीयर पाजण्यास छेडत होती मी विचारले, तेव्हा उस्मान म्हणाला ‘ इधरकी लडकियाँ ऐसी ही सताती है। खूब फी है। कभी कभी आदमी तग आ जाता है। ’ मीच शेवटी तिला बोलावून बीयर दिली रात्रीचा कार्यक्रम ठरवीत होतो गावात फिरायला चलावयाचे ठरले मी खोलीवर कपडे बदलीन व ३० मिनिटात मला बोलावतील असे ठरले. मी वर वाट पाहून रात्रीचे १०–३० झाले झोपण्याकरित

कपडे बदलले. इतक्यात दार उघडून ती मुलगी आली ' का चलत नाही ।' मी दोन तास झाल्याचा हवाला दिला ' आताचीच वेळ फिरण्याची आहे रात्री एकपर्यंत फिरू' माझा मूड पाहून तिथ मी जाळलेल्या उदबत्तीचा सुगध घेतला. देवाच्या फोटोकडे पाहिले व ' मी बघू का ?' म्हणत फोटो पाहिला ' मला पण योगाची आवड आहे पण आता ही डान्सिग हॉलकडे फिरण्याची वेळ आहे जमेल काय ?' मी नकार देताच ' प्लीज युवर सेल्फ ' म्हणत ती अठरा वर्षीय युवती वर एकटी आली व एकटीच परत गेली

सकाळी चारला झोप उडाली तेव्हा ऊन खूप आले होते दिवस तीनलाच उजाडतो जेमतेम सातपर्यंत निजलो व आन्हिक आटोपून सडकेवर आलो या गावात नऊच्या आधी हॉटेल, चहागृह काही उघडत नाहीत रस्त्यावर असलेल्या स्टॉल मशीनमध्ये नाणे टाकून दूध आणि ॲपल घेतले पण त्या थडीत ते थड पदार्थ घेणे कठीणच होते ऊन चागलेच होते पण उष्णता नव्हती नऊला एरिकसन आले. जवळच्या स्मशानभूमीतून प्रख्यात थडग्यांचे दर्शन घडवू लागले डाग हेमरशोल्डचे थडगे त्याच्या वडिलाच्या समाधीजवळ होते वडील स्वीडनचे पतप्रधान झाले होते अशा कितीतरी सुबक थडग्याचे दर्शन व कोरीव काम त्यांनी दाखविले चहूकडे गर्द झाडी उच वृक्षाची छाया लहान-लहान अरुद पायवाटा एकदोन फुलाचे ताटवे व बहुतेक समाधीजवळ पुष्पगुच्छाचे पुजके दिसत होते सुबकता होती पण भयाणताही दिसली रात्री काय होत असेल– असा विचार मनात आला तोच एरिकसन म्हणाले की, बहुतेक रात्री इथे कुणाला तरी कुणी भेटतोच भुताटकी नसावी पण गेलेले मृत आत्मे प्रकट होतात असे दिसते तरी पण सहजासहजी रात्री इकडे कुणी फिरकत नाही शेजाऱ्याना मात्र किंचाळणे, हसणे, रडणे बडबडणे मधून-मधून काळोख्या रात्री ऐकू येते.

स्मशानभूमीचे परिसर कैक एकर पसरले होते ते पार करून जवळील पुरातन चर्चच्या परिसरात शिरलो चोहीकडे झुडपे होती चर्चच्या समोर मात्र झुडुपाजवळ बऱ्याच पाच-सहा फूट उच शिला दिसल्या या शिलांवर दोन रेघा कोरून सर्पाकृती केलेली दिसली एका टोकाला पक्ष्याचे मुख होते त्या दोन रेघामध्ये बरीच अक्षरे एकाच ओळीत ठळक कोरली होती या अक्षरात मराठीतील त्र, न, प अशी बरीच अक्षरे होती. १००० वर्षांपूर्वी येथे जे रहिवाशी होऊन गेले, त्यांच्या थडग्यावरील ह्या शिला होत्या अद्याप या देशात हिवाळा सपला की, होळीप्रमाणे जाळ करतात येथील जुन्या इतिहासात सूर्य आहे त्याला 'सूल' म्हणतात येथे ओदेन व फ्रेग (Oden and Freg) अशा देवता होत्या थूर नामक देव रक्तवर्णी असून मेदिनी त्याचे शस्त्र होय त्या देवतेला लाल दाढी असून ओक वृक्ष त्या काळी पवित्र वृक्ष होता या थूर देवतेचा रथ मेंढी (मेष) वाहन युक्त आहे त्याने मेदिनीच्या हातोडीने सर्परूपी राक्षसाचा वध केला (भारतीय सस्कृतीत इद्राने वज्र घेऊन वृत्रासुराचा– सर्परूपी राक्षसाचा वध केला) हातोडीला विगन नाव असून सूर्यदेवाला उदेन– (उदयीन) पण नाव आहे या सूर्यदेवतेची स्त्री सिह– (Siv)

होय फग ही देवी होय जुन्या इतिहासात क्रिस्टास शब्द मिळाला या शब्दाची जवळीक कृष्ण या नजीक आहे काय, अशी एक कल्पना मनास चाटून गेली पुरातन काळी आर्य जाती इकडे आल्या त्यामुळे भारतीय सास्कृतिक शब्दात व भावनेत काही साम्य मिळेल काय हेच बघत होतो त्या 'रूमी शीला' हजार वर्षांपूर्वींच्या आर्य पूर्वजाच्या होत्या काय ? हा विचार पण मनात आला

या शिला ओलाडून चर्चमध्ये गेलो १५६० साली बाधलेली ही वास्तु अतिप्रचड व आदर निर्माण करणारी आहे आतल्या बाजूला सर्व जुन्या राजाची थडगी व वर त्याच्या प्रतिमा होत्या मध्ये त्या देशातील प्रख्यात पुरुषाचे थडगे व जवळच पुष्पगुच्छ ठेवण्याला पात्र होते तेथे डॉ कार्लव्हान लिनेस या प्रख्यात वैज्ञानिकाचे थडगे दिसले या वैज्ञानिकानी जीवाचे नामाधिकरण एका विशिष्ट पद्धतीने केले व या 'बायनामियल' नामपद्धतीने प्राणी व वनस्पतीशास्त्रात एकसूत्रता घडवून आणली चर्चच्या बाजूस जुन्या आर्चबिशपचा वाडा होता उपसाला विश्वविद्यालयाचा प्राचीन काली इथेच जन्म झाला बिशपचे शिल्प व त्यानी केलेल्या कार्याचा उल्लेख नमूद केलेल्या शिला इतरत्र पसरल्या होत्या. मी कुतुहलाने पहात होतो, पण एरिकसनच्या कपाळाला आठ्या पडत होत्या 'यानी वेड्या धर्मभावनेपायी मानवाच्या विचारशक्तीचा सपशेल खून केला–' तो म्हणाला चर्च ओलाडून जवळच्या टेकडीवर गेलो येथे भव्य भित असलेला एक पुरातन किल्ला होता या किल्ल्यावर अनेक ठिकाणी त्रिशूळाची चिन्हे दिसत होती (तसेच गावात पण कित्येक जुन्या इमारतीवर अशी चिन्हे होती) समोर एका उचवटयावर मोठी काशाची घटी होती रोज रात्री ९ ला दोरी ओढून ती वाजविणारे एक कुटुब अद्याप तिथे आहे याच्या पूर्वजांना हे कार्य करण्यासाठी जमीन-जुमला दिला होता घटा वाजविणे हा या कुटुबाचा पिढीजात हक्क आहे

टूरिस्ट बसने २० मैल हिरवे शेत पार करीत एका जुन्या घरी आलो या जुन्या घरामागे लहान टेकडी होती व समोर छोटीशी बाग. हे घर कार्ल व्हान लिनेसचे होते दोन शतके त्या घराची देखभाल लिनियन सोसायटी करीत आहे घरात शयनागार, भोजनशाळा, बैठक आदि खोल्या ज्या सामानानिशी दोन शतकापूर्वी होत्या तशाच व त्या सामानासह ठेवल्या होत्या प्रवेशद्वारावर लॅटिन भाषेत Innoeje unito numen adest हे वाक्य कोरले होते आपल्या देशात प्रख्यात ऐतिहासिक किंवा इतर व्यक्तीचे असे स्मारक कुठेच दिसणार नाही

आता दुपार झाली जीवरसायन विभागाचे डॉ एकर– (हे अमेरिकन होत) यांनी उपसालाजवळच घर थाटले होते रोज दुपारच्या जेवणाला ते ऑफिसहून घरी जात मला भोजनाचे आमंत्रण आले त्याच्या ऑफिसहून अनेक लॉन क्रॉस करीत जवळपास पाऊण मैल चालत आम्ही बस पकडली (बहुतेक वाहतुकीला बस वापरतात) डोंगराळ प्रदेश, हिरव्या जगलामधून, लहान लहान वस्तीतून ही बस १० मैल गेली तिथे

उतरून पुन्हा झपाझप अदमासे पाऊण मैल चालून त्यांचे घरी आलो डॉ एकर रोजच लंचला असे घरी येऊन कामावर परत जातात हे अंतर पाहून मी चकितच झालो भारतात इतक्या लांबून पायी व बसने कुणी लंचकरिता जाताना दिसले नाही घरी पोचल्यावर लाबूनच त्यांच्या दोन किशोर बालिका (माली आणि सोनिया) धावत आल्या वडिलानी चुंबन घेतल्यावर मला बिलगल्या घरी पाहुणा येणार हे त्याना कळले होते इकडे घरे लांबच लांब त्यामुळे संपर्क कमी असतो मुलाना असे कुणी आले की, छान वाटते मी सोनियाला-- (सोनिया ६ व माली ४ वर्षाची) वर उचलले, मुका घेतला ती सारखी हसून हसून खूप खूप बोलत होती मला त्यातील एक शब्दही कळत नव्हता ( कारण भाषा स्विडिश ) तरी 'गुड,' 'फाइन,' 'देट्स इट्' आदि शब्द वापरून खूप माया केली मला खेळण्याला पाचारण करीत होती लपालपी सुरू केली हे सगळे प्रवेशद्वाराशीच चालले होते आईने हाक मारली व मुलगी माझे बोट धरून आईकडे घेऊन गेली 'माइन होहेन हेर' म्हणून आईची भेट घातली आई शुभ्र-- (ब्लाँड) केसवाली स्विडिश ललना होती व उत्तम इंग्लिश तिला येत असे शिवाय सोशॉलाजी, एन्थ्रोपॉलॉजी विष याची ती एम ए होती मग काय, डॉ एकर राहिले एकीकडे व हिने 'ओरिएंटल' विषयावर सारखी प्रश्नमाला सुरू केली थिऑसाफीचा तिचा चागला अभ्यास होता रामायणातल्या व महाभारतातल्या गोष्टीची तिला आठवण होती कितीतरी विचारपूस झाली डॉ एकर म्हणाले की, जेवण होऊ द्या व परत जाऊ द्या ती विवश होऊन जेवण आणू लागली बागेतच एका लॉनवर छत्रीखाली चार खुर्च्या व टेबल होते पहिल्याने बीअर झाली नतर दहीभात, काकडी, गाजरची डिश झाली मोठा फ्रेंच ब्रेड व बटर, ऑरेंज, ज्यूस झाले सोबत लाल तापविलेले (बटर नसलेले) दूध चिक्कार प्यालो व शेवटी भाडे भरून त्या थडीत आईस्क्रीमवर ताव मारला

पुन्हा प्रश्नाचा भडिमार सुरू झाला देव व दानवांची उत्पत्ती, इंद्र, अग्नि, सूर्य, अहि, वृत्रासूर आदींची नावे, सूल, ओदेन, थोर, फ्रेग, विगन आदि शब्दाचा अर्थ, मेष वाहन असलेल्या दाढीवाल्या देवतेबद्दल माहिती आदि कितीतरी गोष्टी सुरू झाल्या भारतात असा वादविवाद मी केला नव्हता मी चांगला रगून गेलो डॉ एकर म्हणाले, 'चला, कामावर जायचेय--' मिसेस एकर दुःखी होऊन 'ओ नो' म्हणत उठल्या व मी दुःखित मनाने त्या भारतीय संस्कृतीच्या आठवणीचा निरोप घेतला माली आणि सोनियाचे मटामट मुके घेतले मुली सोडीनात-- अगदी मेन रोडपर्यंत फर्लांगभर बडबड करीत सोबत आल्या आपल्या भाषेत 'पुन्हा या--' म्हणत बिलगल्या व डोळ्यात आसवे आणून 'अच्छा--' म्हणत निरोप दिला

त्या जीवरसायनशास्त्र विभागातूनच काही नोबेल पुरस्कार विजेते चमकले डॉ पोराथ त्या विभागाचे प्रमुख होते डाळी व कडधान्य यातील अपायकारक किण्वे शोधीत होते भारतातील कडधान्याची नावे व धान्ये त्यांना हवी होती सर्पविषाच्या प्रमुख

किण्वाचे संशोधन आमूलाग्र त्या प्रयोगशाळेत झाले होते ती अत्याधुनिक लॅबोरेटरी दाखविण्यात आली दुपारी ३ ला दुसऱ्या दिवशी माझे भाषण झाले. विषय होता, 'सर्पविष व किण्वे' डॉ पोराथने माझी ओळख करताना माझी एवढी तारीफ केली– मला कसेसेच वाटले. हा एवढा प्रख्यात वैज्ञानिक माझी मुक्त कंठाने प्रशंसा करीत होता सन १९६७ साली ब्राझील येथील सावोपालो शहरी याची व माझी भेट झाली आम्ही एकत्रच जेवलो तेव्हा त्यांनी आपल्या प्रयोगाची माहिती दिली होती. मुंबईला पण एक ओझरती भेट त्यांनी दिली एक उत्कट इच्छा होती की, त्या नोबेल पुरस्कार देणाऱ्या प्रयोगशाळांना भेट द्यावी तिथे विचारविनिमय करावा– ते स्वप्न साकार झाले होते

डॉ पोराथ मला घरी घेऊन गेले त्याची पत्नी घरी नव्हती मुलाने व मुलीने स्वयंपाक केला सायंकाळी ६ ला जेवण घेतले मी शाकाहारी म्हणून गाजर, टोमॅटो, बटाटा, लाटूस, मटार, फ्लावर व कोबी याची गडगंज रास होती ब्रेड बटर संगे ती खावी दूध चिक्कार होते, फळे होती व आईस्क्रिम खूप खूप बोललो उपसाला चर्च-आकृतीचा एक रुमाल भेट दिला मी त्याना पितळेचे फ्लॉवर पॉट, पुंगीवाल्याचे चित्र व मुलीला जरीचा रुमाल दिला हॉस्टेलपर्यंत डॉ पोराथ चालत आले. 'संशोधन मिळून करू तुमचे विद्यार्थी येथे येऊ द्या व आम्ही आमचे पाठवू' आदि बोलले– पण मला इथली परिस्थिती ज्ञात होती म्हणून चूप होतो पुन्हा भेटू म्हणत अगदी हॉस्टेलच्या पायरीपर्यंत आले हाती एक पाकीट पण दिले मी त्याना रामराम केला पाकीट उघडले खोलीभाडे व भोजनखर्च विश्वविद्यालयाने दिला होता पचवीस डाईश मार्क वरील खर्चाला व 'कम अगेन' ची स्लीप होती

दुसऱ्या दिवशी सकाळी टॅक्सी बोलाविली भाषा समजेना म्हणून जवळच्या बालिकेस पाचारण केले या देशात हायस्कूल वर्गात इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, रशियन, स्पॅनिश, इटालियन व लॅटिनपैकी कोणत्याही चार भाषा अवश्य शिकाव्या लागतात यामुळे बहुतेक तरुणांना इंग्लिश, रशियन, फ्रेंच व जर्मन– (स्वीडिशशिवाय) सगळीकडे समजते टॅक्सीने स्टेशनला आलो व उभ्या असलेल्या बसमध्ये सामान ठेवले वेळ होता म्हणून फोटो काढू लागलो तो परिसर स्टेशनजवळचा होता बाहेरील तो भव्य कारंजा दिसला एकीकडे तो नग्न पुरुष व दुसरीकडे नग्न स्त्री (दोघेही कुरुप) कोरलेली होती अंग तोकडे पण लिंग अतिभव्य, पण कुणाला ते खटकले नाही कुणी तिकडे लक्ष दिले नाही लेपलॅंडहून आलेल्या चित्रविचित्र रंगीत वस्त्र परिधान केलेल्या तरुणी तिकडे फिरत होत्या. काही तरुण बॅंजो वाजवीत होते व एकदोन जोडपी नृत्य सुरू करणार होती तशात बसने भोंगा वाजविला मी त्या तरुणांकडे नजर फेकली ब्रिटिश व अमेरिकन तरुणापेक्षा याचा रंग निराळा कोरीव नाक, हिरवे-निळे बुबुळ असलेले डोळे, सडपातळ बांधा हे दिसले– रुमी शिलेची आठवण आली व एक विचार आला, 'हेच काय आर्यांचे वंशज ?'

५

लडनचा विमानतळ एक भव्य प्रतिष्ठान होय विमान अगदी तेथील व्हरांड्यात थाबवितात एका खोलीतून भव्य सजविलेल्या दालनात जाण्याचा भास होतो आमचे 'धवलगिरी' नामक विमान तसे थांबले अगदी दाराशेजारीच लाऊडस्पीकरवर माझे नामोच्चारण ऐकू आले. तसा मी एकटाच होतो, पण मुबईहून शिकागोला जाणारी एक डॉक्टर महिला मध्यतरी भेटली होती व तिची इच्छा होती की कुवेतला टेपरेकॉर्डर घ्यावा तिथे विमानातून खाली येण्याची मनाई होती जिनिवा किंवा पॅरिसला चेनल ३० नामक सुगधी सेन्ट तिने घेतले होते व लडनला बहिणीकडे दोन दिवस थाबणार होती. सोबत (तिच्या) वर्षाचे लहान मूल पण होते हा आतरराष्ट्रीय प्रवास तिने प्रथमच केला किती जरी शिक्षण झाले तरी वेळेवर येणारी हिम्मत काही इतर गुणावर अवलबित असते, याचे प्रात्यक्षिक मला तिथेच मिळाले

लाऊडस्पीकरच्या आवाजानुसार आम्ही लाउजकडे वळलो माझे सामान तर होतेच व ते मूल पण माझ्या खाद्यावरच होते लाउजमध्ये स्टूवर्डने खबर दिली की दुसऱ्या विमानतळाची बस सुटणार आहे व मी झपाझप चालून ती पकडावी आता मला कुणालाच मदत करता येईना मूल परत दिले व पुढे पावले टाकली मोठ्या घरच्या मुली, कष्ट करण्याची सवय नाही आता सामान आणि मूल सभाळणे कठीणच झाले 'अब मेरा कैसा होगा' 'हार्ट बीट जल्दी गिर रहे है' आदि वाक्ये ऐकू आली जेमतेम मुख्य लाउजपर्यंत गेलो काउटरवर तिला बसविले व पुढे जाऊ लागलो, 'अच्छा डॉक्टरसाब, अब कैसा होगा?' म्हणत ती अश्रू टिपू लागली

या विमानतळावर कैक चालणाऱ्या पायऱ्या आहेत व कैक स्थळी चालणाऱ्या पट्ट्या आहेत उभे रहा की चालत्या पट्टीने आपण पुढेच चालतो झपाझप चालताना अतर सपा-

सप कापता येते, याचा उपयोग करीत खाली आलो बस माझीच वाट पाहताना दिसली 'कम ऑन सर, वी विल बी लेट' म्हणत ड्रायव्हरनेच मला वर घेतले व एक मैलाची चक्कर घालून दुसऱ्या इमारतीत सोडले पण इथे पाहिले तर विमान तब्बल दीड तास लेट तिथे लाउजमध्ये चार-पाच मुली लहान मुलाबाळांसह प्रवासाला एकटयाच निघा-लेल्या दिसल्या सामान तर होतेच व बाळांचे संगोपनसाहित्य पण होते पाठीवर मूल व झोळीत सामान व झोळया खांद्यावर, शिवाय हातात बॅगा होत्याच कसे विरुद्ध चित्र दिसले !

स्केनडिनेवियन एअरलाइन्सचे विमान आले एअर होस्टेस फारच चुटपुटया दिसल्या परदेशी पाहुण्याना एकजीव करण्यात पटाईत ब्लेझरचा कोट होता व मुबईच्या पुलिस-प्रमाणे डोक्यावर टोपी पण होती विमान सुरू होताच प्लॅस्टिक बॅग्स दिल्या गेल्या त्यात होते भाजलेले शेंगदाणे पिण्याची गाडी आली बियर आणि सोडावाटर तथा ॲपल ज्यूस फुकट होते दूध पण चागले दिसले एअर इडियाच्या विमानापेक्षा येथील आतली व्यवस्था बरी दिसली दाणे सपत आले व जेवणाची तयारी सुरू झाली मी शाकाहारी अशी नोंद केली होती. त्याप्रमाणे सलाडसगे जे मासे होते ते काढून 'कोशिंबीर' आली पुलाव राईस चागला दिसला त्यात बदाम, काजू, किसमिस, पिस्ते, मटार व फ्लावर यथेच्छ असून भाताला केशराचा सुगध येत होता पेलाभर गोडे दही (योगर्ट) बाजूला होते इतर प्रवाश्यानी मदिरा घेतली पण मी घेतलेले दूध चागले तापून लाल केलेले होते स्वादिष्ट—पण अल्प चरबीचे दिसले शेवट पुडिंग आणि आईसक्रीमने केला व तोपर्यंत आमच्या विमा-नाने स्केन्डीनेवियाचा किनारा गाठला

मी कैक देशातील विमानस्थळे पाहिलीत, पण स्वीडनचे काही औरच आहे विमान दुनर्फा हिरवेगार जगलामधून जाताना खाली येते कुठेही घरे नाहीत उच वृक्षराजी व शात वातावरण विमानतळाची इमारत जेमतेम एक मजलीच दिसली लाबच लाब पडवी व आडोशाला ती इमारत होती पण लाबून जरी एक मजली दिसली तरी पलिकडे कडा दिसून ती तीन मजली आढळून आली कस्टम्सचे काम अवघे दोन मिनिटात आटोपले झालो लाऊडस्पीकरवर पुन्हा माझे नाव ऐकू आले इथे कुली' नाहीत चोहीकडे स्त्रियाच ! विचार करतानाच एक सोळा वर्षाची मुलगी आली व 'कॅन आय हेल्प यू?' म्हणत माझी ती जड बॅग तिने सहज उचलली 'आपण तो निरोप घेऊन या मी सामाना-कडे लक्ष देते' म्हणत सामानाचा ताबा घेतला एमिग्रेशन पुलिस करीत सात मिनिटे लागली एअर इडियाचा फोन होता श्री गिल मला शहरात बसस्टॉपवर भेटणार होते प्रत्येक भारतीयाला परदेशात काही मदत हवी असेल तर एअर इडिया ती देते आपल्या वकिलातीत प्रवेश जरी मिळाला तरी कुणी बोलावयाला धजत नाहीत त्या मुलीने ती जड बॅग चारशे यार्ड उचलून नेली व मला बसमध्ये बसविले तिला डॉलर देऊ लागलो, 'मी मदतनीस आहे माझे कर्तव्य केले माझ्या देशात तुमचे स्वागत केले आता खूप दिवस

रहा एवढीच विनंती आहे' म्हणत ती 'ग्रीटा गारबो' उंच भरदार रेखीव नाक, हिरवे डोळे, सडपातळ बांधा व खादा हलवित स्मित हास्य करीत निघून गेली

बस तब्बल तीस मैल चालली रस्त्याच्या दुतर्फा पाईन, बर्चचे वन होते मधून थोडीफार शेती दिसली एक दोन शेतकऱ्यांची घरे पण गेली पण जितक्या जमिनीत शेते तितक्या जमिनीत जंगल प्रत्येक शेतकऱ्याने पेरले होते जूनचा महिना होता, पण शेते कशी गर्द हिरवी! लांब क्षितिजापर्यंत मेघाच्छादित स्वच्छ आकाश, कुठे धुरळा नाही, कुठे कचरा नाही एक आगळेच दृश्य होते हळुहळू शहर येऊ लागले टेलिफोनच्या तारा लाकडाच्या ओंडक्यावरच होत्या विजेचे दिवे पण लाकडाच्या खांबावर दिसले जुनी विटाची घरे लागली एक कारखाना पण लागला मधून मधून बागा दिसत. या बागातून कारंजे विपुल होते. स्टॉकहोमजवळील एका कारंजसमुहात मानवशिल्प गुंफलेले आढळले पण सर्व नग्न मूर्ती होत्या रस्त्यावर डांबर नसून दगड आणि लाकडाचे ठोकळे दिसले ते पार करीत उंच मिनारदार इमारती व जुने दगडी वाडे ओलांडीत स्टेशनजवळ आलो बस थांबली प्रत्येकाने आपापले सामान उचलले तिथे एअर इंडियाचे श्री गिल भेटले सामान घेऊन टॅक्सीकरता किंवा पुढील बसकरिता क्यू करावा लागला त्याची व्यवस्था एक स्त्रीच करीत होती टॅक्सीवाला तुटक्या इंग्लिश भाषेत बोले, पण ती स्त्रीपुलिस व्यवस्थित उच्चारण करीत होती. श्री. गिल यांच्या सांगण्यावरून तिने आम्हाला पोहचविण्याचा संबंध नकाशाच ड्रायव्हरला काढून दिला तिथून आम्हाला अठरा मैल दूर ग्रेनिज स्टीफटगार्डला जावयाचे होते कालवे, पूल पार करीत मधून मधून फोन करून मार्ग काढीत एका गर्द झाडीत गाडी शिरली. दोन किलोमीटर या गर्द झाडीतून गेल्यावर अगदी खाडी किनाऱ्यावरील टेकडीवर आमचे एकमेव हॉटेल होते. सामान खाली आणताच व्हिस्कीची बाटलीच फुटली 'गुड लक, गुड लक' म्हणत रिसेप्शनिस्ट बाहेर आली एकमेव कार्यकारी म्हणजे ती बाईच होती कुली नाही, दारवान नाही, वॉचमन नाही ती एकटीच दिसली माझी खोली तळमजल्यावर होती सही करून सामान नेले खोलीला एक दार आणि विरुद्ध बाजूला संबंध काचेची खिडकी तिथून खाली जंगल, लांब वृक्षराजी व लागूनच समुद्र (खाडी) होता लहान लहान पडाव फिरत होते पक्षीगण कलरव करीतच होते व बाहेर प्रकाश अधिक होत होता घड्याळात सहा वाजले

जेवणाची वेळ झाली वरील हॉलमध्ये दोन टेबलावर मोठ्या प्लेटस्‌मध्ये अन्न, दोन भांड्यात पेय, बाजूला ब्रेड बटर. स्वतः घ्यावे व बाजूच्या टेबलावर बसावे त्या हॉटेलमध्ये ६० खोल्या होत्या पण जेवणखोलीत अवघ्या दोनच वेट्रेस व नजर ठेवणारी ती रिसेप्शनिस्ट पुरुष कर्मचारी तेव्हा दिसलेच नाहीत अधून मधून एकादी चक्कर त्यांनी मारली बाथरूमचे पाणी गरम केले एवढेच पुरुषदर्शन जेवणात बटाटे, गाजर, अंडी, मटनपीस, सूप, केक, सालाड व एपल ज्यूस आणि दूध होते जेवढे लागेल तेवढे हाताने घ्यावे पण जेवण तीस मिनिटात संपले पाहिजे, कारण त्या मुलींना १८ मैल घरी

जायचे असते

जेवण करून बाहेर आलो व जंगलातील पायवाटेने फिरून आलो सगळ्यांच्या ओळखी केल्या तरी बाहेर प्रकाश होताच व रात्रीचे नऊ वाजले होते साडेनऊला सपर. म्हणजे चहा किंवा कॉफी आणि बिस्कीटे रात्रीचे १०–४५ झाले तरी बाहेर प्रकाशच होता थकवा होता म्हणूनच झोपलो झोप येईना डोळे उघडले तरी बाहेर प्रकाश रात्रीचे ११–३० झाले खिडकीवर पडदा टाकला व पहुडलो पुन्हा झोप उघडली बाहेर ऊन आले होते पण घड्याळात सकाळचे ४ वाजले होते ५ ला तर चांगलेच उन्ह व पक्ष्यांचा किलबिलाट उत्तर स्वीडनला जून महिन्यात अवघा एक तास अंधार असतो. लँड ऑफ मिडनाईट सन ' असे लेपलँडला संबोधिले जाते

सकाळी आंघोळीची सवय होती स्नानघर २५ फुटावर होते पुरुषांचे वेगळे आत लाकडाची फर्शी व वर दोन कारंजे. एक थंड व दुसरा गरम पण ओळीने चार ' दिगंबर ' आंघोळ करीत ब्रेकफास्ट सकाळी ८ पासून सुरू त्याच दोन मुली, तीच टेबले तिथे ब्रेड, बटर, अंडी, कधी मांसे, पारीज, टोस्टीज, चहा कॉफी दूध स्वत वाढून घ्यावे व टेबला-वर लांब बसावे त्या मुली स्वयपाक, सामान ठेवणे, खोल्या स्वच्छ करणे, आदि सर्व कामे करीत. स्वीडनला कामगाराची उत्तम संघटना असून कामाचे तास ठराविक आहेत पगार पण भरभक्कम या मुलींना महिन्याकाठी ५००० रुपये मिळत होते या देशात उद्योग नाही असा स्वीड मिळणार नाही पण महागाई चिक्कार होती साधी केळी घेतल्यास केळ्यामागे ८ पडले

ब्रेकफास्ट घेऊन वर आलो हॉलच्या व्हरांड्यात चिक्कार गर्दी होती कितीतरी टेलिव्हिजन, रेडिओ व वर्तमानपत्राचे बातमीदार कॅमेरे घेऊन आले होते जागतिक प्रति-निधी म्हणून आम्ही तीस देशाचे मेंबर हॉलमधे शिरलो हॉलच्या कडेने चारी बाजूने टेबल होते, त्यामागील खुर्च्यांवर बसलो त्या कड्याच्या मध्ये टेपरेकॉर्डिंग, स्टेनो व सेक्रेटरिएटचे कर्मचारी होते प्रतिनिधीत विएटनामहून एक भिक्षू आला होता त्याच्यासोबत तिथूनच निसटलेली व पॅरिसमध्ये वास्तव्य करणारी त्या देशाची महिला होती. रशिया व झेकोस्लो-वाकियाखेरीज सगळ्याच देशाचे प्रतिनिधी होते मुख्य भाषा इंग्लिश, फ्रेंच व स्वीडीश या होत्या कानाला इयरफोन प्रत्येकाने लावले होते समोर तीन बटणे होती कोणत्याही भाषेत (तीन) भाषण झाले व आपणाला ज्या भाषेत समजेल ते बटण दाबावे की त्या भाषेत ताबडतोब केलेले भाषांतर ऐकू येत असे भारतातून मी होतो व पाकिस्तानातून डॉ. चौधरी त्या कैक भाषेतील मेळाव्यात आमच्या हिंदी व उर्दूने चांगली मैत्री साधली मी, चौधरी व इजिप्तचे डॉ बराकत जवळ आलो त्या दहा दिवसात घरच्या, देशाच्या व आंतरराष्ट्रीय गोष्टी आमच्या भाषेतच आम्ही एकमेकांशी बोललो एका अमेरिकन वैज्ञा-निकाने बॉम्बिंगचा परिणाम त्या देशावर झाला याबद्दलचा पेपर वाचला व या विध्वंसाला या मीटिंगमध्ये ' इकोसायडल वारफेयर ' (निसर्गविध्वंसक युद्ध) असे नामाधिकरण

दिले हे नाव प्रथमच उपयोगिले व त्यानंतर जगभर प्रचारात आले आमच्या मीटिंगचा गोषवारा स्वीडनच्या पंतप्रधानाना टेलिफोनने व वायरलेसने जात असे या स्वीडिश पंत-प्रधानाचे नाव 'ओलाफ पामी' असे आहे त्यांच्या नसात भारतीय रक्त आहे हे ऐकून आम्हाला आश्चर्य वाटले प्रख्यात कम्युनिस्ट कार्यकर्ते पामीदत्त यांनी एका स्वीडिश मुलीशी लग्न केले होते ही बाई अपत्याला घेऊन स्वीडनला राहू लागली नवऱ्याची आठ-वण म्हणून तिने मुलाचे नामाधिकरण ओलाफ पामी असे केले. या पंतप्रधानाना भारता-बद्दल फार आस्था आहे बांगला देशाच्या युद्धात मदत म्हणून पैसा तर शरणार्थींना दिला पण स्टॉकहोमला भारतीय संगीत आदींची रेलचेल केली श्रीमती इंदिरा गांधींचे त्यांनी भव्य स्वागत केले पण युनायटेड नेशन्सच्या पहिल्या मीटिंगच्या उद्घाटनासमयी त्यानी चक्क उच्चारले, 'प्रदूषणाबद्दल बोलणे व्यर्थ आहे जोपर्यंत महान राष्ट्रे "इकोसायडल वॉर-फेयर" चालू ठेवत आहेत तोपर्यंत हे महान कलंकित लांच्छन चालूच राहील" अमेरिकेला फार राग आला या भाषणाच्या नंतर एक तासाने अमेरिकन राजदूत पामीदत्त यांना भेटले व हा राग व्यक्त केला पण श्री पामीदत्त यांनी स्पष्ट मत दिले की, आपल्या देशात आपले स्पष्ट मत देईन इतर राष्ट्रांना हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.

कॉन्फरेन्स डेंडांग (जागतिक बांधवता) या संस्थेतर्फे सुरू झाली प्रथम फिल्म, टेलि-व्हिजन, रेडिओ याचे थैमान झाले व त्याना बाहेर काढल्यावर चार गट तयार करण्यात आले पहिला गट कारखानदारी व प्रदूषण दुसरा गट साम्राज्यवाद आणि तिसरा गट प्रदूषण, निसर्गविध्वंसक युद्ध व प्रदूषण, व चौथा गट प्रदूषणाची मीमांसा पटापटा रेडिओ, टेलिव्हिजनचे फोटो झाले व आम्ही गटागटात गेलो तरी एन् बी सी, सी बी सी, बी बी सी, कॅनेडियन प्रसारण, फ्रेंच प्रसारण यांच्या प्रतिनिधींने माझी तब्बल दीड तास मुलाखत रेकॉर्ड केली. भारतातील प्रदूषण परिस्थितीपासून प्रश्न सुरू झाले व ते नेहमीच्या वळणावर गेले राजनीतीपासून मी दूर झालो व शेवटची ४० मिनिटे समाज, अस्पृश्यता, धर्मभोळेपणा व शेवटी सर्व आलेच प्रश्न विचारणारे किती वाचून आलेले होते याची कल्पना मला उत्तर देताना झाली नायजेरियाहून एक स्त्री-सभासद आली होती तिला मात्र रोजच प्रश्नाचा भडिमार होत असे

आमच्या मीटिंगप्रमाणे क्लब ऑफ रोमच्या मीटिंग दुसरीकडे गावात सुरू झाल्या. वियतनामबद्दल चिनी मदतीने तेथील भीषण परिस्थितीचे भयानक चित्र प्रदर्शन भरलेले होते १५ × १० फूट मापाचे भव्य चित्र भिंतीवर फोटोग्राफरूपाने सत्य चितारले होते वर प्रे निक्सन हसत आहेत व बाजूला एक अमेरिकन सैनिक वियतनाम सोजिराचे नुसते मुंडके व हात (इतर शरीरभाग कापून दूर केलेले) एका हातात धरून एका पायाने खाली पड-लेल्या प्रेताला लाथाडत आहे वर शीर्षक आहे–'What are you laughing of Mr Nixon ?' (निक्सन, आपण कशाबद्दल हसत आहात ?) जपानमधील मिनामाटा रोगाने पीडिलेले, बोटे वाकलेली व वेडी मुले प्रदर्शित केली होती हा रोग पाण्यात पारा गेल्या-

वर मासे आदि प्राणी तेथील (खाल्ल्यावर) बहुतेक जपानी कामगारांना मिनामाटा खाडी-जवळील कारखानदारीत झाला होता तेलाची कारखानदारी, धातूचे खनिज उत्पादन या-मुळे झालेले जमिनीचे प्रदूषण, तसेच जगल तोडल्यावर उपाशी मरणारे शाकाहारी प्राणी टाहो फोडत आहेत जमिनीची धूप होत आहे मिलमधील धूर शहरातील हवा कशी दूषित करते किंवा नदीत सोडलेले रसायन मासे, खकडे, झिंगे यांचा नाश कसे करते आदींची कैक भव्य प्रदर्शने होती

स्वीडिश सरकारने प्रतिनिधींना ३००० लहान सायकली गावात प्रवास करण्याला दिल्या मोटार प्रवासामुळे प्रदूषण होत आहे ही त्याची भावना प्रवासाकरता बसेस चागल्या होत्या, तरीपण भारतातील काही मन्त्र्यानी गाडी घेतली अशा तीन मर्सिडिझ बेंझ गाड्या त्यांच्या तैनातीत होत्या व त्याना चांगले इजिनिअरिंग कॉलेज विद्यार्थी हाकीत व जवळ-पास १५०० रुपये महिना (ड्रायव्हर म्हणून) घेत

आठ दिवस आमच्या बैठकी झाल्या सगळ्यांचा सारांश प्लेनरी सेशनमध्ये ठरवला व एकमताने ठरलेले विचार आमच्या नेत्यांनी युनायटेड नेशन्सच्या तिथेच भरत असलेल्या कॉन्फरन्समध्ये प्रकट केले व त्याची जनरल असेंब्लीमध्ये नोंद झाली शेवटच्या दिवशीचे स्टॉकहोममधील खुले अधिवेशन देखण्यायोग्य होते सगळ्या प्रेसला खुले होते बोलण्याला उठताच लांबलचक बाबूतील ध्वनीग्राहक सरळ डोक्यावर येत असे सिनेमा फिलममधे जसे ध्वनिक्षेपण केले त्याचीच आठवण झाली त्याच दिवशी अमेरिकेहून रेड इडियनचे एक पथक आले आमचे वशविच्छेदन होत आहे ही त्याची तक्रार. अगदी देशी कपडे घालून पिसे लावून भाषणे होत होती एवढी भव्य प्रेसकॉन्फरन्स मी तेव्हाच पाहिली

दुपारी कटाळून बाहेरील वर्तमानपत्राच्या दुकानात मासिक घेण्यास गेलो. ती चाळ-ताना व यादा पहाताना उत्तम प्लास्टिकने मढवलेल्या कपाटात न्याहाळले तर काय, तिथे स्पष्ट फोटोग्राफीची रेलचेल होती बाजूच्या फूटपाथवरील रेस्टॉरंटच्या खुर्चीवर बसलो व चहा-कॉफी मागितली जवळच एक निग्रो ललना भेटली अदमासे, २६ वर्षांची असेल उत्तम इंग्लिश बोलत होती त्या चित्रांबद्दल व चित्रपटाबद्दल विचारले ती फिलाडेल्फियाची होती व इथ स्वीडिश सरकारने तिला बहकलेल्या मुलीवर देखरेख करण्याला नेमले होते दुसऱ्या दिवशी तिला या प्रश्नाबद्दल विचारणा करावी म्हणून चहाचे आमत्रण दिले ती निग्रो ललना चहाला आली तिने आकडे दिले २५ टक्के मुली वयात येताच स्वतत्र होतात लग्न करू नये अशीच पहिली भावना असते हा 'सग' होतो स्वतत्र वाण्याने फिरतात मुले झालीच तर शासनातर्फे ऑर्फनेज आहेतच पण भावना एकच खूप मजा करावी स्वतत्र वागावे तेथील पोरनोग्राफीची मासिके किंवा सिनेमा तरुणांकरता नसतात म्हातारे', ज्याचे वय झाले किवा परदेशाचे टुरिस्ट—जिथे सोवळेपणा खूप आहे, त्याच्याचकरता आहे.

इथे इतके स्वातंत्र्य आहे की या प्रकाराची जरूरच नाही एकदा पोटभर जेवण झाले की तो किंवा ती दुसरीकडे कशाला बघेल अशीच तिची भावना होती

कारज्याच्या पार्कमधून ट्यूलिप फुलांच्या ताटव्यातून तिने फिरवले दुपारी खुशाल बेंचवर लोक झोपा घेत होते पार्कमधून तरुण-तरुणी दिसल्या नाहीत नग्न शिल्पाकडे कुणाचे लक्ष गेले नाही सेन्ट्रल स्टेशनच्या आत सब-वेमध्ये मला बसवत तिने हस्तांदोलन केले व गाडी सुटताच ओठांवर हात ठेवून हवेत उडवून मला निरोप दिला

स्टॉकहोमच्या प्यॉलेंडा विमानतळावर आमची बस पोचली मला कोपनहेगला जाव-याचे होते तळावर येताना मला विमानकंपनीच्या इमारतीचा वरचा मजला लहान वाटला पण इमारतीपाशी पोचलो तेव्हा दोन मजली तळघरात एक भले मोठे उपाहारगृह आणि सुसज्ज मार्केट पाहून आश्चर्यचकित झालो स्वीडिश कटग्लास (पैलूदार काचपात्रे) जगात प्रसिद्ध आहेत या दुकानात साधा लहान पेला पधरा रुपयाना होता फराळाला वर गेलो एका केळ्याला आठ रुपये पडले एक केळ घेतल्यावर अधिक खाण्याची इच्छाच नष्ट झाली

बाहेर लाऊजमध्ये पत्रे लिहित वनश्री बघत असतानाच एस ए एस कपनीचे विमान उतरले. बाराला विमान सुटले व नेहमीप्रमाणे शेंगदाणे व पेये देण्यात आली कार्ल्सबर्ग नावाची डेनिश बीर फार प्रसिद्ध आहे या बीर कपनीने अनेक विश्वविद्यालयांना आर्थिक मदत केली आहे या मदतीचा विद्यार्थ्यांना पुष्कळ उपयोग होतो बीरचा घोट घतला व होस्टेसने मेनू कार्ड दिले भोजन सपेपर्यंत कोपेनहेगन शहर दिसू लागले मुब-ईच्या मरीन ड्राईव्हसारखा पण बराच लांब समुद्र दिसला

कस्टमने अवघ्या दोन मिनिटात काम सपवले एक क्रौन देऊन ढकलगाडीतून सामान पुढील पडवीत आणले माझे एक मित्र डॉ मागेन लुड कार घेऊन उभे होते गाडीतून खाडीतील पाण्याने भरलेल्या जमिनी दाखवत, नवीन पूल ओलांडत त्यानी मला बाजार-पेठेत आणले आणि मिशन होटलवर सोडले ते माझा निरोप घेत असताना मी त्याना एक ब्लॅक-व्हाईटची बाटली दिली फार खूष झाले 'कपडे बदला मी सहाला येतो आणि घरीच भोजन करण्यास नेतो' असे म्हणत ते गेले

होटलच्या आठव्या मजल्यावर बाथरूमसहित चांगली खोली होती स्नान केले नि कपडे बदलून बाहेर पडलो त्या होटलजवळच टाऊन हॉल होता त्या हॉलसमोरचे भले

## व्यक्तिस्वातंत्र्याची पराकोटी

इथे इतके स्वातंत्र्य आहे की या प्रकाराची जरूरच नाही एकदा पोटभर जेवण झाले की तो किंवा ती दुसरीकडे कशाला बघेल अशीच तिची भावना होती

कारज्याच्या पार्कमधून टच्यूलिप फुलाच्या ताटव्यातून तिने फिरवले दुपारी खुशाल बेंचवर लोक झोपा घेत होते पार्कमधून तरुण-तरुणी दिसल्या नाहीत नग्न शिल्पाकडे कुणाचे लक्ष गेले नाही सेन्ट्रल स्टेशनच्या आत सब-वेमध्ये मला बसवत तिने हस्तांदोलन केले व गाडी सुटताच ओठावर हात ठेवून हवेत उडवून मला निरोप दिला

स्टॉकहोमच्या प्यॉलेंडा विमानतळावर आमची बस पोचली मला कोपनहेगला जावयाचे होते तळावर येताना मला विमानकंपनीच्या इमारतीचा वरचा मजला लहान वाटला पण इमारतीपाशी पोचलो तेव्हा दोन मजली तळघरात एक भले मोठे उपाहारगृह आणि सुसज्ज मार्केट पाहून आश्चर्यचकित झालो स्वीडिश कटग्लास (पैलूदार काचपात्रे) जगात प्रसिद्ध आहेत या दुकानात साधा लहान पेला पधरा रुपयांना होता फराळाला वर गेलो एका केळ्याला आठ रुपये पडले एक केळ घेतल्यावर अधिक खाण्याची इच्छाच नष्ट झाली

बाहेर लाऊजमध्ये पत्रे लिहित वनश्री बघत असतानाच एस ए एस कपनीचे विमान उतरले बाराला विमान सुटले व नेहमीप्रमाणे शेंगदाणे व पेये देण्यात आली कार्ल्सबर्ग नावाची डेनिश बीर फार प्रसिद्ध आहे या बीर कपनीने अनेक विश्वविद्यालयाना आर्थिक मदत केली आहे या मदतीचा विद्यार्थ्यांना पुष्कळ उपयोग होतो. बीरचा घोट घतला व होस्टेसने मेनू कार्ड दिले भोजन सपेपर्यंत कोपेनहेगन शहर दिसू लागले मुबईच्या मरीन ड्राईव्हसारखा पण बराच लांब समुद्र दिसला

कस्टमने अवघ्या दोन मिनिटात काम सपवले. एक क्रौन देऊन ढकलगाडीतून सामान पुढील पडवीत आणले माझे एक मित्र डॉ मागेन लुड कार घेऊन उभे होते गाडीतून खाडीतील पाण्याने भरलेल्या जमिनी दाखवत, नवीन पूल ओलांडत त्यानी मला बाजारपेठेत आणले आणि मिशन होटलवर सोडले ते माझा निरोप घेत असताना मी त्याना एक ब्लॅक-व्हाईटची बाटली दिली फार खूष झाले 'कपडे बदला. मी सहाला येतो आणि घरीच भोजन करण्यास नेतो' असे म्हणत ते गेले

होटलच्या आठव्या मजल्यावर बाथरूमसहित चागली खोली होती स्नान केले नि कपडे बदलून बाहेर पडलो त्या होटलजवळच टाऊन हॉल होता त्या हॉलसमोरचे भले

मोठे पटांगण फरसबद होते पाऊस नुकताच थांबला होता सूर्य ढगामागून डोकावत होता. पटांगणात डॅनिश स्त्री-पुरुष गावठी रंगीत कपडे घालून गोळा झाले होते. एकाएकी व्हायोलिनच्या तारेवर कुणीतरी अलगद गज फिरवला आणि दोन जोडपी टाळ्या वाजवून व्हायोलिन-अॅकॉर्डिनच्या साथीने गाऊ लागली वीस-पंचवीस जोडप्यांनी हातात हात धरून फेर घालण्याला सुरवात केली सामूहिक नृत्य जोशात सुरू झाले आणि बघे टाळ्या वाजवून ताल देऊ लागले

रस्त्याच्या पलीकडून मी ते दृश्य पाहात होतो नृत्य इतके तालबद्ध व लयबद्ध होते की, मी पण पायाने ठेका देऊ लागलो माझे ठेके पाहून एका डॅनिश गृहस्थाने मला हात धरून तिकडे नेले आता पंचाईत झाली मला डॅनिश भाषा कळत नव्हती तो गृहस्थ मला सामुहिक नृत्यात भाग घेण्यास सांगत होता तेवढ्यात बघ्या लोकांनी हात धरून माझ्याभोवती कडे केले माझेही हात धरण्यात आले पायाचा ठेका, हाताची टाळी देत, गिरकी घेत हे कडे त्या नाचणाऱ्या जोडप्याभोवती फिरू लागले मुली पण पाळीपाळीने जोडीदार घेऊ लागल्या मला माझ्या रंगाची व नवशिकेपणाची कीव येत होती एक मुलगी जवळ आली व आता फुगा फुटणार असे मला वाटत असताच पाऊस आला व माझी सुटका झाली

पावसामुळे फूटपाथवर बाजूच्या गल्लीत आडोशाला उभा होतो पाऊस तसा जोराचा नव्हता तरी कपडे भिजणे योग्य नव्हते उभे राहून उजवीकडे दृष्टी फेकली तो काय ! लखलखणाऱ्या नियॉन साइनच्या पाट्याखाली झगमगणारी आणि विविध रंगातील दर्शनी चित्रांनी सजविलेली पुस्तकाची दुकाने हारीने उभी असलेली दिसली ही दुकाने लहान होती पण सोज्वळ प्रकाशातील मोठ-मोठ्या कापडाच्या, काचेच्या, औषधांच्या दुकानांच्या रांगेतून ती उठून दिसत होती पाऊस थांबताच तिकडे गेलो त्या नियॉन लाईटखाली नग्न स्त्री–पुरुषाची खरीखुरी रंगीत चित्रे होती ! दुकानात पुस्तकाचे साठे शिगोशीग भरलेले होते पण पुस्तके पाहणारे मध्यमवयीन किंवा वयस्करच दिसले बहुतेक परदेशी प्रवासीच होते डॅनिश तरुण–तरुणींपैकी कुणी त्या दुकानात दिसले नाही पुस्तक चाळावयाला परवानगी होती एकदोन हाताळली तो काय, ती पांढऱ्याशुभ्र गुळगुळीत आर्ट पेपरवर छापलेली शुद्ध संभोगाची सचित्र गाथाच होती. भारतात वात्स्यायनाच्या कामसूत्राकडे व नग्न चित्राकडे सोवळे लोक तिरस्काराने पाहतात पण इथल्या पुस्तिका हजार पटीने भडक होत्या त्या पुस्तिकात हरतऱ्हेच्या संभोगाची, लिंग-चुंबनांची वर्णने असलेली रंगीत छायाचित्रे तर होतीच, पण स्त्री आणि कुत्रा, कुत्रा आणि कुत्री, गाढव आणि गाढवीण यांच्या मैथुनाचे अस्सल फोटोग्राफ्सही होते केवळ पुस्तकेच नव्हेत, तर ज्याच्या आवरणावर संभोगाचे फोटो होते, अशा आगपेट्या, पेन्सिली रायटिंग पॅडस् इत्यादी वस्तूही तेथे भरमसाट किंमतीला विकत होते २० पानी पुस्तक २५ रुपयाला विकले जात होते. चाळीस रुपयाची खरेदी करणाऱ्या ग्राहकांना दुकाना-

वरच्या गॅलरीत पचवीस मिनिटांचा टेक्निकलर सिनेमा फुकट दाखविण्यात येई. या सिनेमा-तही संभोगाशिवाय दुसरे काही नव्हते मी जरा अस्वस्थच झालो—पण साडेपाच वाजत होते म्हणून हॉटेलवर परतलो

डॉ लुड मला घेण्यास तीन मुलांसह आले मुलीला मी हस्तिदंताचे डूल व रेशमी रुमाल दिला मुलांना नेसल्स चॉकलेट बार दिले. मुले खुश झाली आणि त्यांच्यात कुज-बूज सुरू झाली ते डॅनिशमध्ये बोलत व मी ' गून ' ' झेरगूत ' करीत मान डोलवत होतो गाडी गावातून चालली होती उजवीकडे समुद्र होता व डावीकडे टुमदार बगले होते मरीन ड्राईव्हची आठवण झाली, पण बगले व जुने वाडे किती सुबक होते ! मधूनच जगला-सारखी गर्द हिरवी झाडी लागली मोठ-मोठे वृक्ष दूरवर पसरलेले दिसले गर्द झाडीच्या पलीकडे तेथील राजपुत्राचा वाडा होता राजपुत्राने त्या इवल्याशा जगलात हरिणे सोड-लेली होती गर्द झाडीतून चित्रविचित्र रगाच्या फुलांचे किती तरी ताटवे डोकावत होते उजवीकडे समुद्राच्या पैलतीरावर स्वीडनचा किनारा दिसत होता समुद्रात किती तरी पडाव व बोटी फिरत होत्या

हिरवळ, फुले आणि वृक्ष याची रेलचेल होती पधरा मैल गेल्यावर छोटचाशा झाडामागे आमची मोटार थांबली तेथील घराची रचना अशी की, भोवताली झुडपे व वृक्षराजी, त्यामागे झाकलेले लाकडी किंवा निमकौलारू घर रात्रीचा आठचा सुमार होता पण सूर्य आकाशात अद्यापही चकाकत होता दारातच श्रीमती लुड स्वागताकरिता उभ्या होत्या त्यानी अस्खलित इग्लिशमध्ये माझे स्वागत केले प्रथम भेटीतच त्यांना जरीकाठी रेशमी स्टोलची (उत्तरीय) भेट दिली बेहद्द खुश झाल्या ' थँक यू, थँक यू ' चा जपच चालविला

स्वयपाक तयार होता आम्ही सहाजण त्या गोल टेबलाभोवती बसलो मी प्रथम कार्ल्सवर्गचा आस्वाद घेतला ' फार्मफूड ' चा म्हणजे शाकाहारी भोजनाचा बेत होता प्रथम सूप आले पण नतर चिकनची प्लेट आलेली पाहून चकित झालो ती पाहून मला मुबईच्या एका जेवणाची आठवण आली

त्याचे असे झाले एका स्विस गृहस्थाने मला आणि माझ्या गुजराथी मित्राला मुबईच्या एका बड्या हॉटेलमध्ये भोजनाला बोलाविले. ' तुमच्यासाठी शाकाहारीच बेत करू—' असे आश्वासन दिले होते पहिला कोर्स भज्याचा होता माझ्या गुजराथी मित्राने ' शाकाहारी का ?' असे विचारून दोन भजी खाल्ली. दुसरा कोर्स त्या वेटरने एका भल्या मोठ्या परातीन आणला तो भात होता त्यावर लाल, पिवळा, हिरवा, गुलाबी स्वादिष्ट रग पट्ट्यापट्ट्याने पसरला होता, पण मध्येच वर दोन तगड्या डोकावत होत्या माझ्या गुजराथी मित्राने पुन्हा विचारले,

' शाकाहारी ?'

बॉय म्हणाला, ' हां सर '

'पण मग त्या तगडचा कसल्या ?'

'त्या ना ? कोंबडीच्या कोंबडी व्हेजिटेरियन असते, मटण मांसाहारी समजतात वेटर म्हणाला

हातगाडीवर पाणीपुरी खाणाऱ्या माझ्या मित्राने विचारले,

'मग भजे कशाचे होते ?'

'झिंग्याचे–' असे निर्विकारपणे उत्तर देऊन आदबीने वेटर मान लववून सथपणे निघून गेला माझ्या मित्राच्या पोटात ब्रह्मांड गुरगुरू लागले

डॉ लुडच्या घरी मात्र मला काही तसे झाले नाही चिकनखेरीज उत्तम दूध, भात तीन-चार उकडलेल्या भाज्या, घट्ट दही, साजूक लोणी, उत्तम ब्रेड हे सर्व होते शेवटी फ्रूट सॅलाड आले क्रीम आणि आईस्क्रीमसहित त्यावर ताव मारला

जवणानतर मुलानी शाळेतील कविता गायिल्या कवितात सूर्याची प्रार्थना होती (सूर्याला सून म्हणाले) भारतातील देवांच्या प्रार्थनेप्रमाणे ती प्रार्थना होती. पटापटा कपडे बदलून मुले 'गुड–नाईट' म्हणत आत गेली श्रीमती लुड यांनी थिऑसॉफीचा अभ्यास केला होता हिंदू सस्कृतीबद्दल त्याना फार आस्था होती डॅनिश लोक आर्य आहेत याचा त्याना अभिमान वाटत होता इद्र, वरुण, वृत्रासूर, अग्नि, मेदिनी आदींबद्दल डॅनिश भाषेत तसेच शब्द होते डेनमार्क हा शब्द 'धेनुमार्ग' नावाचा अपभ्रंश असेल ही माझी कल्पना त्याना आवडली देवाधर्माच्या खूप गप्पा झाल्या

मध्येच मी त्या सभोगचित्राच्या चोपडयाबद्दलची त्याची प्रतिक्रिया काय होते हे पाहू लागलो त्या बाई स्पष्ट बोलल्या त्या म्हणाल्या,

'ती विक्री परकीय चलन मिळविण्याकरिता आहे डेन्मार्कमध्ये इतके व्यक्ति-स्वातंत्र्य आहे की, कोणालाही केव्हाही कुणाशीही सबध ठेवता येतो, तहान लागली–पाणी प्यावे, भूक लागली–अन्न घ्यावे, तसेच कामपूर्तीची गरज भासली की ती भागवावी लहान-पणीच तसे शिक्षण दिले जाते यामुळे तृप्त असलेले तरुण त्या दुकानांकडे ढुकूनही पाहात नाहीत'

भारतात खजुराहोच्या किंवा काही जुन्या वास्तूत स्त्री-पुरुष शृगाराची व सभो-गाची शिल्पे व चित्र आहेत दौलताबाद किल्ल्याच्या बाहेरील परिसरातील शिल्पापकी एका शिल्पात स्त्रीचा सभोग गाढवाशी होताना कोरला आहे वेरूळच्या प्रमुख शिव मदिराच्या (कलास शिल्पाच्या) डावीकडे एक कोरीव देऊळ आहे त्या देवळाच्या दारा-वरच कडकडून चुबन घेत असलेले जोडपे दिसते जगन्नाथपुरीच्या देवालयाच्या मागील बाजूला अशीच सभोगशिल्पचित्रे आहेत पण त्या देवालयात पूज्य भावनेने जो जातो त्याचे लक्ष अशा शिल्पाकडे नसते तो उपाशी नसतो. नास्तिकतेचा खोटा आव आणणारा एखादा पाखडी देवाकडे बघणार नाही–पण शिल्पाकडे डोळे विस्फारून अवश्य पाहील कारण तो कामवासनेमुळे वखवखलेला असतो. मुबईला ज्या ब्लू फिल्म्स किंवा नग्न

छायाचित्रे चोरटेपणाने दाखविली जातात त्यांचे ग्राहक असेच भुकेलेले किंवा रिकामटेकडे असतात

कामप्रेरणा नैसर्गिक आहे पण ती आटोक्यात राहावी, समाज सुरक्षित राहावा, समाजव्यवस्था बिघडू नये म्हणून धर्माने काही बंधने घातली लग्न ही संस्था त्या बंधनापैकीच होय डॉ. बोलीयोने तर लग्नसंस्थेला ‘ व्हिपलॅश ऑफ सोसायटी ’ (समाजाचा चाबूक) असे नाव दिले आहे अलीकडे महाराष्ट्रात ‘ सखाराम बाईंडर ’ किंवा नुकतेच झळकलेले ‘ वासनाकांड ’ या नाटकांनी खळबळ माजविली. लिंगवादी वाङ्मय म्हणून या नाटकाची संभावना झाली पण लेखकांनी व टीकाकारांनी कामप्रेरणेचा, लिंगाचा किंवा या जीवशास्त्राचा अभ्यासच केलेला नाही एक शारीरिक भाग व त्याची नैसर्गिक गरज या दृष्टिकोनातून कुणीच यासंबंधी विचार केलेला नाही सजीवात निर्जीवाहून वेगळी मूल्ये आढळतात सजीवाची पहिली निशाणी ही की तो हलतो, त्याची आतून वाढ होते व तो स्वत:ची प्रतिमा निर्माण करतो–ज्यामुळे त्याची जात या सृष्टीत टिकते कामप्रेरणेच्या प्रबल मूल्याभोवती समाजाने धर्माची, नीतीची, नात्याची, शिष्टाचाराची अगणित आवरणे घातली लिंगवादी म्हणून गाजलेली नाटके वस्तुत: या वरच्या आवरणापाशीच घुटमळत आहेत

सुंदर स्त्री तलम वस्त्र परिधान करून चालली की, तिच्या सूचक सौंदर्यामुळे प्रशंसेचे, कुतूहलाचे शृंगारिक भावनांचे लोट पाहणाऱ्याच्या मनात येतात पण ती स्त्री जर रस्त्याने नग्न जाऊ लागली तर याच पाहाणाऱ्यांना ते दृश्य किळसवाणे वाटेल. एकाने लिहिले आहे की, ‘ वुमन ड्रेसेस फाईनली विथ ए डिझायर टू बी अन्ड्रेस्ड् ’ (आपणाला कोणीतरी विवस्त्र करावे या मनोमन इच्छेने स्त्री मोहक वस्त्रभूषा करीत असते ) हा पहाणाऱ्यांच्या मन:स्थितीचा परिणाम होय अविकसित मनाचे विकार असेच कोठे कोठे प्रकट होतात मी गतवर्षी अमेरिकेच्या अटलांटा शहराच्या विमानतळावर होतो विमानाकडे भुयारी मार्गाने निघालो उकाडा होता म्हणून मी कोट काढला व त्याची घडी डाव्या हातावर टाकून चालू लागलो आणखी काही पादचाऱ्यांनी तसेच केले. पण एका षोडशवर्षीय ललनेने चक्क ब्लाऊझ व बॉडीस काढून हाती घेतला व वक्षस्थळ उघडे करून भराभर चालू लागली तिच्याकडे कुणी लक्ष दिले नाही भारतात असा प्रकार घडला असता तर केवढा गहजब झाला असता वस्त्राखाली सगळेच नग्न असतात–पण पाहाणाऱ्यांचा संकुचित वा मोकळा दृष्टिकोन, मनाचा कोतेपणा वा मोठपणा वा समाजाचे दडपण वा मोकळीक यामुळे अशा घटना निषेधार्ह वा उपेक्षणीय ठरतात

असे विचार डॉ लुड याच्याकडे त्या रात्री झालेल्या गप्पागोष्टीत व्यक्त झाले रात्री बारानंतर मोटारीने हॉटेलवर परत आलो त्या गल्लीतील नियॉन लाईट जळतच होते आणि त्या दुकानात ग्राहक जातच होते

दुसऱ्या दिवशी सकाळीच डॉक्टर लुड आले व मी त्यांच्या पेस्ट कंट्रोल प्रयोग-

शाळेत गेलो तेथे उदरावरील प्रयोगाचे निरीक्षण केले अनेक खोल्या भरून उदीर ठेवले होते दुपारी माझे ' पेस्ट कट्रोल व पेस्टीसाईड ' या विषयावर सदीप भाषण झाले ' उदीरसमस्या हाताळणारा एक जागतिक वैज्ञानिक ' या शब्दानी माझी ओळख करून देण्यात आली दुपारी पाचला परत आलो झिमझिम पाऊस असल्यामुळे जरा अधुक दिसत होते एका चायनीज खानावळीत गेलो पडवीतच एका मुलीने माझा कोट काढून ठेवला. चिनी मसाले सहजगत्या जमत नाहीत मी शाकाहारी अन्न घेतले– पण किती–अर्धा किलो भात, अनेक भाज्याचे पाव किलो कात्रण मिक्चर व पेलाभर दूध अन्न सपता सपेना

गल्लीतून पुन्हा फिरण्यास सुरुवात केली अर्ध्या मैलात सभोगचित्राची बावीस दुकाने दिसली दुकानावरील गॅलऱ्यात ब्ल्यू फिल्म्स व काही ठिकाणी सभोगाची जिवत प्रात्यक्षिके चालू होती पण काही म्हाताऱ्या व मध्यमवयीन प्रेक्षकाव्यतिरिक्त कोणी नव्हते बहुतांशी टूरिस्टस् हा सगळा टूरिस्टकडून पैसे गोळा करण्याचा धदा होता क्वचितच डेनिश मनुष्य तेथे दिसे

तिसऱ्या दिवशी दोन–तीन पूल ओलांडून सीरम इन्स्टिटयूला गेलो हाफकिन सस्थची आठवण आली तशीच ती सस्था, तोच सरकारी कारभार मला एकरूपता दिसली सर्पांवर माझे भाषण झाले जतुविरहित प्राणीसगोपनाचे त्यांचे प्रयोग उत्तम वाटले सस्थाचालकाना प्रेझेंटस दिली व चारला परत आलो येताना टाऊन हॉल जवळील दुसऱ्या गल्लीत शिरलो इथे तर कुत्रिम लिंगाची बाजारपेठच होती विजेची, रबराची उपकरणेही दिसली, पण त्या सगळ्या गोष्टीकडे मानसशास्त्राच्या दृष्टीने पाहिले न्यूनगड असलेल्या पुरुषाना आपल्या कमीपणावर खोटा विजय मिळवून देणारी ही साधने होती

आजचा हा शेवटचा दिवस होता मैलभर फिरलो व टिवोली उद्यानात शिरलो बाग तशी मोठी नव्हती पण मधून-मधून ट्यूलिप फुलाचे अत्युत्तम ताटवे दिसले. इथे अनेक लहान-लहान इमारती होत्या पण फन्–फेअर प्रमाणे सर्व मनोरजनाकरिता काही ठिकाणी मोफत प्रवेश होता तर काही ठिकाणी तिकीट होते बॅले डान्सिगमधील ' स्वान ' नृत्य मोफत दाखवीत होते मुलामुलीचा इथे खूप भरणा होता सगळी बाग तरुणानी भरली होती खाणे पिणे करून मस्ती करीत फिरत होते त्याच्या मस्ती करण्याचे कार्यक्रम पण होते फिरणे, उडी मारणे, पडणे, फेर धरणे, झोके घेणे आदी सर्व मशीनच्या सहाय्याने होत असे अखेर हे सर्व चालू असता मुली अर्धवट भीतीने, अर्धवट आनदाने, अर्धवट अनपेक्षित नवलाईने अशा काही किंचाळत, ओरडत, खिदळत होत्या की मूर्तिमत यौवनाचा तो विलास पाहून रोमन् रोम फुलत होता

एका दुकानात सामान पाहताना दोन मुली शुद्ध इग्लिश बोलताना दिसल्या डेनिश भाषिकात या इग्लिश भाषावाल्या पाहून बरे वाटले विचारल्यावर कळले की

त्या कॅलिफोर्नियाहून युरोपचा प्रवास करायला आल्या होत्या वय अवघे १८–१९, पण दोघी एकट्याच यूथ होस्टेलमध्ये उतरल्या होत्या व रशियापर्यंत फिरून येणार म्हणाल्या माझे इंग्लिश ऐकून त्यांना पण बरे वाटले आता रात्रीचे दहा वाजले होते 'चला आता परत जावं–' म्हणत त्या परतल्या कॉलेजमध्ये शिकत होत्या बी एस्‌सी च्या दुसऱ्या वर्गात एक होती व दुसरी पॉलिटिक्सचा अभ्यास करीत होती मी नुकताच अमेरिकेहून आलो होतो तेथील त्यांच्या विश्वविद्यालयात मी लेक्चर दिले होते त्यामुळे गट्टी जमली कॉलेज-जीवन, प्रवास आदींवर गप्पा मारीत आम्ही टाऊन हॉलजवळ आलो त्या गल्लीच्या तोंडाशी आल्यावर मी त्या नग्न दुकानांकडे बघितले व मुलीकडे पाहिले

'इथून घरी कसे जाल ?' मी विचारले

'रोजचा आमचा हाच रस्ता आहे आम्ही दोघीच या गल्लीतूनच जातो, रात्री-सुद्धा भीती वाटत नाही' त्या म्हणाल्या

'हॉस्टेलपर्यंत पोचवून देऊ काय ?' मी म्हणालो

'नको त्रास घेऊ नका– अगदी सेफ आहे' मला त्यांच्या हिंमतीचे आश्चर्य वाटले

'बर, गुड बाय ! ' म्हणत मी हात वर केला

'वोंच यू किस् मी गुड बाय ?' म्हणत एकीने तोंड पुढे केले

दुसरी म्हणाली, 'आय विल किस् यू, गुड बाय !' आणि तिने चक्क माझा मुका घेतला

'गुड बाय टीचर–' म्हणत त्या खिदळत, लखलखत्या धुंद वासनांच्या भर बाजार पेठतून निर्धास्तपणे चालू लागल्या.

काही वर्षांपूर्वी एअरइंडियातर्फे सुपर कॉन्स्टिलेशन नावाची विमाने भारतातून इंग्लंडला प्रवासी नेत होती शेपटावर दुक्कल असलेले हे विमान ताशी ५०० मैल जात असे—पण आत उतारूंची व्यवस्था मात्र बरी होती मुंबईच्या जुन्या सांताक्रूझ विमानतळावरून हे विमान मध्यरात्री निघत असे कंबरपट्टी सोडल्यावर सँडविच वगैरे देत असत व ब्लँकेट पांघरून डोळे मिटण्याचा कार्यक्रम असे दिवस उजाडल्यावर अगदी पांढरेशुभ्र ढग खाली दिसायचे ढगांचे डोंगरच चोहोकडे कोणी पांढराशुभ्र उत्तम कापूस चोहोकडे पसरून दिला असा भास होत असे पण विमान उतरू लागले की ढगांशी झुंज सुरू होई मधून-मधून काळे ढग व तुरळक वारा आला की विमान पतंगाप्रमाणे हालू लागे मधेच ते भर्रकन् खाली येई अशा वेळी झोपाळ्यातील झोका घेताना समोर जसे पोटात दबल्याप्रमाणे होते, अगदी तसे वाटे. जंबो जेट सुरू झाल्यानंतर हे पतंग—उड्डाण जरा कमी झाले

असेच एकदा कॉन्स्टिलेशनने जिनेवाला गेलो होतो दिवस नुकताच उजाडत होता व एअरहोस्टेस सकाळच्या ब्रेकफास्टची भांडी आवरत होती खाणे बरे होते आमलेटमध्ये चवीचे तुकडे होते, उत्तम ब्रेड बटर, नारंगी शरबत व झकासदार कॉफी होती खाली डोकावलो तेव्हा डोंगराळ प्रदेश दिसला. उंच पर्वतश्रेणी असून त्यावर शुभ्र बर्फ पडला होता विमान डोंगरा-डोंगरामागून घिरट्या घेऊ लागले. चोहोकडे डोंगर असल्यामुळे प्रदेश दिसेना व पलीकडे धुके होते हिमवृष्टीपण सुरू झाली एकदाची मोकळी जमीन धुक्यातून दिसली व विमान जिनीवाच्या विमानतळावर उतरले तेथील कर्मचाऱ्यांनी छत्र्या आणल्या कारण पाऊस पडत होता कस्टम्सजवळ आलो त्यांनी विचारपूस केली व पुढे एक्स्चेंजपर्यंत पोचलो पाकीटात काही भारतीय नोटा होत्या

## जिनेवा ते बाझल

वाटले बदलून घ्याव्यात त्याने चक्क सांगितले की त्या नोटा केराच्या टोपलीत टाकाव्यात कारण या देशात भारतीय चलनाला किंमत नव्हती

आंतरराष्ट्रीय स्वास्थ्य संस्थेचे प्रतिनिधी सामोरे आले होटलपर्यंत पोचविले. दुपारचे दोन वाजले होते रात्रभर झोप आली नाही म्हणून पहुडलो तर झोप येईना बाहेर तपमान शून्याच्या दोन डिग्री खाली होते व खोलीची उष्णता वाढवली नव्हती सायंकाळी कपडे बदलून जेवण्याची व्यवस्था पाहाण्यास बाहेर पडलो होटलमध्ये राहिले तर अगदी सकाळची कॉफी–ब्रेड येवढेच देशात मी पडलो शाकाहारी ' शिवाय इंग्लिशखेरीज इतर भाषा जेमतेम अवगत होत्या तब्बल तासभर भटकल्यानंतर ' इंडियन फूड ' नावाचे दुकान दिसले आत एक मुंबईच्या भेंडीबाजारमधील शेख मुहम्मद तेथील ' शेफ ' ' वाढपी ' व ' एजंट ' होता माझा देशी वेष पाहून चक्क हिंदीतच स्वागत केले पराठा आणि बटाटाभाजीचा बेत ठरला त्यांनी कणीक तिंबली पराठा जमत नाही म्हणून फुलके आणि सुकी भाजी दिली पाच फुलक्याचे त्यांनी सात रुपये घतले दुसऱ्या दिवशी इटालियन रेस्तारांमध्ये गेलो त्यानी जाड– ( अगदी गव्हासारखा ) तांदुळाचा भात व कसलेसे बेसन केले तिसऱ्या दिवशी स्विस् रेस्तोरांमध्ये ऑर्डर दिली त्याला सांगितले की भाजी आण– त्यात बटाटे, कांदे, गाजर व मटार टाक व सोबत पांढरा भात आणि दूध आण तिथे जेवणारे बरेच होते व पिण्याचा कार्यक्रम पण रंगात आला होता जेवण आले. त्याने प्लेटभर भात व एका टोपलीत एक किलो उकडलेले बटाटे, कांदे, गाजर व मटर ठेवले तो भाजीचा ढीग पाहूनच ऊर भरून आला

स्वस्थ्य–संस्थेचे ऑफिस पेले डी नेशन्सच्या बिल्डिंगमध्ये असे मेन गेटवर पिस्तुलधारी चौकीदार आडवा आला त्याने फोनने ठराविक ऑफिसरना पाचारण केले राईट साहेब आले त्या अगडबंब गॅलरीव्यूहातून भटकत त्यांचे खोलीवर आलो चार दिवसाचा कार्यक्रम आखला होता किती वाजता कोणाला भेटावे, सगळे निश्चित ठरले होते माझ्यासंगे लंचला– टीला कोण येणार त्यांची पण नावे होती प्रत्येक वैज्ञानिकाला भारताची आठवण म्हणून काही द्यावे म्हणून बोलणी केली लंचला खाली कॅफेटेरियात गेलो ठराविक अन्न हाताने घ्यावे व पुढे पैसे मोजावेत वेटर, ऑर्डर, सफाई वगैरे त्रास नाही खरकटी भांडी स्वत उचलून ठराविक स्थळी ठेवावीत या भव्य वास्तूत लीग ऑफ नेशन्स भरत होती त्याचे मोठमोठे सजविलेले हॉल, कमेटीरूम पाहून आलो रविवारी सुट्टी असते व शनिवारी पण कार्यक्रम बंद होता या दोन दिवसात त्या देशातील काही स्थळे पहावीत असे ठरविले

आमच्या स्टेशनजवळील होटलहून पुढे गेले की मोठा रस्ता एका भव्य सरोवराकडे जाई असे दुपारनंतर या सरोवराच्या एका कडेला कृत्रिम कारंजा सोडत असत या कारंज्यातून पाण्याची भिंत उंच १५० फुटावर जात असे रात्रीला विद्युत प्रकाशात हे फारच रमणीय दिसे. इतके थंड असून बदक फिरताना दिसले रस्तोरस्ती घड्याळांची

दुकाने होती लाजीन्स, टयूडर, एनीकार अशी किती तरी नावे झळकत होती–,पण निर्यात सूट देणारी ठराविक दुकानेच होती किंमतीत १५ ते २० टक्के सूट देऊन घडयाळे विकत होते या बाजार–गर्दीतून त्या शनिवारी सुट्टीची गर्दी चालली होती बहुतेक स्विस लोक विशिष्ट गरम कपडे घालून स्कीइंगचे सामानासहित डोंगराकडे निघाले होते. येथील हा राष्ट्रीय खेळ होय परदेशात असताना कुणी भारतीय दिसला की, त्यांना भेटण्याची इच्छा होतेच मुंबईचे राजदेरकर कंपनीच्या मालकाचे चिरंजीव तीन वर्षांपासून इकडे मशीन कारखान्यात शिक्षण घेत होते मी आल्याने त्यांना फार आनंद झाला ते दुसऱ्या गावाहून आले तीन वर्षांनी घराकडील कुणी भेटला हे कळल्यावर ते अगदी गहिवरले होते हुंदका देत म्हणाले, 'मला घराची फार आठवण येते–' मग जरा सावरून 'का हो, मी मराठी तरी ठीक बोलतो काय ?' म्हणाले स्वित्झर्लंडमधील भारतीय वकालतीत तिसरे सेक्रेटरी नागपूरचे श्री देव होते त्यावेळी जिनिवाला असल्यामुळे फोन केला– पण ते कामात गुंतलेले होते

दुसऱ्या दिवशी जिनेवा स्टेशनहून ब्यर्नकडे निघालो आगगाडी आपल्या मीटर गेजप्रमाण होती तिथे गार्ड, टिकिट कलेक्टर, कंडक्टर एकच मनुष्य होता ड्रायव्हर मात्र त्या विजेच्या इंजिनमध्ये दिसला त्या डोंगरकपारीतून वळसे घेत गाडी चालली मुंबई–पुणे मार्गाची आठवण, विशेषत जुन्या रिव्हर्सिंग स्टेशनची स्मृति आली, पण दरीवर घातलेले पूल या रिव्हर्सिंग पूलाच्या चौपट उंचीचे दिसले स्टेशनवर कुणी नाही, पान-बिडी नाही, कोलाहल नाही आपले सामान आपण खाली घ्यावे स्टेशनवरील छोटी गाडी घ्यावी, सामान बाहेर न्यावे व ती परत करावी उत्तम व्यवस्था मुंबईच्या दादर–बोरीबंदरचा कुलींचा त्रास नको ब्यर्नला ९ वाजले टेलिफोन बूथहून फर्स्ट सेक्रेटरींना फोन केला त्यांनी घरचा पत्ता दिला तिथे गेलो. मि महरोत्रा सनदी ऑफीसर होते फार चांगले वागले भारतीय वकील श्री वेलोडी माझी वाट पहात आहेत असे कळविले श्री वेलोडी यांना भेटलो भारतीय वैज्ञानिकांनी आता परदेशात जावे व आपले कार्य दाखवावे असे त्यांचे मत दिसले भारतातील परराष्ट्र खात्याकडून सगळ्या वकीलांना माझ्या येण्याबद्दल पत्रे गेली होती यामुळे ते तयारीत होते जागतिक स्वास्थ्य आदि विषयावर बोलणी झाल्यावर 'शहर पाहिले का ?' विचारले मी नकार देताच, 'आज सुट्टीमुळे ड्रायव्हर नाही तरी श्री देव सगळे बघतील,' म्हणाले

श्री देव घरी घेऊन गेले उत्तम वरणभातावर ताव मारला नागपूरला एक सेशन्सजज्ज श्री कोयाळ होते ते सांगत की, त्यांचा पुतण्या फॉरिन सर्विस' मध्ये आहे या श्री देवसाहेबांकडे हा पुतण्या दिसला घरकामात मदत करीत असे व स्वयंपाक त्यानेच केला होता– ही 'फॉरिन सर्विस'

दुपारी ४ पर्यंत ब्यर्नच्या जुन्या इमारतींचे दर्शन घेतले व आगगाडीने बाझल शहराकडे वळलो बाझलचे स्टेशन मोठे होते प्लॅटफार्मवर गायगी कंपनीचे श्री क्रिस्टेनसन

सामोरे आले हे गाव कारखानदारीचे असल्यामुळे जुनाटपणा दिसला रॉयल हॉटेलमध्ये त्यानी आणले. चहापान करून जवळपासचा मुलुख दाखविण्यास निघाले गाडी खेड्यातून जात होती. रस्ते दगडी बांधलेले होते दुतर्फा लहान एकमजली घरे व समोर बाग असा थाट होता ३० मैलानतर काही घरे दिसली ती अगदी वृक्षाच्या आकाराची होती जवळच 'डोरनाक' चे चर्च होते या विशिष्ट चर्चचे लोक निसर्गभक्त असतात निसर्गाप्रमाणे रहावे व वागावे ही त्याची वृत्ती असे याकरिता घरे तशी होती. चर्चची वास्तू पण निसर्गवृत्तीप्रमाणे दिसली इथे 'गोथिक' स्थापत्याचा अभाव होता

पुढे डोंगरावर चढलो. एक फार पुरातन किल्ला होता भिंती पडक्या व शेवाळाने भरल्या होत्या झाडे-झुडपे होतीच, पण जवळील वस्तीतून स्वयसेवक येऊन स्वच्छता ठेवीत, तिकिट देत व सर्व इतिहास सागीत महाराष्ट्रात इतके किल्ले आहेत, पण अशी व्यवस्था अद्याप आली नाही शासनावर ते अवलबित नाहीत मला तर एकदा विदर्भाच्या सिंदखेड राजवाड्यात गेल्यावर वीरमाता जिजाबाईच्या जन्मखोलीत कचरा आणि खत भरलेले दिसले ( १९७० साली ) व जाधवरावांच्या समाधीत गाढव, डुक्कर याची विष्ठाच पसरलेली होती काय हा ऐतिहासिक स्थानाचा अपमान !

सायकाळी रॉयल हॉटेलवर आलो सकाळपासून प्रवास चालू होता अगदी दमून गेलो टबमध्ये स्नान केले कपडे बदलले व जरा पलगावर पहुडलो तो काय ? पलगच हालताना भासला उठून पाहिले तर काही नाही पुन्हा पहुडलो व पुन्हा भास काय होते कळेना ५ मिनिटे असे चालले घटा वाजविली व वेटरकडून गरम दूध मागविले कारण थकवा होता, पण भूक नव्हती खोलीत फिरू लागलो आता तर खोलीच गिरक्या घेताना दिसली कोयनेच्या भूकपासमयी जो अनुभव मुबईकरांना आला तो अनुभवला कारण कळेना तोपर्यंत दूध आले टेबलावर दूध ठेवले तर टेबलच हलल्याचा भास झाला दुधात ब्रँडी सोडली व पेलाभर दूध पिऊन झोपलो बराच वेळ झोप येईना पलगाचे चलन व भास चालूच होते लाईट तसाच ठेवला व पाघरूण घेऊन निजलो झोप सकाळी त्या वेटरने उठविल्यावर उघडली तयार झालो व मॅनेजरला पलग-चलनाचे विचारले तो जरा थट्टेखोर होताच 'कोणत्या खोलीत आहात ? जवळ लिफ्ट आहे काय--अरे विसरलोच, त्या खोलीत आतापर्यंत ३ खून झाले' वगैरे म्हणाला

सोमवारी सकाळी गायगीचा रग कारखाना पाहिला डोळ्यात भरण्यायोग्य गोष्ट म्हणजे भारतातील कारखान्यातील कामगारांचे प्रमाण बघितल्यास इथे त्यामानाने एक दशांश कामगार होते व कारखाना सुरू करताना वाऱ्याची दिशा कुणीकडे आहे, तो वारा शहराकडे जातो का ? हे पाहूनच काम सुरू करतात शहराकडे धूर जात असल्यास कारखाना बद होतो गायगी कपनीतील प्रयोगशाळेत माझे भाषण झाले डॉ विझमान, डॉ म्यूलर, (याना डी डी. टी बद्दल नोबेल पुरस्कार मिळाला होता ) याना भेटून फार आनद झाला

जिनेवाची यात्रा सपवून मला पॅरिसला जायचे होते विमानतळावर आलो ३ तास थांबलो धुक्यामुळे ब्रूसेल्सहून विमान येईना पेस्पर इन्स्टिटयूट पॅरिसमध्ये माझे ३ वाजता भाषण होते मी अगदी बेजार झालो विमानाचा पत्ता नाही दुपारचे २ वाजले तरी विमान नाही ताबडतोब पॅरिसला तार केली दुसरे एक विमान थेट लडनला जात होते, ते घेतले विमानाच्या गडबडीमुळे बरीच मडळी खोळबून होती त्यात एक ब्रिटिश ललना दिसली ती तिशीची असावी इटालीहून पॅरिसला जाऊन डोंवरमार्गे घरी जाणार होती तिचे वडील आजारी होते ती सारखी तरफडत होती नखे कुरतडे, ओरडे, हातपाय आपटी एकदाचे दुसरे विमान आले व लडनकडे निघालो ' माझे वडील मला दिसतील काय ?'– या चिंतेतच ती ओरडत किंचाळत होती एकदोन वेळा तिने मूठपण आवळली एकदाचे लडन विमानतळ आले तिने किंचाळी फोडली, मूठ आवळली व मला धरा म्हणत फट्कन खालीच बसली. तोंडावाटे फेस निघत होता डोळे वटारले होते हातपाय थड पडू लागले तिला एअरहोस्टेसच्या स्वाधीन केले व आम्ही बाहेर पडलो

प्रॅनएमचे जेट विमान हेनेडा तळावरून रात्रीला सुटले अतिपूर्वेकडे जाताना आंतरराष्ट्रीय काल्पनिक रेषा लागली व पायलटने कॅलेंडरवरील एक दिवस मागे घ्यावा, अशी सूचना लाऊडस्पीकरवर केली रात्रीलाच वेक आणि मिडवे बेटे आली व बऱ्याच प्रवासानंतर आमचे विमान पांढऱ्या ढगाच्या समूहातून खाली उतरू लागले सकाळ झाली होती व सूर्य पॅसिफिक महासागराच्या निळ्या पाण्यावर तळपत होता हळूहळू खाली येताना बऱ्याच बेटाची पाण्यावरील टोकेच दिसली एकदाचे एका मोठ्या बेटावर विमान घिरट्या घालू लागले चोहोकडे निळा समुद्र होता बेटाच्या नजीक फेसाळ पाण्याजवळच पांढरे बीच दिसत होते व मागे बेटावर हिरव्या पर्वतराजी धुकाळ ढगात लपलेलें दिसले एकदाचे विमान होनोलूलूच्या विमानतळावर उतरले

एअरहोस्टेसने दार उघडले व गुड बाय करीत आम्हाला पायऱ्यांवर सोडू लागली चोहोकडे कसे हिरवेगार होते स्त्रियांच्या लांब रांगा हातात हार घेऊन उभ्या होत्या व अगदी शिडीच्या पायथ्याशी ग्रीक राजाप्रमाणे कागदाचा सोनेरी मुकूट व भलीमोठी हाताची कफनी घालून एक गृहस्थ उभा होता त्याच्या हातात एक राजदंड असून तो वर करून 'अलोहा-अलोहा' म्हणत डोके वाकवून आमचे स्वागत करीत होता तो म्हणे हवाई बेटांचा शेवटचा राजा कामेनमेह याचे सोंग घेतलेला एक नट होता

कस्टम्समधून फिरताना बाजूला 'मेन' व 'वाहिनी' अशा दोन पाट्या लावलेल्या खोल्या दिसल्या या बेटात बायकांना वाहिनी (महाराष्ट्रातील वहिनी) नावानीच संबोधिले जाते सामान काढून बाहेर पडलो, तोच हातात चाफा (खुरचाफा) व आर्किड फुलाचे हार घेतलेल्या वाहिन्यांचा तांडा ठुमकत ठुमकत येऊ लागला प्रत्येकीने केसात भलेमोठे जास्वंदीचे निळे, पिवळे, पांढरे, गुलाबी फूल खोवले होते व अंगात पायघोळ

कफनी परिधान केली होती त्या कफनीवर चित्रविचित्र फुलाची चित्रे होती एका वाहिनीने नारळीच्या पानाचा अवघा गुडघ्यापर्यंतचाच स्कर्ट घातला होता व वक्षस्थळावर एक छोटीशी आडवी पट्टीच बाधली होती गळ्यात शिपल्याच्या माळा, फुलमाळा व कानात कवडयाचे डूल हालत होते आम्हाला माळा घातल्या, 'अलोहा' म्हणत स्वागत केले बसमधून 'कालाकुआ' राजमार्गावरून कालिया' हॉटेलवर आलो कफनी परिधान केलेल्या वाहिन्या इथे पण होत्या त्यानी खोली दाखवली आन्हिक आटोपून ब्रेकफास्टला समोरच्या उपहारगृहाकडे निघालो सडकेवर नुसते स्विमसूट घातलेले कैक गृहस्थ फिरत होते व मधून मधून बिकिनीज घातलेल्या पांढऱ्या वाहिन्या झळकत होत्या त्या कॅफेटेरियात अन्न समोरच शिजवून मिळे वेट्रेस आतरराष्ट्रीय दिसल्या चिनी, जपानी, फिलीपिनी, हंगेरियन व पोलिनेशियन अशा होत्या बिनबियाची पपई, ब्रेडबटर, क्रीमची कॉफी व अननसचा रस यावर भूक भागविली सकाळचा पेपर आला, ज्याचे नाव होते नूहाऊ-ओ-काला (न्यूज ऑफ दी डे) अगदी मुबईच्या 'नवा काळ' ची आठवण झाली

आमची परिषद विश्वविद्यालयाच्या पटागणातच भरली इथेच गव्हर्नरने उद्घाटन केले हारतुरे हिरव्या पानाचे होते शखध्वनी सुरू झाला हवाई बेटाचा ध्वज उभारला त्या बेटाचे जुने राष्ट्रगीत झाले ध्वजावर ब्रीदवाक्य येणेप्रमाणे होते—डेआजाऊ-कि-इए-ओ-का-इएना-ई-का- पोनो धी लाईफ ऑफ धी लँड इज परपेच्युएटेड इन रायपसनेस) पोनो म्हणो पुण्या असे कळविले

दिवसभर सभा झाल्या व पेपर पण वाचले गेले चहा कॉफी, ताजा पेरू, अननस, मोसबी, द्राक्षाचा रस सभेच्या ठिकाणी मिळाला नावे नोदवून सायकाळच्या विशिष्ट हवाई मेजवानीकरिता तयार झालो

याकरिता दुपारी ३ वाजता भलेमोठे डुक्कर मारले त्याला केळीच्या पानात गुडाळले व वरून लोखडी जाळीने वेष्टिले हॉटेलबाहेर ६ फूट खड्डा केला तिथे खूप जळण, विटा, दगडी टाकल्या आगीतील निखारे धगधगू लागल्यावर त्या डुकराचे बडल आत टाकले, वरून विस्तव सोडला व त्यावर माती सोडून डुकराला तिथे पुरले माती आणि टारपोलीनने सर्व झाकून टाकले. सायकाळी ७ वाजता तो खड्डा उकरून ते डुक्कर काढले हॉलमध्ये गालीचे अथरले होते एकफुटी टेबलावर अननस, पेरू, चिकू, पपई, केळी, अवाकाडो, काजू, बदाम, अपल, पीच व ऊसाचे काप व्यवस्थित ठेवले होते मधून मधून तो बिलबिलीत झालेल्या डुकराचा भाग दिसत होता पाहुण्यानी जमिनीवर माडी घालून बसावे व हातानी ते डुक्कर व फळाचे काप घ्यावे ज्याना बोटानी जेवण्याची सवय नव्हती (बहुतेक सगळ्याच पाश्चिमात्याना) त्याना वाहिन्या सरळ भरवत होत्या समोर लहान स्टेजवर हवाई नृत्य सुरू झाले माडाच्या पानाचे स्कर्ट, डोईवर खुरचाफ्याचा गजरा, मनगटात आणि गळ्यात हार व हातात लाल पिसांनी वेष्टलेल्या तुबड्या वाजवीत वाहिन्या हळुहळू मणिपुरीप्रमाणे हावभाव करीत होत्या वाद्ये मद होती व त्यात एक

ततुवाद्य व चिफळा याचाच समावेश होता काही गीत पण मजुळ स्वरात झाले व ते गायिले एका जाडच्या काळ्या रगाच्या पॉलिनेशिन गृहस्थाने, ज्याच्या सोबतीला एक गोरीगोमटी 'वाहिनी' साथ देत होती

पॅसिफिक महासागरात अनत बेटे आहेत या सागराचा तळ दरवर्षी एक मिलि-मीटर सरकतो या हालचालीमुळे कैक स्थळी खालील ज्वालामुखी पण वर आले. हवाई द्वीपकल्पात २०० बेटे मोडतील, पण अवघी आठच बेटे पाण्यावर आली असून तीवर वनस्पती आणि काही प्राणी सापडतात. जपानहून ३९०९ मैल दूर या द्वीपकल्पांचा भाग १५४ अश पश्चिम ते १७८ अश अक्षाश असून १८ ते २८ रेखाश वर लागतो अमेरिकेच्या सॅनफ्रान्सिस्को शहरापासून २४०६ मैल अतरावर ही बेटे आहेत सन १७७८ साली कॅप्टन कुकने या बेटावर प्रथम पाय रोवले त्यावेळी त्या बेटातील ९४ टक्के वनस्पती ( १७०० जाती अद्याप मिळतात) जगात कुठेच नव्हत्या. कीटक जातीत ३७५० प्राणी होते पैकी ९० टक्के येथीलच दिसले एकूण पाखरे ९२ जातींची असून तिथे सर्प नव्हते, डास नव्हते शार्क मासे तर मानव मास घेत नसत तिथे पॉलीनिशियन लोक होते व त्याचा राजा कामेनमेह राज्य करीत असे सुबत्ता, सुबलक अन्न व सुखी ससार भारतीय प्रणालीप्रमाणे होता सन १८२० साली ख्रिश्चन मिशनरी आले व १८४० सालापर्यंत सगळी बेटे बाट-वून ईसाई करण्यात आली सन १८५२ साली चिनी लोकांनी महायान बुद्ध धर्म आणला व सन १८८६ साली जपानने झेन पथाचा तिथे शिरकाव केला आता त्या बेटावर पॉलीने-शियन, फिलिपिन्स, जपानी, चिनी व अँग्लो–सॅक्सन जाती वास करीत आहेत.

या आठ द्वीपकल्पातील पहिले बेट ओहावू असून त्याचीच राजधानी होनोलूलू ( शांत बदर ) होय 'कुलाव' डोगर या ४० मैल लाब व २६ मैल रुंद बेटाला द्विभा-गते व एकीकडे २० इच पाऊस पडतो अवघ्या ३१५० फूट उच शिखराच्या या डोग-राच्या टोकाला डायमडहेड नावाचे मृत ज्वालामुखी शिखर दिसते व याच टोकाला जग-प्रसिद्ध शुभ्र वाळूचे वैकिकी बीच दिसते अडीच लक्ष लोकसख्येच्या या बेटावर उत्तम बदर (पर्ल हार्बर) असून वैकीकी बीचवर मादक वातावरण व अनिर्बंध व्यक्तीस्वातत्र्य याकरिता प्रवाशाचे थवेच्या थवे येतात इथेच राजे कामेनमेह याचा 'आयोलानी' राज-वाडा असून समोरच कास्य धातूचा पुतळा उभारला आहे सन १९५९ साली सर्व बेटे अमेरिकेच्या छत्राखाली गेलीत व आता त्या देशाचा एक प्रदेश म्हणून गणला जातो

डॉ श्रूमच्या मते या देशातील आद्य लोक–ज्यांना आता पालिनेशियन म्हणतात, ताहिती बेटावरून आलेत हे लोक भारतातील मलबार विभागातील काही जातीच्या आंतरराष्ट्रीय विवाहातून जन्माला आले असावे. या बेटावरील वस्ती सन १००० साली सुरू झाली असावी तिथे प्रथम बुटके लोक होते व त्याना जिंकून 'काहिकी' (तेहिती)

बेटावरून संस्कृती आणली हवाई लोकांची आई 'पापा' म्हणजे पृथ्वी होती व पिता वेकिया म्हणजे आकाश होते त्या पृथ्वीवरील उष्णता मॅडम पेली सभाळीत असे व तिनेच 'काहिकी' (तेहिती) वरून समुद्र आणला अशी आख्यायिका आहे

हवाई बेट ९३ मैल लांब व ७६ मैल रुंद असून राजे कामेनमह यांची जन्मभूमी इथेच होती त्यांनीच सर्व आठ बेटाना एकत्रित आणले एक राज्य, एक भाषा याचीच कल्पना होती हवाई भाषेत अवघी बारा अक्षरे असून त्याचे उच्चार येणेप्रमाणे होते–अ–इ–ई–ओ–ऊ–उ–क–ल–म–न–प आणि व

जगातील नंदनवन कुठे असेल तर ते हवाईला पहावे नेचे जातीच्या वृक्षाची उंची २५–४० फूटापर्यंत इथे दिसते (लोणावळे इथे ३ फूट दिसतील) जास्वद व आरकीड (एन्यूरियम) फुलांचा रंग व रूप कुठेही दिसणार नाही चोहूकडे हिरवेगार असून रोजच पाऊस झिमझिम पडतो यामुळे उसाचे व अननसाचे मळे चोहूकडे दिसतात इथून कैक कोटीचे आरकीड साखर व फळे निर्यात होतात फळात बिनबियाची पपई, उत्तम केळी, पेरू, मोसबी, फणस, अननस, मेकेडेमियानट, काजू व अवाकाडे चिक्कार मिळतात नुकतीच लाखो गुराकरता कक केंद्रे काढली असून दूध आणि मासाची निर्यात होत आहे

ओहाद बेटावरून हवाई बेटाला विमानांनीच जावे लागले हिलो शहरी उतरलो होटल अगदी समुद्रालगतच होते व ओहोटीच्या वेळी उथळ पाण्यात कौड्या, शिंपले, शख चोहूकडे दिसत बेटाला लागूनच कोरलरीफ असल्यामुळे लाटाचा जोर समातरात बराच वेळ टिकतो याकरता तरुण लाकडाच्या फळ्यावर लाबपर्यंत जातात व येणाऱ्या लाटेसगे जोरात उडत येतात कुठल्याही बीचवर हा खेळ व बिकोनीची चिंधी नेसलेल्या वाहिन्या सर्वत्र विखुरलेल्या दिसतात वैकीकी बीचवर तर या मादकतेने अगदी कहरच केलेला दिसे

हवाई बेटावर ५ जिवत ज्वालामुखी आहेत यापैकी मोआना–लोवा व मोवाना किया अद्याप जिवत दिसतात प्रत्येक ज्वालामुखीच्या मुखात लहान लहान कैक मुखे होती काही ज्वालामुखी समुद्रसपाटीच्या १३,७९६ फूट वर होते किलावियै इकी अशापैकी एक लहान मुख होते याचे क्रेटर तर ३ मैल रुंद होते व अदमासे ७०० फूट खोल असेल आत खवळणारा लावा हळूहळू इतरत्र हलताना दिसे या ज्वालामुखीच्या मुखानजिक एक विश्रामगृह बांधले आहे आम्ही दोन रात्री इथे काढल्या सबंध रात्रभर बिल्डिंग हळूहळू डोलत असे होटेलजवळच कैक वाफेचे फवारे जमिनीतून निघत होते व थड झालेल्या लावाचे थर व मोठे मोठे दगडांचे ढीग चोहूकडे पसरले होते सहा महिन्यापूर्वीच या ज्वालामुखीतून तप्त रस बाहेर आला त्या समयी उष्णतेच्या ज्वाला ३०० फूट उच उडाल्या दिसल्या तर १० मैलपर्यंत पसरल्या या बेटावरील ज्वालामुखीचा रस पातळ असतो थोडेसे उकळणे आले की रस बाहेर पडतो त्यामुळे भूकप जोराने होत नाहीत तप्तरस समुद्रात जाऊन थड होतो व बेटाचे पगोय वाढतात वनस्पती जळतात पण थड रसामुळे उत्तम खत मिळून नवीन वनस्पती येतात या बेटावरच अशी आख्यायिका आहे की, 'मॅडम

पली ' नावाची देवता इथे वास करते त्या देवतेचे नेत्र रक्त असून विस्फारित आहेत डोईवर राठ केस असून ते उभे आहेत तिची जीभ बाहेर निघाली असून जिभेवरून रक्त निथळत असते या देवतेच्या गळ्यात मानव-रुंड-माळा तर आहेच, पण इला लेहुआ (रक्ताच्या रंगाच्या) पुष्पाच्या माळा आवडतात वक्षस्थल उघडे असून ती गर्जना करत मानव शरीरावर नृत्य करत असते ती रागावली की पृथ्वीतून ज्वाला निघतात, धरणीकंप होतो–हे सारे वर्णन भारतातील कालिमातेप्रमाणे दिसते

किलाव्हिईकी ज्वालामुखीजवळ नेऱ्याचे भव्य जंगल आहे त्याचे क्षेत्रफळ ३०४ मैल दिसते या जंगलातून डोंगर ओलांडून हवाईच्या पूना जिल्ह्यात गेलो (पुणे) इथूनच तप्तरस समुद्रात गेला होता चोहूकडे थंड रसाचे डोंगर व मधून मधून भरलेल्या पाण्याची लहान तळी होती याना ' वापियो ' म्हणतात (वाप-विहीर) काळा रस समुद्रात गेला व तिथे मोठे वाळूचे बीच झाले या वाळूचा रंग काळा होता व त्या बीचचे नाव ' काला–पाना ' होते

पूना जिल्ह्यातून कोना जिल्ह्यात आलो हवाई बेटातील जुन्या संस्कृतीचे हे आद्य-स्थान होय समुद्रतटाकी होनोइइ नामक स्थान दिसले याला आश्रयस्थान म्हणतात म्हातारे, अर्भक, पंगू, रोगी, मांत्रिक अशा लोकाना युद्धसमयी इथे ठेवत जवळच हीआऊ नामक जुने देवालयाचे अवशेष दिसले या देवालयात पितरांच्या अस्थि किंवा लाकडी प्रतिमा ठेवत छप्पर शाकारलेले असे व द्वाराचे मुख उत्तरेला होते आश्रयस्थानापलिकडे कुरुक्षेत्राप्रमाणे मोठे पटांगण होते युद्धे इथेच खेळत आश्रयस्थानात वरील लोकाना ठेवून सकाळी आन्हिक न्याहारी आटोपून शंखध्वनी करत युद्ध सुरू होऊन दुपार झाली की पुन्हा शंखध्वनी होत असे व लंचकरता सैन्य घरी जाई पुन्हा वामकुक्षीनंतर शंखध्वनी व अंधार होईपर्यंत युद्ध होई रात्रौला आराम गनिमी कावा नाही–छापा नाही अगदी धर्म-युद्ध होत असे

राजा निवडताना नाहा (शिळा) उचलणाऱ्या शक्तीशाली लोकांचा जय होत असे ' किनाई ' नामक राजगुरु पूजा आणि बळी अर्पण करत स्त्रियांना समान हक्क नव्हता. पुरुषासंगे केळी खाणे त्यांना वर्ज्य होते ऋतुस्नात स्त्रिया व अंत्यज लोकांची सावलीसुद्धा अपवित्र मानत इवल्याशा माइर्द बेटावर या राजपुरुषाची स्मशानभूमी होती तिथे राजे कियोपुओलानी, कौमाली, कालाकुआ, लुनालिलो व राजगुरु हियापिली यांची छत्रे दिस–तात कोईआई बेटावर गर्भवती राण्यांना नेत व राजपुत्राचा जन्म काही पवित्र शिला–वरच होत असे या शिलांना होलो-होलो क-हिइआवू असे नाव होते याच बेटावर राजे मोईकिहा (मैत्रेय) यानी हनालीच्या युद्धात अनाकोला पर्वताच्या आरपार भाला फेकला म्हणतात इथेच सन १८१० साली राजे कामेनमेह यांनी राजे कौमालीचा वध केला होता असा हा इतिहास व काल्पनिक कथासार या बेटावर गुफलेला आढळला.

उरलेल्या दोन बेटावर म्हणजे मोलोकाई व लिनाईवर कुष्टरोग्याचीच वस्ती असून

विटुकल्या नुहाई बेटावर अवघ्या २१३ पोलिनेशियन लोकांचीच वस्ती दिसते अशी ही बेटे आहेत, जिथे भारतीय नावे व सांस्कृतिक चिन्हांची रेलचेल दिसेल

तिकडे आमची कॉन्फरन्स चालू होतीच दुपारी पेपरवाचन व सकाळ-सायंकाळ फिरणे होतेच भारतीय विद्यार्थ्यांकरता ईस्ट-वेस्ट सेन्टर नुकतेच निघाले असून कैक भारतीय विद्यार्थ्यांनी तिथे प्रवेश घेतला आहे श्री वाटूमल या भारतीयांनी इथे वस्ती केली असून मिसेस वाटूमलनी भारतीयांना खिचडी, भरीत, लोणचे, पापडाचा खाना दिला भाषणाला उत्तर देताना डॉ चंद्रशेखर (भारताचे आरोग्यमंत्री) यांनी उत्तर दिले हवाईबेटात भारतीय संस्कृतीची चिन्हे आहेत थायलंडमध्ये राजाला राम म्हणतात तिथे अयोध्या आहे, कथेत सिंधुमस नदी आहे व अद्याप राज्याभिषेकाला ब्राह्मण गंध लावतो कंबोडियाला अंकुखत स्थळी विष्णूमंदिर आहे इंडोनेशियामधे तर मशिदीत जाण्यापूर्वी भीमाला भाताचा नवेद्य दाखवतात अगुंग पर्वत फुटला तेव्हा ‘ पदांध ’ (ब्राह्मण) बाली बेटावर रुद्राभिषेक करत होते प्रे सुकार्णोची आई ब्राह्मण होती व ते देवळात कटचार पूजीत तेथील ‘ भासाइंडोनेसिया ’ मध्ये ४० टक्के शब्द संस्कृत किंवा तत्सम आहेत तिथे गंगा–यमुना आहेत रामायण–महाभारत आहे हे असे पूर्वेला आपल्या इतक्या जवळचे असून–सुद्धा भारतातील एकासुद्धा विश्वविद्यालयाने ‘ अतिपूर्व भाषा ’ किंवा संस्कृतीचा अभ्यास करण्याचा कार्यक्रम आखला नाही तेथील विद्यार्थी जवळ केले नाहीत मध्यपूर्वेबद्दलची जी कृत्रिम आस्था दिसते त्याच्या एकदशांश जरी अतिपूर्वेबद्दल दाखवली तरी भारताची परदेशनीती फार सफल होईल असे उद्‌गार मिसेस वाटूमल व तिथे जमलेल्या पॉलिनेशियन सज्जनांनी काढले हा सवाल मी विश्वविद्यालयांनाच टाकतो

✪

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

हवाई बेटावरून पॅनअमचे विमान रात्रीला सुटले तीन हजार मैल प्रवास करीत मिडवे बेटावर उतरले सकाळचे चार वाजले होते आम्हास बाहेर येण्याचा आदेश मिळाला अमेरिकन सैन्याच्या बराकीत सकाळचा ब्रेकफास्ट देण्यात आला इवलेसे बेट, पण गेल्या महायुद्धात जपानी बोटी बुडविल्या त्या तशाच ठेवलेल्या दिसल्या पुढे निघालो व वेक् द्वीपावर पुन्हा उतरावे लागले आता आम्ही आंतरराष्ट्रीय वार रेषेजवळ आलो विमान हवेत जाताच कॅप्टनने जाहीर केले, 'आता आपण सर्व काल्पनिक आंतरराष्ट्रीय रेषा ओलांडीत आहोत या रेषेनंतर सर्व व्यवहार चोवीस तास पुढे होणार मिडवेला मेची एकतीस तारीख होती, पण ती आता एक जून समजावी लागेल व त्याप्रमाणे वेळ बदलावी ' प्रत्येकाचे पत्ते घेतले व सर्वांना सांगितले, ' एक सर्टिफिकेट मिळणार त्यात ही रेषा ओलांडल्याचा निर्देश राहिल '

जपानी स्वागत – सकाळी दहा वाजता टोकियोच्या हेनेडा विमानतळावर आम्ही येऊ लागलो प्रवास सुमारे चोवीस तासाचा झाला मला तर असे बसून राहिल्यावर पायाची सूज ही ठरलेली त्याप्रमाणे पाय सुजले बूट घालता येईना एका जपानी एअरहोस्टेसने खड्यांच्या चपला दिल्या व माझे सर्व सामान चक्क उचलून घेतले उतरताना तळावर रेड कारपेट पसरलेले दिसले तळातील इमारतीच्या गच्चीवर काळा कोट व टोपी परिधान केलेली शाळेतील मुले हाती झेंडा घेऊन स्वागत करीत होती ती मात्र चपलानीच चालत होती, पण हे स्वागत कसले कळेना. नंतर समजले की, शिक्षण खात्यातर्फे शाळेतील प्रत्येक मुलाना देशाची महत्त्वाची स्थळे दाखवली जातात त्यामुळे रोज कोणची तरी शाळा विमाने व तळ पहाण्यास येत असते त्यांचा उपयोग करावा व प्रवासी पाहुण्याना स्वागताचे (लोग) – दृश्य दिसावे ही व दुहेरी इच्छा दिसली मुंबईला असे का करू नये ?

---

## राखेतून पुनर्जन्म घेणारा फिनिक्स

---

कस्टम्सचा त्रास झाला नाही बाहेर भारतीय वकिलातीतले श्री सोहनसिंग सामोरे आले त्यांनी अॅनिमल सेंटरचे डॉ आंडो यांची ओळख करून दिली माझा आठ दिवसाचा छापील कार्यक्रम दिला थेट राजमार्गाने राजवाड्यांच्या खंदकाशेजारून इंटरनॅशनल हॉटेलवर आलो खोली लहान होती, पण खिडकीतून तो छोटेखानी डोंगर, त्यावरील सुप्त दिसणारी हिरवळी, एकदोन ओहोळ, लाकडी पूल, मधून मधून बसविलेले कोरीव दगडी दिवे, सगळे जपानी पद्धतीच्या बागेची साक्ष देत होते मध्यावरच जपानी पद्धतीचे देवालय होते तिथून काही ततुवाद्यांची टेप मदध्वनी पसरवीत होती, त्यामुळे आराम व शांतता याचाच भास होई.

जपानी जेवण·— दुपारचे जेवण होते, तिथे शाकाहारी मेनू वाचला सोयाबीनच्या पिठाने वेढलेले भाताचे लाडू व स्ट्रॉबेरी क्रीम दुपारी डॉ आंडो सासर्गिक रोगाच्या दवाखान्यात घेऊन पुढे गेले जुन्या बऱ्याच भेटी झाल्या सायकाळी गावाबाहेर एका बागेत आलो मोटार आत घेतली नाही शंभर फूट दारापलीकडे पायीच गेलो स्प्रूस, बर्चची झाडे दोन्ही बाजूस होती चेरीला नुकतीच पालवी फुटून कळ्या निघत होत्या दगडाचे दिवे मार्ग दाखवित होते मधूर मद ततुवाद्यसंगीत हळुहळू आल्हाद देत होते एका जुन्या घराच्या पडवीजवळ आलो समोर ओळीने लाकडी चपला ठेवल्या होत्या बाजूला भरजरी किमोनो घातलेली तरुणी गुडघे टेकून बसली होती आम्ही जवळ येताच ती व शेजारून आलेली दुसरी वयस्कर बाई सामोरी आली कमरेपासून वाकली व आम्हास आत घेतले आमचे बूट काढले व लाकडी चपला दिल्या शेजारच्या स्टूलवर हे चालले असताना गरम (वाफेच्या) पाण्यात भिजवलेला टॉवेल आला आम्ही हात, तोंड त्यांनी शेकले व पुसले तोपर्यंत तिसरीने जाड कपात एकचतुर्थांश कप हिरवा चहा (काढा) समोर केला सोबत गोड लहान गोळ्याचजा वड्या दिल्या आम्ही आस्वाद घेताना त्या बायका कितीतरी गप्पा हसून हसून करीत होत्या चहा सपला व आम्हास लाकडी जिन्यावरून पहिल्या मजल्यावर नेले अगदी पुण्याच्या जुन्या घरांची आठवण झाली, तसेच जिने, तसेच लाकडी खाब पण खोलीभर चटया मात्र व्यवस्थित पसरल्या होत्या एका खोलीत सहा इंच उंच व रुंद पाटावर बसावे लागले मागे टेकण्याची व्यवस्था होती समोर एकफुटी टेबल होते देवळातील प्रवचन करणाऱ्या पुरोहिताची आठवण आली एक लाकडी रॅक, वर लहान लहान बाटल्या भरून 'साकी' आली ही तेथील तादळाची बीअर होय, पण ती गरम करून आणलेली होती वयस्क किमोनीवाली गुडघे टेकून तीवर हात देऊन स्मित करीत बसली तिच्या हाती पखा होता व ती वारा घालीत होती एक तरुणी आली तिने लहान लहान दोन कप कागदाच्या ट्रेमधून आणले तीन तीन इंचाच्या चौरस प्लेटस आल्या तीवर इवलीशी चटणी होती व बाजूला लेट्यूशची दोनच पाने होती लुटुपुटुच्या ससाराप्रमाणे ती खाल्ली हसत पखा हालवत ती बाई सारखी गप्पा मारून मन रमवीत होती व लाब बागेतून मद ततुवाद्याचा स्वर कानावर पडत होता दुसरी

प्लेट आली दोन इंच उंच होती व तिच्यावर अगदी लहान दाढीवाली परडीमाली. (दोन इंच उंच) तिच्यात चार उकडलेल्या मटारच्या लहान शेंगा होत्या नंतर आले लहान वाटीत सूप. भाताची पंचवीस शिते असलेली प्लेट आली असे हे भातुकलीचे वीस कोर्सचे जेवण होते ती आंबट गोड 'साकी' बीयर घेत या वीस कोर्सच्या संगीतासंगे व हिच्या गुलगुल गोष्टीसंगे आस्वाद घेत एक तास संपला गरम टॉवेल आला, चुळपाणी आली ती अगदी कंबरेपासून वाकून आम्हाला त्या लुटुपुटुच्या जपानी जेवणानंतर निरोप देऊन गेली भारतातील भेळपुरीप्रमाणे सुकी याकी व टेम्पुरा जेवण होती त्या हॉटल-पासून दूर राहिलो

गच्च भरलेली गाडी – सरदार सोहनसिंग सकाळी आले त्यांच्यासंगे स्टेशनवर आलो अगदी मुंबईप्रमाणे भरलेली गच्च लोकल आली लाऊडस्पीकरने स्टेशने सांगितली अगदी कोंबाकोंबी करून शिरलो बायकामुले सर्व एकाच डब्यात होती बसणारे कमी, उभे रहाणारे सगळेच गाडी सुरू झाली बाजूला एक जपानी त्या सीटवरील कव्हर शिवत होता विचारल्यावर म्हणाला, 'ही गाडी आमचीच आहे, कुणीतरी कव्हर फाडले मी शिंपी आहे, वेळ आहे, स्वतःची प्रॉपर्टी शिवून ठीक करीत आहे' (भारतातले आणखी फाडतील) रेल्वे लाईनच्या दुतर्फा हिरवळ, बागा, जंगल, शेती होती एक इंचसुद्धा जमीन कुठे पडिक दिसली नाही सुगोमा स्टेशनवर धक्काबुक्की करीत उतरलो यात्रेकरूनी वाकून निरोप दिला हे स्टेशन अगदी माऊंडप्रमाणेच होते सॅनिटेशन पण तसेच उकर-लेल्या दगडी सडकेवरून कॅम्प भामा गाठले जपानी सत्रीने अडविले आतून मेजर पीयर्स गाडी घेऊन आले व अमेरिकन कमांडन्टला भेटलो कॅ मेकडोनेल्ड यानी प्रयोगशाळा दाखविली सुंदर चित्रे भितीवर दिसली जपानचा गेल्या युद्धात पाडाव झाला होता अमे-रिकन सैन्याने शहर व्यापिले व सर्व संस्थेत अमेरिकन ऑफिसर शिरले खालील दर्जाची कामे करण्याला त्यांनी जपानी ठेवले चार वर्षांनी त्यांना आढळले की, वैज्ञानिक चित्रे ज्यांनी चार वर्षे काढली व जो इतका गरीब दिसे तो तिथे प्रोफेसर ऑफ फाईन आर्ट होता

बाग करणारा माळी प्रोफेसर ऑफ हॉर्टिकल्चर होता कॅन्टीनमधील स्वयंपाकी प्रोफेसर ऑफ केटरिंग होता अशी मोठ्या व हरहुन्नरी लोकांनी इतकी हलकी कामे केली, पण ओळख शेवटपर्यंत दिली नाही ओकीनावा बेटावर जपानी लोकांनी खूप प्रतिकार केला ते सर्व बेट पोखरून आत उत्तम वस्ती, शाळा व दवाखाने त्यांनी केले होते बीच-वरील सैनिक गारद झाले की, आतून कुमक येत असे अमेरिकेने त्या पोखरलेल्या भुया-राची तोंडेच बॉम्ब टाकून उध्वस्त केल्यावर त्यांना कैक वर्षे तोंडे दिसली नाहीत, पण सहा वर्षांनी त्या बेटावर उंदरांनी खूप धुमाकूळ घातला शोधाती कळले की, हे उंदीर आतील प्रेतांवर ताव मारीत आहेत

तिसऱ्या दिवशी प्रोफेसर निशी मूरा यानी स्वास्थ्य संस्थेत माझे स्वागत केले

संस्था पाहिली ब्रिटिश आणि अमेरिकन संस्था त्यामानाने अस्वच्छ दिसल्या, पण काट-कसर चिक्कार होती प्रयोगाला लागणाऱ्या कुत्र्याना वेगळे महागडे अन्न देण्यापेक्षा, पेश-टने टाकलेले साजुक अन्न स्टरलाईज करून देत असत त्यामुळे अन्न वाया जात नसे व कुत्री चागली वाढत माझे व्याख्यान होते वैज्ञानिक वाकून आत येऊ लागले विशेष लॅम्पने माझे सदीप लेक्चर व्यवस्थित ऐकून यथेच्छ प्रश्न विचारले

राजकीय खाना– रात्रीला भारतीय राजदूतानी माझ्या निमित्ताने खाना दिला जपानी डिफेन्स मिनिस्टर आले होते खूप खूप बोलणे झाले व हिरोशिमा– नागासाकीवर येऊन ठेपलो 'ती खोल जखम अद्याप दु:सह्य आहे– आम्ही पोळून निघालो, चितेतून वर येत आहोत, फिनिक्स पक्ष्याप्रमाणे जपान अजरामर आहे' असे अगदी मर्मभेदी शब्दात त्यानी सांगितले

देशाकरिता हसत फासावर जाणारे सेनाधिकारी किंवा हाराकिरी करणारे सैनिक ज्या देशात आहेत, जिथे राष्ट्राभिमान रोमारोमात भरला आहे तो देश कधी नष्ट होणार नाही हिरोशिमा चांगले उद्योगपतीचे शहर होते त्या दिवशी नित्याप्रमाणे रहिवासी दुपार-नतर काम आणि मनोरजनाकडे लागले होते कुणी ऑफिसच्या पायरीवर घड्याळाच्या सावलीखाली बसले होते, कुणी त्या मोठ्या लोखडी गर्डरवाल्या इमारतीजवळ फिरत होते एकाएकी हजारोपट वीज कडाडण्याचा आवाज झाला प्रकाशाने डोळे तर दिपलेच, पण ते कायमचे मिटले ती पायरीची शिला फुटली, वितळली लोखड वितळले, वायुरूपात उडूनपण गेले एक मैल लांब एका तळघरात प्रख्यात ॲक्ट्रेस कपडे करून पाव-डर लावीत होती. दिवे गेले, तेज–प्रकाश दिसला, भयकर आवाज आला ती शुद्धीवर आली तेव्हा अग कडकडत होते–तिचे वस्त्र, शरीरावरील केस पार जळून गेले व ती तात्पु-रती आधळी झाली त्या घटनेनतर आज दोन पिढ्या हिरोशिमाचे पाप सहन करीत आहेत त्यांचे रक्त दूषित झाले कॅन्सरचे प्रमाण वाढले हाडे ठिसूळ झाली त्वचा डागव-लेली झाली व लाखो अपग झाले आज त्या स्थळी त्या भयकर तपमानाने वितळलेले गर्डर उपस्थित आहेत जवळच पार्क आणि मेमोरियल बाधण्यात आले आहे व प्रतिवर्षी यात्रा भरून प्रार्थना करतात, 'ॲटमबॉब थांबवा, शांतता राखा'

गिंजास्ट्रीट टोकियोची प्रख्यात बाजारपेठ होय. सडकेच्या दोन्हीकडे दुकाने तर आहेतच पण फूटपाथवर विजेची उपकरणे, ट्रांझिस्टर, पखे, टी व्ही अगदी उघड्यावर विकतात इतका माल व इतका स्वस्त साऱ्या जगाची बाजारपेठ जपानने काबीज केली अमेरिकेचे जपान, कोरिया व फारमोसाशिवाय कसे होईल हा एक प्रश्नच आहे 'मिटसुई' डिपार्टमेन्ट स्टोर मध्ये गेलो इथे अक्षरश: टाचणीपासून मोटारीपर्यंत (समोर निरखून) विकत मिळते स्टोर, अमेरिकेतील कोणत्याही स्टोरपेक्षा मोठे दिसले टोकियो तर लडन-पेक्षा मोठेच शहर ठरले काही सामान छत्री, खेळणी घेऊन वरील सहाव्या मजल्यावरील उपहारगृहात पेये व खाद्ये घेतली. सुदर तरुण युवतीनी ती वाढली उठताना नेहमीप्रमाणे

दहा टक्के टीप प्लेटखाली ठेवली दारापर्यंत गेलो तोच ती तरुणी धावत आली 'सर, आपण टेबलावर पैसे विसरलात' खिसे तपासले व 'टीप आहे'—म्हणालो 'या देशात असं करीत नाहीत आम्हाला पगार मिळतो, आमच्या स्वाभिमानाला दुखवू नका—' ती म्हणाली

नाईट क्लब आणि प्रामाणिकपणा—टॅक्सीने परत आलो त्याला उतरताना येन टीप दिली त्याने चक्क 'नो, थँक यू' म्हणत परत केली रात्रीला गीशा विभागातून फिरलो एका गिशा-घरात शिरलो अनुभवी वयस्क स्त्रियाच्या देखरेखीखाली लहान मुली ट्रेनिंगला ठेवतात याना चांगली वागणूक, वेषभूषा, पुरुषाचे मनोरंजन आदि शिकवतात मुंबईच्या काँग्रेस हाऊसच्या परिसराप्रमाणे गिशागृह नसतात चटई अंथरलेल्या हॉलमध्ये त्या फराळाचे देतील, काही हलके गाणे, काही सामुहिक खेळ व थँक यू—एवढेच ते कार्यक्रम पधरा रुपयात होतात दारापर्यंत निरोप देतात

अलिकडे नाईट क्लब्स् निघालेत आत गेल्यावर एकटे असल्यास तरुण मुली देतात सोबत गप्पा मारीत बरोबरीने मदिरा किंवा इतर ड्रिंक घ्यावीत समोर स्टेजचा पडदा उघडतो बँडच्या आवाजात एक तरुणी गिरक्या घेत येते कैक हावभाव करीत एक एक वस्त्र काढून नाचत नाचत फेकत जाते वक्षःस्थळ उघडे झाले की वाद्याचा उच्चांक होतो ती गिरकी घेत परत जाते पण तेवढ्यात चड्डी पण काढून फेकते हे असे दृश्य दिसले भारतातील एक व्यापारी तिथे गेला चिक्कार प्याला व टेबलावरच पडू लागला त्या मुलींनी मॅनेजरला बोलविले त्याचा कोट काढून खिशातील पैसे तपासले कागदावर टिपून ड्रिंकचा खर्च, मुलीचे भाडे, व टॅक्सीचा खर्च लिहिला तेवढे पैसे काढले, टिपलेली स्लिप खिशात ठेवली व त्याच्या खिशाला सेफ्टीपिन पैशाभोवती लावली व टॅक्सीत बसवून घरी पाठविले इतका प्रामाणिकपणा भारतात येईल काय ?

मी याशीका कॅमेरा घेतला २५० रुपयाला पडला त्याचे जवळ टेलिफोटो व जवळचा लेन्स नव्हता पण किंमत लिहून दिली दोन वर्षांने पुन्हा जपानला गेलो त्याच दुकानात त्याची पूर्वीची स्लिप दाखवून मागणी केली किंमती दुप्पट झाल्या होत्या दुकानदाराने आम्हाला चहापाणी दिले 'थांबा—' म्हणत टॅक्सीने चार मैल गेला दोन्ही लेन्सिस आणून दिल्या, किंमती दोन वर्षापूर्वीच्याच होत्या 'इतका खर्च व तोटा का सहन केला ?' विचारल्यावर म्हणाला, 'तुम्ही माझ्या देशात आलात या वस्तू माझ्या देशात स्वस्त मिळतात ही तुमची भावना माझ्या देशाबद्दलची ही सदभावना मी वाया जाऊ देणार नाही माझा देश वर आला तर मी वर येईन' भारतात असे कुणी म्हणेल काय ?

गावाबाहेर एक दिवस एका शेतकऱ्याकडे काढला घर लाकडाचे खिडक्या बांबू आणि कागदाच्या होत्या घरभर चिठ्या पसरल्या होत्या घराला लागूनच छोटेखानी शेत होते हा शेतकरी गरीब होता त्या अर्ध्या एकर शेतीतूनच चार पिके काढी नागराला

गुरे नव्हती पण नवरा–बायको खाद्यावर जू घेत मुलगा फाळ जमिनीत दाबी वरील ओहोळाचे पाणी आत सोडले होते कोपऱ्यात लाब टाकी होती तिथे घरातील सर्व खत जाई सकाळी उठल्यावर घरातच शौच करून स्वत: काढून त्या टाकीत सोडून व घर स्वच्छ फिनाईलने धुऊन चटई अथरून ठेवीत तेच खत शेतीला उपयोगी पडे तो तांदूळ, सोया बीन, काही डाळी, व पुन्हा तादूळ पेरी शेताच्या टोकाला एक चेरीचे झाड व लहानशी बाग होती स्त्रिया व मुले खूप गोरी व गुटगुटीत होती आंघोळीला लहान खड्डयाच्या न्हाणीत आई–वडील, मुले व नातवडे, सुना सगळे दिगबर होऊन सामुहिक स्नान करीत.

ओकासा शहरात गेलो कैक बोटी उभ्या होत्या बसेन मधील मदिरे पाहिली योरी-टोमा देऊळ ७०० वर्षांचे जुने आहे · कामाकुरा के पास से गुजरे दूर फुजियामा पर्वत था, जो अधुरा बर्फ से ढका था ' मोहनसिंग म्हणाले ' डैबात्सु नामक वृद्ध भगवानकी प्रचड प्रतिमा है प्रतिमा अदर से पोली है और यात्री अदर सीढिसे चढ जाते है ' हे सर्व सोहनसिंग याचे शब्द खरे दिसले त्या मूर्तीच्या आतील पायऱ्याने चढलो व मस्तकापर्यंत गेल्यावर अर्धोन्मीलित नेत्राने येणाऱ्या प्रकाशातून बाहेरील जगाचे मिणमिणते दर्शन घेतले जवळच्या देवळातून उदबत्त्या व फोटो घेतले सायकाळी टोकियोला परतलो रात्रौ एका थिएटरवर नृत्य–नाटकाचा कार्यक्रम होता स्टेज खूप मोठे होते. स्टेज उघडे होते एका टोकाला अगदी समोरच वाद्यवृद बसला होता स्टेज उघडे होते वाद्यानी झकार केला थिएटरमागून काही आवाज आले हे ध्वनी जवळ येऊ लागले व त्याचे प्रतिध्वनी उमटत होते हळूहळू क्लायमेक्सप्रमाणे वाद्यानी आवाज केला श्रोतृसमुदायामधूनच एक घोडा-त्याचा सईस, (म्हणजे मोतद्दार) शिपाई, प्रेयसी सगळे मिरवणुकीने स्टेजकडे चालले होते मागे वळून पाहिले तेव्हा घोड्यावर स्वार पण दिसला व हे सर्व नट–नटीचे सोंग ओरडत, कोरस म्हणत स्टेजवर आले घोडा नाचू लागला नटाच्या सर्वानी पण हावभाव सुरू केले हे विशिष्ट प्रकारचे थिएटर होते व ही पद्धत 'काबुकी' म्हणून सबोधिली जाते त्यात नट श्रोतृवृदातून येतात तो खरा दिसणारा घोडा सात मानवांचा सागाडा होता भार-तात नुकताच 'घाशीराम कोतवाल' नाटकाचा प्रयोग पुण्या-मुबईत झाला व तिथे सुरु-वातीला नटसच श्रोतृवृदातून आणला आहे

शवटच्या दिवशी गावाबाहेरील मेळा पाहिला चेरी वृक्षाला फुले येत होती. 'चेरी ब्लॉसम' पाहून निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्याला हजारो नागरिक त्या वृक्षवृदाजवळून चालले होते पाढुरकी, गुलाबी, जांभळी, केशरी रगांची फुले झाडांना अगदी ओथबून लगडली होती चहुकडे जणू होळीचा रग होता सुदर ततुवाद्ये वाजत होती सुदर तरुण–तरुणी उत्तम किमोनो परिधान करून त्या सौंदर्यात, त्या सगीतात लय घेऊन हळू-हळू नृत्य करीत होते

जूनचा कडक उन्हाळा व तशात हाँगकाँगची दगदग, त्यामुळे अगदी थकून गेलो तरी मलेशियन एअरलाईन्सने सिंगापूरला रात्री ११ ला पोचलो बाहेर वारा नव्हता उकाडा चिक्कार व जवळच असलेल्या खाडीचा कुजका वास यातच सिंगापूरचे दर्शन झाले. मेडिकल ऑफिसर तामीळ होते एक दोन शीख दरवान दिसले व भारताची आठवण आली कस्टम्स करून टॅक्सी घेतली ड्रायव्हर भारतातूनच आलेला होता नेताजी सुभाषचंद्र बोस इथे असताना त्यानी आपले सर्वस्व अर्पण केले होते कुजलेला वास व उकाडा सहन करीत हॉटेलवर आलो नशिबाने रूम एअर कंडिशंड होती स्नान केले व पडलो सकाळी आठ वाजता जाग आली

डॉ सदोशन मेडिकल कॉलेजचे डीन होते मलेरियावर त्यांचे उत्तम संशोधन झाले. सकाळी प्रयोगशाळा दाखविली दुतर्फा घरे अगदी ब्रिटिशकालीन मद्रास प्रांताप्रमाणे होती रात्री भारतीय खाना दिला त्या समयी जुनागढचे श्री कांतिलाल गाथा पण उपस्थित होते जेवणाच्या वेळी होनोलूलूची आठवण झाली त्या गावी श्रीमती वाटुमल यानी उत्तम भारतीय खिचडी, वांग्याचे भरीत व पापड आणि लोणची दिली होती डॉ चंद्रशेखर भारताचे भूतपूर्व वैद्यक विभागाचे मंत्री त्यानी आम्हा सगळ्यातर्फे मिसेस वाटूमल यांना खूप धन्यवाद दिले इथेसुद्धा तोच मेनू होता

तिसरे दिवशी कोलालपूरला उड्डाण केले विमानतळावर डॉ जॉन आर आडी घ्यावयाला आले होते यांना भारत व भारतीय याबद्दल फार आस्था आहे हल्ली ते सॅन-फ्रान्सिस्को इथे मेडिकल रिसर्च सेंटरचे डायरेक्टर आहेत त्याचा जन्म पुण्यात झाला तिथे त्यांचे वडील फोटो झिंकोग्रसचे मॅनेजर होते लहानपणची आठवण सांगताना त्याना घरातील बाजीराव चपराशाबद्दल फार कुतूहल दिसले त्यानी जॉन साहेबाना बाजारातून

## अतिपूर्वेत अयोध्या व राम

जिलेबी खाण्यास व घरामागे विड्या पिण्यास शिकवले होते

सिंगापूरप्रमाणे कोलालपूर मद्रास प्रांतासारखे दिसले. ऑफिसराचे बैठे बंगले मोठ कम्पाउंड, चपराशी समोरील रेल्वेस्टेशनवरील पाटी, तामीळ, चिनी, इंग्लिश व अरेबिक अशा चार भाषात होती. गावाबाहेर एका टीन धातूच्या खाणीजवळ डोंगरावर मोठ्या गुफा आहेत त्याना बठुक गुफा म्हणतात ३०० पायऱ्या चढून वर गेल्यावर त्या भव्य गुफेच्या दाराशीच वरून चुनखडीचे भव्य घड खालपर्यंत लोंबतात (यांना स्टेलेक्टाईट म्हणतात ) उचावर वटवाघुळांचे थवेच्या थवे किंचाळत होते व लांब आत एक पवित्र देवालय (श्री सुब्रमण्यम् स्वामीचे) दिसले जवळच उदबत्त्या, पणत्या व पुरोहित पूजेचे सामान घेऊन उभे होते अगदी दक्षिण भारतातील पूजास्थानाची आठवण झाली. पठारावर आलो व जगलाकडे वळलो त्या लहान रस्त्याच्या दोन्हीकडे रबराचे मळे दिसले झाडाच्या बुध्याना चिरा देऊन बादलीत थेंब थेंब रस गोळा करीत होते सोबतच बाबू किंवा लाकडावरच बांधलेली घरे दिसली या घरात भारतातील 'कुली' मद्रास आणि बिहारहून दोन पिढ्यांपूर्वी आले व आता स्थायिक झाले त्यांनी आपापली भाषा व संस्कृती टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न केला

पुढे जरा घनदाट जगलच होते बांबू, केळी व नारळाची वस्तीभोवती झुडूपे होती नुकतेच कम्युनिस्ट चळवळीकरिता एकत्रित आणलेल्या वसाहती दिसल्या जगलात सर्प, विंचू तर सर्वत्र होतेच पण लहान लहान जळवा जणू काय झाडावरून उडीच घेत व नकळतच मानवाचे रक्त शोषीत लुगी नेसलेले मल्याळी कामकरी बाबूच्या कुपीतच पडलेल्या तबाखूचा रस ठेवीत जळू चिकटली की हा रस टाकावा जळवा पटापट खाली पडतात

परत गावात आल्यावर हॉटेलमधे पायनापल ज्यूस मागितला त्याने कॅलिफोर्नियाहून आलेला टिन फोडला हॉटेलच्या दाराशीच अननसाचे ढीग पडले होते किंमत अवघी ४ आणे फळाला पडे पण या फळाचा रस परदेशातून आणावा लागला मार्केट सर्वस्वी चिनी व भारतीय व्यापाऱ्याच्या हाती होते दुकानावरील दरवान शीखच दिसले मलयवासी चैन व नवीन प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याचा हक्क संभाळण्यात गुतले होते रात्री एका उडुपी हॉटेलात केळीच्या पानावर चक्क भात, सांबार व डोश्यावरच भोजन आटोपले

सहाव्या दिवशी आमचे विमान बँकाकला पोचले विमानतळाची जागा अगदी डमडम एअरपोर्टसारखी आहे आतील कस्टम्स व वैद्यक विभागाची वागणूक नेमकी कलकत्त्यासारखी भासली गाव तिथून २० मैल लांब असावे थाई रेडक्रॉसचा मला पाहुणचार लाभला होता तडक त्याच्या एका ऑफिसवरील खोलीत नेण्यात आले पडवीवजा खोली होती व शेजारीच दोन मोठाले मातीचे राजण पाणी भरून लहान बाथरूममध्ये ठेवलेले आढळले डास अगदी मुंबईच्या–बांद्र्या (पूर्व) प्रमाणे, चिक्कार होते स्नान आदि झाल्यावर एका भल्या मोठ्या ट्रेमध्ये जेवण आले आणणारी स्त्री की पुरुष कळेन

व त्यांना इंग्लिशचे ज्ञान पण नव्हते अन्नात थोडा भात, पोर्क, मटण, बीफ, चिकन, मासे, अननस, नारळ आणि केळी होती शेवटच्या तीन व पहिल्या पदार्थांवरच भूक भागविली

क्वीन सौभा मेमोरियल इन्स्टिटयूटच्या प्रांगणात कार्य सुरू केले इथे एक जुने सर्पालय असून त्यात घोणस, पटेरी मण्यार, बिन आकडयाचे नाग व मोठे किंग कोब्रा ठवले होते याच सर्पालयाप्रमाणे सर्पालय हाफकिन संस्थेत जमविले आहे पण बँकाकचे सर्पालय पाहण्याला रोज सारखी प्रवाशाची गर्दी असते (मुबईच्या राणीबागेप्रमाणे) व त्या गर्दीची गरज पुरविण्याला कावडी घेऊन चहा, चिवडा, चिरीमिरी विकणारे हिरवळी-वर बसून असतात तो १८ फूट लांब किंग कोब्रा उचलून दाखविण्याकरिता विशेष लोकांची निवड केलेली असते संस्थेत या सर्पाचे विष काढून त्याना निर्विष करितात माझे तिथे व्याख्यान पण झाले व मी सुधारलेले सर्पालय त्याना आवडले

येथील राजेसाहेब थै रेडक्रासचे अध्यक्ष होते परदेशात गेल्यामुळे त्याचे बंधू राज-कुमार ‘ चुभोत ’ यानी मला बोलाविले चुभोत शब्द कुभोज असावा राजेसाहेबांचे नाव ‘ भूभोल अडूलडेज ’ असे लिहितात पण ते बहुतेक ‘ भूमिपाल अतुलतेज ’ असावे. प्रत्येक राजाच्या नावाशेवटी राम दी थर्ड–सेवथ आदि असते, म्हणजे रामचे नाव शेवटी असलेले राजेच इथे आहेत इथे अयोध्यानगरी आहे राजपुत्र कुभोजकडे जाताना मार्गात ‘ धरणी ’ चा पुतळा लागला राजपुत्राच्या घराचे नाव होते ‘ नगरस्वर्ग ’ शिपायानी आत नेले व एक इवलासा पूल ओलाडून एका छोटयाशा द्वीपावर केलेल्या मडपात बसविले मडप कोरीव लाकुडखांबाचा होता हत्ती, मगर, कमळ, आदि कोरलेले दिसले सौराष्ट्रातून येणाऱ्या लाकडाच्या खाबासदृश फर्निचर होते एका सोफ्यावर बसलो राजपुत्र कुभोज शरीररक्षकासगे पुलावरून आले सावळी मूर्ती होती रेशमी काळी जरीकाठी धोतरजोडी परिधान केली होती पण धोतर गुडघ्यावरच होते खाली लाब काळे मोजे व उत्तम बद-वाले बूट बद कॉलरचा रेशमाचा करडया रगाचा कोट होता त्याला रत्नजडीत बटण चमकत होती हिरे–माणिकाच्या आंगठ्या झळाळत राजे मजपर्यंत आले हात पुढे केला व शुद्ध इंग्लिशमध्ये माझे स्वागत केले मान हलविली की रत्नजडित लहान कुडले पण डोलत होती केंब्रिजला याचे शिक्षण झाले त्यामुळे जगातील परिस्थितीचे ज्ञान त्याना चागले दिसले थाई व भारतीय संस्कृतीच्या गप्पा सुरू झाल्या, इतक्यात त्याच्या पत्नी आल्या यांनी मात्र स्कर्ट घातला होता महाराष्ट्रात आपण देवाला आरती करितो त्या निराजनाला ‘ हारती ’ हा शब्द त्याना ठाऊक होता तामीळमध्ये हारती शब्द असावा चहाफराळाचे पदार्थ आले ब्रिटिश क्रॉकरी उपयोगात होती नुकतेच त्यानी एक शिल्प विकत घेतले होते त्याचे देवालय करण्याचा बेत होता त्या शिल्पाचे दर्शन घडविले फारच सुदर नक्षीकाम होते. भारतीय पुरातन शिल्पाची आठवण झाली व त्याना सांची, अमरावती, अजठा आदिबद्दल सांगितले आता त्यानी मला महालात नेले. लाकडी महाल,

काचेची झुंबरे, भव्य कारपेट, त्यावर तलम कापड, चिनी, जपानी भिंती–पडदे कोरीव फर्निचर सर्व बघत थेट त्याच्या देवघरात आलो इथे एका टेबलावर कैक बुद्ध मूर्ती होत्या जवळच लाद्रसची भग्न झालेली शिवाची एक मूर्ती पण पडली होती त्या टेबलाच्या मधोमध सोन्याचे महिरप असलेले छोटेखानी सिंहासन होते त्या छोट्या जागी मी आश्चर्याने पाहिले चक्क पंचायतन-तिथे शिव–पार्वती–गणपती आदि होते व त्याच्या मस्तकावर कुणीतरी चंदन लावलेले दिसले आठवड्यातून एकदा ब्राह्मण चंदन लावून जातो या देशात बुद्ध धर्म आहे राजाला दीक्षा घ्यावी लागते पण राज्याभिषेक समयी ब्राह्मण चंदन लावून अभिषेक करतो

राजपुत्राना खूप-खूप धन्यवाद देऊन दुसरे दिवशी राजमहालातील मुख्य देवालयात गलो भारतातील जुन्या वाड्याप्रमाणेच ही इमारत होती दोनचार चौक्या, दगडी शिपाई, खरोखरीचे शिपाई परवानगीपत्र सगळे तपासून भगवान बुद्धाच्या मुख्य मंदिरात आलो माझ्यासंगे क्वीन सौभा, संस्थेची उपसंचालिका डॉ श्रीपापदे अक्षरा होत्या या देवालयाच्या भिंती उत्तम ऑईलपेन्टने चितारल्या होत्या व समोर सहा फूट उंचीवर सोन्याच्या मखराखाली भगवान बुद्धाची एक फूट उंच पाचूची सुंदर मूर्ति होती प्रवासी फूल आणि फळ समोरील टेबलावर ठेवू लागले व मी भिंतीवरील चित्र बघू लागलो भगवान बुद्धाच्या आईला पडलेल्या पांढऱ्या हत्तीचे स्वप्न, बुद्ध धर्मातील जातक, भगवानांची यात्रा आदि सर्व ऐतिहासिक दृश्ये चितारली होती ते सर्व पाहून अख्खे बुद्धचरित्र वाचल्यासारखे झाले चित्रे पहात थेट दारापर्यंत आलो इथे रामायणातील प्रसंगांचे चित्रीकरण दिसले पण सर्वात जर डोळ्यात भरले असेल व जे भारतीय पाठकांना आश्चर्याने हलवेल असे ते चित्र होते, स्वयंवराचे पण हे स्वयंवर श्रीहनुमानाचे होते लंकेवर उड्डाण करण्यापूर्वी सुरसा आदींच्या घटना झाल्या तिथेच हे स्वयंवर रचले व चितारले डॉ श्रीपपदेना विचारले, पण त्यानी मान हलविली बुद्धग्रंथवाचन चालू होते सुगंध दरवळत होता लोक नतमस्तक होऊन बसले होते मी नमस्कार केला व परत निघालो

सातव्या दिवशी थाई नृत्यनाटक दाखविले या नृत्यनाटकाच नाव होत 'सुवर्ण-हंस' इथे नायिकेला सिंधुमस नदी पार करावी लागे त्याकरिता स्टेजवर नदी–बोट–प्रवाम आदि प्रात्यक्षिक केले होते कडेलाच सगळा ऑर्केस्ट्रा होता तिथूनच तबला, जलतरंग आदि भारतीय वाद्याप्रमाणे सामान दिसले संगीत–लय-तान सगळे भारताप्रमाणे होते या नाटकात स्त्रियांनीच पुरुषाचा पार्ट केला होता प्रत्येक नटाची नखे लांब सुवर्ण धातूने मढलेली कमरेखाली नुसते जाड सोनेरी खूप मोठी जरी असलेले किनखापी लुगडे होने काष्टा होता मनगटावर सोनेरी पट्टे व डोक्यावर सोनेरी मुकूट होता मुकुटाच्या आकारांनीच व कमी जास्त हालचालीनीच स्त्री–पुरुष पार्टी ओळखता येत असे नट काही बोलत नसत केवळ नृत्यानी– बोटांनी, भुवयांनी, तोंड्यानी हावभाव करायवाचे वाद्यवृंद, संगीत आणि काही भाषण जेमतेम लाऊडस्पीकरवर बोलत काही

विशिष्ट नृत्यानंतर लोक टाळ्या वाजवीत सगळे नृत्य इतके नाजुक व हृदयस्पर्शी होते की शब्दाची गरज नव्हती आठव्या दिवशी कक बुद्ध मंदिरांना भेट दिली, एका मंदिरात भिक्षूची राग बसली होती व अर्चक त्यांना जेवण देत होते थायलंडमध्ये राजधर्म बौद्ध असून या धर्माची एक मिनिस्ट्री पण आहे बुद्धभिक्षूचे यथासांग पालनपोषण व जनतेची धार्मिक भूक यानीच शमवितात ६० फूट लांब महापरिनिर्वाण बुद्धाची सुप्तमूर्ति पाहिली इथूनच बाजारपेठ सुरू होते या देशात कृत्रिम पाचू, हिरे चिक्कार मिळतात व दागिन्याची एक विशिष्ट कलाच आहे पुढे बाजार आधुनिक झाला चिनी व्यापारी दिसले शीख सरदार आले व तेथील दुधाचा व्यापार चक्क 'भय्या'च्याच हाती, मुंबईप्रमाणे दिसला गावात परत येताना बँकॉकच्या कैक प्रसिद्ध कालव्यावरून आलो या कालव्यांतून– ( क्लाग ) बोटी, भाजीपाला नेतात बाजूला झोपड्या आहेत त्याच पाण्यात घाण सोडतात कुणी मासे पकडतात कुणी फळे घेतात पण तेथील स्वच्छता पाहून माझी तरी काही खाण्याची इच्छा झाली नाही अमेरिकन टूरिस्ट मात्र चित्रे काढीत होते

या अतिपूर्वेकडील अयोध्या आणि रामाची आपणाला कधी तरी आठवण झाली पाहिजे आपली संस्कृती इथे आहे इंडोनेशियाच्या बाली द्वीपावर अद्याप हिंदूधर्म आहे ब्राह्मणाला पदाध म्हणतात अगुंग पर्वतावर ज्वालामुखी फुटला तेव्हा उजयिनी शंखाने ते रुद्राभिषेक करीत होते देवालयासमोर ब्रह्मा–विष्णू आहेत पण आत 'अनंत' त्या देशात गंगा–यमुना आहेत रामायण–महाभारत इथेच झाले म्हणतात मशिदीतूनसुद्धा रामायण-महाभारताचे नृत्य करतात नमाज पडण्यापूर्वी भीमाला भाताचा नैवेद्य देतात प्रेसिडेंट सुकार्णोची आई ब्राह्मण होती ते कमरेवरील कट्यार देवळात जाऊन पूजीत त्यांनी आपल्या मुलींची नावे भारतीय ठेवली यांच्या भाषेत ५० टक्के संस्कृत शब्द आहेत भाषा सुधारण्याला व संस्कृतला स्थान देण्याला एक खातेच उघडले व देशभाषेला 'भासा इंडोनेशिया' नाव दिले

कंबोडियाला 'अंकुरवत' देऊळ आहे 'विष्णू' आहेत या लाऊस– ( लवद्वीप ), कंबोडिया– ( कुंभोज ) ला येथील संस्कृती आहे तरी या अतिपूर्वेकडील हल्लीच्या परिस्थितीचा कधी विचार झाला नाही येथील विश्वविद्यालयात त्या भाषांचे संशोधन नाही श्री मेनन– आपले थायलंड येथील वकील, यांनी खाना देताना या उणीवांकडे माझे लक्ष वेधले व मी हाच प्रश्न प्रत्येक भारतीयाला टाकीत आहे

माझी टॅक्सी जॉन हाफकिनच्या पोर्चमध्ये थाबली टॅक्सी ड्रायव्हर ' तो ' नसून ' ती ' होती त्या प्रचडकाय निग्रो बाईला काचेच्या आडून पैसे दिले ' थँक्यू ' म्हणत मीटरची दांडी वर केली मान वळवून ' यू फ्रॉम क्यूबा ?' पुटपुटली व मी ' नो ' म्हणताच ' देम काउन्सिल वेयरी जिटरी ' अस म्हणाली व ' बाय् बाय् ' करत दाराआड झाली

बाल्टिमूरहून क्लीव्हलँड व तिथून पीट्सबर्ग गाठले लोखड कारखानदारीचे हे मुख्य केंद्र आहे इथून इस्टर्न एअरलाइन्सच्या ' व्हिस्परिंग जेट ' ने मयामीकडे निघालो प्रशस्त विमान व उत्तम सोबत मिळाल्यावर त्या व्यापाऱ्याने जगातील लोखड-निर्मितीचे आकडे– (बोलके ) सांगितले :– जपान १३० मिलियन टन, अमेरिका– १२० मिलियन टन, रशिया– ७० मिलियन टन, चीन– ३० मिलियन टन, जर्मनी– २५ मिलियन टन, ब्रिटेन– २१ मिलियन टन व भारत– ०.००५ मिलियन टन ! यावरून आमची प्रगती कळते ओपेक राष्ट्रातील अग्रगण्य पुढारी वेनिझुवेला इथे प्रतिदिनी तीस लक्ष बॅरल तेल निघत आहे व त्या राष्ट्राचे भवितव्य किती उज्ज्वल आहे, इकडे त्यानी माझे लक्ष वेधले भारतात निघत असलेल्या सर्व तेलाचा साठा अमेरिकेला अवघा चोवीस तासच पुरेल

गप्पा सपत असतानाच मयामी शहराची गगनचुबित वसाहत दिसू लागली त्या पसरलेल्या विमानतळातच चार फर्लांग दालनातून चालून बारिग एअरलाइन्सचे ऑफिस गाठले व सामान ठेवले इथेच प्रतीक्षा करीत मिसेस हास्ट उभी होती क्षेम कुशल झाले व लेट् अस गो ' म्हणत तिने मला गाडीत बसविले स्पॅनिश सस्कृती बहरत असलेल्या घरासमोरून हाय–वेने आम्ही डिक्सी ड्राइव्हवरील तिच्या प्रशस्त इस्टेटीत पदार्पण केले ही बाई दक्षिण अमेरिकेतील बोलीविया कुटुबातील मुलगी माया व अन्टेक सस्कृतीचा

## वेनिझुवेला

तिच्यावर प्रभाव झाला होता. तिने बिली हास्ट या सर्पालयाच्या मालकाशी विवाह केला. इथे सर्प, मगर, सुसर, सरडे, पाली, कासव आदींचा मोठा सचय असून नुकतेच विष-सशोधनाचे दालन उघडले होते बिली हास्टला १२३ वेळा विषारी सर्पदश झाले होते. त्याना परिषदेत अवश्य न्यावे याकरिता दोन तास घालविले निमत्रण स्वीकारले माया हास्टने अवघ्या तीन तासात पासपोर्ट व व्हिसा मिळविला अमेरिकन नागरिकत्वाचा हा एक फायदा असावा

वारिग एअरलाइन्सच्या विमानात स्पेनिश भाषा सगळीकडे ऐकू येत होती अमेरिकेच्या विमानप्रवासातील शातता जाऊन अमळसा गोंगाट सुरू होता काजू आणि मदिरा याचे ' पान ' चालू होते जेवणात आता मिरची दिसू लागली व पिण्याला लेबल लागलेल्या झऱ्यातील पाण्याच्या बाटल्या आल्या खिडकीतून वर निळे आकाश दिसे व खाली कॅरीबियनचे निळे समुद्र चार तासानी विमान मेकटिया विमानतळावर उतरले. एमिग्रेशन व कस्टम्सला भारताप्रमाणे वेळ लागला युरोप-अमेरिकेत असे होत नाही बाहेर पडलो तेव्हा अधार झाला होता कुली सामान घेऊन पुढे गेला इकडे डॉ० सेंडनर मॉटीला भेटले त्यांनी अगदी कडकडून मिठीच मारली ' ओ, आय ॲम् सो हॅपी-' म्हणत गाडीजवळ हात धरून नेले त्यांना इतका आनद झाला होता की, काय करू हेच सुचले नाही आमची गाडी मोठ्या हायवेवरून निघाली हे रस्ते इतके रुद होते की सहा ते आठ गाड्या सलग एकाच वेळी जात होत्या दोन बोगदे लागले. यापैकी एक तीन मैल लांब होता समुद्रसपाटीपासून ९०० मीटर उच डोंगराने वेष्टिलेले कराकस शहर प्रकाशात झगझगत होते ते २० ते ३० मजली उत्तुग इमारतींनी गजबजलेले होते इमारती आधुनिक होत्या या उच इमारतींमुळे रस्ते अरुद वाटू लागले पूल बांधून एकाच सडकेवर दोन-तीन सडका केल्या होत्या गाड्या भराभर जात कारण आडवी गाडी वरूनच जाई तो २५ मैलाचा मार्ग सपवून शहराच्या मध्यभागी गाडी आली एक बागेतून पुढे जाऊन आम्ही कॅराकस हिल्टन होटल गाठले नेहमीप्रमाणे ' चेक् अप् ' केल्यावर दहाव्या मजल्यावर पोचविले. खोली प्रशस्त होती व लागूनच असलेल्या बाल्कनीतून लाबपर्यंत शहराचे लाइट्स, गाड्यांचे दिवे व दूरदूरचे प्रकाशित डोंगर पण दिसले स्नान आदि आटोपताच मॉटीला तळमजल्यावरील उपाहारगृहात भोजनाला घेऊन गेले चार पानी अन्नपदार्थांची यादी वाचूनच अर्धी भूक शमली

हॉटेलच्या चोहीकडे हिरव्याकच बागा होत्या दोन दालनांमधील जागा वरपर्यंत उघडी होती त्या जागेत छोटे छोटे कारजे तर होतेच, पण सभोवार वेली व वनस्पतींची दाट गर्दी होती या बागातून सारखे पेंऽऽपेंऽऽ असे ध्वनी त्या रात्री ऐकू आले ते आवाज कीटकाचे नव्हते भारतात बेडूक ड्रॉव.. ड्रॉव ओरडतात, पण इथे झाडांच्या पानाखाली

हिरवे (पोपटी) 'हायला' नामक अवघे १ ते १॥ इंच लांब बेडूक चिकटून बसलेले दिसले या जातीच्या बेडकावर मानव गर्भधारणेचा खरा-खोटेपणा तपासत असत या देशात अशा काही जातीचे बेडूक (टोड) आहेत की, ज्याच्या पृष्ठस्थ ग्रथिरसात तेथील आदिवासी बाणाची टोके बुडवतात व त्या बाणानी वेधलेले माकड अवघ्या चार मिनिटात मरण पावते

परिषदेची सजावट दिसली नाही मुख्य रस्त्यावर आणि हॉटेलच्या मुख्य दारावर एक बॅनर व एक फलक मात्र दिसले

दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट घेतला कॉफीबरोबर ब्रेड, बटर फुकट मिळे फळाची प्लेट घेतली तिच्यात पपई, केळी, अवाकाडो, कलिंगड, पीच, ॲपल तर होतेच पण वर चीजची पूड शिवरली होती पोटभर शाकाहारी जेवणाची सुरुवात केली. हॉटेलच्या तळमजल्याच्या हॉलमध्येच परिषद भरली सकाळी डॉ क्राऊसने प्रतिनिधींच्या देशाचे झेंडे मागे भिंतीवर रोवले भाषांतराला इयरफोन दिला नोंदणी सुरू झाली व ठीक दहाला जागतिक सर्प परिषदेला सुरवात झाली कोणी मंत्री नाही, कोणी ऑफिसर नाही, उद्घाटनाचा वेळखाऊ सोहळा नाही एकदम ओळख करून अध्यक्षीय भाषणाला सुरवात केली मी इथून भाषणाचे भाषांतर स्पॅनिशमधून करून नेले होते व ते स्पॅनिश उच्चारण चांगले होण्याकरता देवनागरीत लिहिले होते यामुळे वाक्य स्पष्ट आले व चार ओळी वाचल्यावर टाळ्यांचा कडकडाट झाला आणि मी लेखी भाषण बंद केले नंतर तासभर स्लाईडस्च्या आधारावर इंग्लिशमधूनच बोललो परिषदेच्या समयी प्रत्येक सदस्यांनी आपल्या देशातील संशोधनात्मक कार्याचे, विष, औषधी व सर्प यांचे प्रदर्शन भरविले भारतातील मध्यवर्ती शासनाने या निर्यातीला परवानगी दिली नाही यामुळे मला दुसरीकडून एक नागसर्प आणावा लागला हॉटेलमध्ये मनुष्य सोडून कोणताही प्राणी ठेवण्याची मनाई होती पहिल्या दिवशी तो पिंजरा स्वतःच्या खोलीत पलंगाखाली लपवला दुसऱ्या दिवशी बाथरूममध्ये टॉवेल झाकून ठेवला व खोलीवर नोटीस लावली- 'मीटिंग इन प्रोग्रेस, डोन्ट डिस्टर्ब !' त्या दिवशी खोली स्वच्छ झाली नाही तिसऱ्या दिवशी श्री० हास्टच्या मदतीने तो नाग अध्यक्षीय टेबलावर सोडला व हास्ट यानी त्याच्या विशिष्ट पद्धतीने विषदोहन केले फणा काढलेला सर्प किती डौलदार दिसतो व अशा मस्त सर्पाबद्दल किती कुतूहल, किती भीती व किती आदर असतो याचे प्रात्यक्षिक मला तिथे दिसले इतर सर्प नागाच्या धुंदीपुढे अगदी फिके पडले

दुपारी गावातील दुसऱ्या हॉलवर पुढील कार्यक्रम झाला मोटारीतून तिकडे जाण्यास निघालो हॉटेलची प्रशस्त बाग तर होतीच पण प्रत्येक सडकेच्या कडेला वृक्षांच्या यथोचित उंचीच्या रांगा होत्या लहान बोळीत ही झाडे मध्यावर होती मला कैक बोळीत आंब्याची झाडे दिसली पण ती उंच तर नव्हतीच, शिवाय बुंधा सपताच वर कैक फाटे फुटताना दिसले आंब्याला इतके फाटे फुटताना भारतात पाहिले नाहीत बाजारपेठ मुंबई-

सारखीच होती, पण शहर नवीन होते आणि दुकानदार (काही वगळल्यास) अगदी पुणे–मुबईतलेच असल्याचा भास होई अगदी गर्दीच्या जुन्या वस्तीत कवेलूची घरे पिवळा नि पाढरा रग दिल्यामुळे उठावदार दिसली तिकडे रस्ते डांबरी नसून दगडाच्या फरशीने बांधलेले होते सायकाळी या बोळातून शहराच्या मध्यावर आलो टाऊन हॉलच्या समोर फरशीचे पटागण होते पटागणात व भोवती मोठे वृक्ष डोलताना दिसले मध्यभागी या देशाचा निर्माता–सायमन बोलीवार याचा अश्वारूढ पुतळा होता

सायमन बोलीवार हा या देशाचा खरा राष्ट्रपिता होय भारतात ब्रिटिश आले, त्यानी १५० वर्षे राज्य केले भारताला स्वातत्र्य कमवण्याला तेथील भारतीयानी लढा दिला व थोडे रक्त साडले स्वतत्र भारत झाल्यावर येथील ब्रिटिशधार्जिणे लोक–विशेषत ॲग्लोइडियन्स देश सोडून गेले पण वेनीझुवेला-जिथे स्पॅनिश लोकांनी सत्ता गाजवली–अर्धस्पॅनिश नागरिकानी स्वतत्र केला– त्यानीच स्पॅनिश सैन्याला लढा देऊन हाकलले व जन्मलेल्या देशाची अब्रू राखली सायमन बोलीवार हा असाच एक स्पॅनिश व येथील आदिवासी याच्या मीलनातून जन्मलेला वीर होता या देशाच्या प्रत्येक शहरात मध्यभागी त्याचा पुतळा दिसतो त्या देशातील मुख्य नाण्याचे नाव बोलीवार आहे शहर, डोगर, कडेपठार बोलीवार आहेत व वेनिझुवेलाच्या एका प्रांताला 'बोलीविया' हे नाव देण्यात आले व तो प्रांत आता स्वतत्र झाला

प्रेसिडेंट गोमेझ ( १९१० १९३५ ) च्या कारकीर्दीत इथे खनिज तेल सापडले या 'काळ्या सोन्या'ने (ब्लॅक गोल्ड) या देशाचा कायापालट केला आज इथे प्रतिदिनी वीस लक्ष बॅरल तेल निघत आहे व सन १९७४ साली त्याची किंमत १३४५ ७ दशलक्ष डॉलर प्रतिवर्षी होती तेल शुद्धीकरण प्रथम अमेरिकन कपन्या करत, पण दोन वर्षांपासून त्यांचे राष्ट्रीयीकरण झाले

वेनीझुवेलाचे क्षत्रफळ ३५२, २९५, ५७ वर्गमैल असून लोकसख्या अवघी ११७२८००० (एक कोट सतरा लक्ष अठ्ठावीस हजार) आहे व त्यात ३ लक्ष तर आदिवासीच (इडियन) आहेत सर्वात मोठे शहर कराकस आहे व तेथील लोकसख्या अवघी पचवीस लक्ष पण तीस लक्ष मोटारगाड्या आहेत इतर मोठी शहरे आहेत– मराईकाबो (सहालक्ष) बारसीलोना, सिटाट बोलीवार, पोरटो आरडेझ, सिटाड गुईयाना व वेलनशिया देशाची विभागणी वीस प्रांतात केली शिवाय दोन मध्यवर्ती प्रात दिसतात प्रत्येक प्रांतात गव्हर्नर व विधानसभा आहेच भाषा स्पॅनिश असून नाणे बोलीवार आहे, ज्याची किंमत अदमासे अडीच भारतीय रुपयाला एक पडेल तीन दिशांनी या देशाला समुद्राने वेढलेले आहे मध्यभागात १६४०० फूट उच डोंगरशिखरे व जगले दिसतात मुख्य वन्य हिंस्त्र प्राणी पूमा जग्वार असून नदी आणि खाडीत पिराना नावाचे क्रूर मासे व विजेचे शॉक देणारे ईल सापडतात येथील सर्पात वीस फुटाचे अजगराच्या जातीचे अनाकोंडा सर्प पाण्याजवळ दिसतात सबध म्हैस विळखा घालून पाण्यात नेऊन मारू शकतात दुसरा

भयानक सर्प इकडे बाथ्रोप्स नावाचा असतो हा जर पायाला चावला तर दुखल, सुजल व चार दिवसांनी जखम भरेल, पण पधरा दिवसानी दशस्थळावर बारा इचपर्यंत भयकर कड सुटेल व हळूहळू त्या भागाचे सगळे मास गळून पडेल नुसती दोन हाडेच रहातील प्रत्येक गावात आठ-दहा तरी असे हातपाय तुटलेले निर्बल रोगी जगताना दिसतात

तिसऱ्या दिवशी गावातील एका जुन्यापैकी उपहारगृहात लचचे आमत्रण आले. हॉटेलसमोरील मुख्य स्वातत्र्य स्मारक अॅव्हेन्यूवरून आयची गाडी निघाली रस्ते ३०० फूट रुद होते दुतर्फा वृक्षराजीच्या रांगा तर होत्याच, पण पलिकडे बागासुद्धा दिसल्या दोन मैल गेल्यावर अगदी सडकेच्या मध्यावर तीस फूट उच चबुतरा दिसला व त्यावर सर्पाचे शिल्प होते तिथे टेपियर प्राणी उभा ठाकला होता त्याची स्वार एक उत्तम शरीरसौष्ठव असलेली नग्न नारी होती ती हात उचावून 'स्त्री-कटिअस्थी' घेऊन बसली आहे अशी कोरलेली दिसली तिच्या डोक्यावर मुकुट होता जुन्या काळी खेड्यातून ही सतीण आली अध्यात्मबलावर रोग व दुःख निवारण करू लागली हिचा पथ अद्याप हयात आहे व त्यात मुख्यत स्त्रियाच सभासद असतात या पथाला 'मारिया लिओंझा' म्हणतात व जखीण आदि पथाप्रमाणे त्या वागतात

जुने उपाहारगृह स्पॅनिश पद्धतीचे होते आत गिटारवर सगीत चालले होते व काळेभोर केशकलाप असलेली महिला गीत गात नृत्य करीत होती चहूकडे मसाल्याचा वास दरवळत होता मदिरेचे बुदले टेबलावर आले सॅलड व सूपनतर मेन डिश आली येथील ती एक प्रसिद्ध डिश होती काटा सुरी हाती घेतल्यावर कळले की, नारळीच्या पाण्यात (दुधात) शिजविलेला तो एक ससा होता मातुरिन गावी असेच पदार्थ दिले होते व तिथे होता दुधात शिजविलेला व नारळाच्या पाण्यात जिरविलेला उदीर मला मात्र उकडलेला रताळू, मटार, कणीस, गाजर, पालकभाजीची डिश व फळे मिळाली

शेवटच्या दिवशी अगदी जुन्या सस्काराच्या वस्तीत खाना दिला जुन्या पद्धतीचे भोजन ठरले पाहुणे आले भेटी झाल्या येथील पद्धतीत स्त्रियाचे हात किवा गाल ओळख करताना चुबावयाचे असतात हे झाल्यावर सूप जेवण व टोस्ट सुरू झाले एक सेवानिवृत्त अॅबेसेडरने चाळीस मिनिटे भाषण दिले मी भारतीयाची सद्भावना व्यक्त केली चुबनाच्या कार्यक्रमाने भोजनसस्कार सपविले

या देशातील सर्वात खालच्या दर्जाचा नागरिक आदिवासी होय कोटी लोकसख्येत याची सख्या अदमासे तीन लक्ष आहे ते ओरिनाको नदीच्या खोऱ्यात, जगलात रहातात लगोटी किंवा झालर याशिवाय ते विवस्त्र आहेत आता आता स्त्रिया अगवस्त्र घेत आहेत गवताची शाकारलेली घरे करतात व मका पेरतात केळी, रताळी, युक्का काही फळे, शिकार करून आणलेले प्राणी यावर त्याची गुजराण आहे कुत्री पाळतात व त्या पिलाना अगदी मुलाबाळाप्रमाणे वागवितात युक्का या कदापासून मदिरा करून सेवन करतात शिकारीला धनुष्यबाण, भाले तर आहेतच, याशिवाय बाजूच्या लाब

शिलखा विषात बुडवून भल्यामोठ्या फुकणीने फुकतात प्राण्याना शिळखा लागून खरचटले तरी प्राणी मरून पडतो तसे याचे जीवन सुखात होते, पण मिशनरी आता तिकडे जाऊ लागलेत नवीन रोग, नवीन अन्न, नवीन पोषाख, नवीन विचारधारणेमुळे हा समाज झपाट्याने बदलत आहे

कराकसहून १५०० मैल कॅरिबियन समुद्रतटाचा प्रवास सुरू झाला रस्ते उत्तम होते. या देशात आगगाड्या नसून, प्रवास, विमान किंवा मोटारीनेच करतात पहाड फोडले, पण धूप होऊ नये म्हणून रिअिन्फोर्स्ड सिमेंटने भितीप्रमाणे तो भाग भरून काढला ३०० मैल प्रवास करून 'बोकायी–उचीरे' या खेड्यात रात्री १० ला पोचलो. मार्टिला-साहेबाचे अगदी समुद्रतटी छोटे घर होते तिथे समोर केरिबियन समुद्र व मागे मोठे गोड्या पाण्याचे सरोवर होते जवळच उचीरे नदी समुद्राला भेटत होती तिथे घरी कुणी नव्हते आत फर्निचर धुळीने माखले होते सडासात पाणी नव्हते या देशात मुख्य सडका-वर दर १०–१५ मैलावर पेट्रोल स्टेशन आहे तिथे पेट्रोलशिवाय औषधे, खाद्येपेये, रहाण्याची सोय व किराणा माल पण मिळतो तिथूनच दुधाचे दोन डबे व या देशातील तादळाची आंबविलेली पोळी– (इडलीप्रमाणे) व झऱ्याच्या शुद्ध पाण्याचा पाच गॅलनचा काचेचा बुदला घेतला घामाने भरलो होतो तडक केरिबियन समुद्राच्या बीचवर बसलो लाटांनी चांगले स्नान केले वर चागले चादणे होते आम्हा दोघाशिवाय कैक मैलाच्या परिसरात कुणीच नव्हते असे मध्यरात्री एकांतात मी कधीच स्नान केले नव्हते

उत्तम रस्ते व चागली गाडी याचा उपयोग करीत मी आणि डॉ मार्टीला जगले पार करून मातुरिन विभागात आलो इकडे खनिज तेलाच्या कैक विहिरी दिसल्या जगलात जग्वार नावाचा प्राणी पाहिला. पुढे उच्च डोगर पठारातून खाचारी येथील ९००० मीटर लांब गुहेच्या दाराशी पोचलो डोंगरात गुहेच्या तोडाशी मोठमोठे स्टेले-ग्टाइट होते आत, वरून टपटप पाण्याचे थेंब गळत होते फार आत– खूप आत तो गुफा दीड मैलपर्यंत शिरली आहे दोन फर्लांग गेल्यावर अधार दिसला वरील पाणी, चिखल व दमट हवा याने जीव गुदमरला या गुफेच्या आतून आंऽआ' असे ध्वनी ऐकू आले इथे खाचारो नामक पक्ष्याचे प्रचंड थवेच्या थवे वास्तव्य करतात रात्री हे पक्षी बाहेर पड-तात कैक मैल फिरून दिवस उजाडण्यापूर्वी पुन्हा अधारात दडून बसतात या निसर्गरम्य स्थानी असे असख्य निशाचर भेटले भारतात असे पक्षी नाहीत

तीन–चारशे मैलांचा पट्टा पार करीत, सरोवर, नद्या, डोगर, जगलावरून परत छपईगुवाना नामक रेड इंडियनाच्या नावाने प्रसिद्ध असलेल्या बोकाई–उचीरे गावी आलो त्या पेट्रोल पंपाच्या हॉटेलात भोजन मिळाले काळ्या चण्याची उसळ व ब्रेड, याबरोबर फळे व कॉफी होती सर्वांचा निरोप घेऊ लागलो प्रथम बिल करणारी मारिया आली तिने गाल पुढे केला वाढणारी जोसीफिन– तिने तेच केले दारातून बाहेर पडलो तोच आतून गोंगाट ऐकू आला स्वयपाकघरातील बाई किंकाळत समोर आली. 'परदेशाहून

आलात, नेहमी भेटी होणार नाहीत व्यवस्थित बिदाई तरी द्या. त्या दोघींना चुंबन दिले मी काय पाप केले होते ?' या रीतीचे पालन करीत कराकस गाठले. डॉ माटीलाची आई म्हणाली, 'पुन्हा अवश्य या– पण स्पॅनिश शिकून या, म्हणजे आम्ही केलेल्या स्वागताचे चीज होईल' आता विमान सुटण्याची वेळ झाली. डॉ मांटीलाने उजवा हात धरला डावा हात पाठीवर ठेवला 'पुन्हा अवश्य या तोपर्यंत मी लग्न करीन व आम्ही दोघे स्वागत करू–' म्हणाले शेवटी कडकडून मिठी मारली, रुमालाने डोळे पुसत म्हणाले, 'यू आर माय फ्रेंड, गाईड ॲण्ड नाऊ ए टीचर– गुड् बाय्–' माझासुद्धा कंठ दाटून आला इतका जिव्हाळा मला दुसऱ्या देशात दिसला नाही.

भारतीय एअर इंडिया कंपनी, परदेशात भ्रमण करताना भारतीयांना चांगली वागणूक देत नाही असा सगळीकडे समज आहे. पॅन अॅमसारखी कंपनी तर दिलेला शब्द पण पाळत नाही, याचा अनुभव मला दोन वेळा आला. मयामीहून ब्राझिलचा प्रवास या कंपनीतर्फे केला. निघण्यापूर्वी मी शाकाहारी असल्याची विशेष नोंद केली आणि कराकस शहरी चारच्या आत मला न्यावे, तेथून ४–३० चे उड्डाण घेऊन रिओडी–जनेरिओला पोचवावे असे ठरले. उशीर झालाच तर माझी देखभाल कंपनीने करावी असा पण उल्लेख केला.

विमानतळावर आलो, पण उड्डाण वेळेची गफलत होऊन विमान उशीरा सुटले. करार–भंगाला सुरवात येथूनच झाली. शाकाहारी भोजनाची नोंद ठिकाणापर्यंत पोचलीच नव्हती. तिकीट दाखवल्यावर भाजीतील बीफ व पोर्क काढून थान समोर आले. कराकसला विमान ५–३० ला आले आणि माझी पुढील यात्रा चुकली. या शहरी अराजकता होती. सैनिक बंदोबस्त इतका होता की, विमानात विसरलेली छत्री आणावयास गेलो, तर सोजिराने मशिनगन रोखली. विमानतळावर इंग्रजी भाषेचा अभाव होता. उशीरा विमान आल्यामुळे माझी देखभाल करण्याचे पॅन अॅमच्या अधिकाऱ्याने नाकारले. हा तिसरा करार–भंग माझ्यावर जणू संकटच कोसळले. अक्षरशः भांडण झाल्यावर, इंग्लिश बोलणारी एक तरुणी भेटली. तिने जेवण व रहाण्याची व्यवस्था हॉटेलमध्ये करण्याचे मान्य केले. गावातल्या अराजकामुळे बंदुकीचे आवाज सारखे ऐकू येत होते. गावाबाहेर मुक्कामाला जावे या हेतूने आम्ही टॅक्सीतून निघालो. एकदोन मैलातच गाडीच्या बाजूने दोन बॉंब फुटले. पण आम्ही पोचण्यापूर्वीच ही घटना झाली आणि आम्ही बचावलो. हॉटेल बावीस मैल दूर निवांत स्थळी होते. मार्गात त्या तरुणीचे आणि एका उतारूचे भांडण जुंपले. दोघांनी एकमेकांवर रिव्हॉल्वर रोखले. ड्रायव्हरने सुरा उपसला.

आमच्यापैकी एका प्रवाशाने शिताफीने तो सुरा हिसकला एका भयानक प्रसगातून आमची सुटका झाली हॉटेलमध्ये प्रत्येकाजवळ रिव्हॉल्वर होतेच. डार्ट खेळताना तर कटयारीचा उपयोग होत असे कशी–बशी रात्र काढली दुसऱ्या दिवशी सकाळी चारला रिओडी जनेरिओकडे निघालो सुरवातीला वचन देतात पण पुढे कसे भयावह प्रसग ओढवतात याचे हे नमुनेदार उदाहरण

ब्राझिलची राजधानी रिओडी–जनरिओ, पण अत्याधुनिकतेचे व व्यापाराचे केंद्र म्हणून साओपालोला प्रवासी येतात ब्राझिलने मध्यवर्ती भागात नुकतीच एक नवीन अत्याधुनिक राजधानी तयार केली आहे. आधुनिक शिल्पशास्त्राचा नमुना पहावयाचा असेल तर या ब्रेझिलिया राजधानीला अवश्य भेट द्यावी

रिओडी–जनेरिओहून साओपालो शहराकडे सायकाळी निघालो रात्री आठ वाजता साओपालोला विमान उतरले एप्रिल महिना होता तेथे अगदी मुबईप्रमाणे जोराचा पाऊस होता त्या काळोख्या पावसाळचा रात्री, कसेबसे इग्लिश बोलून सामान ठीकठाक करीत होतो, तोच समोरील काचेच्या भितीकडे लक्ष गेले दोघे गोरे सज्जन काचेवरील आर्द्रता व बाष्प दूर करत माझे लक्ष टिक्टिक् करून वेधत होते ते मान्यवर गृहस्थ म्हणजे ‘ इन्स्टिटयूटो बुटनहान ’ चे डायरेक्टर डॉ फोन्सेका व तेथील सर्पविभागाचे प्रमुख डॉ. होगी त्यानी माझे स्वागत केले गाडीतून गावाकडे दहा मैल व पुढे इन्स्टिटयूटकडे दहा मैल गेलो गावाबाहेर डोंगराळ विभागात या सस्थेची वास्तू आहे मोठेमोठे वृक्ष, कॉफीचे मळे सस्थेच्या परिसरात आहेत त्या वनराजीच्या मध्यावर एक दुमजली स्पॅनिश इमारत होती तिथेच गाडी थाबली

सामान उतरले दारावर दरवान नव्हता त्या दोघानी सामान घेतले आणि दुसऱ्या मजल्यावर असलेल्या पाहुण्यांच्या खोलीत नेऊन ठेवले शिडी चढून वर जाताना म्युझियमचा काही भाग दिसला वाटले की, जागा बरी असेल

खोलीत सामान लावले व त्याना ‘ शुभ रात्री ’ केले बाहेर पाऊस चालूच होता. खिडकीतून सतत पावसाचे तुषार आत येत होते खिडकी बद केली की उकाडा होई कसेतरी लोळलो पण वीज कडाडली म्हणून उठलो विजेरी घेऊन सभोवताली पाहिले तो काय, माझी खोली म्युझियमच्या वर होती समोर माकड, मानव, साळी, सर्प या सर्वांचे सागाडेच दृष्टोत्पत्तीस आले कुणाला हाक मारावी तर बाहेरून जवळपास एकही घर वा माणूस नव्हता दार बाहेरून लावून घतले होते मग कसली झोप येते ! जळत्या मेणबत्त्या घेऊन कैक स्त्रिया आत शिरल्या आहेत, असा मध्येच भास झाला. उठून पहातो तो कित्येक काजवे रातकिड्याबरोबर खोलीत शिरले होते या अशा अनुभवामुळे सस्थेच्या नावाचा ‘ बूटन–हान ’ –‘ भूत आनन ’ ( भूत–नतान ) असा सामाजिक विग्रह केला

भारतातील हाफ्किन् सस्थेप्रमाणेच या सस्थेत लसी व प्रलसी तयार करतात

विताल ब्राझिल या वैज्ञानिकाने पचाहत्तर वर्षांपूर्वी सर्पाबद्दल विशेष सशोधन करून एक निर्विष तयार केले व या सस्थेत याच विषयाला उत्तेजन दिले या उत्तेजनामुळे या सस्थेत बारा खाटा असलेले एक इस्पितळ निघाले या दवाखान्यात फक्त विषारी प्राण्यानी दश केलेलेच रोगी येतात त्या रोग्याना निर्विष तर दिले जातेच, पण दशाची परिस्थिती, रोगनिदान, औषधिगुण या सर्व सशोधन–कार्याला मदत होत असते या सस्थेची महत्ता जाणून ब्राझिल सरकारने तसे नियम केले आहेत

ब्राझिलमध्ये साओपालो प्रांत व जवळपासच्या प्रदेशात विषारी प्राण्याचा दश झाला की, पोलिसांना बिनतारी सदेश दिला जातो पोलीस लष्कराला ताबडतोब कळवतात आणि मग रुग्णाला लष्करी विमानाने फुकट साओपालो विमानतळावर आणतात तेथून हेलिकॉप्टरने ' इन्स्टिटयूट बूटनहान ' च्या हेलिपॅडवर रोगी उतरतो व सरळ त्या विशिष्ट दवाखान्यात जातो

या देशात विषारी दश करणारे प्राणी म्हणजे सर्प, विंचू, कोळी–(ब्लॅक विडो स्पायडर), गोम, विषारी पाल, (हेलोडरमा), मधमाशी आणि गांधिलमाशी, समुद्रातील ओबेलिया व विषारी मासे हे होत

ब्राझिलमध्ये आपल्याकडच्यासारखे नाग–सर्प नाहीत पण लक्षात ठेवण्यायोग्य महत्त्वाचे दोन सर्प आहेत अनाकोंडा हा निर्विषारी सर्प अजगराच्या जातीचा असतो व त्याच्यापेक्षा मोठा व बलाढ्य असतो पाण्यात दडून बसलेला हा सर्प म्हशीसारख्या प्राण्यास पाण्यात ओढून बेजार करून गिळतो या सर्पाची पाण्याच्या जागी बरीच भीती असते

दुसरा सर्प आहे बोथ्राप्स दिसायला तसा भयानक नसतो, पण विषारी आहे त्याच्या विषामुळे मृत्यू होत नाही, पण परिणाम घोर होतात पायाच्या बोटाला बोथ्राप्स चावला तर त्या दिवशी थोडे फार चुरचुरेल, सूज येईल, रक्तस्त्राव होईल व दु ख पण जाणवेल. औषधोपचार न झाल्यास सूज आदि आपोआप कमी होईल जखम पण बरी होईल पण आठ दिवसानतर पायाच्या घोटयावर खाज सुरू होईल. ही खाज अगदी गुडघ्यापर्यंत होऊ लागेल सुमारे नऊदहा दिवसानतर खाज आलेल्या जागेवरील कातडीचा रंग बदलेल व ती आपोआप तडकून पडू लागेल पधरा दिवसांनी कातडी काळी होऊन स्नायूसहीत गळून पडेल व पायाच्या दोन हाडाशिवाय त्या पायावर काही दिसणार नाही खालील पाय पण कुजून जाईल कुजण्याची ही क्रिया आणखी पुढे वाढू शकेल. रोग्याचे कुजलेले अवयव भयानक दिसतात भारतात फुरशाच्या दशानतर दशस्थळी काळा डाग पडतो व थोडे कुजते पण बोथ्राप्स दशानतर दश केलेले सगळे अवयव कुजतात याशिवाय मूत्रपिंडावर पण परिणाम होतो

या देशातील कोळी-(ब्लॅक विडो स्पायडर) लहान असतो, पण त्याच्या दशामुळे अग सुजते, ताप येतो व विषबाधेची क्रिया मज्जातंतूनाशक असते शेतात धान्याच्या साठा

करत असताना याचा दश होतो

मोठ्या सरड्याप्रमाणे घोरपडीच्या आकाराची पाल इथे आढळते. ती विषारी असते. दहा ते बारा इंच लांबीच्या या पालीच्या शरीरावर लाल तुटके पट्टे असतात हिच्या दोन्ही जबड्यातील दाताना चीर असते तेथूनच विष जखमेत पाझरते भारतात अशा पाली नाहीत आपल्या देशातील पाल चावत नाही, पण तिच्या मूत्रात भयानक जतू असतात त्यामुळे वाती व अतिसार होऊन रोगी दगावण्याची शक्यता असते ब्राझि-लच्या विषारी पालीला हिलोडरमा म्हणतात

या देशातील गोम पण चागलीच विषारी असते तसेच विंचू आणि गाधील-माशीच्या विषाने इजा होत असते या प्राण्याच्या विषापासून निर्विष तयार करतात

सर्प गोळा करायला येथे उत्तेजन दिले जाते काही विशिष्ट जातीचे ठराविक सख्येचे सर्प या सस्थेच्या पिंजऱ्यातून पाठवले तर प्रेक्षकाला पैसे किंवा निर्विषाचे ॲम्पूल फुकट देतात सरकार ॲम्पूल सोबत निर्जंतुक सिरिंज पण देते पाठीच्या स्नायूपुजास हे इजेक्शन कसे द्यावे याची खेडुतांना साग्र माहिती असते व त्याचे शिक्षणही दिले जाते शेतकऱ्यानी धमनीत इजेक्शन देऊ नये याबद्दल बजावले जाते यामुळे या सस्थेचे औषध अगदी खेडोपाडी सगळीकडे उपलब्ध आहे

सर्प असलेले पिंजरे रेल्वेने जकात न आकारता, कोणत्याही स्थानकावरून तावड-तोब या सस्थेकडे पाठवावे, असा नियम आहे. त्यामुळे नेहमीच सर्प येत असतात कधी कधी दहा हजार सर्प एकत्रित आलेले दिसतील त्याना थोडेफार दिवस पिंजऱ्यात ठेव-तात, पण मुख्यत त्याना सुदर पाढऱ्या फरशीच्या सर्प उद्यानात सोडतात आतून चायना टाइल्सच्या गुळगुळीत भितीमुळे सर्वांना पळता येत नाही आत छायेसाठी एकदोन झाडे लावलेली आहेत एका टोकाला पाण्याचा नळ असतो मधूनमधून सिमेंटची गोल आका-राची लहान लहान आठदहा बिळे ठेवलेली आहेत त्यात बरीच सर्पमडळी दडून बसतात एका जातीच्या सर्पांना उद्यानाचा एकच भाग दिला जातो निर्विष सर्पांच्या उद्यानावर एक पूल असून प्रेक्षक तेथून खाली हिरवळीवर फिरणाऱ्या सर्पांचे अवलोकन करू शक-तात प्रवासी प्रेक्षकाची ठराविक सख्या झाली की तेथील कर्मचारी एखादी विषारी घोणस (viper) गोफणीच्या साहाय्याने उचलून आणतो काचेचे एक भांडे घेतो व त्याच्या कडावर घोणशीचे मोठे दात अडकवतो मग विष आपोआप पाझरू लागते दिवसातून वीस-पचवीस वेळा वेगवेगळ्या सर्पांचे विषदोहन प्रेक्षकाना दाखविले जाते आठवड्यातून एक किंवा दोन वेळा उद्यानातील सर्पांना उदराचे भोजन देण्याचा कार्यक्रम असतो सर्पांची सख्या इतकी आहे की त्याची निगा राखणे शक्य नसते यामुळे त्यांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त आहे मेलेल्या सर्पांची कातडी कमावितात या सस्थेच्या मोठ्या ग्रथालयातील असख्य पुस्तकांना सर्पांच्या कातडीचे आवरण आहे

सर्प–विष डेसिकेटरमध्ये वाळवून त्याचे खडे सग्रहित करतात विषाच्या जहालतेचे

प्रमाण कबूतरावर काढून लहान घोड्यांना टोचतात घोड्याच्या रक्तात गामा ग्लोब्युलिनसोबत प्रतिकारशक्ती तयार झाली की त्याच्या रक्तातून ती काढून निर्विष बनवतात. यांच्या इंजेक्शनमुळे सर्पदंश झालेला रोगी बचावतो

डॉ फॉन्सेका यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी गाडी आणली नतर सस्थेच्या विभागाची पहाणी व कॉफी–पान झाले येथील कॉफी फार अप्रतिम असते पण या पेयाचा घट्ट, कडू गोड काढा जिभेने हळूहळू स्वाद घेत सधवावा, असा नियम आहे प्रत्येक खात्यात ओळख करून दिली तेथील राष्ट्रीय पेय गुबारडिन होय कैक वृक्षवल्लींच्या पानाफळाचा रस एकत्रित केला जातो दोन तीन विभागात त्याचा स्वाद घेतला दुपारचे जेवण सस्थेत झाले जेवणाला उकडलेले बटाटे, टोमॅटो, गाजर आणि कादे होते कोबी व पुदिन्याची कोशिंबीर होती एक गॅलन दुधाचा जार सोबत दिला होता

विंचवाच्या विभागात डॉ बुखारेल यानी कोळी, विंचू व पाली याची माहिती दिली. विंचू लाकडी व काचेच्या मोठ्या पिंजऱ्यात होते आत ब्लॉटिंग पेपरच्या कपाः खाली त्यांचे थवेच्या थवे दिसले चिमट्याने विंचू उचलण्यात आला नांगीवर डाव्या हाताच्या आगठ्याचे नख दाबले गेले व त्याचे तोड मुठीत घेतले गेले नांगीला विजेचा धक्का दिल्याबरोबर एक थेंब विष पेल्यात आले विषदोहनानतर चिमट्याने त्याला परत पिंजऱ्यात ठेवण्यात आले भारतातील–विशेषत ठाण्याकडील काळ्या इंगळ्या मोठ्या असतात म्हणून आम्ही दुसरीच पद्धत काढली तीत विंचवाला पेट्रीडिशखाली ठेवावे लागते व नांगी बाहेर सोडावी लागते विजेच्या तारेचे एक टोक नांगीवर व दुसरे या विंचवाच्या शरीरावर लावले की, विषाचा थेंब पडतो मात्र विजेचा दाब पाच व्होल्टपर्यंत खाली आणावा लागतो कोळी उलटा धरावा व त्याच्या ग्रंथीमुखात अगदी बारीक (केपिलरी) काचेची नळी खुपसली की, नळीत विष येते या नळ्याच जमवून ठेवाव्यात याप्रमाणे पहिल्या दिवशीच विषदोहनाचे प्रकार व प्राण्यांची भेट झाली

सायकाळी निवासाकडे निघालो कॉफीच्या मळ्यात प्रणयी युगुलाचे प्रणयाराधन चालले होते निवासात भोजनव्यवस्था नव्हती रात्रीच्या वेळी कँटिनची व्यवस्था नव्हती लाब गावात कुठेतरी जावे लागे डॉ होगीची पत्नी जर्मन होती ते बेल्जियम होते माझ्या मोडक्या–तोडक्या जर्मन भाषेचे तिने कौतुक केले रात्री भात आणि कसलेसे पिठले केले होते तिला थिऑसफीचा नाद होता भगवद्गीतेतील श्लोकाची फार आवड होती श्लोकपठणाचा फार परिणाम झाला माझ्याबद्दल आदर निर्माण होऊन रोज रात्री तिथेच भोजन होऊ लागले. एके दिवशी तिची प्रकृती बिघडली डॉक्टरांनी टॉन्सिलचे ऑपरेशन ठरवले ती तयार होईना. डॉ होगी मला विनवू लागले भारतातून चदन नेले होते त्याचा टिळा लावला ती ऑपरेशनला तयार झाली, पण माझे जेवण हुकले

दररोज सस्थेतील प्रत्येक खात्यात प्रयोगाकरता जाऊ लागलो एका गुरुवारी नियमाप्रमाणे माझे व्याख्यान ठरले. शहरातल्या इतर कॉलेजातील पोर्तुगीज मडळी आली

त्या देशातील भाषा पोर्तुगीज असून पोर्तुगालबद्दल त्या गोऱ्या लोकांना फार आदर व अभिमान दिसला भारतातील हाफकिन संस्थेची सचित्र माहिती मी दिली व सशोधनाचा दृष्टीकोन सांगितला गोव्यातील पोर्तुगीज लोकाचा दृष्टीकोन व भारतासबधी असलेले विचार तेथे पण पोचले होते

व्याख्यानानतर विज्ञानाबद्दल आस्था असलेल्यांनी कोणते प्रश्न विचारावेत याची सूचीपण केली होती एक गृहस्थ उठले व मोडक्या इग्लिशमध्ये प्रश्न विचारू लागले भारताबद्दलचा त्याच्या मनातील द्वेष जणू उफाळून येत होता 'भारतात वर्षाकाठी किती स्त्रिया सती जातात ?' असा त्याचा प्रश्न होता कुठे चर्चेचा वैज्ञानिक विषय आणि कुठे हा प्रश्न ! आणखी असेच प्रश्न त्या पोर्तुगिजाने विचारले. अस्पृश्यता, बालविवाह, कुमारी-विधवा आदी विषयावर या प्रश्नातून भर दिला गेला

त्याच रात्री येथील एका मोठ्या क्लबमध्य जेवण ठरले. सायकाळी गाडीने तिकडे निघालो. घरे टेकडीवर होती सपाट जमिनीवर सुदर रस्ते होते प्रत्येक रस्त्याला कोणत्यातरी देशाचे नाव दिले होते. काही झोपडपट्टीपण होती लोकसख्येत गोरे थोड्याप्रमाणात होते त्यानतर काही निग्रो दिसले मधून मधून मिश्ररगाचे अँग्लो–पोर्तुगीज आढळले. क्लब गावाबाहेर होता सुदर बागेतून भव्य दालनात पोचलो बाग उत्तम होती गर्दी बरी दिसली लिफ्टजवळ आलो डॉ फॉन्सेका आत शिरले मी आत जाताच लिफ्टमन चटकन बाहेर आला त्याने लिफ्ट चालवण्यास नकार दिला 'व्यवस्थित कपडे नसलेल्या भारतीयाला वर नेणार नाही,' म्हणाला मी भारताचा राष्ट्रीय पोशाख परिधान केला होता शर्ट, कॉलरचा कोट होता, पण नेकटाय नव्हता त्याला समजल्यावर त्याने वर नेले ही इमारत चार मजले उच होती प्रत्येक मजल्यावर ठराविक बेट लावणाऱ्याचा गट असे पहिल्या मजल्यावर दोनशे क्रुझेडो तर वरील प्रत्येक मजल्यावर एक हजार क्रुझडो लावूनच पत्ते खेळत प्रत्येक गटाच्या टायचा रग वेगळा खेळणाऱ्यांच्या मुलाबाळाना खळायची समोरच सोय होती

एक दिवस तेथील नवीन प्राणीसग्रहालयात मला नेण्यात आले हे नुकतेच सुरू झालेले होते माकडाकरिता बेटे होती वाघ-सिहांना गुहा तेथील पोर्तुगीज डायरेक्टर सामोरा आला सर्व दाखवल्यानतर हळूच म्हणाला, 'गोव्यामुळे भारत आणि पोर्तुगाल यांचे सबध काहीही असोत, पण ब्राझिल व भारताचे सबध चागले झाले पाहिजेत याकरता या प्राणीसग्रहालयाला भारततर्फे एखादा हत्ती भेट म्हणून पाठवा नेहमीची आठवण राहील'

रात्री दूरचित्रवाणीवर माझा कार्यक्रम झाला विंचू, कोळी व सर्प हाती धरून इग्लिशमध्ये भाषण दिले चार सिनेमा नटी मधूनमधून प्रश्न विचारत होत्या कटाळून डॉ होगीने हळूच त्यांच्या पायाला चिमटा काढला त्या 'विंचू चावला !' म्हणून जोराने उड्या मारू लागल्या कार्यक्रमात गमत झाली शेवटी मुख्य बाईने एक विनती केली,

भारतातील स्त्रियाना आमचा नमस्कार सांगा या देशातील स्त्रिया स्वतन्त्र होत आहेत भारतात तसेच होवो '

'जुलै ९ ' हा या शहराचा मुख्य मार्ग इथूनच परतत होतो रात्र वाढत होती पण मार्गावर बऱ्याच गाड्या व प्रवासी घोळक्या–घोळक्याने जात होते मिरवणुकीचा बॅंड, गॅस–लाईटचा प्रकाश दिसू लागला एका ट्रकवर हाफपॅंट परिधान केलेली बरीच मंडळी हातात एक भव्य रुपेरी ढाल घेऊन मस्तीत उड्या मारीत होती जवळपासचे लोक हुर्यो करीत होते ब्राझिलचा राष्ट्रीय खेळ फुटबॉल ती मॅच जिंकलेल्या चमूचा उदोउदो चालला होता

शिकागोहून व्हिस्पॅरिंग जेट या विमानाने मियामी शहराकडे आम्ही प्रवास करीत होतो विमानात दक्षिण अमेरिकेला जाणारी बरीच मडळी होती मला पाहून काही मेक्सिकन लोकाना या देशातील प्राचीन सस्कृतीची आठवण झाली माझा शर्ट, कॉलरचा कोट, डोक्यावर टोपी व बॅगवर ‘ इडिया ’ त्यानी पाहिले व जवळ येऊन तिकडील ‘ माया ’, ‘ एन्टेक ’, सस्कृतीबद्दल बोलू लागले पुरातन काली हे लोक सूर्योपासक होते याच्या सूर्यमदिरात सर्पांच्या प्रतिमा होत्या

शपथ घेताना त्या प्रतिमेवर ते हात ठेवीत पण त्या शिलेवर कोरलेल्या प्रतिमा भारताच्या नागसर्पाच्या नसून त्या देशात असलेल्या वायपर सर्पाच्या होत्या दोन्ही देशातील सूर्योपासना व सर्पपूजा या विषयावर बरीच चर्चा झाली. पण तोपर्यंत विमान मियामी शहरावर घिरट्या घालू लागले आम्ही खाली उतरलो

विमानतळ भव्य होता दक्षिण अमेरिकेतील एअरलाईन्सचे ऑफिस गाठताना मला तब्बल अर्धा मैल चालावे लागले सामान ठेवून समोरील दुकानात डोकावत होतो तेव्हाच, ‘ डॉ देवरस ऑन दी काऊटर प्लीज ’ असे लाऊडस्पीकर ओरडला लगबगीने काऊटरवर गेलो तिथे अक्षरश: म्हैसुरी पागोटे घातलेली एक महिला माझी प्रतीक्षा करीत होती ‘ मी माया हास्ट आहे–’ असे म्हणत तिने हात पुढे केला हस्तांदोलन करताना मी जरा बुचकळ्यात पडलेला पाहून तिने खांद्यावर थाप मारली व १९५१ सालच्या मियामीभेटीची आठवण करून दिली बोलतच ती माझा हात धरून गाडीकडे चालू लागली

गाडीत बसलो तिने पागोटे काढले बघा माझ्याकडे ’ म्हणत तिने इकड डोकावले ‘ माझ वशज, म्हणजे वडील व आजोबा माया सस्कृतीचे होते माझे नाक व डोळे बघा कसे त्या देशातील दिसतात आम्ही आता ख्रिश्चन झालो आहोत पण मी तरी

---

# मियामीचा मानवी नीळकंठ

---

सर्पाशी संबंध कायम ठेवला आहे व आपले नाव माया म्हणून लिहिते '

तिने १९४९ सालची आठवण दिली मी ब्राझिलकडे जाताना मियामीला थांबलो होतो त्या समयी ही धीट सुंदर ललना माझ्या हॉटेलवर मला सर्पोद्यानाकडे नेण्याला आली होती तो दिवस एका विशिष्ट सणाचा होता त्या दिवशी मियामीच्या जवळपासच्या जुळ्या लोकांची पर्वणी होती लहानमोठ्या तरुण मुली बँडच्या आठ दहा ताफ्यात ऐटीने वाद्ये वाजवीत चालल्या होत्या त्याच्यामागे वेगवेगळ्या वयोगटांचे जुळे लोक उत्तम वस्त्रे परिधान करून गाडीतून किंवा पायीच चालले होते दोन्हीकडील गॅलरीतून ' हॅलो हॅलो ' च्या अभिनंदनाला हात उंचावून प्रतिसाद देत होते • काही जुळे बाबागाडीत होते, तर काही ९५-१०० वर्षांची जुळी कुणाच्या तरी खांद्याचा आश्रय घेत होती सारी मियामी या दिवसाची वाट पाहत असते शहराबाहेर रंगविलेली व उकडलेली अंडी एका बागेत लपविलेली असतात ही सर्व मिरवणूक तिथे जाते व अंडी शोधून सर्वांना खिरापत वाटते सर्व बच्चे खिदळतात व जुळ्यांना डिवचून मजाच मजा करतात

ती मिरवणूक बाजूला सारीत माया हास्टने १९५९ साली गाडी २२ डिक्सी ड्राईव्हला थांबवली होती आत गेल्यावर मि विल्यम हास्ट या गृहस्थाने माझे स्वागत केले सर्जन डॉक्टरप्रमाणे वेषभूषा केलेले मि हास्ट मला आत घेऊन गेले तेथील टेरेससमोरच्या लॉनवर बरीच प्रेक्षक मंडळी जमली होती माया हास्टने सुरेख वेष परिधान करून हाती माईक घेतला 'जगातील सर्वांत निडर व धैर्यवान पुरुष तुमच्यासमोर दिसत आहे अत्यंत भयंकर विषारी सर्पांचे याला भय नाही सापच याला भितो हे आहेत मि हास्ट ' हास्ट पुढे आले त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात अभिवादन स्वीकारले जवळचा मोठा पेटारा उघडला व आतून १४ फूट लांब भारतातील राजनाग (किंग कोब्रा) काढला तो हिरवट व काळे पट्टेवाला नाग सळसळत पळू लागला हास्टने एका हातातील काठीने त्याला डिवचले नाग, काठी व हाताकडे वळून ३ फूट उंच फणा काढून फूत्कार करू लागला काठी जवळ गेली आणि नागाने दंश करण्याकरिता झेप घेतली मि हास्ट यांनी चपळाईने काठी सोडली व दुसऱ्या हाताने सर्पाचे मानगूट मागून पकडले शेपूट पायाने दाबून धरले व एका काचेच्या पेल्यात दंश करवून विषदोहन केले तोपर्यंत माया हास्ट जोरजोराने स्तुतिसुमने उधळीत होती व प्रेक्षक टाळ्या वाजवून व आश्चर्य व्यक्त करून मि हास्ट यांची तारीफ करीत होते सर्पाला त्यांनी पंपाने अन्न दिले व नंतर पिंजऱ्यात कोंबले हात स्वच्छ धुवून गाजराचा रस प्यायले व शेजारच्या खोलीत जाऊन विषद्रावणाचे समप्रमाणित इंजेक्शन स्वतःला टोचून घेतले हा सर्व खेळ पाहण्यास प्रेक्षकांनी दरडोई २० रु दिले होते.

घरात गेल्यावर मला सायंकाळच्या जेवणाचे अगत्याचे निमंत्रण देत त्यांनी आपली प्रयोगशाळा, सर्पगृह, विविध प्रकारचे सर्प, मगरी, सुसरी, विषारी पाली आदि प्राणीसंग्रह

दाखवली व गिफ्टशॉपमधून एक भेट दिली तोपर्यंत त्याच्या दोन कन्यका शाळेतून आल्या एकीचे नाव नाजाहाना (राजनाग) व दुसरीचे नाव नाजानाजा (नाग) असे होते

घरातच जेवण होणार होते स्वयपाकघरातील डाळी, तांदूळ, मसाले, भाज्या यांच्या डब्याची यादी दिसली शाकाहारी मेनू छापील पुस्तकातून वाचण्यात आला पण पाक-सिद्धी होईना मीच पुढे झालो व चक्क मुगाच्या डाळीची खिचडी, भेंडीची भाजी आणि पिठले करून त्या 'डिनर' ची लाज राखली माया हास्ट 'योगा' चे धडे घेण्यास गेली व मि हास्ट मला आपला जुना इतिहास सागू लागले ते गेल्या युद्धात भारतात आले होते व परत जाताना येथील सर्प व त्याना हाताळण्याची विद्या घेऊन गेले होते

१९५९ सालच्या आठवणीची अशी उजळणी करत माया हास्टने गाडी सर्पगृहाच्या अंगन घेतली. जुन्या बैठ्या घराच्या जागेवर पक्के अद्यावत् सशोधन केंद्र आले होते त्या इवल्याशा स्वयपाकघराच्या जागेवर यांत्रिक पाकगृह व उत्तम स्वयपाकीण पण आलेली होती गिफ्टशॉप ओलांडून पलिकडे गेलो कैक उपकरणांनी युक्त अशा प्रयोगशाळेत मि० हास्ट एकचित्त बसले होते हाती ग्राफची टेप होती विषाचे पृथःकरण करताना विशिष्ट विषघटकाचे प्रमाण त्या टेपवर रेखाटले जात होते 'हॅलो डियर, सी हूम आय हॅव ब्रॉट !' म्हणत मायाबाईने मि हास्टच्या खांद्यावर हात ठेवला जणू काय गुगीतून दचकून उठावे तसे ते उठले माझ्याकडे निमूटपणे काही क्षण पहात राहिले व एकदम गळामिठी मारली काही वेळ तसेच थांबले व मिठी सोडून हस्तांदोलन करत नवीन कार्य दाखवू लागले तसाच हात धरून सर्व नवनवीन प्रासाद दाखवला बाहेरील बागेत आम्हा तिघाचा फोटो पचफणांच्या नागशिल्पाखाली काढला त्याची मोठी मुलगी आता लॉस एन्जेल्सला सिनेमा-नटी म्हणून काम करत होती व दुसरी ग्रॅज्युएट होणार आहे केराकस येथील कॉंग्रेसला अवश्य यावे असे त्यांना मी अगत्याचे निमत्रण दिले त्यांनी जरा कुरबुरतच येण्याचे कबूल केले व लगबगीने निरोप घेतला मायाबाईने एअरपोर्टपर्यंत पोचवले फारच घाई झाली होती विमान जणू काय माझीच वाट पहात होते. लाऊडस्पीकरवर माझ्या नावाची पुकारच चालली होती माया हास्टने निरोपाची मिठी मारून मला अक्षरश एमिग्रेशन खोलीत लोटले

वारिग या दक्षिण अमेरिकेतील कपनीचे ते विमान होते आत स्पॅनिश भाषेचा व 'सिनोरिटा' तथा 'सिनोर' याचा ( स्पॅनिश भाषेतील सभ्य स्त्री-पुरुष ) अगदी सुळ-सुळाट होता

केराकस शहरी मला हिल्टन हॉटेलमध्ये ठेवले होते त्या महागड्या हॉटेलच्या पाहु-ण्यांची यादी तपासली, पण तिथे मि हास्टचे नाव नव्हते

कॉन्फरन्स सुरू होऊन दुसरा दिवस उजाडला मी माझे अध्यक्षीय भाषण वाचत होतो व स्लाईडद्वारे माहिती देत होतो. भाषण सपताच लाईट लागले. प्रश्नाची सरबत्ती सुरू झाली. प्रश्न स्पॅनिशमधे येत माझ्या इअरफोनमुळे मला त्याच इंग्लिश भाषांतर मिळे

व माझ्या इंग्लिश उत्तराचा प्रश्नकारांना स्पॅनिशमध्ये बोध होई. (आंतरराष्ट्रीय परिषदेत असे ताबडतोब भाषांतर करणारे ठेवून सोई उपलब्ध करतात ) एका प्रश्नाला दुजोरा देणारा मनुष्य मला मि हास्ट दिसू लागला.

ते जोडपे आल्याने मला आनंद झाला दुपारचा लंच व नंतरचा चहा सोबतच घेतला. सायंकाळ झाली व ते मात्र जरा चिंतित दिसले. ज्या हॉटेलमध्ये ते उतरले होते तिथे रात्रीच्या मुक्कामाला जागा नव्हती हिल्टन हॉटेलमधील खोल्या तर पंधरा दिवसाकरता भरल्या होत्या मी त्यांना माझ्या खोलीत सामान ठेवण्यास सांगितले रात्रीचे जेवण झाले बरेच फिरून व प्रयास करून पाहिले पण कुठे खोली मिळेना शेवटी नाईलाजास्तव माझ्या खोलीतच सोबतचा दुसरा पलंग त्यांना दिला एका पलंगावर मी व सोबतच लागून दुसऱ्यावर मिस्टर आणि मिसेस हास्ट निजण्याचे ठरले तयारी झाली व आम्ही पहुडलो. खोलीची चिंता गेली व एक प्रकारची कृतज्ञता म्हणून निजण्यापूर्वी त्यांनी मन मोकळे केले

'तुम्हाला आठवते, मी अमेरिकन वकिलामार्फत तुमच्याकडून विषघ्न लगबगीने मागवले होते ? त्यानेच माझा जीव वाचला' त्यांनी सांगितले की, एके दिवशी नित्याप्रमाणे नागसर्पाचा पिंजरा बंद करत होते हलगर्जीपणामुळे दारातून सर्प निसटला व त्याने त्यांच्या ढोपराजवळ कडकडून दंश केला त्याला आवरून बंद केले प्रतिकारशक्तीकरता इंजेक्शन घेतल्यामुळे साहजिकच काही होणार नाही असे त्यांना वाटले. काम आटोपून मुलाकडे जाण्यास मोटारगाडीत बसले दहा मिनिटात त्यांना समोरील वस्तू दोन दोन दिसू लागल्या आणखी काही मिनिटांनी पायाला मुंग्या आल्या पुढे पायाची शक्ती कमी होऊ लागली गाडी कडेला घेतली व तिथूनच मुलाला वायरलेसने संदेश दिला मुलगा येईपर्यंत हातपाय ताठरले होते तोंड उघडे पडले होते व लाळ गळत होती डोळे धुंद झाले होते त्यांना ताबडतोब दवाखान्यात नेऊन आयर्नलंग (लोखंडी फुप्फुस) मध्ये ठेवले. इंजेक्शन दिले स्पेशल वॉर्डमध्ये त्यांची निगा महिनाभर ठेवण्यात आली तेव्हा कुठे ते जगले

दुसऱ्या वेळी त्यांना मण्यार चावली गुंगीतच हॉस्पिटल बेडवर पडले होते पण त्यांना भिंतीचे रंग लाल, निळे, हिरवे भासू लागले झोपले होते तरी त्यांना वाटे की आपले सारे शरीर अधांतरी तरंगत अगदी खोलीच्या छतापर्यंत जात आहे. डॉक्टर किंवा नर्स येऊ लागले की बुटांचे आवाज बँडच्या ड्रमच्या नादाचा आभास निर्माण करत बाटली, चमचे, पेले यांचे आवाज तर सुमधुर संगीतसदृश भासू लागले या सगळ्या अकल्पित आभासाचे वर्णन त्यांनी लिहून घेतले व ते सर्व एल् एस् डी नामक मादक पदार्थाने होणाऱ्या भासाप्रमाणे होते

रेटलस्नेक, बाथाप्स, घोणस, फुरसे, गबून, वायपर, माबा व शेवटी गिलामॉन्स्टर नावाची पाल त्यांना चावली प्रत्येकाने कसा कसा त्रास दिला व तरी आपण कसे वाचलो

याचे रोमहर्षक वर्णन त्यानी केले

मध्यरात्र झाली सकाळी सातला उठेन म्हणत हास्टने जाभई दिली व गुडनाईट म्हणत डोक्यावरून पांघरूण घेतले मला मात्र रात्रभर झोप आली नाही

सकाळी सातला उठून त्यांनी अवघ्या दहा मिनिटात स्नानसुद्धा आटोपले माया म्हणाली की, तिला तब्बल दीड तास बाथरूममध्ये लागेल सातासमुद्राच्या तळातील गाळ त्वचेवर लिपावा, वीस मिनिटे त्याची प्रक्रिया पहावी, मग तीनचार तपमानाच्या पाण्याने तो भिजवावी असे कितीतरी सौदर्यप्रसाधनेचे तिचे प्रकार होते त्यामुळे म्हणा की अनुवशिकतेने म्हणा, ती पन्नाशी ओलाडतानासुद्धा तिशीच्या आत दिसत होती आपल्या मोहक चेहऱ्याने व गोड शब्दानी तिने पतीची जाहिरात करून त्याना विशेष ख्यातीच्या शिखरावर चढवले होते

प्रत्येक राष्ट्राने आपल्या देशातील विशिष्ट प्रकारचे जिवत सर्प आणले होते. मला मात्र परवानगी फार उशिरा मिळाली त्यामुळे मला नाग आणता आला नव्हता पण जवळपासच्या प्राणिसग्रहाल्यातून एक नागसर्प मी आणला हॉटेलमॅनेजरची परवानगी नव्हती मोठ्या ब्रीफकेसमधे तो पिंजरा लपवून सहाव्या मजल्यावरील खोलीत आणला बाथरूममध्ये ठेवून टॉवेलने झाकला खोलीच्या दाराला पाटी लावली– ' मीटिंग चालू आहे आत येऊ नये ' सायकाळपर्यंत हे सर्व जमले खोली स्वच्छ करणारीकडून बिस्तरा ठीक करून घेतला व तो पिंजरा चक्क पलगाखाली लपवून ठेवला दुसऱ्या रात्रीला त्या खोलीत आम्ही चौघे होतो हास्ट दांपत्य एका पलगावर व मी आणि माझ्याखाली नागसर्पाचा पिंजरा

तिसऱ्या दिवशी परिषदेत हा भारताचा ' नाग ' दाखवला माया हास्ट सुंदर पोषाक परिधान करून भाषण करत होती तिकडे मि हास्टने नाग हातांनीच टेबलावर ठेवला. चोहीकडील कॅमेऱ्याच्या फ्लॅशलाईटमुळे तो सर्प जरा बिथरला त्याने फणा काढून फुत्कार सुरू केले श्री हास्ट यानी डावा हात पुढे करून सर्पाचे लक्ष तिकडे वेधून घेतले नागाने जशी दश करण्याला हाताकडे झेप घेतली तशी त्यांनी उजव्या हाताने त्याचे मानगुट पकडले व जवळच ठेवलेल्या काचेच्या कुपीत त्याचे विषदोहन केले खूप फ्लॅश फुटले टाळ्या वाजल्या व सर्प पिजऱ्यात गेला. त्या दिवशी टी व्ही. वर, सायकाळच्या वर्तमानपत्रात व रेडिओवर भारतातील नागसर्पाचे विषदोहन व हास्टदांपत्य यांची स्तुतीच स्तुती येत होती त्यामगे भारतीय वैज्ञानिक म्हणून माझी मुलाखतही रकाने भरून आली

सायकाळी आम्ही केराकस हिल्टन हॉटेलच्या ३२ व्या मजल्यावर बसलो होतो समोरील गच्चीवर चोहिकडे लहान निळे दिवे चमकत होते जणू काय आकाशातील तारेच असावेत समोरील मचावर स्पॅनिश सगीताचे सूर व जवळच वाद्ये साथ देत होती कैक तरुण तरुणी हेलकावे घेत वाद्याच्या तालात नाचत होती आमच्या भवतीतले सुदर सोफे युगुलांनी मडित केले होते बारच्या परिचारिका मद्य व खाद्ये टीपॉयवर ठेवीत

होत्या या सुरेल व रंगेल वातावरणात मदिरापान व गप्पा करीत असतानाच श्री हास्ट याना हुरूप आला. त्यानी खिशातील दोन मोठी सुवर्णपदके टेबलावर ठेवली एकीकडे मी व कोस्टारिका देशाचे डॉ बोलानास बसलो होतो व समोर ते दांपत्य होते ती पदके पाहून मायाबाई उठल्या व माझ्या आणि बोलानास यांचेमधे बसत, 'यू नो इट ?' विचारीत तिने बोगोटाची कथा सांगितली या शहरातील एका धनवान व महत्त्वाच्या राजनैतिक पुरुषाच्या एकुलत्या एक मुलास सर्पदंश झाला त्याला इंजेक्शनचे वावडे होते मुलगा आता हमखास मरणार, म्हणून त्या गृहस्थाने अमेरिकन वकालतीत प्रवेश केला व मुलाला वाचविण्याची विनती केली तेथून खास बायरलेसने वॉशिंग्टन व मियामीला संदेश गेला अमेरिकन एअरफोर्सच्या खास विमानाने मि हास्ट याना बोगाटा शहरी तातडीने आणले श्री हास्ट यांच्या रक्तवाहिनीतून ३०० सी सी रक्त काढले त्या मुलाचे रक्त जरासे काढून हे रक्त दिले श्री हास्टच्या रक्तातील प्रतिकारशक्तीमुळे सर्पविषाचा परिणाम झाला नाही मुलगा वाचला मि हास्टचा खूप गाजावाजा झाला शहरातील मेयरने त्यांचा सन्मान केला, पदक दिले, शहराची किल्ली अर्पण केली यांच्या रक्ताने कैक सर्पविषदंशित लोकाना जीवदान मिळाले आहे याच्या रक्तात कैक विषांची प्रतिकारशक्ती निर्माण झाली आहे

दर पंधरवड्यात एक थेंब विषाचे दहा हजार थेंब पाण्यात द्रावण करतात. या कैक प्रकारच्या विषमिश्रित द्रावणातील एक दशांश सी सी द्रव ते टोचून घेतात नेहमी टोचल्याने प्रतिकारशक्ती शाबूत राहते, व त्या सर्पविषाची बाधा होत नाही पण विषाचे प्रमाण, प्रतिकारशक्तीपेक्षा जास्त झाले तर अपाय होतो नाग किंवा मण्यार दंशाने याना जी इजा झाली ती या अप्रमाणित प्रकारामुळे होय यांना आतापर्यंत १२३ वेळा विविध विषारी सर्पांनी दंश केला आहे या सख्येत नागदंशाचा आकडा ६७ असून, राजनाग ७ व इतर सर्प व विषारी पाल (हिलोडर्मा) मिळून ४९ दंश झाले या सर्व सर्पदंशातून हे सुखरूप बरे झाले यांनी सर्पालय व विषदोहनाचा धंदा सन १९४८ साली सुरू केला मियामी शहरी यांचे सर्पालय म्हणजे एक प्रेक्षणीय स्थान मानले जाते कैक सर्प ठेवून यानी आत्तापर्यंत १०० किलोग्रॅम विष गोळा केले सर्पविषाला त्या देशात चांगलीच मागणी आहे हे १००० ते ३००० रुपये प्रतिग्राम या भावाने विकले जाते अगदी सोप्या हिशेबाने त्यानी २५ कोटी रुपयांचे विष निर्माण केले आहे याशिवाय दररोजची प्रवेश फी प्रतिप्रेक्षक १७ ते २१ रुपये आहे यामुळे अदमासे ६०००० रुपये मासिक प्राप्ती होत आहे शिवाय गिफ्टशॉपमधील सामान व टी व्ही आहेच या सर्वांमुळे मि हास्ट आता कोट्याधीश झाले आहेत त्यांचे वय या समयी ६७ असून सर्पप्रदर्शन विकून नुसते संशोधन करावे अशी त्याची मनीषा आहे त्याची सुंदर पत्नी माया, हिला मात्र वाटते की यांनी असेच सर्प हाताळावे व तिने माईकवर मि हास्टचे गुणगान करावे

माया माझ्या व डॉ बोलानास यांचे गळ्याभोवती हात ठेवून सार्‍या गोष्टी सांगत

होती कथा संपावयाला आली. मि. हास्ट जागेवरून उठले पेल्यात मदिरा ओतली व झुलत झुलत माझ्या समीप आले 'हियर इज टू इंडिया' (भारताच्या सन्मानाकरिता) म्हणत माझ्या पेल्याला पेला टेकवला कसेबसे उभे राहून म्हणाले, 'भारतात आल्यामुळे ही विद्या मला अवगत झाली, भारताचा मी सदैव ऋणी राहीन' भावनेने भारावलेल्या हास्टने मिठी मारण्यास हात पुढे केले. धुंद झालेले हास्ट–विष पचविणारे नीळकंठ, माझ्या खांद्यावर पडले तेवढ्यात मायाने टुण्‌कन् उडी घेतली व 'ते शिवासारखे असले तर मी पार्वती आहे,' म्हणत मला मिठी मारली. तिकडे वाद्ये थांबली व टाळ्यांचा कडकडाट झाला

यावेळी मी लुफ्तान्साच्या विमानाने निघालो होतो. सांताक्रूझ विमानतळावरील जर्मन कारकुनाने पेटचाचे वजन जास्त दाखविले ते कमी करण्यासाठी अंगावरील ओव्हर-कोटाच्या खिशात वजनी सामान कोंबले तोपर्यंत त्यानी पेटी तावातावाने हिसकावून विमानाकडे पाठविली होती माझी हँडबॅग पण नेली होती. आता माझ्याजवळ कपडे आणि खिशात सामान कोंबलेला ओव्हरकोटच होता

विमान जरा उशिरा सुटले ऑरेंज घेतल्यावरसुद्धा प्रवासात तहान भागत नव्हती. पाणी मागितले ते दोनदा दिल्यावर एअर होस्टेस जरा वैतागली तिने जर्मनीत भरलेल्या पाण्याचे छोटेसे सीलबद पिंप आणून दिले किती शुद्ध केलेले ते पाणी होते पण मुंबईच्या पाण्याचा गोडवा त्याला नव्हता पाण्यावरून सोबतच्या ऑस्ट्रेलियन महिलेची ओळख झाली तिचे वाचन बरेच होते तिने गंगाजळ व गोमूत्र या द्रवाची सांगड शुद्धीकरणापर्यंत पोचविली होती 'गंगेच्या पाण्यात 'बेक्टिरियोफाज' असतात, त्यामुळे कैक जंतू त्या पाण्यात जगत नाहीत पुरातनकाली भारतातील गुरे, 'चरतिनाम् वने वने' प्रमाणे वना-तील वनौषधी घेत होती व यामुळे गोमूत्रात औषधी गुण येत असे व त्यामुळे काही मानवरोग बरे होण्याला मदत होई म्हणून गोमूत्र सेवन करीत,' असे मी सांगितले तिला हा वैज्ञानिक दृष्टीकोन पटला तिने हिंदुधर्माबद्दल प्रश्न विचारण्यास सुरवात केली

जाग आली तेव्हा खिडकीतून सूर्यप्रकाश दिसत होता विमान पांढऱ्या शुभ्र धुत-लेल्या कापसाच्या ढिगाऱ्यावरून चालल्याचा भास होत होता, प्रातर्विधी लवकर आटोप-ण्याच्या बेतात होतो, पण आठवण आली की सांताक्रूझला हँडबॅगसुद्धा आत गेली सका-ळचे साहित्य त्यातच राहिले होस्टेसकडून ब्रश, पेस्ट, रेझर घेऊन कार्यक्रम उरकला. तोपर्यंत फ्रँकफुर्ट विमानतळावर विमान उतरले

# मनःशांतीसाठी भक्तिमार्ग आणि धर्माचरण

सांताक्रूझ विमानतळापेक्षा हा तळ वीस पटीनी तरी मोठा असेल कस्टम्स, पासपोर्ट करून बाहेर येण्याला तब्बल २५ मिनिटे लागली आत किती तरी दुकाने, ऑफिसे, विश्रामगृहे, फलाहारगृहे, तर होतीच पण याशिवाय शेरटानचे भव्य हॉटेल अगदी चिकटून होते वर चोहिकडे मार्गदर्शक फलक झळकत असलेले दिसले त्यावरील चिन्हे मायक्रोफोनच्या आवाजासरशी बदलत होती ड्यूटी फ्री सामानाची विक्री चालू होती जरा पुढे जाऊन खळणी न्याहाळत होतो, तेवढ्यात 'गुटेन मॉर्गेन' म्हणत एक तरुणी हसत हसत समोर आली 'स्प्राखन झी डायशे–माईन हो हेन हेर' (महाशय, आपण जर्मन बोलता काय ?) म्हणत तिने हात पुढे केला व माझ्या कोटाच्या बटनहोलवर फूल खोचले 'हरे रामा, हरे क्रिस्ना' पठण करीत तिने डोळे मिटले व हात वर करून चुटक्या वाजवीत ती समोर डोलत उभी राहिली एक–दोन बालिश वयाचे बघे गमत निरखत होते हळूहळू तिने डोळे उघडले डोलणे कमी झाले तिच्या एका हातात पैशाकरिता डबा व दुसऱ्या हातात त्यांच्या पथाची मुखपृष्ठावर श्रीकृष्ण असलेली पुस्तकाची बडले होती ती जर्मन भाषेत बरीच बोलली त्यात 'मथुरा' 'वृंदावन,' 'राधा,' 'कृष्णा' आणि 'राम' हे ओळखीचे शब्द होते 'स्प्राखन क्लाईन डायशे' (थोडेसे जर्मन येते) असे मोडक्या जर्मन भाषेत मी बोललो तिने प्रवचन थांबविले डबा पुढे केला मी ५० सेंटचे नाणे आत टाकताच मला एक पुस्तिका दिली 'डानकिन्शोन' (धन्यवाद) म्हणत खिदळत ती निघून गेली

या भक्तिमार्गाच्या प्रथम दर्शनानंतर परतीच्या वेळी मी पुन्हा इथे आलो स्टेशनवर स्नान आदि आटोपले तब्बल १२ रु देऊन एक पेला ऑरेंज ज्यूस घेतला तेवढ्यात येथील नॅचरल हिस्ट्री म्युझियमचे डायरेक्टर डॉ क्लीमर भेटायला आले तेव्हा मी मुबईहून आणलेला घारापुरीच्या त्रिमूर्तीचा बस्ट त्यांना भेट दिला माझे विमान सुटायला चार तास अवधी होता, म्हणून ते मला म्युझियमवर घेऊन गेले या विमानतळावरील सर्व कारपार्किंग तळघरातच होते, त्यामुळे एकदम हायवेवर आलो हिवाळा नुकताच सुरू झाला होता. झाडांची पाने गळत होती हवा ढगाळ असून चिमण्या पाखराचे आवाज कमी होते.

म्युझियममध्ये त्यानी कर्मचाऱ्यांची ओळख करून दिली माझे १९६५ साली प्रकाशित झालेले पुस्तक दाखविले. नतर श्री शकराच्या त्रिनेत्राबद्दल चर्चा सुरू केली त्यानी प्रयोगशाळेत न्यूझिलंडहून 'टुवाटारा' नावाचा सरडा आणून पाळला होता. हा टुवाटारा (स्फीनोडान) दीड फूट लांब असून याच्या भुवयाच्यावर मध्यभागी एक उभा 'नेत्र' होता सृष्टीतील पृष्ठरज्जयुक्त प्राण्यास दोनच डोळे असतात, या विधानाला एकच अपवाद आहे व तो म्हणजे 'टुवाटारा'–ज्याला एक तृतीय नेत्र आहे असाच का शकर त्रिनेत्र असेल !

गेल्या युद्धात या म्युझियमचे अतोनात नुकसान झाले पण त्या मोडकळीतून काढ-

लेल्या वस्तू व्यवस्थित ठेवल्या होत्या एका इजिप्शियन मुलाची 'ममी,' पुरातन काळातील प्राण्याचे सापळे, अशा किती तरी वस्तू बघत आम्ही भोजनाला बसलो एक मध्यमवयीन महिला कपाळाला गोपीचंदन लावून गळ्यात तुळशीमाळ घालून आमच्या टेबलावर आली क्रिस्ना कॉन्शस्नेस या संस्थेने जर्मनीत काही देवालये बांधली आहेत जर्मन भक्त, नामसंकीर्तन करीत टाळ मृदंग घेऊन सडकेवरून हिंडतात व लोकांना कीर्तनात तल्लीन करतात हा पंथ श्रीगुरू प्रभुपाद यांनी तिकडे आणला व आता कैक जर्मन अनुयायी प्रचार करीत आहेत. भक्तीमार्ग इथे पोचल्याची ग्वाही त्या महिलेने दिली

न्यूयॉर्क ते क्लीव्हलँड जाण्यास निघालो एअरपोर्टवर 'हरेराम' च्या युवती पुन्हा दिसल्या ओहायो स्टेटच्या क्लीवलँड गावी मुक्काम केला तिथे आमचे चिरंजीव पॅथॉलॉजिस्ट म्हणून स्थायिक झाले आहेत. या शहरात पोलादाचे आणि लोखंडाचे चार मोठे कारखाने तर आहेतच, पण फोर्ड कंपनीच्या गाड्यांचा एक भव्य उद्योगसमूह आहे या कारखानदारीमुळे मजूरवर्ग, विशेषत: निग्रो इथे चहुकडे दिसत होते जेवढ्या कॅडीलॅक या निग्रो नागरिकाकडे होत्या त्याच्या निम्म्यानेसुद्धा इतराकडे नसतील पैसा मिळाला की भव्य गाडी, भारी पोशाख व उंची भोजन यातच ते खर्चीत असतात पैसा गेला की, वताग येणारच त्यांची वस्तीच वेगळी होती व तिकडे सायंकाळनंतर फिरणे फार धोक्याचे मानले जाई या वस्तीतून हिंडून सरोवर तटावरील मोठ्या हॉटेलसमोरील मोटारी बघत आम्ही मुख्य पेठ व ऑफिसेस जवळील चौकात आलो या भव्य चौकात एक १०० फूट व्यासाची टाकी होती त्या टाकीच्या मध्यभागात एक मोठे शिल्प असून तिथून कारंजे चहूकडे पाणी फेकीत होते या शिल्पाच्या पायथ्याशी चार मानवी संस्कृतींची प्रतीके कोरली होती भारतीय संस्कृतीच्या भागात गणपती, एक नंदी व मुकुटधारी एका देवीरूपी महिलेचे शिल्प होते. या सगळ्या संस्कृती जळत आहेत, त्यातून शिल्पाच्या पाषाणी—ज्वाला वर उफाळून येत आहेत व त्या ज्वालामधून एक मानव हात उंचावून गगनाकडे उड्या घेत आहे— असे ते शिल्प आहे भारतीय देवदेवतांची अशी नालस्ती मनाला खटकली.

त्याच विषण्ण मानसिक स्थितीत शहरातील एका भारतीय व्यापाऱ्याच्या दुकानात प्रवेश केला व्यापारी मुंबईचेच होते त्यांचे नाव श्री बाबूभाई पटेल । यांनी स्पेनच्या केशराची १ औंसाची डबी १२ डॉलरला दिली बदाम २५ रु किलो होते पिस्ता ३० रु किलो होता श्री पटेल यांना त्या शिल्पाच्या मूर्तीबद्दल विचारले, 'जवळच श्रीकृष्णाचे मंदिर आहे, ते पाहून या— मग बोलू' असे ते म्हणाले फर्लांगभर पायी गेलो तोच उजवीकडे एका बंगलीसमोर 'हरे राम' अशी काचेची पाटी दिसली ही रात्री प्रकाशित पण होत असे पायऱ्या चढून कम्पाऊंडच्या आत जाताच एक १८ वर्षीय गौर ललना दिसली तिने नीलवस्त्र परिधान केले होते. कपाळाला गोपीचंदनाचा टिळा लावला होता फुले तोडताना ती दिसली तोडाने तीकाही पुटपुटत होती स्त्रोत्र असावे 'देवदर्शन होईल

काय ?' असे विचारताच ती सरळ बगलीत शिरली आम्ही घटा वाजविली एक निग्रो तरुण आला, त्याने आम्हास आत घेतले दोन खोल्या पार करून आम्ही एका हॉलमध्ये आलो या हॉलच्या एका बाजूस सबध वरपर्यंत पडदा होता व इतर भिंतीवर श्रीकृष्ण लीला, कंसवध, गीतोपदेश, महाभारत आदि चित्रे फ्रेम करून लावली होतीं हरेराम–हरेकृष्ण लिहिलेली वस्त्रे दारावरून लटकत होती मोठ्या पडद्याच्या अगदी समोर स्वामी प्रभुपाद याचा फोटो पुष्पहार घालून ठेवला होता उत्तम अगरबत्तीचा सुगध दरवळत होता इतक्यात पडद्याआडून घंटी वाजली निराजनाचा अधुक प्रकाश दिसला कुणीतरी आतून मध्यम स्वरात काही अपभ्रष्ट मत्र म्हणताना ऐकू आले– ' कलशस्य सम्मुखे विष्णु ' हे तर स्पष्ट ऐकू आले असे किती तरी मत्र वीस मिनिटे चालू होते त्या ऐकण्याच्या गुगीत होतो, तेवढ्यात शखनाद झाला पडदा सरकताना दिसला बाजूला तीच लहान ललना एका हातात उत्तर भारतातील निरांजन व दुसऱ्या हातात घटा घेऊन ' जय जगदीश हरे–' गात होती. समोर भगवान श्रीकृष्ण व राधिकेच्या पाढऱ्या सगमरवरी जयपुरी मूर्ती होत्या मूर्तींवर उत्तम रेशमी वस्त्रे होती भगवताच्या शिरावर मयूरमुकूट आणि एक फिरती छत्री होती या आग्ल प्रदेशात हे भारतीय दृश्य– अगदी झावबाच्या राममदिरा-सारखे दिसले माझा कठ दाटून आला डोळ्यात अक्षरशः आसवे झळकली व प्रणिपात करीत नतमस्तक होऊन स्तब्ध उभा राहिलो त्या मुलीने कापुर–आरती केली निरांजन आमच्याकडे सरकविले फुले घेऊन ती मत्रपुष्पाजली म्हणू लागली आम्ही आरतीवरून हात फिरविला, १ डॉलर ठेवला व साष्टाग नमस्कार घालताच पडदा बद झाला भारता-तील सामान्य देवळात २०–२५ मिनिटे अशी वेद–पुराणोक्त पूजा चालू असलेली मला तरी कधी दिसली नाही हॉलच्या बाहेर निग्रो तरुण उभा होता त्याला विचारले तेव्हा तो म्हणाला, कॅडिलॅक चालविली, खूप खूप मजा केली, पण या ' हरेराम ' नावान मला जी मानसिक शांती मिळाली ती ' पॉट ' न– (मादक पदार्थ) किंवा मदिरेनसुद्धा मिळत नव्हती '

अमेरिकेत कैक स्थळी श्रीकृष्ण मदिरे बांधण्यात आली आहेत येथील श्रीकृष्णाची मूर्ती जयपूरहून आणलेली आहे अगरबत्ती, चदनकाष्ठ, गोपीचदन, रामनामाचे वस्त्र, जानवी, तुळशीमाळ, भगवी वस्त्रे, धोतरे, साड्या भारतातून अमेरिकेला येतात काही मदिराजवळ सस्कृत पाठशाळा आहेत या पथात लहान मुलांना थोडे सस्कृत शिकवितात समाजात भारतीय पद्धतीने लग्ने होतात रोज दोन वेळा देवळात पूजाअर्चा असते, पण मुख्यतः हरेराम–हरेकृष्ण या नामसकीर्तनावर जोर दिला जातो या नामाची माळ सकाळ–सध्याकाळ जपतात वर्षातून दोन महत्त्वाचे सण असतात एक श्रावणातली रथयात्रा व दुसरी श्रीकृष्ण–जन्माष्टमी सेंटफॅन्सिस्को शहरात भल्या मोठ्या रथातून सुभद्रा, बळ-राम व श्रीकृष्णाची गावातून मिरवणूक काढतात उत्तम प्रसाद देतात

पिटस्बर्ग शहराजवळ वृन्दावन नावाची वसाहत निर्माण झाली आहे इथे श्रीकृष्णाचे

मोठे देवालय आहे एक प्रचंड गोशाला लागूनच असून शेतजमीन पण राबवतात इथे उत्तम हार, गजरे विकणारी दुकाने तर आहेतच, याशिवाय, निर्भेळ, स्वादिष्ट पेढे, कलाकंद, बर्फी, रसगुल्ले, चमचम, खीरमोहन विकणारी रेस्तोरां आणि शाकाहारी भोजनगृहे, आहेत जगातील कैक देशात अशी मंदिरे असून श्रीकृष्ण चरित्र, श्रीमद्भागवत, श्रीमहाभारत, रामलीला, भगवद्गीता आदि ग्रंथाचे कित्येक भाषांतून रूपांतर होऊन ते ग्रंथ अभ्यासिले जातात क्रिस्नाकॉन्शसनेस संस्थेचे संस्थापक स्वामी प्रभुपाद या वर्षीच आपली १८–१९ वर्षांची प्रचारसेवा संपवून मथुरेला श्रीकृष्णचरणी लीन झाले

नरकचतुर्दशी होती क्लिवलँडला मुलाना उटणे लावून स्नान घातले व पिट्सबर्गला विमानाने पोचलो विमानतळावर हरेरामच्या प्रचारिका होत्याच हे शहर अमेरिकेची लोखंडनगरी असे मानतात. 'मोननगहेला' नदीकाठी वसलेल्या या शहरात कैक टेकड्या असून वस्ती पसरली आहे इथे काही भारतीय नागरिकानी गावाबाहेर एका टेकडीवर उभारलेले गिरिजाघर विकत घेतले आहे तेथे देवी, मारुती, श्रीकृष्ण आदींचे फोटो व एकदोन मूर्ती असून, शेजारच्या खोलीत 'श्रीगुरुग्रंथसाहेबा' ठेवले आहेत शुक्रवारी लक्ष्मीपूजनाचा दिवस होता. सायंकाळी मी कुटुंबासह या टेकडीवर गेलो सुमारे २०० भारतीय सहकुटुंब आले होते प्रत्येकाने घरून काही तरी फराळाचे आणले होते सगळेजण यावर ताव मारीत होते ठीक ७ वाजता पूजासाहित्य आले दक्षिण भारतातील एका इंजिनियरने विष्णुसहस्रनाम वाचले–पण पूजाविधी जमत नव्हता कानपूरचे एक डॉक्टर व त्यांच्या पत्नी याना आसनावर बसविले व कलशपूजा झाली श्रीसूक्त व पुरुषसूक्त म्हणून तेथील देवीच्या मूर्तीची पूजा झाली लहानमोठ्या स्त्री-पुरुषाच्या भाली लाल कुंकवाचा टिळा लावला विजेच्या दिव्याची चोहीकडे रोषणाई होतीच–त्याशिवाय पेपरबॅगमध्ये मेणबत्त्या पेटवून लांब रांगा केल्या होत्या ठीक ७–३० वाजता 'दुर्गे दुर्घट भारी–' ही आरती सुरू झाली 'जय जगदीश हरे'–चा जयघोष झाला लहान मुलांनी कपाळावर टिळा, आरती याचा कधी अनुभव घेतला नव्हता मंत्र ऐकले नव्हते टाळ्या वाजवित, 'जय जय' म्हणत सर्व डोलत होते मंत्रपुष्प झाले लोकानी आरतीत पैसे ठेवले त्या दिवशी या भेटीत २५० डॉलर जमले नंतर सर्व भारतीय बाहेर आले १०० × २०० फूट अशा एका सपाट टेकडीवर दोरी बांधून अंतर आखले होते दूर पोलीस उभे होते ॲम्ब्युलन्स व पलीकडे आगीचा बंब होता ही जय्यत तयारी झाली तेव्हाच फटाके उडविण्याची परवानगी दिली आतषबाजी सुरू झाली मुलाना २–३ फूट लांबीच्या फुलबाज्या दिल्या होत्या चर्चभोवती दिव्याची माळ, सडकेवर मेणबत्त्यांची रांग, पठारावर फटाके व भुईनळे आणि चोहुकडे फुलबाज्याचा प्रकाश 'जय जय'च्या आवाजात पिट्सबर्गला भारतीयानी दिवाळी साजरी केली

पाडव्याला डॉ जोशी– श्री ना ग गोरे यांचे जावई– याच्या घरी महाराष्ट्रीय मंडळी जमली होती चकली, कडबोळी, करंजी, शेव, चिवडा खाण्यात, गायन वादनात

आणि हसण्याखेळण्यात दुसरा दिवस साजरा केला सायकाळी गावाबाहेर कुली रोडच्या उत्तरेला पेनहिल या टेकडीवर गेलो इथे तिरुपतीच्या लक्ष्मी-व्यकटेशाचे देवालय बाधले आहे देवळासाठी शिल्पकार व तयार मूर्ती भारतातून आणल्या आहेत शिल्पाचे दगड तिथूनच आणले आहेत नुकतेच या वर्षी हे देवालय पूर्ण झाले गर्भागारासमोरच तळ-घरात मोठा हॉल असून तिथे उपनयन, विवाह इत्यादी सस्कार करण्याची व्यवस्था आहे यापूर्वी मी तिथे असताना एक लग्न पाहिले पुणेरी पगडी घालून व उपरणे पांघरून भटजी आले त्यानी प्रथम सोमरसाची मागणी केली हुरूप आल्यावर एका कुडीत बरा-चसा कापूर पेटविला याच अग्निभोवती सप्तपदी करून त्यानी १५ मिनिटात लग्न लावले आता श्री बालाजीचे मदिर पूर्ण झाले आहे भारतातून चांगले उपाध्ये तिथे गेले आहेत सर्व विधियुक्त सस्कार आता होतील

न्यूयॉर्कला श्री गणपतीचे देवालय आहे महर्षी महेश योगी यांनी तर मत्र देऊन जपसाधनेने मानसिक शाती मिळते हे सिद्ध केले आहे तेथील प्रत्येक विश्वविद्यालयात त्याचे वर्ग चालतात शासकीय सैन्यशाळेत त्या तत्राचा अभ्यास झाला बाल्टीमूरला जॉन-हाफकिन्स विद्यालयात लेक्चर देण्याला गेलो होतो तिथे चोहीकडे चित्रित फलक झळ-कत होते स्वामी मुक्तानद याच्या श्री कुडलिनी शक्तीच्या व्याख्यानाच्या शिबिराची ती जाहिरात होती

आम्ही भारतीय सुशिक्षितानी भक्तिमार्ग आणि धर्माचरणाकडे दुर्लक्ष केले, पण अमेरिकेत त्या मार्गाचे स्वागत होत आहे कारण त्यांना त्यामुळे मन शांती मिळू लागली आहे

लॉस एंजलसच्या विमानतळावर डॉक्टर आणि श्रीमती बॉल मला घेण्यास आले त्याची भेट होताच मला घरची आठवण झाली. हे दांपत्य मुंबईला एक महिना राहून आले व श्रावण–भाद्रपदातले आमचे कितीतरी सणवार त्यांनी पाहिले होते. आमच्या घरातील हळदीकुंकू समारंभाला श्रीमती बॉल अगत्याने आल्या होत्या, त्यामुळे मला त्या अगदी घरच्या वाटल्या

हे शहर लांबपर्यंत पसरले आहे अमेरिकेतील सर्व शहरात या शहराचाच परीघ जास्त भरेल जमीन भुसभुशीत असून शहरातील कैक स्थळी वस्तीजवळच जमिनीतून तेल काढण्याची यंत्रे दिसली दुमजली घरे न्यूयॉर्कच्या मानाने फारच थोडी होती कारण धरणीकपाचे धक्के या शहरात नेहमीच बसतात शहराची लोकसंख्या २५ लक्ष आहे पण तेथील मोटारींची संख्या ३० लक्षावर होती कारखानदारी व मोटारवाहतुकीमुळे हवेचे प्रदूषण या शहरात प्रामुख्याने दिसले. अगदी सकाळी ९ वाजता चोहीकडे वातावरणात धुक्याप्रमाणे ढग पसरत व काही ठिकाणी श्वासोच्छ्वासाला त्रास होत असे या शहराचे प्रमुख आकर्षण येथील चलत्‌सृष्टी व श्री डिस्ने यांची अजब सृष्टिनगरी होत

माझे वास्तव्य क्लेरमांट हॉटेलवर होते, पण जेवण दुसरीकडेच मिळे पहिल्याच दिवशी गावात जेवणाला क्लिफटन हॉटेलवर गेलो मार्गात ब्रॉडवे सडकेजवळील मोटार ठेवण्याची भव्य जागा, रंगीत फवारे, लांबचे मॅकआर्थर सरोवर लागले तिथेच अतिप्राचीन कालातील डिनोसोर प्राण्याचे सांगाडे ज्या खड्ड्यात सापडले त्याचे प्रत्यक्ष दर्शन घेतले क्लिफटन हॉटेलवर अगदी हवाईची छाया पसरली होती मोठ्या बांबूची वने, पाम आणि केळीचे वृक्ष तर होतेच पण गवताने साकारलेली लहान लहान घरेही दिसली. त्याच्या आत मेणबत्तीच्या प्रकाशात जेवण मिळत असे. बाहेर कृत्रिम धबधबा होता व

मधूनमधून हत्ती ओरडण्याची टेप ऐकू येत होती

विश्वविद्यालयाच्या परिसरापलीकडे छोट्या मोठ्या टेकड्या होत्या हिरवळ व जंगली झाडे यांची रेलचेल दिसली या झाडाझुडुपातून नागमोडी रस्ता बीवरली हिल-कडे वळला होता याच्या पलिकडे व्हरमॉंट हिल ओलांडताच बेल एयर परिसर आला इकडेच सर्व सिनेमा नट–नट्यांचे प्रासाद होते या भागाचा नकाशा विकत मिळाला व त्यावर कोणता नट वा नटी कुठे राहते याची संपूर्ण नोंद होती हे प्रासाद पाहण्या-करिता व नट्यांचे मुखावलोकन करण्यास कैक गाड्या फिरत होत्या– पण ही घरे अगदी झुडपांनी झाकलेली, सुदृढ शरीरसंरक्षकांनी रक्षित, इलेक्ट्रॉनिक यंत्रांनी सुसज्ज अशी होती यामुळे कुणी जवळ आला की यंत्रे अलार्म देत, कुत्री भुंकत व रक्षक दक्ष उभे असत ही घरे न्याहाळीत हॉलीवुड पार्ककडे वळलो मार्गात कितीतरी रेडिओ व टेलि-व्हिजनचे स्टुडिओ दिसले (सी बी सी, एन् बी सी, के आर सी ए .) भारता-तील सिनेमास्टुडियोप्रमाणे मेट्रो गोल्डविन मेयर, पॅरामाउंट यांचे परिसर मुख्य रस्त्या-पासून लांब कोन्यात दिसले या मार्गावर चायनीज थिएटर ही डोळ्यात भरेल अशी वास्तू आहे कोणत्याही प्रसिद्ध चित्रपटाच्या उद्‌घाटनसमयी प्रसिद्ध नट किंवा नटी इथे आण-तात थिएटरच्या परिसरात सिमेंट ओले करून लहान चबुतरा करतात त्या ओल्या सिमेंटवर त्या नटनटीचे हाताचे किंवा पायाचे ठसे घेतात व जवळच त्यांची बोटाने केलेली सही असते काही काळाने सिमेंट वाळून ती एक महत्त्वाची नेहमीची खूण ठरते इथे क्लार्क गेबल, ग्रेटा गार्बो, बेटी डेवीस, शर्ले टेंपल, बॅरीमूर बंधु–भगिनी, डग्लस फॅयरबॅंक्स अशी कितीतरी नावे तारखासहित नमूद केलेली दिसली हॉलीवुडच्या चित्र-पटाचा इतिहास इथे पूर्णतया भरला होता. थिएटर मात्र जुजबीच होते

मार्गातील कक नाईट क्लबच्या इमारती ओलांडून पलिकडील डोंगरावर ग्रिफिथ प्लॅनिटोरियम पाहिले पुण्याला न्यू इंग्लिश स्कूलच्या आवारात असलेल्या ‘आकाशदर्शन’ गृहाची आठवण झाली–पण हे किती अजस्त्र व अवाढव्य होते आत बसून तारे, चंद्र, सूर्यग्रहण आदि स्पष्ट पाहावे व त्या मानाने आपले जग किती लहान व आपण किती अल्प याचा भास होतो हे सर्व करीत डॉ बॉलच्या घरी भोजनाला गेलो एक मजली सर्व घरे कौलारू होती बागा व सुंदर फुलांनी गच्ची भरली होती डॉ बॉलचे घर पिटु-कल्या टेकडीवर होते गाडी वर चढली व गॅरेज समोर आले खिशातील यंत्राचे बटन हाताने दाबताच लांबच्या गॅरेजचे भव्य दार आपोआप उघडले गाडी ठेवून ड्रॉईंगरूममधे बसलो भारतातून आणलेल्या कैक वस्तू दिसल्या दारापलीकडे ऑलीव्हचे झाड होते जेवणापूर्वी त्यांनी झाडांना पाणी घातले, बाग दाखविली

तिसरे दिवशी बिल्ह्शायर बुलवार्ड येथे प्रख्यात बीवरली हॉटेलवरून लॉस एंजल्स फ्रीवेने गावाबाहेर निघालो सगळीकडे कारखानदारी पसरली होती कैझर स्टील, क्राय-स्लर मोटर्स, हाईन्स फूड, रॉयल टायर्स आदि करीत साटा फी स्प्रिंग जवळून एका बड्या

पार्किंग सीमेत गाडी थांबली इथे अदमासे हजार तरी गाड्या उभ्या असतील तिकीट काढले व भव्य दाराजवळ आलो तेव्हा अगदी दारावरून खेळांची आगगाडी झुकझुक करीत चालली होती व समोर पन्नास जपानी मुली सुदर पोषाख करून हळूहळू नृत्य करीत होत्या डिस्ने लँड या यक्षनगरीत आमचे स्वागत झाले

अठराव्या शतकातील अमेरिकन शहरातील दुकाने व घरे दुतर्फा दिसली मोठ्या घोड्यानी एक ट्राम आवाज करीत ओढली जात होती दुकानातली सजावट जुनी १७ व्या, १८ व्या शतकातील होती रस्ता क्रॉस केला एक फलक दिसला त्यावर ' अॅडव्हेंचर-लँड ' कोरले होते तिकीट काढून आत गेलो लहान बोटी उभ्या होत्या एक अमेरिकन नावाडी ती बोट खोल ओढ्यातून वल्हवत होता दुतर्फा घनदाट झाडी होती उंच पामची झाडे दिसली लाब किनाऱ्यावर एक हत्ती सोंड उंच करून किंचाळू लागला एका खडका-वर चित्ता पहुडला होता तो शेपूट आपटून तोंड उघडून ओरडू लागला पलीकडे सिंहाचे जोडपे खुल्या जागी डरकाळ्या फोडीत होते नतर एक धबधबाच लागला अंगावर पाण्याचे तुषार आले ते साभाळीत असता बोटीलगतच एक जबरदस्त पाणघोडा आँ पसरून उभा राहिला नावाड्याने पिस्तुलाचा बार केला व पाणघोडा पाण्यातच बुडाला बोट आता डोंगराळ प्रदेशाकडे वळली अंधुक प्रकाशात रेड इडियन लोकाची घरे दिसली एका घोड्यावर रेड इडियन नायक हातवारे करून आम्हास दूर जाण्याचा सकेत करीत होता रेड इडियन समाजाचा नाच त्याच्या जरा पुढे सुरू होता. डफ–नगारे वाजू लागले हातात भाले, तलवारी, खजीर घेऊन लगोट्या लावलेले, पाखरांच्या पिसाने भरलेले हे लोक हूं हूं करीत नाचत होते एक भाला अगदी बोटीवरून आला त्या घोडेस्वाराने फेकला होता अगदी थोडक्यात बचावलो नावाड्याने रायफलचा नेम धरला व त्या घोडेस्वाराला ठार केले असा अनुभव ३० मिनिटात आला–त्या सर्व खऱ्या दिसणाऱ्या बाहुल्यांचे सत्यदर्शन घेत बोट धक्क्यावर लागली

पीटर पॅन, स्लीपिंग ब्युटी, सिंड्रेला, सेवन ड्वार्फ आदींची प्रतीके पाहिली वाळ-वटातील प्रवास कॅक्टसच्या जगलातून केला भुयार, रगीत धातू असणाऱ्या खाणी करीत आधुनिक युगाकडे वळलो इथे सबमरीनची यात्रा, चद्रयात्रा, येणारे युग आदिचे दर्शन करीत भोजनाला मेक्सिकन भोजनालयात बसलो. वेटरने तीन टॉवेल दिले पहिल्या डिशमध्ये त्यांनी टारटिला आणला हा पदार्थ आपण धिरडे करतो तसा होता, पण त्या धिरड्याची पुडी करून सबध कुटलेल्या हिरव्या मिरच्यांनी भरली होती हे धिरडे जवळ ठेवलेल्या बशीतील चक्क लाल मिरच्यांने भरलेल्या चटणीसगे खावे लागे मला आध्र प्रदे-शाची आठवण आली खाणारे खात व नाकाडोळ्यातून पडणारे पाणी त्या तीन टॉवेलनी पुसत मी ते तसेच ठेवले. वॉल्ट डिस्ने याच्या कल्पनाशक्तीचे प्रात्यक्षिक या हजारो एकर जमिनीत साकार झालेले पाहून आम्ही तोंडात बोटे घातली

कॅलिफोर्निया प्रांतातील प्रमुख सशोधनशाळा पेसाडिना या गावी आहे. अतरिक्ष-

संशोधन इथून होत असते व इथे दोन चार तरी नोबेल पारितोषकविजेते नेहमीच भेटतात कृत्रिम जीव निर्मिती, अंतरिक्ष उड्डाण, विश्वाची सृष्टी आदि सर्व विषयांवर कार्य होत असून माऊंट पालोमर येथील वेधशाळा व केप केनेडी (फ्लोरिडा) येथील अवकाश-संशोधन शाळा यांचे संचालन इथूनच होत आहे येथील वैज्ञानिकांना भेटणे म्हणजे एक पर्वणीच होय दुपारी लंच घेताना, येथील टाय लावल्याशिवाय आत प्रवेश नाही त्यांच्याशी विचारविनिमय करून माऊंट पालोमरला जाण्याचे ठरविले तो दिवस पेसाडिनाला एक विशिष्ट यात्रेचा होता सबंध अमेरिकेतून यात्री इथे येतात रस्त्या-रस्त्यांतून स्टँड केलेले असतात प्रेक्षक बसले की बँडची पथके येऊ लागतात त्यांच्या मागे शोभिवंत ट्रक दिसले प्रत्येक उघड्या ट्रकवर नुसत्या गुलाबाच्या फुलांची सजावट होती फुलांचा माणूस, फुलांच्या बागा, ट्रकड्रायव्हरसुद्धा दिसत नव्हता. नयनरम्य रंगीत गुलाबाची फुले व त्यांची पाने त्या उन्हातसुद्धा टवटवीत होती कैक महिने तयारी करून सगळ्या झाडांनिशी ट्रक सजवितात प्रत्येक ट्रकवरील सजावट वेगळीच असते असे दृश्य अमेरिकेत कुठेच दिसत नाही हा तीन तासांचा सोहाळा पाहून मन कसे शांत होते

सॅन्टियागो शहरापासून ५० मैल दूर माऊंट पालोमर आहे पेसाडिनापासून त्याचे अंतर १०० मैल भरेल समुद्रापासून दूर ३००० फूट उंच डोंगरावर ही वेधशाळा वसवली आहे. डोंगराचा खडक काळा मजबूत असून, धरणीकंपाची व धक्क्याची इथे भीती नाही डोंगर ३१ अक्षांशाजवळ असून इजिप्तच्या पिरॅमिडलगतच्या अक्षांशातच भरेल सॅन्टियागो शहराजवळ लाहोला विभागात एक विश्वविद्यालय आहे समुद्रानजदीकच प्रख्यात स्क्रीप्सची महासागर संशोधनसंस्था दिसते हे भव्य प्रांगण ओलांडताच पुढे शेती सुरू होते इकडे अवाकाडो नावाच्या फळाच्या बागा कैक मैल पसरलेल्या दिसतील या फळांतून पिकल्यावर २० टक्के तेल निघते गोल पेरूप्रमाणे हे फळ असते व जेवणासंगे त्याचा उपयोग होतो पुढे युक्का नावाची वनस्पती बरीच पसरलेली दिसली पनवेलला कुमारीआसव करिताना जे निवडुंगाप्रमाणे झाड लागते तशीच पण मोठी झाडे होती गुलबकावलीची सुंदर फुले दिसू लागली तोपर्यंत ला पालोमार गाव आले इथे तर पक्ष्यांचे अभयारण्यच होते

रेड इंडियन लोकांची वस्ती जवळच होती रस्त्यावर, फुलावर त्यांची मुली-मुले बसलेली दिली आसाम प्रांतातील भारतवासीयांसारखे त्यांचे नाक-डोळे होते इंग्लिश बोलत पण कपडे जुन्या चालीचे असून, बहुतेक पुरुषाच्या डोक्यावर पिसाऱ्याचा तुरा होता सरकारतर्फे त्यांना संरक्षण दिले जाते खाण्यापिण्याला मिळते यामुळे उदीम धंदा काही दिसला नाही लोक गरीब होते व आयुष्याचा काल मजेतच घालवत होते. या विभागात पाऊस अवघा १०-१२ इंच पडतो पण चोहीकडे शेती व जमीन कशी धान्य व फळांनी भरलेली होती, कोलोरॅडो नदीतून इथे पाणी आणतात व शिंपून वनराजी वाढवितात डॉ जॉर्ज डाबझान्स्की या प्रख्यात वैज्ञानिकाने इकडे एका निर्जनस्थळी घर

बांधले असून, इथून तो ' उडत्या तबकड्यांचे रहस्य ' उकलीत असतो

डोंगरावर बस चालली चोहीकडे वनराजी होती, पण मानव वस्ती कुठेच दिसेना सबंध माऊंट पालोमार डोंगरपठारावर वेधशाळेशिवाय दुसरी वस्ती नाही वेधशाळेची वास्तू येण्यापूर्वी काही तांब्याचे वेष्टन केलेली घरे दिसली इथेच वैज्ञानिक राहतात रात्रीला त्यांचे कार्य सुरू होते व दिवसा ते झोपतात सायंकाळी ब्रेकफास्ट घेऊन ते वेधशाळेत येतात मध्यरात्री लंच घेतात व सकाळी पाचला डिनर घेऊन सहाच्या सुमारास झोपतात थंडीत घरे उष्ण ठेवतात व सूर्यप्रकाशाचा त्रास होऊ नये म्हणून अंधार असतो त्यांचे स्वतःचे पॉवर हाऊस असून दशलक्ष गॅलन पाण्याची टाकी पण केली आहे.

या वेधशाळेची रहस्यकथा कैक ग्रंथांतून लिहिली गेली आहे जगातील सर्वांत मोठी दुर्बिण-जिच्या काचेचा व्यास २०० इंच आहे– इथेच दिसेल. या काचेची निर्मिती न्यूयॉर्कमध्ये झाली व वरती आणण्याकरिता स्पेशल गाडी करावी लागली, बोगदे मोठे केले इथे ही दुर्बिण २०० फूट व्यासाच्या डोममधून डोकावते त्या डोमवर ३० फूट रुंद खिडकी असून ती यंत्राने उघडतात व दुर्बिण चोहीकडे निरखू लागते डोम ज्या धातूचा केला त्याचे वजनच २० लक्ष पौंड आहे सायंकाळी वैज्ञानिक दुर्बिणीच्या खाली ( पण दुर्बिणीचाच एक भाग ) खुर्चीत बसतात यंत्राने दुर्बिण वाटेल तिकडे फिरवतात व व्यवस्थित जमल्यावर विश्वातील तारकापुंजाचे फोटो काढतात सगळे विश्व चित्रित करण्याला त्यांना १०,००० वर्षे लागतील या वेधशाळेत जवळची सूर्यमालिका वगळून विश्वाच्या अंताचा पडताळा चाललेला असतो सहस्त्र दशलक्ष प्रकाशवर्षे चालून येणाऱ्या प्रकाशाचे जन्मस्थान ते शोधीत आहेत पृथ्वीवर जो ' ब्रह्मनाद ' ( रेडियो-लहरी ) येतो त्याचे आकलन करीत आहेत सन १९८६ साली ' हाली ' नावाचा धूमकेतू येणार, तारकापुंजावरील प्रकाशातून तेथील धातूंची ओळख, ओरायनचे चित्रीकरण आदि घटना त्यांनी करून दाखविल्या मानव चंद्रावर गेला लवकरच वायकिंग अंतरिक्षयानातर्फे ३७० कोटी मैल दूर जाणार आहे आकाशात उघड्या रात्री ४५०० तारकपुंज दिसतात यातील आकाशगंगेतच वीस लक्षाच्या वर तारका असतील अशा आकाशगंगसारखे कैक तारकापुंज दीड ते दोन दशलक्ष प्रकाशवर्षांच्या विस्तारात विखुरले आहेत आपल्या जीवनदात्या सूर्याचा जन्म तर आता आता म्हणजे अदमासे ४००० कोटी वर्षांपूर्वी झाला असेल सूर्यामुळे या धरेवर जीवसृष्टी निर्माण झाली, पण डॉ मिलर म्हणतात की या पृथ्वीवर जीवसृष्टी येण्यापूर्वी १ लाख ग्रहांवर काही विशिष्ट रूपात जीव होते, ते तर मानवापेक्षा जास्त उत्क्रांत असावेत आमच्या चक्षूंने ते दिसत नसावे अंतरिक्षाचा शोध करताना ज्ञात विश्वाच्या प्रवासाला प्रकाशवेगाने जाताना कैक प्रकाश वर्षे लागतील प्रोफेसर लॉरेन्स आइन्स्टाईन या सर्व विचारांना कल्पित करून सांगतात की इतर ग्रहांवरील जीव इथे आले, नवीन संस्कृती स्थापन करून गेले व परत ४० वर्षांनी जर परतले तर तोपर्यंत या धरेवर ५०० पेक्षा जास्त

वर्षे होतील विश्वाच्या अंताला यानातून मानव गेला व परतला तर त्याला अवघी ६० ते १०० वर्षे लागतील पण पृथ्वीवर तोपर्यंत १०,००० वर्षे लोटली असतील हे सगळे पाहताना, वाचताना माझ्या मनात विचार आला, 'सुमेर संस्कृती या अशाच इतर तारकापुंज–जीवाने केली असावी किंवा कुंतीच्या कर्णाचा पिता असाच बाहेरचा कोणी अज्ञात दैवी पुरुष असावा' ते सगळे पाहताना मला भगवद्गीतेच्या श्लोकाची आठवण आली–'सहस्त्रयुगपर्यंत, मुहुर्यद्ब्रह्मणो विदुः।' नेति नेति वेदानी लिहिले आहे, त्याची आठवण झाली विश्वाकडे पाहावे व आपण मानव किती लहान, किती तोकडे आहोत याची आठवण व्हावी–तसेच मला माऊंट पालोमारला झाले

# १

गेल्या महायुद्धापूर्वीची गोष्ट लॉईड ट्रिस्ट्रिनो या कंपनीच्या तीन बोटी मुंबई ते जिनोवा जात असत लंडनपर्यंतचे भाडे अवघे २१ पौंड पडे. बरेच भारतीय विद्यार्थी या भावाचा लाभ घेत भारतीय विद्यार्थी येणार म्हणून मुंबईतून या बोटीवर पापड, भजी, चटण्या व लोणची घेत असत ब्रिटिश बोटींशी टक्कर देताना या इटालियन कंपन्या भरमसाट जाहिराती करून उतारू जमविण्याचा प्रयत्न करीत

असेच एकदा कॉंटीरासो या बोटीने १९३८ साली काही भारतीय इंग्लंडला जावयास निघाले कित्येकांना पहिले दोन तीन दिवस बोट लागली काहींनी गुजराती फरसाण आणले होते, पण बिचारे बोट लागली म्हणून खट्टू होऊन केबिनमध्ये झोपत होते

बडोद्याचे डॉ दाते तीन दिवस असे अन्नाशिवाय राहिले अगदी गळून गेले होते. सायंकाळी जेवताना प्रत्येकाला विशिष्ट टेबल मिळे तिथे त्यानी व त्याच्या इतर सोबत्यानी शेवटच्या दिवसापर्यंत बसावयाचे होते बडोद्याचे दुसरे गृहस्थ श्री भेंडे हे मुंबईच्या श्री मोटे, मी व मिस सीता याच्यासोबत जेवत पापड, लोणची आली की ते भात मागवायचे व नतर त्यांना आठवण येत असे दह्याची ते नेहमी म्हणत की, या इटालियन बोटींनी सोबत म्हशी ठेवाव्यात व म्हशीच्या दुधाचे छान दही द्यावे. त्याना घरच्या म्हशीची रोज आठवण येई (आम्ही) सर्व आपला भात त्याना देत असू

डॉ दाते यांना भेंडे रोज जेवावयाची आठवण करीत पण ते फार अशक्त झाले होते त्यांनी बोटीवरील इटालियन केबिन बॉयला डॉ दाते याच्याकरिता थोडा भात

---

## भारतीय तरुण व गांधी टोपी

---

आणावयास सांगितला. त्यानी पर्सरला रिपोर्ट दिला पर्सर म्हणे की, बोटीच्या डॉक्टरची चिठ्ठी आणा की मग केबिनमध्ये भात पाठवू बोटीचा डॉक्टर फार फार महागडा तो बरेच पैसे फी म्हणून मागू लागला याप्रमाणे चार दिवस गेले.

शेवटी काही भारतीय तरुणानी एकत्रित येऊन बोटीच्या कॅप्टनला पत्र धाडले 'आपण आम्हा भारतीय विद्यार्थ्यांना जाहिरातबाजी करून बोटीवर बोलविता व आता स्वत: आमच्यापैकी एक डॉक्टर असून व त्यांना अशक्तपणाशिवाय काही नसून आपल्या डॉक्टरची भारी फी द्यायला पैसे आम्ही कुठून आणावे ? हा आमचा अपमान— ही आमची दिशाभूल ! आम्ही आता भारतीय व इटालियन पत्रात लिहून आपले हे खरे रूप प्रकट करू तुमच्या पर्सरचे वागणे उघड उघड भारतविरोधी आहे आम्ही याचा गवगवा करू '

पत्र पाठवून सर्व केबिनमध्ये बसलो पुढील विचार करण्यात दोन तास गेले केबिनचे दार लागले होते त्यावर आवाज आला व घंटा पण वाजली दार उघडले. बाहेर केबिनबॉय, पर्सर, डॉक्टर व बोटीचा दुय्यम अधिकारी उभे होते पर्सर म्हणाला, 'सॉरी, आपला गैरसमज झाला मी माफी मागतो जे जे अन्न मागाल ते केबिनमध्ये येईल' दुय्यम अधिकारी म्हणाला, 'भारतीय युवकाबद्दल आम्हाला नितांत आदर आहे आम्ही भारतीयांचे खरे स्नेही चूक झाली, माफी असावी डॉक्टर फुकट तपासेल. अन्न केबिनमध्ये येईल. पुढील रविवारी वरील हॉल सर्व भारतीयांकरिता खुला करीत आहोत आपण काही भारतीय कार्यक्रम करावे'

## २

उत्तर प्रदेशातून जोनपूर जिल्ह्यातील एका खेड्यातून केशवदत्त मिश्रा लंडनला जात होते त्यानी आयुष्यात कधी सूट घातला नव्हता नुकताच अलाहाबाद इथे शिवलेला काळा सूट ते घालीन व वरून पांढरी गांधी टोपी चढवीत. त्याच्या मागासलेल्या गावी किंवा जिल्ह्यात युरोपियन लोक तुरळकच शिवाय त्यांच्याशी बोलण्याचा त्याना कधीच चान्स मिळाला नाही पांढऱ्या कातडीच्या माणसाशी बोलताना त्यांना एक प्रकारची धन्यता वाटत असे

त्याच बोटीने फ्रांटियर रायफल्स रेजिमेन्टचे लेफ्टनट स्मिथ पण एडिनबराला जात होते ते नेहमी सिगारेट ओढीत व कादंबरी वाचीत त्यांचे जेवायचे टेबल श्री वर्टी याच्या जवळच असे व त्या टेबलावर एक जर्मन, एक इटालियन तरुणी व एक स्विस युवक बसत असे

बगवासी कॉलेजचे प्रो सेन हॅंबुर्गला जात होते ते नेहमी खादीचे धोतर व खादीचा

झब्बा घालीत व आपल्या इंग्लिश कविता आम्हा सर्वांना वाचून दाखवीत त्यांचा विश्वास होता की, त्याना लवकरच नोबेल पुरस्कार मिळेल ते एक गाढे विद्वान व देश-भक्त गृहस्थ होते

मुबईहून मिस्टर अब्बास लंडनला स्कूल ऑफ एकानामिक्समध्ये शिकवायला जात होते त्याची खादीची पँट, शर्ट व त्याच्या पीळदार मिशा नेहमी सर्वांच्या डोळ्यात भरत काँग्रेस आणि खिलाफत चळवळीत त्यांनी भाग घेतला होता ते, प्रो सेन, श्री मिश्रा व मिस शिरीन एका टेबलावर बसत

मिश्राजी एके दिवशी स्मिथशी बोलण्याच्या प्रयत्नात होते लागूलचालन चालले होते इतक्यात मिश्राजीची टोपी खाली पडली त्या शुभ्र टोपीवर धूळ आली मिश्रानी ती धूळ झाडून हसत टोपी डोक्यावर घालण्याचा प्रयत्न केला स्मिथने वळून पाहिले 'ती मातीत पडली होती, आता त्या चिंधीचा उपयोग जोडे पुसण्याकरिता करू.' श्री मिश्रा हे–हे–हे करीत हसले व एक युरोपियन आपणाशी बोलला याची धन्यता मानून टोपी डोक्यावर घातली केबिनकडे गेले ते नक्की खजिल झाले होते व त्यांनी ही घटना मि अब्बासच्या कानावर घातली

दुसऱ्या दिवशी अब्बास (आमच्या) केबिनवर आले म्हणाले, 'आम्ही आज तुमच्या टेबलाजवळ बसू काही गडबड झाल्यास आपण आमच्या पाठीशी रहा' आम्ही सर्दच झालो स्मिथचे टेबल आमच्या टेबलालगतच होते वेटर अन्न आणीत होते. एव-ढ्यात अब्बास एक खुर्ची घेऊन माझ्या मागे बसला त्याचे तोंड स्मिथच्या टेबलाकडे होते अन्न सपूर्ण वाढणार एवढ्यात जोराने आवाज आला 'तुम्ही माझ्या राष्ट्रीयतेच्या प्रतिकाचा अपमान केला आता ते शब्द पुन्हा काढा, जीभ छाटून ठेवतो' मागे वळून पाहिले तर गांधी टोपी परिधान केलेला अब्बास स्मिथची कॉलर धरून ओरडत होता त्या जर्मन व इटालियन महिला खिदी खिदी हसत होत्या तेवढ्यात त्या डिनर रूमच्या दारातून पाढरे धोतर परिधान केलेले प्रो सेन इकडे धावत आले त्याच्या एका हातात सुरा होता ओरडत होते, "भारत माता की जय' त्यानी सुरा स्मिथच्या तोंडाजवळ आणला जेवणारे आश्चर्याने पहात होते कॉलर धरलेला अब्बास स्मिथना घेऊन बाहेर जात होता प्रो सेन सुरा घेऊन मागे होतेच दाराजवळ येताच रुमालाने घाम पुसत स्मिथ म्हणाले, 'मला मि. गांधीबद्दल नितात आदर आहे जोपर्यंत त्याची निष्ठावत देशभक्ती आहे तोपर्यंत मला ते पूजनीय आहेतच.'

जेवणाची धूळधाण झाली. लोक आपआपल्या केबिनकडे जाऊ लागले स्मिथ आणि अब्बास मिश्राच्या केबिनमध्ये आले. स्मिथने राष्ट्रीय टोपीला चिंधी म्हटल्याबद्दल माफी मागितली

मनुष्याची सवय सारखी बदलत नाही आयुष्यात दुसऱ्यांदाच पांढरी कातडीवाला त्यांच्याशी बोलला व माफी मागत होता. मिश्रा म्हणाले, 'हे हे, माफी कशाची ?'

अब्बासचा राग अनावर झाला त्यांनी मिश्राच्या मुस्काटात ठेवून म्हटले, ' जिचा आदर ठेवता येत नाही, ती वस्तू परिधान तरी कशाला करिता– धिक् तुमच्या दिखाऊ देश-भक्तीची ! '

बोट समुद्र पार करीत सुएझजवळ आली धीरे धीरे तो कालवा पार करीत पोर्ट सैदला रात्री ११ वाजता पोचली बोटीवर कित्येक ब्रिटिश व इजिप्शियन पुलिस शिरले त्यानी सगळी बोट तपासायला सुरवात केली तीन तास तपासणी झाली म्हणाले की चार भारतीय क्रांतिकारक या बोटीवर आहेत कोणी दिसले नाही पोर्टसैदला ४ तास थांबून बोट पुढे निघाली दोन दिवस चालली रोजच्या जेवणाच्या खोलीत एक टेबल भरलेले नसे अगदी ब्रिंडिस येईपर्यंत त्यातील दोन गृहस्थ नव्हते

श्री मिश्रा अस्वस्थ होते डेकवर फिरावयाचे, लांब पहावयाचे व अश्रू गाळायचे त्यांच्या खांद्यावर हात दिल्यावर ते म्हणाले, ' श्री सेन आणि अब्बास खरे देशभक्त होते मी त्याचा महिमा जाणला नाही–त्यांचा पत्ता नाही– गांधी टोपी पोरकी झाली '

## ३

काँटीरासो बोट इटालियन किनाऱ्याजवळ येऊ लागली लांब जमीन दिसत होती एक बेट आले बेटाच्या किनाऱ्यावर इटालीच्या राजकीय सत्तेचे भव्य प्रतीक लांबून दिसत होते जशी बोट किनाऱ्यालगत आली तशी बंदराच्या भिंतीवर सिनार मुसोलिनीच्या " डुचे " शब्दांकित रंगीत प्रतिमा दिसल्या बोटीवरून खाली आलो शहरात आम्ही चौघे फिरत होतो. श्री मोटे, शिरीन, सीता व आम्ही दगडी रस्त्यावरून चाललो होतो शिरीन रेशमी साडी नेसली होती व सीताने वेणीचा लांब गोंडा सोडला होता दोघींच्या कपाळाला कुंकू होते भटकताना दुकानातील दोन गुलाबाची फुले घेऊन देठ तोडून सीताने ती वेणीत घातली होती

शहर लहानच मुख्य वाहन घोडागाडी रस्त्याच्या कडेने जाऊ लागलो मुलींचा घोळका दिसला लांब स्कर्ट घातलेल्या मुली व बॉबकट करून त्यावर पीळ येण्याकरिता पिना लावलेल्या काही वयस्क बायका आमच्या मागून झपाझप येत होत्या एकीने ' इंडियाना ' म्हणून सीतेच्या वेणीला हळूच हात लावला बायकांचे केस लांब गुडघ्यापर्यंत असू शकतात हे यांना माहीत नसावे लांब केसाला प्रत्येक बाई हळुवारपणे हात लावी तिला वाटे की हे कृत्रिम तर नाहीत ? एकीने वेणी आपल्या गालावरून हळूच फिरविली मऊ लागल्यावर ती ओरडली, ' नाचा ' नैसर्गिक दिसतात सगळा घोळका सीतेजवळ येऊन वेणी, भांग, कुंकू याचे कौतुक करू लागला एकीचे लक्ष शिरीनच्या साडीकडे गेले ती रेशमी रंगीत साडी आता हाताळू लागले. असा घोळका घेऊन चालणे अशक्य झाले,

घोडागाडी केली. टप टप गाडी चालली मागे मुली ओरडतच होत्या तेवढ्यात एका शाळेसमोरून गाडी आली मुलांनी ओरडणे ऐकले सगळी शाळा 'इंडियाना' म्हणत बाहेर पडली गाडीभोवती आता झुबड मुले काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करीत वेणी, साडी, कुंकू . भारतीय स्त्रिया बहुतेक इकडे आल्या नसतील एका मुलाने दोन फुले फेकली आम्ही गाडी एका फळवाल्याच्या दुकानाजवळ थांबविली काळी टपोरी द्राक्षे दोन आणे रत्तल होती आम्ही दोन रत्तल घेतली व मुलांना वाटून स्वतः खात गर्दी सांभाळत धक्क्यावर आलो

बोट सुटली दुसऱ्या दिवशी व्हेनिस जवळ येऊ लागले हे शहर कालव्यांचे इमारती पाण्यातच रस्ते म्हणज कालवे बंदर आल्यावर बोट सोडावी लागली सामान उचलणारे व कस्टमचे अधिकारी भारतीय सिगारेट ' मागत होते भारतातील विड्या इकडे चांगल्या आवडत होत्या असे दिसले गावात भटकायला गेलो इटली देशाचा पहिलाच भाग आमच्या दृष्टोत्पत्तीस येत होता एक मोठ्या कॅथीड्रलकडे गेलो बाजूला फळे आणि भाजी, वांगी, भेंडी, शिराळी, भोपळा, ढबू मिर्च्या, मेथी ओळीने ठेवली होती. फळात पीच, ॲपल व द्राक्षे मुबलक होती. कॅथीड्रलच्या पायऱ्याच्या दुतर्फा भिक्षा मागणारे निरोगी व रोगी भिकारी रांगेत उभे होते मार्गस्थ लोक कॅथीड्रलकडे पाहून गुडघे टेकीत व डोके छाती-कान यांना हात लावून क्रॉसचे चिन्ह करीत

सायंकाळी फ्लॉरेन्स एक्सप्रेस पकडली आता सीता व आम्ही या ट्रेनने पॅरिसला जात होतो स्टेशनवर गर्दी नव्हती पोर्टर उतारूंना स्वच्छ उशा देत होता द्राक्षासव लांब वेतांनी वेष्टिलेल्या बाटलीत अवघ्या चार आण्यात मिळत असे बाटली डब्यात ठेवून सवडीप्रमाणे पिता येई थर्डक्लासचा कॉरिडॉर कोच डबा होता पण स्वच्छ ! फ्लोरेन्स रात्री आले व दुसऱ्या दिवशी पॅरिस गाडी ' गारदी नार्द ' ला थांबली येथील पोलीस व कुली इंग्लिश समजूनसुध्दा फ्रेंच भाषेतच उत्तर देत होते शहरात भटकलो रस्त्याच्या दुतर्फा मोठे फुटपाथ प्रत्येक फुटपाथवर मोठ्या छत्र्या, खाली चार खुर्च्या आणि एक टेबल ठेवले होते ग्राहक काचेच्या भांड्यातील कॉफी व लांबच लांब ब्रेड खात होते या ब्रेडची लांबी अदमासे चार फूट तरी असावी व ती मनगटाएवढी रुंद होती व अगदी खरमरीत लागावयाची कित्येक महिलांच्या शेजारी लहान ' पुडल ' प्रकारचा कुत्रा दिसे त्याचे केस कापून विशिष्ट आकार आणला होता

दुपारी फोक्स्टनची बोट पकडली या बोटीवर मुंबईच्या लोकलप्रमाणे वाहतूक असे खाडीत वादळ होते बोटीवर आलेल्या उतारूंनी आपल्या मोटारीपण आणल्या होत्या इंग्लंडच्या किनाऱ्याचे दर्शन लांबून पांढरा दगड आणि मातीच्या संचयातून झाले कस्टम्समध्ये एक नखरेल रंगभूषा केलेली बाई थांबविलेली दिसली. तिच्या विशेष उंचीच्या बुटाच्या टाचात हिरे आदि दडले होते असे कळले इंग्लिश भाषा कळल्यामुळे जरा बरे वाटले कारण गेले तीन दिवस इटालियन व फ्रेंच भाषाच माहीत होता.

९६८
आ. क्र. २५१५५

इटालीची शेते दिसली शेताच्या पारावर शितूताची झाड होती द्राक्षाचे किती तरी मळे होते. हिरवेगार तर होतेच व रोपेही बरीच होती फ्रान्समध्ये गव्हाचा मोसम होता इग्लडमध्ये चहूकडे हिरवळ. प्रत्येक हिरवळीभोवती लाकडी कुंपण त्या कुंपणात गुरे, कुठे मेढरे व काही स्थळी घोडे चरताना दिसले स्वच्छता, हिरवळ, शातता आणि थंडी यांनीच इग्लिश देशाचे वातावरण व्यापलेले दिसले कोण्या एका शेतात शेतकरी नागराना घोडे जुपून नांगरत होता, तर कुठे त्या मोठ्या घोड्यांच्या टापाच्या आवाजात बिअर पीत कोळसेविक्या रस्त्याने भटकत होता इटालीची घरे कौलारू- इथे इग्लडला गवताची शाकारणी केलेली दुमजली घरे इटालियन लोकाचा रग पांढुरकस गोरा तर इग्लिश लोकाचा गर्द गुलाबी पाढरा रग होता. स्त्रियाच्या केशभूषा इतक्या विचित्र की त्यात साम्यता कुठेच नाही पुरुष बोडके तर स्त्रियाच्या डोक्यावर वाटेल तशा टोप्या एकीने तर नुसती वळकटी बाधावयाची दोरीच डोक्याला फेट्यासारखी गुडाळली होती फराळ व भोजन सगळे करीत पण तोंड धुताना कुणी दिसले नाही. जेवणानतर चहाकॉफी व वर सिगारेट कित्येकांचे दात कसे हिरवट होते व पुरुषाची बोटे सिगारेटमुळे धुरकटलेली इग्लडमध्ये आल्यापासून पाईप सेवन करणाऱ्यांची सख्या वाढलेली दिसली इटालियन माणसे बोलावयाला तयार असत. पण इग्लिश वर्तमानपत्र घेऊन डोके खुपसून बसत

ट्रेनने लडन शहर गाठले केवढे मोठे शहर ! अगदी भांबावल्यासारखे होत असे टयूब ट्रेनमध्ये चढण्याकरिता आपोआप वर खाली जाणाऱ्या शिड्या स्टेशनवर होत्या ह्या गाड्या अगदीच थोडा वेळ थांबतात. गाडी सुरू होण्यापूर्वी दारे आपोआप बद होतात. भर्रकन उतरले तर ठीक, नाहीतर दुसरे स्टेशन आलेच समजा

रात्री स्वच्छ चादरीचा बिस्तरा मिळाला व एक बेडपॉट सकाळी क्षितिज दिसणे कठीण चोहोकडे धुराडे असलेली घरे इथे लोक सोज्वळ दिसतील नवीनच आलेल्या भारतीयाला लडनचे कॉकनी इग्लिश समजणे कठीण. पेपरला पायपर म्हणायचे नवीन उतारूचा वाली पोलीस पूर्ण सहा फूट उच, काळी वर्दी घातलेला शिपाई सर्व समजून घेई व मार्गदर्शन करी चुकल्यास घरापर्यंत येई. लोक पण ' टर्न टू राईट, टर्न लेफ्ट, गो स्ट्रेट ' असे समजावून देत बोलातून जाताना एक अनुभव आला आठ वर्षाचा एक मुलगा जवळ आला म्हणाला, ' मिस्टर टाईम काय ?' हे वाक्य त्यांनी अगदी एका घड्याळ मनोऱ्याजवळ विचारले मी त्याला मनोऱ्याच्या घड्याळाकडे बोट दाखवून उत्तर दिले. तो धावत जवळच्याच घरात गेला आतून आवाज आला ' ही स्पीक्स इग्लिश–' ( याला इग्रजी बोलता येते )

दुसऱ्या दिवशी लक्झरी बस घेतली. लडन ते एडिंबर्ग प्रवास बारा तासात करावयाचा होता रात्री सकाळ बसमध्ये बसलो. खुर्च्या मऊ तर होत्याच पण एअर-कडिशन्ड बस होती तिथे बाथरूमची सोय होती व मद सगीताचे सूर येत होते. ड्रायव्हर

होता पण कंडक्टर नव्हता ड्रायव्हरच तिकिट देत असे, उतारू बसवीत असे मधून-मधून लाऊडस्पीकरवर गावाची नावे सांगत असे ब्लँकेट अंगावर घेऊन आरामखुर्चीप्रमाणे आम्ही पहुडलो साडेअकराला बस थांबली सपर घेणाऱ्याची सोय त्या गावी होती. पाय मोकळे करून आलो पुढे सकाळी साडेसहाला बस थांबली इथे प्रार्तविधी व न्याहरी करून एडिंबर्गला पोचलो वाय एम् सी ए. चे एक गृहस्थ घ्यावयास आले होते होस्टेलमध्ये लहानशी खोली दिली न्याहरीला सांजेसेच होते इतर ख्रिश्चन विद्यार्थी थट्टा करून बोलू लागले. मला म्हणाले की, ' हे इकडे खारे गुलाबजाम आहेत लवकर आटोपा '

घर शोधायला निघालो. बऱ्याच घरावर पाट्या होत्या ' खोली भाड्याने देणे आहे ' घंटा वाजविली की कुणीतरी खिडकीतून डोकावून बाहेर पाही दार उघडून म्हणे ' सॉरी, वी आर फुल ' ( माफ करा, जागा भरल्या ) असे हेलपाटे दुपारी दोन-पर्यंत चालले होते शेवटी एका बाईला गळ घातली, नक्की काहीतरी सांगा तिने सांगितले की तुमचा रंग काळा आहे असे रंगीत लोक त्या लांबच्या बाईच घेतात त्यांचेकडे जावे नशीबाने ते खरे ठरले त्या दुसऱ्या बाईकडे एक सिलोनी जोडपे होते व मला पण तिने जागा दिली

एडिनबर्गच्या मध्यावर एक प्रख्यात राजमार्ग आहे या राजरस्त्याच्या एकीकडे वाडे, हॉटेले व दुकाने अशा इमारती आहेत दुसरीकडे किल्ला, लांबच लांब बागायती, सुंदर फुलांचे ताटवे, खेळण्याची पटांगणे, कलेचे म्युझियम व आंतरराष्ट्रीय उत्सवाकरिता असलेली पटांगणे आहेत जागतिक संगीत उत्सव, जागतिक क्रीडा उत्सव इथेच होतात सायंकाळी बाजूच्या पटांगणाच्या कडेने व फूटपाथवरून पांथस्थ भटकत असतात कित्येक तरुण-तरुणींचे थवेच्या थवे इथून जाताना व प्रणयलीला करीत असताना मधून मधून आढळतील

एका बागेच्या जवळच पहिल्या महायुद्धानंतर केनेडियन स्कॉच लोकांनी धारातीर्थी पडलेल्या शूरवीरांची स्मृतिशीला रोवली आहे एक सजलेली भिंत, तिच्यासमोर ऐन तारुण्यात बहरलेला शिपायी, लांब भविष्याकडे टक लावून पहाताना कोरलेला आहे ' यांनी आपल्या वर्तमानकाळाची रांगोळी केली ज्यामुळे तुमचे भविष्य सुरक्षित राहो '

एके दिवशी या भागात भटकत असताना एक भारतीय गृहस्थ दिसला कपडे उत्तम परिधान केले होते व सोबत एक तरुण स्कॉच ललना होती. हातात हात होते व हसत थट्टा करीत चालले होते भारतीय असेलच या भावनेने मी जरा मंद स्मित केले त्याने हसणे बंद करून ' इंडियन ?' असा प्रश्न केला मी हो म्हणताच त्या बाईची पत्नी म्हणून ओळख करून दिली स्वतःला डॉ. लाल म्हणून संबोधिले व इतर विचारपूस करून घरचा पत्ता दिला आणि ' फोन करून अवश्य भेटा–' असा निरोप देत मंडळी पुढे गेली

दुसऱ्या दिवशी जरा प्रकृती ठीक नव्हती. तसे तर एडिनबर्गला आल्यापासून

गळाल्यासारखेच वाटावयाचे एक विचार आला की, डॉ लालचे कार्ड बघू व त्यांना भेटू. पण पहिल्या भेटीतच बहुतेक इग्लिश लोक घरी बोलावत नाहीत याची आठवण झाली· विश्वविद्यालयाचे मेडिकल स्कूल होते, तिथे रजिस्टरचे पत्र घेऊन थडकलो एक प्रख्यात फिजिशियनच्या खोलीजवळ मला बसण्याची सधी आली हॉल चांगला २० × २० फूटाचा असेल सोफासेट नसून लाकडाच्या खुर्च्या होत्या समोरच्या टेबलावर काही मासिके पडली होती ह्या खोलीत माझ्याशिवाय दहा-बारा पेशट बसले होते, पण प्रत्येकाने आपले वर्तमानपत्र किंवा आपले वाचनाचे पुस्तक आणले होते अगदी शुकशुकाट होता प्रत्येकजण वाचण्यात गर्क कुणाला कुणाकडे पहाण्याचीही फुरसद दिसली नाही मी एका रिकाम्या स्टुलावर बसलो चहूकडे न्याहाळले पुरुषाचे कपडे यथा-तथा होते, पण प्रत्येकाचे डोके टोपीविरहित बायका मात्र टोप्या घालून होत्या पण त्या टोप्या कसल्या—काही फेल्टचे, काही फेटयासारख, काही तर नुसत्या दोऱ्याचेच स्कर्ट अगदी गुडघ्याखाली व मी आल्यावर काहींनी तो आणखी खाली घसरविला जोडे पण सगळेच विविध रगांचे काही तरुण मुली हँडबॅग उघडून आरसा न्याहाळून नाक आणि गालावरील पावडर व्यवस्थित करीत व लिपस्टिक लावून ती चाटीत

पाळीपाळीने आत गेलो प्रत्येकाजवळ नबर होतेच डॉक्टरांनी आत गेल्यावर विचारले, ‘कुठून आलात’, ‘काय करता ?’, ‘काय खाता’, ‘नेहमीचा आहार काय ?’ छाती तपासली, नखे तपासली तोड, नाक, कान, डोळे पाहिले सर्व झाल्यावर समोर बसवून म्हणाले, ‘तरुण माणसा, तुम्हाला काही झाले नाही, जरा नॉनव्हेजिटेरियन खात जा व व्यायाम करीत जा, सर्दी पडसे झाले तर थोडी ब्रँडी घेत जा हेच तुमचे औषध’

घरी—म्हणजे ‘डिग’ वर आलो बाईने सांगितले की एक कश्मिरी डॉक्टर विचारणा करून गेला व दुसऱ्या दिवशी येणार आहे प्रिन्सेस स्ट्रीटवर भेटलेले हे गृहस्थ दुसऱ्या दिवशी भेटले म्हणाले, ‘तुमच्याबद्दल फार काळजी वाटते फार रोड, अशक्त दिसता आमच्या घरी येत चला व्यवस्थित अन्न देऊ व प्रकृती सुधारेल’ परदेशात असा स्वदेशी व घरगुती विचार माडणारा मिळाला मी भाळलो व त्याच्या घरी गेलो दारातच स्कॉच ललना उभी होती म्हणाली की, डॉक्टर कामावर आहेत आत्ता येतील. त्याप्रमाणे वाट पहात बसलो ड्रॉइगहॉल लहानच होता दारातून पलीकडच्या खोलीतले दिसत असे बाई आत गेली आत जरा जोराचीच कुजबूज चालली होती आदळ-आपट सुरू झाली मी डोकावून पाहिले तर आमचे डॉक्टर महोदय लाटणे घेऊन पोळ्या करीत होते व ती ललना त्याच्या ओटयावर विसळलेले भाडे आपटीत होती ही गम्मत १० मिनिटे चालली डॉक्टर कपडे बदलून बाहेर आले म्हणाले, ‘माफ करा आत एक पेशट तपाशित होतो’ आत जेवण वाढले गव्हाचे पजाबी परोटे व मसुराच्या डाळीचे घट्ट वरण ही मुख्य डिश होती एक तळलेला पापड व काही कांदे व थोडी बटाटयाची भाजी जेवण आटोपले. बाहेर

आलो डॉक्टर म्हणाले, 'त्याचे अवघे तीन शिलिंग झाले' मला जरा आश्चर्य वाटले पैसे देऊन घरी आलो

लँडलेडी भेटली विचारपूस झाली तिने सांगितले, 'डॉक्टर पंजाबात एम बी बी एस झाले व इथे एफ आर सी एस करिता आले तीन वर्षे फेल झाले व त्या दरम्यान मोलकरणीच्या प्रेमात पडून बसले आहेत घरी सुंदर पत्नी आहे, तिचा त्याग केला व इथे असेच हिंदी विद्यार्थ्यांना हिंदी जेवण देऊन उदरनिर्वाह करतात' असे वीस-पचवीस तरी डॉक्टर एडिनबर्गला होते

पोचून चार दिवस झाले डॉक्टर वेस्ट यांनी कॉलेजच्या प्रोफेसरातर्फे निरोप पाठविला की, मी त्यांना भेटावे प्रत्येक हिंदी विद्यार्थी आल्याबरोबर त्यांना भेटलाच पाहिजे असा नियम होता व ते त्याला मार्गदर्शन करीत त्यांच्या घरी गेलो भारताच्या एक दोनच गोष्टी झाल्यावर कॉलेज विषयाबद्दल मी विचारले 'ते माझे काम नाही' हा जबाब मिळाला मार्गदर्शन सुरू झाले 'रोज कॉलेजला जाताना चालत जावे,' 'व्यायाम होईल,' 'नॉनव्हेजिटेरियन अन्न एकदाच खावे हिंदी विद्यार्थ्यांच्या कोणत्याही संघटनेत जाताना त्यांना विचारून जावे भारतात पत्र पाठविताना यांच्यातर्फे पत्रे गेली की, लवकर पोचतील व आठवड्यातून एकदा तरी यांना भेटून जावे' घरी आल्यावर भारतीय विद्यार्थ्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्याकरिता ब्रिटिश सरकारने नेमलेला तो ऑफिसर होता त्याचे मुख्य काम प्रत्येकाबद्दल वर रिपोर्ट पाठविणे

कॉलेजमध्ये अध्ययन सुरू झाले एक डेमॉन्स्ट्रेटर आला नुसता बी एससी होता प्रामाणिकपणे प्रथम वर्षाचे प्रॅक्टिकल सुरू केले मी सांगितले की, पदव्युत्तर प्रॅक्टिकल्स मी घेत असे, पण त्याला ते पटेना प्रोफेसराकडे गेलो एवढा मोठा प्रोफेसर, वाटे की, भव्य खोली, मोठा रुबाब असेल, पण त्याची खोली अवघी १० × ९ फुटांची होती खुर्ची लाकडी, लहान टेबल, आवरण नाही, अवडंबर नाही स्वतः दार उघडले हस्तांदोलन करून एक खुर्ची दिली प्रकृतीची विचारणा केली पाईप पेटविला, एक दोन झुरके घेतले व सगळी विचारपूस करून न्यू कासल शहरी जावयास सांगितले पुन्हा दारापर्यंत आले

बसने न्यू कासलला पोचलो रात्री एका डिगमध्ये झोपलो दुसऱ्या दिवशी तेथील प्रोफेसरना भेटून कॉलेजात प्रवेश मिळविला दिवसभर रहाण्याची व्यवस्था बघत होतो दुपारी घर मिळाले रहाण्याचे दर आठवड्याचे दहा शिलिंग भाडे होते खोली बरी होती पलंग, बिस्तरा, टॉवेल, गॅस, वीज व बाजूला बाथरूम दुपारी लंचकरिता घरी येत होतो सूप, ब्रेड, बटर व स्वीट एवढ्याचे तीस सहा पेन्स पेई परत जाताना बरमूडाची केळी त्यापैकी एक केळे एका पेन्सला व कॅडबरी किंवा राष्ट्रीय चॉकलेट दोन पेन्सला असा दुपारचा भोजनाचा कार्यक्रम असे रात्रीला कॉलेजहून परत येताना एक तांदळाची पुडी, मसूर डाळपुडी, ब्रसेल्स स्प्राऊट नावाचे लहान कोबीचे गड्डे, ब्राऊनब्रेड, लोणी व मध एवढे सामान आणावे खोलीतील गॅसवर भांडे ठेवावे लोण्यात मोहऱ्या घालून फोडणी

खावी व ती खिचडी आणि त्यातच टाकलेल्या कोबीची भाजी ही ब्रेडसोबत खावी हे रात्रीचे भोजन असे

शनिवारी अर्धा दिवस व त्या दिवशी बाजारची गर्दी सर्वांत स्वस्त दुकान वूल-वर्थचे इथे कोणतीही वस्तू ६ पेन्सच्या वर नसे सर्व सामान समोर व आपण निवडून घ्यावे भाजीपाल्याच्या दुकानावर दर छापलेले मोठ्या स्टोअर्समध्ये दर छापलेले यामुळे फसवणुकीचा प्रश्नच नसे

रविवारी कॉलेज बद, दुकाने बद व सिनेमा, नाटके पण बद चर्च, पार्क व काही उपहारगृहे उघडी असत मोठ्या दुकानातील सामान बाहेरून दिसावे याकरिता काचेचे मोठमोठे दरवाजे व खिडक्या होत्या फूटपाथवरून लोक या सामानाकडे पहात व तिथे लिहिलेल्या किमतीबद्दल कुतुहल व्यक्त करीत त्या दिवशी या खिडक्यातून सामान पहाणे हाच एक व्यवसाय असे व आम्ही त्याला ‘ विन्डो शॉपिंग ’ म्हणत असू

सकाळी चर्चमध्ये जाऊन यावे व तिथे काय चाललेय ते पहावे या दृष्टीने प्रयत्न केला कितीतरी प्रकारचे पथ सर्वच ख्रिश्चन पण त्यात रोमन कॅथॉलिक, प्रॉटेस्टेन्ट, एपिस्कोपेल, सेवन डे एटवेन्टिस्ट, बेपटिस्ट, स्पिरिचुअल अशा कितीतरी मतांची गिरजाघरे होती व प्रत्येकजण म्हणे, ‘ मी त्या धर्माचा नाही ! ’ चर्चमध्ये गेल्याबरोबर बाहेरील व्यक्ती दिसली की मितभाषण करून स्वागत भासवीत की आपण ख्रिश्चन झालात तर स्वर्ग मिळेल कित्येक बाया स्वेटर विणताना दिसत म्हणायच्या, ‘ आम्ही दलित देशातील लोकांकरता हे विणतो व चर्चमधून पैसे पाठवतो ’

एकदा रोमन कॅथॉलिक चर्चमध्ये गेलो त्या दिवशी त्याचा ‘ मास ’ हा पवित्र पाठ होता आतून भव्य केथीड्रल दाराजवळच एका दगडी भांड्यात पाणी ‘ तीर्थ ’ म्हणून ठेवलेले होते मुख्य दाराजवळ गुडघे टेकून उजव्या हाताने क्रूसचे चिन्ह करावे, पुढे ते तीर्थ डोळ्याना लावावे समोर येशू ख्रिस्ताची भव्य प्रतिमा होती कितीतरी मेणबत्त्या जळत होत्या उदबत्तीसारखा सुवास येत होता आम्ही बेंचखाली पाहिले, गुडघे टेकले व बसलो समोर बायबल व भजनाचे पुस्तक होते लाब कोणती भजने म्हणणार याचे आकडे होते दारातून चादीचा क्रूस घातलेला एक तरुण येत होता मागे चर्चचे मानापानाचे कपडे परिधान करून पाद्री इत्यादी येत होते एक मनुष्य साखळी हलवत होता त्या साखळीच्या टोकाला एक गोळा दिसला तिथून उदबत्तीचा धूर निघत होता सर्व मिरवणूक मचापर्यंत आली मुख्य पाद्री एका मखराजवळ थांबला आत सोन्याची पात्रे होती त्यांनी लॅटिनमधे मत्र म्हटले आम्ही सर्वांनी त्याचे अनुकरण केले ब्रेडचा तुकडा त्यांनी तोडला आम्ही आमच्या समोर असलेला ब्रेड तोडला व खाल्ला लहान पेल्यात असलेली थोडी मदिरापण घ्यालो येशू ख्रिस्ताचे स्मरण करून ब्रेड त्याचे अग व मदिरा त्याचे रक्त याचे प्राशन आम्हास शुद्ध करो, पवित्र करो व आमचे पापनाश करो हीच भावना या ‘ मास ’ मध्ये असते

चर्चच्या बाजूला एक खोलीवजा पडवी होती तिथे बरेच रकाने दिसले रकान्याच्या बाजूला छोटे छिद्र. आत एक पाद्री बसला होता. त्या बाहेरील छिद्रातून काही स्त्री-पुरुष गुपचूप त्याच्याशी बोलत होते. तसे करण्यासाठी रांगच लागली होती कळले की, आपल्या तथाकथित पापांचा गुन्हा कबूल करत आहेत व पाद्री त्याना क्षमा देत आहे या विधीला कन्फेशन म्हणतात

चर्चमधून परत येताना आम्ही गावातील जुन्या किल्ल्याकडून येऊ लागलो माझ्या-सोबत एक आयरिश मुलगी होती एका जागेवर थांबून तिने एका वाटसरूला त्या स्थानाची माहिती विचारली त्याने स्पष्ट उत्तर दिले, 'तुला सांगणार नाही', कारण तू एका काळ्या माणसाबरोबर भटकत आहेस'

सन १९३९. ऑगस्ट महिना जर्मनीने पोलंडवर स्वारी केली होती इंग्लंडमध्ये युद्ध-परिस्थिती सुरू झाली ब्रिटिश जनतेने युद्धासाठी कंबर कसली जीवनोपयोगी वस्तूत काट-छाट होऊ लागली. करमणुकीचे कार्यक्रम तर नजरेआड गेले रात्र झाली की अंधाराचे साम्राज्य पसरू लागले घराघरातून प्रकाश फेकणाऱ्या दिव्याना अंधाराशी मैत्री करावी लागली खिडक्याना काळे कागद लागले अंधारामधेच प्रकाशज्योती फेकल्या जात. शत्रूच्या विमानाचा अंदाज घेऊन त्यांना खाली पाडण्यासाठी सिव्हिल डिफेन्सकडून ही योजना केलेली असे

रस्त्याना अवकळा आली होती नावाच्या पाटया काळया रंगाने पुसलेल्या होत्या काही ठिकाणी तर पाटया काढून टाकलेल्या दिसत होत्या ट्राम्स आणि बसेसच्या खिड-क्यांनादेखील काळया कागदाचे आवरण होतेच या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की लोक स्पिरिच्युअल सोसायटींच्या चर्चमधे जाऊ लागले मृतात्म्यासंबंधी माहिती देणारी मीडियम हा एक फार मोठा आधार वाटू लागला एकूण वातावरणाचे माझ्याही मनावर परिणाम होत होते मृत्यूनंतर खरोखरच काही जीवन आहे का याविषयीच्या जिज्ञासेने मीही चर्चकडे आकर्षिला गेलो

एकदा चर्चमधे जुनी मीडियम आली होती तिने खुर्चीवर बसून एकतानता साधली व माझा उजवा हात हलकेच दाबून म्हणाली, की तुम्हाला लहानपणी आलेल्या भुताच्या प्रचीतीची गोष्ट सांगा

मला माझे बालपण डोळयापुढे दिसू लागले नकळतच आयुष्याची अनेक वर्षे ओला-डून मी भूतकाळात दाखल झालो .

मी आठ वर्षांचा असेन मध्यप्रदेशातल्या एका शहरात आम्ही रहात होतो तो एक

टोलेजंग वाडा होता वाडा म्हटले की साऱ्याच गोष्टी डोळ्यापुढे येतात यातले वैशिष्ठ्य हे की वाड्याचे माजघर मालकाने बंद ठेवले होते घरापासून दूरवर असलेल्या संडासा–जवळ पिंपळाचे व शिरीषाचे वृक्ष होते दर अवसे-पुनवेला त्या वृक्षावर घुबडे ओरडत व त्याच सुमारास कुत्री आपला भेसूर स्वर त्यात मिसळून देत. नेमका त्याच वेळी त्या बंद माजघरातून कपला तरी आवाज येई

एके दिवशी माझ्या वडिलांचे गुरुबंधू व गुरुमाय आमच्याकडे आली रात्री निज–ण्याच्या वेळी गुरुबंधूंनी माजघराच्या बंद दरवाजाजवळ सतरंजी अंथरली वाऱ्यामुळे की काय नकळे, पण ती उडाल्यासारखी झाली मग गुरुमायनी आपले अंथरूण तिथेच टाकले मी आणि वडील बाहेर अंगणात झोपलो होतो उन्हाळ्याचे दिवस होते पौर्णिमेचे शुभ्र चांदणे पसरले होते पहाता पहाता आम्हाला झोप लागली. रात्री जाग आली ती घुब–डाच्या घुत्काराने आणि कुत्र्यांच्या रडण्याने पडवीत आरडाओरड सुरू झाली वडील रामनाम घेत उठले मी पण जागा झालो पहातो तर गुरुमाय थरथर कापत उभ्या होत्या त्या अडखळत सांगू लागल्या, की ' दारातून एक सवाष्ण बाई बाहेर निघाली आणि तिने लाथ मारून विचारले, " अगदी दारात निजायला लाज नाही वाटत ? दूर व्हा वाटेतून–" कंदिलाची वात मोठी करून पाहिले तर कुणीही नव्हते दाराला कुलूप होते व आतून खडखड खडखड आवाज येत होता तो बहुतेक उंदराचा असावा मधूनच एक मांजर पळाले

आमच्या दारी एक मोठे जांभळाचे झाड होते त्याला कधी फळे येत नसत लोक म्हणत हे झाड शापित आहे घर दुमजली होते आम्ही सर्व माडीवर झोपत असू मागल्या पडवीत मुलगा अभ्यास करी त्यापलीकडेच ते झाड होते त्यावर मधून मधून घारी येत एके दिवशी माशा घोंघावताना दिसल्या माणूस चढवून पाहिले तर घरट्यात वीस पंच-वीस मेलेले उंदीर सापडले जवळच घारीची पिल्लेही होती एका अमावास्येला काय झाले, धो धो पाऊस कोसळत होता भाद्रपद महिन्याचे दिवस होते मुलगा अभ्यास करीत होता रात्री बारापर्यंत मी जागा होतो नंतर डोळा लागला सकाळी चार वाजता जाग आली पहातो तर पडवीकडील दार उघडलेले व दिवा मालवलेला दुसऱ्या खोलीत जाऊन पाहिले तर सगळे निजलेले होते पण मुलाचा पलंग मात्र रिकामा होता त्याच्या चपला व खुंटी-वरील कपडे दिसत नव्हते त्याला इकडेतिकडे पाहिले, हाक मारली, पण पत्ता नाही मग पत्नीला उठविले तर ती नाराजीने म्हणाली, ' इतके काय मुलांच्या मागे लागता ?' पण उघडे दार दृष्टीला पडले मात्र, तिला रडूच कोसळले तोपर्यंत पहाट झाली होती टॉर्चने मागोवा घेतला तेव्हा चिखलात चपलांच्या खुणा दिसल्या मग सर्व दिशांनी शोध सुरू झाला पण पत्ता लागेना शेवटी सकाळी दहा वाजता पोलिसात वर्दी दिली रात्री रेडिओवरही बातमी दिली नदी, दवाखाने, तळी–एक म्हणून जागा शोधायची शिल्लक ठेवली नाही

तिसरे दिवशी मुलाच्या मामाचे नागपूरहून पत्र आले. त्यांच्या ईश्वरभक्तगुरूंनी

निरोप दिला होता

'मुलाला वृक्षावरील देवता घेऊन गेली–तो उत्तरेकडे चालत आहे देवता चागल्या स्वभावाची आहे–मुलाला इजा करणार नाही, काळजी करू नये पाच दिवसांनी मुलगा आपोआप येईल'

चार दिवस फार काळजीने गेले गणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीची मूर्ती आणली पूजेच्या विचारात ड्रॉईंगरूममध्ये बसलो होतो तेवढ्यात घराबाहेरील कपाऊडचे दार कुणीतरी वाजविले सहज लक्ष गेले मळके कपडे घातलेला, मुडन केलेला, एक थकलेला मनुष्य घरी येत होता दाराबाहेरील घटा न वाजविता तो तरुण सरळ ड्रॉईंगरूममध्ये शिरला बोलला नाही काहीच इतर मुलानी 'आईऽ' म्हणून हाक मारली–मी त्याच्याकडे पाहून घरात शिरलो आई तिथे आली पाणावलेल्या डोळ्यानी हुदका देत म्हणाली, 'अरे, तू का?' पुढे तिच्याच्याने बोलवेना हुदके देतदेतच ती आत गेली मी पूजेला जाऊन बसलो

माझा नाहीसा झालेला मुलगा आपोआप परतला होता

मी निजताना पडवीकडील खोलीचे दार नेहमी बद करीत असे अशाच एका आषाढात रात्री खूप पाऊस पडत होता अमावास्येची रात्र असावी नित्याप्रमाणे घुबड, कुत्री याचे ओरडणे सुरू झाले बरीच रात्र गेल्यावर मला भास झाला की त्या दारातून कुणी तरी आत शिरले होते एक सवाष्ण बाई दिसली कपाळभर कुकू होते, निळी नऊवारी साडी व हातात बऱ्याच हिरव्या बागड्या होत्या ती पलगाजवळ येताच मी तिला 'चल जा' म्हणालो, ती बाजूच्या खोलीत गेली मग पत्नीचा गळा दाबत आहे असे वाटू लागले तेवढ्यात माझ्या पत्नीचे गुरू दुसऱ्या दाराने शिरताना दिसले व ती स्त्री फरशीवर लाथ मारून खाली जाताना दिसली त्या फरशीवरील भगदाडातून एक बाहुली वर आली तिचे हातपाय लाल होते व अगात पाढरा फ्रॉक होता ती चक्क माझ्या पलंगावर आली मी तिचे लाल हात पाय तोडण्याचा प्रयत्न केला. 'चले जाव' म्हणत तिला लांब फेकले इतक्यात थडी लागली काही आवाज झाला व झोप उघडली

डोळे उघडून पाहिले तर पडवीकडील दार उघडे होते थड वारा येत होता. उठलो· लाईट लावला तेवढ्यात पलगावरून एक उदीर पळताना दिसला

दारे लावून उदराला यथेच्छ मारले आणि तो मेलेला उदीर पडवीपलीकडून झाडाखाली फेकून दिला एवढ्यात पत्नी उठून आली आणि म्हणाली, 'अहो, झालय काय तुम्हाला? बरळताय काय, उड्या काय मारताय? झोपू द्या की सर्वांना' मी मुकाट्याने झोपलो

सकाळी महाला उठून आन्हिक उरकले. धाकट्या मुलीला घेऊन डेन्टिस्टकडे गेलो तिचे दात काढायचे होते एक्स–रे काढून तिला ऑपरेशन थिएटरकडे नेले टेबलावर झोपवले ती रडत होती डॉक्टर गुगी देत होते बाजूच्या टेबलावरच्या मुलीचे ऑपरेशन

चालले होते. तिच्या दोन्ही पायावर रक्ताचे ओघळ दिसत होते

मुलीचे दात काढून झाल्यावर ती मला बिलगली तेवढ्यात एक लाबचे दार उघडले त्यातून निळे वस्त्र परिधान केलेली बाई भराभरा आत शिरू लागली डॉक्टरनी तिला मज्जाव केला बाजूच्या टेबलावरच्या मुलीचा पाय कापून वेगळा केला जात होता त्याच वेळी माझ्या मुलीला घेऊन मी घराकडे निघालो

घरी आल्यावर निजण्याच्या खोलीत गेलो सहज जांभळीकडे लक्ष गेले एक कावळा काहीतरी ओढीत होता आणि कुत्रा त्याच्या तोंडातून ते काढण्यासाठी धाव घेत होता तेवढ्यात कुठूनशी घार आली तिने एकाच झडपेत रक्तबबाळ झालेला, आतडी निघालेला तो प्राणी उचलला आणि भरारी घेतली

मी रात्रीच्या स्वप्नाभासाची आठवण करीत होतो आणि मला प्रचीती आली

घारीने मी फेकलेला उदीरच पळविला होता

असेच अनेक आभास मी आठवत गेलो माझे अनुभव निवेदन करीत राहिलो

गोष्ट ऐकत ती मीडियम– ( आत्मा आणि आपण यातील मध्यस्थ ) म्हणाली, ‘ तुमच्याभोवती कितीतरी लोक गोळा झालेले आहेत प्रत्येकाची तुम्हाला भेटण्याची इच्छा आहे ’

‘ मला तर इथ तुमच्याखेरीज कुणीच दिसत नाही.’

‘ खरोखरच तुम्हाला या गोष्टीबद्दल कुतुहल दिसते. तुमच्यात तशी शक्तीही आहे मला अस वाटत लौकरच तुम्हाला गतविभूतींचा साक्षात्कार होईल ’

एवढा सवाद होऊन मुलाखत सपली त्यानतर चारच दिवसानी मिसेस जेमीसनचे पत्र आले ‘ स्कॉटलडहून एक प्रख्यात मीडियम येणार आहे व तिला “ भुते ” साक्षात करण्याची शक्ती आहे जमल्यास अवश्य यावे ’

या भुतांच्या प्रकरणाचा इत्थभूत विचार व्हावा म्हणून मी जाण्याचे कबूल केले दरम्यान सर आर्थर कॉनन डायल, एच जी वेल्स, मॅडम ब्लाव्हाटस्की यांचे या विषयावरील ग्रथ वाचले मृत्युनतर जीवन असेल तर त्या जीवाशी सपर्क साधता यावा, त्या जीवाना त्याच्या जीवनाबद्दल कसे वाटते याची विचारपूस करावी व हे सगळे मृत्यूबद्दलचे भय घालविण्याच्या कामी उपयोगी पडावे अशी धारणा करून मी ठरविलेल्या दिवशी मिसेस जेमिसनकडे गेलो

रात्री काळोख असतो म्हणून मी सायकाळी सातच्या आतच तिच्या घरी पोचलो बाहेरच्या ड्रॉईंगरूममध्ये बसलो आणखी दोघे आले साडेसातला मिस स्कॉट नावाची मीडियम आली ही बाई वयान पचेचाळिशीची असावी अगाने खूप जाडी, भरलेली होती हातपाय पण लठ्ठच होते आपण ‘ उच ’ हवेतच तरगतोय या भावनेत ती असे भेटीगाठी झाल्यावर मिसेस जेमिसनने आमच्या प्रत्येकाकडून सात शिलींग वर्गणी गोळा केली मिस स्कॉट जन्म, मरण, जीव आदीच्या गोष्टी करीत होती व ‘ या दुनियेत मृत्यु म्हणजे एका

जीवनातून दुसऱ्या जीवनाकडे जावयाचे द्वार होय ' अशी भावना प्रस्तुत करीत होती मी सहज विचारले, ' इतक्या पारमार्थिक कार्याकरिता पैसे का घेता ?' मिस स्कॉट तर रागावलीच पण मिसेस जमिसन म्हणाली, ' त्याची मनोभावना दुखवू नका नाही तर प्रयोगसिद्धतेला बाधा निर्माण होईल.'

अर्ध्या तासाने सगळी मंडळी जमली आम्ही अवघे आठजण होतो मिसेस जेमीसनने मला व एका नर्सला आत बोलाविले मिस स्कॉट पण आत आली बाजूच्या खोलीत तिला अगदी विवस्त्र केले बाहेरील ओवरकोट व पायात बूट याशिवाय तिच्या शरीरावर दुसरे काही नव्हते डोक्यातील आकडे पण काढले तोंडातील कृत्रिम दात पण काढून ठेवले मागील खोलीत तिला नेले. ही खोली १५' × १२' ची असेल एका कोपऱ्यात खुर्ची होती व त्यासमोर काळा पडदा ओढला होता मिस स्कॉटला त्या विवस्त्र अवस्थेत त्या खुर्चीवर बसविले भिंतीकडे आम्हाला एकटक पहायला लावले तिथे काही नव्हते दारापासून ती लांबच होती पडदा सारून तिला आत नेले त्या खोलीला एक दार व एकच खिडकी होती खिडकी आम्ही आतून लावली व पडदा बंद केला खोलीत एकच बल्ब होता तो पण लाल रंगाचा त्यावर एक काळे कापड टाकून घट्ट बांधले होते मिस स्कॉटसमोर—म्हणजे पडद्यापासून अवघ्या तीन फुटावर आठ खुर्च्या दोन रांगेत ठेवल्या होत्या

सगळ्या पाहुण्यांना आत बोलाविले मिसेस जेमिसनने दार बंद केले मी समोरच्या रांगेत अगदी समोरच बसलो सगळे बसल्यावर हातातल्या आंगठ्या, फाउंटन पेन, घड्याळ इत्यादि चकाकणाऱ्या वस्तू सगळ्यांनी काढून खिशात घातल्या पाय जमिनीवर सरळ ठेवून दोन्ही हाताचे तळवे गुडघ्यावर ठेवावयास सांगितले सगळे नाठ बसले. मिसेस जेमिसनने प्रार्थना सुरू केली इतर बायकांनी साथ दिली पहिली प्रार्थना होती, ' परलोकी गेलेल्या मित्रांनो, या अवश्य या—तुम्ही या जगात आहात याची खात्री द्या—तुम्ही कसलेही रूप धारण करून या–आम्ही तुमचे स्वागत करू ' अशा प्रकारे दोन चार प्रार्थना सुरात झाल्या याच सुमारास कुणीतरी कण्हत असल्याचा आवाज पडद्याच्या आतून आला. अगदी विव्हळल्याचा आवाज होता आम्ही सर्व अगदी गप्प होतो

' कम कम, फ्रेंड्स्, कम—' असा आतून आवाज आला विव्हळणे चालूच होते पहिला आवाज पुन्हा म्हणाला, ' मीडियमची मानसिक पातळी आज स्थिर नाही त्यामुळे कुठपर्यंत यश येईल सांगता येत नाही, तरी आम्ही प्रयत्न करू '

कुथणे चालू असतानाच, ' या, ये, ये, ये, ख ' असा आवाज आला व मीडियमची मान खुर्चीच्या बाजूला कलडली ' ऊ, ऊ, ऊ, ऊ ' हा आवाज चालूच होता ' कम ऑन, कम ऑन ' हे शब्द पुन्हा आले

त्या शब्दाकडे आमचे लक्ष होते. तेवढ्यात पडदा मधून व खालून हालू लागला. हळूहळू बाजूला सरू लागला आतला फिक्कट प्रकाश खालून येऊ लागला सर्फ साबणाच्या

फेसाप्रमाणे निळसर पाढुरका फेसयुक्त पदार्थ सरकत असलेल्या पडद्यातून दिसू लागला हळूहळू तीन फुटापर्यंत पडदा बाजूला झाला तीन फूटावर दोन चमकणारे लहान डोळे दिसले त्याखाली काही तरी नाकाच्या छिद्रासारखे छिद्र होते व त्याखाली एक आडवे छिद्र दिसले रग पाढुरका पण जवळपास पारदर्शक या तोंडावरून कपाळ, गाल, कान, चोहोकडून कॅथलिक ननसारखे पाढरे, कापऱ्याप्रमाणे वलय होते तिथून खालपर्यंत घड्या पडलेल्या कापसाप्रमाणे पांढुरका पदार्थ जमिनीपर्यंत दिसत होता या आकृतीपलीकडे काही दिसत नव्हते ती आकृती स्थिरावल्यावर डोळे गोल फिरले डोक्याखाली खाद्याच्या बाजूला जिथे हात असतात तिथे घडी पडलेले कापड वर खाली सरकत होते 'या, या, या ' असा आवाज झाला 'बेबी डान्स ' असा शब्द आला, पुन्हा 'मेरी बेबी डान्स ' असा शब्द आला समोर बसलेले मि जोन्स एकदम दचकून उठले ते म्हणाले, 'ओ मेरी, माझी लाडकी मेरी ..किती दिवसानी तुझा शब्द ऐकू आला आम्ही तुझ्या जाण्याने फार दु:खी होतो या निमित्ताने तुझी भेट झाली आनद झाला '

ती आकृती बोबड्या लाडिक शब्दात म्हणाली, 'सिग साँग मेरी—' मि जोन्स म्हणाले, 'हा बेटी, नाचून दाखव व गाणे म्हण ' ती आकृती नाचण्याचा प्रयत्न करू लागली पडद्याखालील भागात पायाच्या जागेवर हालचाल सुरू झाली हाताच्या जागी वर खाली पाढरे ढगाळ पदार्थ फिरू लागले व डोके थोडे इकडून तिकडे हलताना दिसले तोड सोडून शरीराचा कोणताही भाग दिसत नव्हता सगळीकडे तो विरळ फेसाळ, पाढु–रका, घडी पडलेल्या कापडाप्रमाणे दिसणारा रगच आकृतीने एक नर्सरी ऱ्हाईम गायले 'मेरी ए लिटल लँब ' नतर एक फ्रेंच ऱ्हाईम झाले मि जोन्स म्हणाले, 'बेटी, तुला कसे वाटते, काही दुःख होते काय ?' आकृती नाचत होती ती बोबड्या स्वरात म्हणाली, 'मेरी गुद, नो पेन, ममी हाऊ ?' मि जोन्स म्हणाले, 'यस डीयर, ममी गुड, लव ' ती आकृती म्हणाली, 'ओ ऽ गोईंग हा ऽ हा ऽ' असे म्हणत ती आकृती हळू हळू बद होणाऱ्या पडद्यात विरून गेली

मि जोन्स मात्र 'ओ डियर हाऊ स्वीट मेमरी ' म्हणत डोळे पुसण्याचा प्रयत्न करू लागले मिसेस जेमिसनने त्याना 'हात उचलू नका ' असे सागितले. मेरी नावाची मि जोन्सची मुलगी अवघी तीन वर्षांची असतानाच वारली होती त्या घटनेला चार वर्षे झाली होती

पडद्याच्या आड पुन्हा कुथण्याचा आवाज आला आता पडदा हळूहळू जरा वरूनच उघडू लागला जरा उच आकृती दिसू लागली पाच फुटापेक्षा उंच असेल इथेसुद्धा तोंडा-शिवाय सगळा भाग त्या पांढुरक्या, फेसाळ कापड सदृश पदार्थाने वेष्टिलेला दिसला गुडघे, ढोपर हे भाग जरा समोरच होते 'हॅलो पेट्रिक, आय ॲम रॉजर ' (पेट्रिक, मी

रॉजर आहे), असा आवाज आकृतीच्या तोंडाजवळून आला ताठ बसून हलू नये या नियमामुळे मला वाकता येईना किंवा उठता येईना चार पाच फूटावरून जे दिसेल ते पहात होतो खूप प्रयत्न करून पाहिले मीडियमच्या नाकातून काही तरी पाढुरका घट्ट द्रव पदार्थ निघताना दिसत होता त्या निघणाऱ्या पदार्थानेच आकृत्या बनत होत्या मीडियमचे शरीर मात्र दिसत नव्हते कारण आकृतीने शरीर झाकले गेले होते

'रॉजर' नावाची आकृती बोलू लागली मिस्टर पेट्रिक माझ्या मागील रांगेत बसले होते 'हॅलो ब्रदर, नाईस टू हियर यू' 'ही, ही, ही' आकृती म्हणाली, 'यू सफर्ड ए ग्रेट पॅट्रिक' 'यस बट ऑल इज वेल नाऊ' रॉजरने उत्तर दिले

'तुला कसे वाटते ?'

'आय ॲम ऑल राईट, फ्रेंडस हेल्प मी हियर, टेल जोन्स नॉट टू वरी, बेबी विल बी वेल इन फोर डेज'

'पण तिला न्युमोनिया झाला आहे व जोन्स तर रात्रभर जागरण करून आजारी पडली आहे'

'काही हरकत नाही'

'आणखी काय सांगणार ?'

'आता काही नाही कारण इतर लोक इकडे यायला उभे आहेत बरे गुड बाय' एवढे बोलून रॉजर नाहीसा झाला

पडदा पुन्हा मधून बंद झाला व आकृती लुप्त झाली पुन्हा कुथण्याचा आवाज आला. पडदा हळूहळू उघडला यावेळी तो सहा फुटापर्यंत उघडलेला होता व बराच रुंद असा दिसला एक जाड आकृती आली 'आय ॲम सलोमन !' अशी ती ओरडली कुणी काही बोलले नाही म्हणून पुन्हा ती आकृती ओरडली, 'आय ॲम सालोमन ॲण्ड आय ॲम फॉर यू' (मी सालोमन आहे व मी तुझ्याकरिता आलो आहे) आकृती म्हणाली प्रत्येकाने 'मी ?' असे आळीपाळीने विचारले 'नो, नो–' अशी ती आकृती ओरडत होती शेवटी मी म्हणालो, 'फॉर मी ?' त्यावर ती म्हणाली, 'ओ ओ, एस'

माझ्या माहितीत कोणी सालोमन मला आठवत नाही–' मी म्हणालो

'काय विसरलात ! सोळा जूनला रस्ता ओलांडताना एकदम ट्रॅम आली मी तुम्हाला मागे ओढले, तुम्ही नक्की चेपणार होतात अठरा मेला प्रयोग करताना तुम्हाला काही सुचेना म्हणून तुम्ही स्तब्ध बसला होता तुमच्या नाकावर एक माशी बसली, तुम्ही सावध झाला व पुढील विचार नवीन रीत्या तुम्हाला मी सुचविले तुम्ही प्रयोग चालू केले' आकृती बोलत होती

धन्यवाद, पण मला या घटनांची आठवण नाही' मी म्हणालो

'मी नेहमी तुमच्या जवळपास असतो इतःपर अशा आकस्मिक घटना घडल्यास लिहून ठेवीत जा म्हणजे आठवण राहील. तुम्हाला तुमच्या प्रयोगात यश मिळेल पण

कित्येक वर्षे तुमच्या कार्याचे चीज होणार नाही तुम्ही हिम्मत हारू नका तुमच्या जवळपासचे लोक तुमची कधीच किंमत करू शकणार नाहीत कार्य करीत रहा–' आकृतीने सांगितले

'आपल्या बोलण्यावरून दिसते की आपण कधीतरी ज्योतिष जाणत असाल भाषा तशीच दिसते तरी पण आपण कुठे होता व इथे कसे आला हे सांगाल काय ?' मी विचारले

'मी ध्यानी कोणी का असेना, मला जे दिसते आहे ते सांगितले तुमच्या खिशात यावेळी अवघे पाच शिलिंग आहेत मी ग्रीसचा रहिवासी तिथे शिक्षक होतो मला वैज्ञानिकाची संगत आवडत असे माझ्या आयुष्यात ती मला मिळाली नाही. माझ्या कार्याचा उत्कर्ष पण झाला नाही मी अपघाताने मेलो आता या अनंतात भटकत असताना तुमचे वलय बरे दिसले व तुम्ही एकाकी होता म्हणून मदत केली अशीच मदत करेन टिपून ठेवीत जा बाय बाय ' आकृती लुप्त झाली पडदा पुन्हा बंद झाला

त्यानी सांगितलेल्या घटनांची आठवण करत होतो व ट्रॅमची घटना आठवली आज बत्तीस वर्षांनी त्यांनी केलेल्या भाकितात बरेच तथ्य आहे असे मला दिसते

याप्रमाणे दोन चार आणखी विविध उंचीच्या, विविध शब्द उच्चारणाऱ्या स्त्री-पुरुषाच्या आकृत्या आल्या मधेच एक फारच उत्तम इंग्लिश बोलणारी आकृती आली तिने आपले नाव डॉ थॉमस सांगितले

'आपण या संसारातून ज्यावेळी गेला, तेव्हा कसे वाटले ?' मी विचारले

'अगदी त्यावेळेचे मला आठवत नाही पण कुठे तरी उठून गेल्याचा भास होत होता काही काळ .(इकडे काम नाही) नवीनता भासली मागे वळून पाहू लागलो भकासपण मागे होते काही अंधुक आठवणी मागे होत्या माझे तिकडील कार्य स्थिरावले होते कुणी तरी तिकडे मी सोडलेल्या कलेवराला काहीतरी करीत होते पण इकडे बरेच जुने मित्र उभे होते त्यानी माझे स्वागत केले व इकडच्या वातावरणात रूळविले आता मधून मधून आठवण येते तिकडीलप्रमाणे कार्य करता येत नाही इच्छा असते, पुन्हा जावे प्रगट होण्याला महत्प्रयास करावे लागतात आज किती त्रास झाला त्या मीडियमला पण इथे कितीतरी रांगेने उभे आहेत प्रत्येकाला प्रत्यय दाखविण्याची इच्छा दिसते तेथील जीवन इच्छामय आहे. कुणाचा व कसला तरी आधार घेऊन इच्छा तृप्त करता येते मी इतका बोललो पण हे सर्व बाजूचे येऊ इच्छितात बंद करा म्हणतात' डॉ थॉमस म्हणाले, 'पण तिकडचे जीवन तरी कसे असते व पुन्हा इकडे कसे येता ?' मी प्रश्न केला

'मला जरा घाई आहे ती पहा मीडियम खोकत आहे उघडी असल्यामुळे सर्दी होते आहे तुमच्या मागे तिची बॅग आहे. त्यात खोकल्याच्या गोळ्या आहेत दोन गोळ्या द्या' डॉ. थॉमसनी सांगितले.

मी उठू लागलो, पण मिसेस जेमीसनने हटकले व गोळ्या कशातरी पायाने आत ढकलल्या

'डॉ थॉमस, आपणाला खूप विचारायचे आहे तोपर्यंत आपण खरोखरच डॉ० थॉमस आहात याची खात्री पटवण्याकरता मला आपली स्वाक्षरी देता का ?'

असे म्हणून मी खिशात हात घातला पेन काढेपर्यंत मिसेस जेमिसनने हटकले माझ्या बाजूचे गृहस्थ खेकसले, 'अशा प्रसगी कसे वागावे हे कळायला हवे तुम्ही वाचन करूनच यायला हवे असे विचाराल व वागाल तर मीडियम धोक्यात येईल'

ते गृहस्थ असे बोलत होते तोपर्यंत आकृती अदृश्य झाली पुन्हा कुथण्याचा आवाज आला व आतून एक व्यक्ती म्हणाली, 'त्या हिंदी गृहस्थाला कटू बोलू नका तुमच्या सगळ्याच्या वलयाच्या दहापट त्याचे आध्यात्मिक वलय आहे मीडियमची प्रकृती ठीक नसतानाही आज जे काही आपण पाहिले ते त्याच्या वलयाच्या प्रतापामुळे होय'

आता मीडियम जोराने कुथू लागली व धापा पण टाकू लागली रेडिओवर चार स्टेशने एकाच वेळी एकू यावीत तसे किती तरी विविध प्रकारचे आवाज एकाच वेळी येऊ लागले एका आवाजाने तर जोराने व्याख्यान द्यायला सुरवात केली दुसरा म्हणाला, 'हिंदी गृहस्थाशी बोलेन, बाहेर येऊ द्या तुम्ही स्वप्न व घटना टिपून ठेवा आमच्याशी तुमचा संपर्क नेहमी राहील आध्यात्मिक उत्कर्षाकडे वृत्ती वाढवा तुमच्या नशिबी धन नाही, पण अडचण नाही अहो, अहो, अहो, येऊ द्या, बोलू .'

तिकडे मीडियम आणखीच कुथू लागली व जोरानेच विव्हळू लागली सर्वात पहिला आलेला आवाज म्हणाला,

मीडियमची प्रकृती ठीक नाही तरी मरणोत्तर जीवनाचे प्रतीक कसेतरी आपणास दाखवले मृत्यूनंतर अंत नाही, खंत आहे शरीर जरी गेले तरी त्याचे रूपांतरच होते इथे काही नाश पावत नाही केवळ रूपांतरच होते स्वर्ग, मृत्यू ही भाषा आहे आमची राग लागलेली असते, इच्छा तृप्त करून घ्यायला अगदी क्यू लागलेला असतो शरीर धारण करून त्या इच्छा तृप्त करायला हव्या असतात जितके जन्म होतील तितके आम्ही परत येऊ नाहीतर अतृप्तच राहू लक्षात ठेवा की आमची अदृश्य योनि एक स्थिती होय व ती प्रत्येकाला येते जन्म आणि मरण या येण्याजाण्याच्या दोन वाटा किंवा दोरे आहेत असे समजावे दु:ख आणि सुख एकाच नाण्याच्या दोन बाजू समजाव्यात '

हे असे बोलणे चालू असतानाच मीडियम आणखी अस्वस्थ झाली हातपाय आपटण्याचा आवाज येऊ लागला मिसेस जेमीसनने प्रार्थना सुरू केली 'स्पिरिट फ्रेंड्स, मेनी मेनी थँक्स ! आपण आपली प्रचीती दिली, उपदेश दिला आम्ही तसे वागू आता कृपा करून मीडियमला मुक्त करा' दोन-तीन मिनिटे अशी प्रार्थना झाली तेवढ्यात आतून जोराचा सुस्कारा सोडण्याचा आवाज आला 'आता हात वर घ्या व उभे रहा—' असे मिसेस जेमिसनने सांगितले

त्या अगदी फिक्कट दिसणाऱ्या प्रकाशात आम्ही उभे राहिलो मी आणि ती नर्स पडदा धरून आत गेलो ती मीडियम अगदी बेशुद्धावस्थेत खुर्चीवर पसरली होती हात बाजूला जमिनीपर्यंत लोळत होते पाय दूरपर्यंत लोळत होते सगळे अंग उघडे होते श्वासोच्छ्वास जोराने चालू होता डोके बाजूला कलडले होते. नाकातोंडातून थोडा ओलसर फेस पडलेला दिसत होता रुमालाने तिचे तोंड पुसले टॉवेलने छाती, पोट घासले पायाला व हाताला थोडे मालिश केले तोपर्यंत ती शुद्धीवर आली हळूच डोके सरळ केले हाताने बाजूचा ओव्हरकोट उघड्या शरीरावर झाकून टाकला

आम्ही दोघांनी व मि पॅट्रीकने तिला उचलून उभी केली खांद्यावर हात ठवून ती आधाराने हळूहळू स्वयपाकघरात गेली टेबलावर ठेवलेले गरम गरम अन्न खाल्ले जवळ-पास दहा मिनिटांनी हळूहळू ती बाहेर येऊन सोफ्यावर रेलून पडली

आम्ही सगळ्यांनी तिचे हार्दिक आभार मानले हस्तांदोलन करून एक एक जण बाहेर पडलो

रात्रीचे दहा वाजले होते कशीबशी बस मिळाली घरी येईपर्यंत मध्यरात्र झाली होती खोलीत शिरेपर्यंत झालेल्या घटनाच आठवत होतो त्या सर्व लिहून काढल्या थोडं गरम दूध घेऊन झोपलो झोप काही येईना माझा पलग मोठा होता उशीकडी ल फळीवर काचेचे आरसे मढवले होते मध्यरात्रनंतर मला भास झाला, कुणीतरी छातीवर बसला आहे व मी गुदमरतो आहे 'मी येतो मी येतो ..' असा आवाज पण झाला मी 'चल हट्–' म्हणत होतो हळूहळू 'राम राम' या नावाचा जप पण करत होतो असा जेमतेम झोपलो सकाळी ब्रेकफास्टच्या वेळी घरमालकीण म्हणाली, 'रात्रीला काय पुटपुटत होतात ? झोपत नाही काय ?' मी तिला मिसेस जेमीसनकडची सर्व घटना सांगितली ती म्हणाली– 'देम पीपल नो गुड, कीप आऊट !' (ते लोक चांगले नाहीत त्यांच्यापासून दूर रहा )

असे हे माझे मृतात्म्याशी झालेले हितगुज आज एवढ्या वर्षानंतरही मनावर उमटलेले हे ठसे थोडेही अस्पष्ट झालेले नाहीत याची प्रचीति येते

मे महिना सपत होता एडिनबर्गहून जेनेटिक काँग्रेसचे आमत्रण किग्ज कॉलेजला आले होते तसेच ब्रिटिश विज्ञान परिषदेचे अधिवेशन डडी शहरी भरणार होते त्याचे पण आमत्रण आले होते. प्रतिनिधी निवडून पाठवण्याकरता बैठक झाली पत्रे गेली व तेथील माहितीपत्रक पण आले. तिथे रहाण्याची व्यवस्था एखाद्या ब्रिटिश कुटुबात व्हावी अशी माझी इच्छा होती विशेषत ब्रिटिश शेतकरी व त्याची घरची रहाणी मला पहावयाची होती एडिनबर्गला हे जमेना पण डडीला याची व्यवस्था झाली

ब्रिटिशद्वीपात प्रवेश केल्यावर एडिनबर्गला महिना काढला होता यानतर न्यू कॅस–लला आलो व जवळपास वर्ष काढले या काळात तेथील वातावरणात बराच रमलो होतो व आता पुन्हा एडिनबर्गला गेलो परिषदेने एका स्कॉच बाईच्या घरी माझी व्यवस्था केली होती व्यवस्थामडळात दोन जुने मित्र भेटले दोघेही ‘प्रो क्रू’ चे विद्यार्थी होते. यापैकी एक आता बनारस विश्वविद्यालयात प्राणिशास्त्राचे प्रोफेसर आहेत या प्रो. रायचौधरीने एडिनबरो येथील सशोधनाचा चागला उपयोग केला व भारतात आनुवश (जेनेटिक्) सशोधनाचे पहिले केंद्र उघडले तिथे ड्रोसोफायला या माशीवर उत्तम कार्य होत आहे दुसरे डॉ भट्टाचार्य भारत शासनातील कृषि अनुसधान परिषदेत ‘ॲनिमल हसबडरी कमिशनर, या हुद्द्यावर होते

एडिनबर्ग येथील आनुवश विज्ञान परिषदेचे मुख्य सूत्रधार प्रोफेसर क्रू होते त्यानी जर्मनीहून डॉ म्यूलरला आपल्या सस्थेत आणले व ‘ड्रोसोफायला’ या माशीच्या आनु–वशिकतेवर प्रचड सशोधन सुरू केले याच सशोधनाच्या वलयाखाली सस्थेने ही बैठक बोलावली होती डॉ म्यूलर फार प्रेमळ गृहस्थ होते त्यांची त्या काळी डी एस सी होती व दोघांनी बरीच लोकप्रियता सपादन केली होती डॉ म्यूलरला पुढे नोबेल पुरस्कारपण

मिळाला परिषदेच्या परिसरात ब्रिटिश वैज्ञानिक डॉ डार्लिंगटन, डॉ मेथर, डॉ केचेसाईड यांचा महत्त्वाचा भाग होता त्या वेळी अनुवंशसूत्र (क्रोमोसोम) व जीवगुण विभाजन यावर बरीच चर्चा होत असे डॉ मेथरने लोकरीचे मॉडेल करून जीवसृष्टीत नर नि मादी याच्या आनुवंशसूत्रात वंशगुणाचे विभाजन कसे होते याचे प्रात्यक्षिक चांगले दिले होते तसेच या आनुवंशसूत्रात गुण (जीन) कुठे असतील हे दाखवण्याकरता भव्य चित्रे प्रदर्शिली होती विभाजनक्रिया विशिष्ट रूपाने तयार करून त्याची फिल्म दाखवली सन १९३९ साली जनन व आनुवंश यावर विस्ताराने विचार करणारी ही जागतिक परिषद होती जर्मनीहून वैज्ञानिक मोठ्या प्रमाणात आले होते परिषदेच्या पहिल्या दिवशी लॉर्ड मेयरच्या स्वागतसमारंभात ४१ वैज्ञानिकानी सोन्याचे स्वस्तिक पदक प्रामुख्याने कोटावर लावले होते वैज्ञानिकाची राग आपापले व्हिजिटिंग कार्ड घेऊन उभी होती लॉर्ड मेयर आले राष्ट्रगीत झाले मेयरसाहेब मधे उभे त्याच्या उजवीकडे त्यांचा प्रवक्ता होता वैज्ञानिकानी प्रवक्त्याला कार्ड द्यावे व त्यानी जोराने त्याच्या नावा-गावाचा उल्लेख करावा मग मेयरने हस्तांदोलन केले की पुढे जायचे, असा कार्यक्रम तासभर चालला नतर उत्तम फराळ व पुढे प्रख्यात बँडवादनाबरोबर नृत्य सुरू झाले रात्री अकरा ला हा कार्यक्रम सपला

परिषदेचा कार्यक्रम दुसऱ्या दिवशी सुरू झाला मोठ्या विषयांच्या लहान लहान शाखा करून तिथे सशोधनात्मक निबंध वाचण्यात येत सायकाळी सार्वजनिक व्याख्यान होत असे व दुपारी दोन परिसवाद जर्मन वैज्ञानिक आपले स्वस्तिक चिन्ह कोटावर नेहमी ठेवीत व दोघा-दोघाच्या समूहात फिरत तिसऱ्या दिवशी एकाएकी या वैज्ञानिकात काहीतरी चुळबूळ सुरू झाली सायकाळपर्यंत सगळे जर्मन-वैज्ञानिक परिषद सोडून मायभूमीला परतले रात्रीला कळले की लडन येथील जर्मन वकालतीने त्याना ताबडतोब घरी परतण्याचा तातडीचा सदेश पाठविला होता त्यानतर कळले की इग्लडमध्ये 'टूरिस्ट' म्हणून आलेल्या सर्व जर्मन-स्त्री पुरुषाना ताबडतोब घरी परतण्याचा आदेश आला होता ते बँडवाले, घरात काम करणाऱ्या मुली, व्यापारानिमित्ताने भटकणारे गृहस्थ, सगळे तातडीने घरी गेले परिषदेच्या कार्यक्रमात यामुळे बराच फरक करण्यात आला व एकदर वातावरण जरा चिंतेचे झाले

पाच दिवस एडिनबर्गला राहून उत्तर स्कॉटलडच्या 'डडी' या शहरी आलो भारतातील ताग- (ज्यूट) याच गावात येत होता तागाचे घाऊक व्यापारी इथूनच कलकत्ता आणि डाक्क्याशी सबंध ठेवून व्यापार करीत शहरात ताग विणून गोणकापड करण्याच्या बऱ्याच गिरण्या होत्या स्टेशनवर ब्रिटिश विज्ञान परिषदेच्या स्वागत समितीने माझी व्यवस्था डडीहून १५ मैल लाब एका शेतकऱ्याकडे केली असे कळवले ठराविक बसने एका स्वयसेवकामागे त्या शेतकऱ्याच्या घरी गेलो तीस एकर शेतीत सुदर टुमदार बगलीत त्याचे घर होते समोर चागली फुलाची बाग होती व बाजूला शेतकामाची आयुधे-(ट्रॅक्टर, मादर, बिनोवर आदि) दिसली दारात घरमालकरीण,

(हाऊस मेड) ने दार उघडून स्वागत केले मालकिणीची ओळख झाली वर पहिल्या मजल्यावर माझी खोली तिने दाखवली चांगली पधरा–चौदाची खोली होती व तिला लागूनच संगमरवरी दगडाने भूषित केलेली सडास–न्हाणी होती भिंतीला रंगीत कागद होता व खिडकी दरवाजावर भारी पडदे, खोलीत उंची गालिचा होता व त्यावर 'चिपेनडल' चे फर्निचर, उंची बिस्तरा घातलेला पलंग व त्याखाली सुंदर 'चेंबर पात्र' खिडकीतून लांबवर हिरवी शेती व पुढे चरणारी गुरे दिसत होती ती उंची बडदास्त पाहून मला धन्यता वाटली पण ही क्षणिक होती सायंकाळी घरमालक मि स्मिथ आले मला खालील उंची ड्रॉईंगरूममध्ये त्यांनी नेले पेये वगैरे झाली व माझ्याबद्दल त्यांनी विचारपूस केली भारतातून जाताना मला तीन पदव्या होत्या त्यामुळे माझे नाव व पदव्या पाहून त्यांनी पाहुणचार केला होता तो शेतकरी होता तरी तागाच्या धंद्यात त्याने पैसा गुंतविला होता कलकत्ता, डाक्का, कोमिल्ला, चितगावबद्दल त्यांनी बरीच विचारपूस केली तागाच्या जाती, लागवडीचा खर्च, नफा आदीवर बराच वेळ बोललो नंतर भारतातील राजकीय परिस्थिती व महात्मा गांधी यांच्याबद्दल चर्चा झाली तो गृहस्थ हुजूर पक्षाचा सदस्य होता त्याची मते जहालच होती ब्रिटिशांनी भारतावर राज्य करून महान उपकार केले अशी त्याची भावना दिसली पुढे धर्म आणि इतर दलित आणि मागासलेल्या देशांना मिशनरी लोकांनीच पुढे आणले, त्यांना ज्ञानदीप दिला, त्यांना आरोग्य प्राप्त करून दिले व मधून मधून मदत करून आधुनिक मानवात त्यांचे रूपांतर होत आहे, शिवाय येशूच्या शिकवणीचा प्रचार झाल्यामुळे हा दलित वर्ग लवकरच रानटी धर्म झुगारून ख्रिश्चन धर्म स्वीकारेल व इहलोकी सुख भोगून मृत्यूनंतर आकाशातील 'बाप' च्या उजवीकडे उभा राहील अशी भविष्यवाणी पण त्याने केली

रात्रीचे जेवण झाले पण त्याच्या बोलण्याचा कल कळू लागला, व जेवताना गोमांस 'वर्ज्य' असे मी सांगितल्यावर त्याच्या कपाळावर आठ्याच दिसल्या एकदर त्याची कल्पना होती की मी कुणीतरी तीन पदव्या घेतलेला ब्रिटिश विद्यार्थी असेन पण 'काळा' माणूस-सुद्धा तीन डिग्र्या घेऊन विज्ञानात पुढे येतो हे त्याला पटले नाहीसे दिसले माझा रंग पाहून तो खट्टूच झाला असावा रात्रीला कसेबसे खोलीत गेलो व झोपलो सकाळी मि स्मिथ आले ते म्हणाले, की लंडनहून काही विशेष वर्तमान गुप्तरीत्या आले त्यानुसार डंडी येथील दवाखान्यातील खासगी रोगी ताबडतोब काढण्यात यावे असा एक संदेश होता शिवाय मि स्मिथना येथील होमगार्ड सैन्यात ताबडतोब यावे असा दुसरा संदेश होता याकरिता मी त्यांची खोली सकाळी ९ लाच सोडली, कारण तिथे ते आपली बाळंत झालेली मुलगी दवाखान्यातून आणणार होते शहरातील एका हॉटेलमध्ये एका खोलीत माझी व्यवस्था केली व मी लवकर तयार होऊन बस पकडावी अशी त्यांनी विनंती केली. मला प्रथम वाटले की माझा 'काळा' रंग नडला, पण दुसऱ्या दिवशीच्या टाइम्स यांचे कृत्य योग्य असावे अशी भावना झाली

हॉटेलमध्ये सामान टाकून ब्रिटिश विज्ञान परिषदेच्या अधिवेशनाला गेलो उद्घाटन तेथील लॉर्ड मेयरने केले व लंडनहून शिक्षणखात्यातील एका मंत्र्याने शासनाचा संदेश व अपेक्षा कळविल्या केंब्रिज, ऑक्सफोर्ड, रीडिंग, एडिनबर्ग, डरहॅम, लीडस, मॅंचेस्टर, बर्मिंगहॅम, हल, वेल्स आदींचे विख्यात वैज्ञानिक तर होतेच, पण इतर वैज्ञानिक संस्थेने पाठविलेले प्रख्यात वैज्ञानिक–प्रतिनिधी पण होते परिषदेच्या अध्यक्षांनी विज्ञानविषयक नबंध वाचला अधिवेशनानंतर टी पार्टी झाली प्रत्येक प्रतिनिधीला एक विशेष पास दिला होता त्या पासामुळे त्याला सगळ्या डंडी शहरात ट्रॅमने कुठेही फुकट प्रवास करता येत असे सायंकाळी लार्ड मेयरने टाऊन हॉलमध्ये स्वागत केले एडिनबर्ग सारखाच कार्यक्रम रांगेत उभे रहावे संपर्क अधिकारी आमचे कार्ड जोराने वाची व थोडी मल्लीनाथी करून मेयरपुढे उभा करी मेयरशी हस्तांदोलन झाले की पुढच्या हॉलमध्ये खाद्य–पेये घेण्यास सगळे जात ओळख झाल्यावर बँड वाजला लॉर्ड मेयर स्वतः लेडी मेयरला घेऊन हॉलच्या मध्यभागी आले सगळ्यांनी टाळ्या वाजविल्या बँडने सूर लावला–गाणं असेल ' रनरे बिटरन ' पायाच्या टाचा वाजवीत एक एक जोडी प्रांगणात उतरली व गिरके घेत ' फाकसट्राट ' नृत्याचे ठोके व नंतरचे गिरके सुरू झाले ज्याचे कुणी जोडीदार नसेल तो वाट पाही व नृत्य संपले की जोडीदारणीकरिता आर्जव करी असे ' फाकसट्राट, ' ' वाल्ट्झ,' ' साबा ' नृत्य १२ पर्यंत चालले घरी येताना रस्त्यावरील दिवे मधून मधून विझताना दिसले

एके दिवशी स्टीव्हन्सन नावाचा माझा मित्र स्कॉटिश रंगीत टाय घालून माझ्या टेबलावर आला तो पिवळा भडक रंग पाहून मला जरा आश्चर्यच वाटले पण स्टीव्ह हसत म्हणाला, ' अरे स्कॉटलंडमधील प्रत्येक जमातीचा वेगळा प्रतीकात्मक रंग असतो तिकडे प्रत्येक क्लान–(जमात) अभिमानाने आपल्या टायचा रंग प्रदर्शित करते–तुमच्या देशात असे काही आहे काय ?'

मी त्याला पुणेरी पगडी, राजस्थानी साफा, शिखांची दाढी व बंगाली कुडता याबद्दल सांगितले पण हे त्याला पटेना त्या पगडीचा मान ठेवण्याला किती पुणेरी लोक तयार होतील ? मी चूप बसलो त्याला जरा ताव चढला ' अरे ब्रिटिश साम्राज्यावर सूर्यास्त होत नाही, आम्हाला सगळे विश्व मोकळे इथे अभ्यास करून आम्ही आफ्रिका-न्यूझीलॅंड, कॅनेडा, ऑस्ट्रेलिया– फार काय तुमच्या भारतात मानाने जगू, तुम्ही कोठे जाणार ?'

' अरे, याकरताच तर आम्ही सत्याग्रह केला आमचा भारत स्वतंत्र झाल्यावर आम्ही पण कुठेही जाणार व आमच्या देशात ठरलेल्या लोकांनाच येऊ देणार–' ' भारत काय स्वतंत्र होतो– आम्ही राज्य केले म्हणून इतका विचार करणारे तयार झाले'– स्टीवन्सनने मला डिवचले पुढे काही दिवसांनी हिटलरने पोलंडवर स्वारी केली व बोलणाऱ्यांची विचारप्रणाली बदलू लागली

ता १४–३–१९४० ला जनरल डायरचा मुहम्मदसिंग आझाद यानी खून केला सगळीकडे याबद्दल गवगवा होईल असे वाटले भारतात तसे झाले असते पण इग्लडमध्ये तसे झाले नाही ही बातमी पण वर्तमानपत्रात एका कोपऱ्यात आली कॉलेज क्लबमध्ये बसल्यावर माझा एक इटालियन मित्र डेल डुका म्हणाला, 'ते असे चालावयाचेच ब्रिटिश लोकानी भारतीय लोकाना खूप छळले, अमानुष कृत्ये केली त्याचे उट्टे कुणीतरी काढणारच हे पाहा ब्रिटिश वर्तमानपत्रातून हिटलरबद्दल व्यगचित्रे काढतात त्याला हसतात अशाने का हिटलरशाही नष्ट होणार ? म्हणे फ्रान्सला मदत करू ! फ्रान्सने म्हणे मेजिनो-लाईन बांधली जर्मनी ती ओलांडू शकणार नाही यांना इतके कळत नाही की हिटलर आणि त्याचे सेनापती इतके का मूर्ख आहेत की ते त्या तटबदीवर जीव देतील ते सरळ बेल्जियम–हॉलडकडून आत शिरतील फ्रान्स एकटे राष्ट्र दोन बाजूने लढू शकणार नाही वरून जर्मनी शिरेल व खालून इटाली घुसेल या दुतर्फा मारामारीत फ्रेंच लोक नेस्तनाबूत होतील व ब्रिटिशाची पोकळ मदत अगदीच फोल ठरेल चेंबरलीनसारखा मुत्सद्दी दाती तृण धरून अगदी केविलवाण्या तऱ्हेने म्युनिचला काय जातो, सह्या काय करतो, आमच्या आयुष्यात युद्ध टळले, असे काय म्हणतो– अगदीच पोरखेळ लीग ऑफ नेशन्स इग्लड आणि फ्रान्सची बटिक होती सुडेटनलेड जर्मनीच्या समतीशिवाय दान करण्याची काय घाई केली व पोलड आणि झेकॅस्लोवाकिया, किंवा अबिसिनिया याबद्दल या देशाचा घात होत असताना, लीग ऑफ नेशन्स अगदी मूग गिळून बसली होती '

३–५–४० ला याबद्दल पुन्हा वाद सुरू झाला ब्रिटिश म्हणाले की, आम्ही भारतात विद्याप्रसार केला व जलसिंचन योजना आखली भारतीय कॉंग्रेस तर एका ब्रिटिश गृहस्थानी सुरू केली त्याच दिवशी रात्रीला सर्व परदेशी विद्यार्थ्यांची बैठक झाली आमचे रेक्टर 'लार्ड परसी' मुख्य पाहुणे होते भारत वर्षाच्या परिस्थितीबद्दल बरीच चर्चा झाली भारत जर स्वतत्र झाला तर इग्लडला फायदा होईल, असे आम्ही प्रतिपादिले त्यानी स्पष्ट मत दिले की, भारताला स्वातत्र्य देणे या समयी अयोग्य होईल भारतीय जनता स्वातत्र्याला योग्य नाही स्वातत्र्य दिल्यामुळे जर्मनीशी युद्ध जुपणार नाही, ही खुळचट कल्पना होय शिवाय ब्रिटिश, भारतीयाना जर्मन लोकापेक्षा चागले वागवितात जर्मन वसाहतीतली परिस्थिती फारच वाईट आहे

त्याच रात्री जर्मन रेडिओवरून गोबेल्सचे भाषण झाले त्याने सागितले की, माकड आणि हिंदुस्थानी यात काही फरक नाही ब्रिटिश स्वतःची तारीफ करतात मग आज शभर वर्षे राज्य करून इतके दारिद्र्य व अज्ञान भारतात का राहिले ? इग्लड गेल्या ३०० वर्षांपासून युद्ध करीत आला, त्यांनी युद्ध न करण्याबद्दल दुसऱ्याना उपदेश देऊ नये फ्यूररच्या ३०–१–१९४० च्या भाषणाची आठवण करून त्यांनी सांगितले की, ईश्वर त्यानाच मदत करतो की, जे स्वतःच्या शक्ती व शौर्यावर विश्वास आणि भरवसा ठेवतात जगात कोणी कुणाला फुकट मदत करीत नाही. युरोपातील युद्धामुळे पूर्व युरोपियन

राष्ट्रांना फायदा होईल इंग्लंडचे आर्च बिशप उपदेश करतात उलटी कॉलर लावून कुणी आकाशात ईश्वर व त्याचा बाप आहे असा सांगणारा खुळाच असला पाहिजे काही ड्यूक आणि मारक्वीस म्हणतात की, आमच्या पूर्वजाने ही जमीन जिंकली व किल्ले बांधले पूर्वज गेले, त्यांच्या मुलाबाळांत शौर्य तर नाहीच, पण साधी हिम्मत दिसत नाही अशा-कडून आताच्या त्याच्या प्रजाजनांनी आपल्या जमिनी हिसकावून घेतल्या पाहिजेत असे करण्याला हिटलर मदत करील व त्यांना त्या गावचा 'गॅझेटियर' नेमील मि हेरी पोलीटच्या एका व्याख्यानाचा उल्लेख केला यात मि पोलीट म्हणाले होते की, कोण्या एका राष्ट्राने हजारो मैल लांब असलेल्या दुसऱ्या राष्ट्रावर वसाहत म्हणून राज्य करणे योग्य होणार नाही– त्यांना तो हक्कच नाही– त्यामुळे ब्रिटन पुढे गरीब होईल

या गोबेल्सच्या भाषणाची प्रतिक्रिया चोहोकडे झाली हिटलरने जोराने ओरडून सांगितले होते की, 'मला धक्का लागला किंवा जर्मनी दुखावला तर मी सर्व जगाला जळत्या चितेत लोटूनच मरेन ब्रिटन युद्धात पडले की, त्यांच्या वसाहती संपल्या असे सम-जावे' सगळ्या वर्तमानपत्रातून ही अक्षरे ठळकपणे आली दुसऱ्या दिवशी चोहोकडे त्याबद्दल चर्चा सुरू झाली वर्तमानपत्रांनी गोबेल्स आणि हिटलरच्या विधानांची थट्टाच केली, पण काही वयस्क गंभीर होते आमच्या कॉलेजचे एक प्रौढ विद्यार्थी मि पाल एके दिवशी माझ्या प्रयोगशाळेत आले इकडच्या-तिकडच्या बऱ्याच गप्पांनंतर युद्धवार्तेकडे वळले. ब्रिटिश सैन्याची मोठी तुकडी जनरल आयरनसाईडच्या हाताखाली फ्रान्समध्ये उभी होती मेजीनो लाईनच्या पलीकडे जर्मनीने झिग्फ्रीड लाईन नावाची तटबंदी केली होती डिसें-बरच्या नाताळात जर्मन सैन्यांनी तेथील खंदकांत प्रार्थना केल्या होत्या 'स्टील नाख्ट, हायलिग नाख्ट' (शांत रात्र व पवित्र रात्र) असा ते घोष करून येशू ख्रिस्ताची प्रार्थना करीत होते या प्रार्थनेची आठवण करून मि पाल म्हणाले की, जर्मनीच्या अशा पोकळ प्रार्थनेकडे लक्ष देऊ नये ते लोक फार शिस्तप्रिय, फार कष्टाळू व फार व्यवस्थित आहेत, पण तितकेच निर्भय पण आहेत ते हट्टास पेटले की, गावेच्या गाव बेचिराख कर-तील इंग्लंडची तयारी नाही सुरवातीला खूप मार खावा लागेल चर्च, शाळा, कॉलेज, प्रयोगशाळा नेस्तनाबूद करतील आज तुम्ही इथे पदव्युत्तर शिक्षण घेण्यास आलात सगळे बेचिराख झाले, इंग्लंड कमकुवत झाला तर तुमचे राष्ट्र स्वतंत्र होईल तुमची भरभराट होईल इथून नेलेल्या ज्ञानाचा अभ्यास करण्याला आम्ही ब्रिटिश तुमच्या देशात येऊ काही असो, युद्ध झाले तर ब्रिटन तिसऱ्या दर्जाचे राष्ट्र होईल– हे लक्षात ठेवावे'

युद्धातसुद्धा जुन्या कल्पना पण आधुनिकता– हेनकाक म्युझियममध्ये जुन्या चाली-रीतीचे चित्रित प्रदर्शन भरले बरीच व्याख्याने झाली हे सगळे ऐकल्यावर भारतात ज्या काही जुनाट कल्पना व विचार आहेत त्याप्रमाणे तिथे पण आहेत, असे दिसले या कल्पना डेन्मार्कलासुद्धा तशाच होत्या घरात मूल झाले की, गावात खिरापत वाटतात या खिरा-

पत्तीत लोणी, मीठ आणि अंडी असतात. डेन्माकला भूतबाधा होऊ नये, याकरिता पाळण्यावर धारेचे लोखंड लावतात. त्यावर लसूण ठेवतात. मुलाला जोपर्यंत बाप्तिस्मा होत नाही तोपर्यंत आरशात डोकावू देत नाहीत. मुलाला प्रथम चांगल्या बाईनेच धरले पाहिजे. पाळण्यात मूल नसल्यावर त्याला हालवू नये. जन्म झाल्याचा केक नर्सने बाहेर नेल्यास भिन्न लिंगियालाच द्यावी (म्हणजे मुलगी झाली असेल तर पुरुषाला व मुलगा असेल तर बाईला द्यावी लागेल) शनिवारी जन्मलेले मूल चांगले नसते– अशा मुलाच्या कल्पना.

पुलावरून जात असताना खालून गाडी जाणे योग्य नाही. घरात मांजरापेक्षा कुत्रीच बरी. कोणतीही गोष्ट खरी, असे सांगताना 'टच्‌वुड्' (लाकडाला हात लावावा) नूतन वर्षारंभी रात्री बारानंतर काळा माणूस मीठ आणि कोळसा घेऊन बाजूच्या दाराने घरात शिरल्यास ते वर्ष शुभ होणार आहे.

या अशा खुळचट विचारधारा पसरल्या होत्या. या सोबत भारतात दिसणार नाही तसे स्वतंत्र वातावरण होते. इथे बेकारी दिसली, पण भीक मागणारे कुणी दिसले नाही. एखादा कधी भेटावयाचा व म्हणावयाचा, 'काय मिस्टर, ब्रेड चावावयाला दहा पैसे देता का !' सरकारी यंत्रणा बेकारीकरिता राबत होती. जिथे कामगार काम करेल तिथून काम केल्याचे कार्ड मिळे व बेकारीबद्दल काही रक्कम जमा होई. याशिवाय दवापाण्याकरिता तर डॉक्टरांचे पॅनेल होतेच. बेकार झाला की, विशिष्ट विभागातील केंद्रावर जायचे व 'डोल' घ्यावयाचा. जोपर्यंत दुसरी नोकरी नाही तोपर्यंत काही प्रमाणात व काही दिवस हा डोल मिळे. त्यामुळे तो कामगार उपाशी मरत नसे. त्या 'डोल' मध्ये त्याच्या पत्नी व मुला-बाळांच्या नावाने पण काही रक्कम मिळे. त्यामुळे भारताप्रमाणे तिकडे बेकारी इतकी जाचक नव्हती. कामगारांची नोंदणी करणाऱ्या केंद्रावर प्रत्येक सुदृढ मनुष्याची यादी राही व तो काय काम करू शकेल याची नोंद असे. बहुतेक गिरणीमालक किंवा इतर मालक इथूनच कामगार नेत. त्या कामगारांची यामुळेही हमी मिळे. त्याने काही गडबड केल्यास ती नोंद इथे राही व पुढील कार्याला तिकडे लक्ष देण्यात येई. काम करताना कामगार एप्रन घाली. सकाळी रोज झाडू देताना चिरूट किंवा पाईप तोंडात घेतलेले मेहतर मला 'गुड्‌ मॉर्निंग' म्हणीत. एके दिवशी रविवारी ते सगळे माझ्यापेक्षा उत्तम सूट घालून चर्चकडे जाताना दिसले. कामाकरिता वेगळा वेश व इतर वेळी सगळे एकत्र येत.

लग्नाचे निर्बंध सैलच होते. पण मोठ्या व सुशिक्षित घराण्याची मुलगी बहुधा शिकलेल्याशीच लग्न करी. सोशल क्लबमध्ये मुले–मुली भेटत. मुलीची आई थोडेफार लक्ष ठेवून चांगल्या मुलाबरोबरच मुलीला फिरावयाला पाठवी. काही महिने फिरल्यानंतर लग्न ठरवीत. या दरम्यान सिनेमे व चुंबन हे प्रकार उघडच होते. सायंकाळी सात नंतर रस्त्याच्या बाजूच्या दुकानातील कुठल्याही दाराजवळ बघा– युगुल असे मिठी मारून चुंबन

घेन उभे असताना दिसत लंडन येथील हाईड पार्क नावाच्या भव्य बागेत रेनकोट आंथरून युगुले पहुडलेली नेहमी दिसत दिसल्यास तिकडे कुणी लक्ष देत नसे, पण मुली सहजा-सहजी चुंबन घेऊ देतील, पण पुढील पायरी चढू देणार नाहीत मुलगा मुलीच्या बापा-जवळ मुलीला मागणी घालेल पुढे लग्नसोहळा होईल चर्चमधील लग्न चांगले समजले जाते मुलगा आपल्या मित्रासोबत पांढरे फूल कोटावर लावून चर्चमध्ये येतो मुलीचे वडील मुलीला घेऊन येतात मुलीला पांढरा फ्रॉक तर असतोच पण डोक्यावरून बारीक जाळीचा पदर घेतलेला दिसेल पाद्र्यांनी, 'तू हिला आपली पत्नी म्हणून मरेपर्यंत घ्यावयास तयार आहेस ?' असे विचारताच तो 'हो' म्हणतो 'टिल डेथ डू अस पार्ट' असे म्हणून तिच्या बोटात अंगठी घालतो ती त्याच्या बोटात अंगठी घालते मुलाचा मित्र प्रथम तिचा मुका घेतो चर्चमध्ये बरीच मंडळी जमलेली असतात मुलगा व मुलगी हातात हात धरून परतताना सर्व मंडळी त्यांच्यावर बारीक कागदाचे गोल गोल असलेले रंगीत तुकडे फेकतात नंतर नाच होतो मद्यपान आणि काही खाद्य हे रिसेप्शनला दिले जाते बस् ! इतके झाले की मुलगा आणि मुलगी मधुचंद्राकरिता कुठेतरी जातात चर्चच्या लग्नाला खर्च येतो. पण रजिस्टर लग्ने बरीच होतात इथे तिथी नाही, वार नाही, मुहूर्त नाही, गोत्र नाही, पत्रिका नाही– केवळ लग्नच आहे

आपल्याकडील अधिक मासाप्रमाणे इथे 'लीप ईयर' च्या फेब्रुवारी महिन्याच्या २९ व्या दिवशी वाटेल त्या मुलीने वाटेल त्या मुलाला ठरवावे, असा दंडक आहे त्या दिवशी बरीच लग्ने होतात लग्नानंतर बहुतेक मुली–मुले स्वतःचा संसार वेगळा करतात वडि-लांना मधून मधून भेटतात एके दिवशी माझे मित्र जॉन्सन फार आजारी पडले त्याचा मुलगा त्यांना भेटावयाला आला थांबला नाही जाताना आईला म्हणाला, 'ममी, वडील बरे होतील ? मी जातो' दुसऱ्या दिवशी मि जॉन्सन मेले मुलगा आईला म्हणाला, 'ममी, मला खेद आहे, पिताजी गेले'

या अशा राहणीमुळे वार्धक्य फार कष्टी होते आजारी–म्हाताऱ्या आई–वडिलांना दवाखान्यात ठेवतात कित्येक सुखवस्तू म्हातारे घर सोडून हॉटेलमध्ये दिवस काढतात. म्हाताऱ्यांची केविलवाणी स्थिती असते कारण सुनेला सासू–सासरे नकोत चर्चमधील सर्वांत जास्त प्रेक्षकाचा भरणा म्हणजे म्हातारे ईश्वराजवळ करुणा भाकावयाला येतात आणि बरेच तरुण मुलींच्या शोधार्थ येतात

भारतात 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता' अशी एक म्हण आहे पण इंग्लंडमध्ये खरोखरच बायकांची पूजा होते 'यस डियर–' शिवाय नवरा बायकोला संबोध-णार नाही कुठेही गेले तरी अग्रस्थान स्त्रियांना मिळते खरी स्त्रीपूजा तिथेच आहे भांडी घासणे पुरुषांनी बायकांच्या मदतीने करावे नवऱ्याने मदत केली नाही, मारझोड केली की सोडचिठ्ठी ठरलेलीच या कायद्याने, शिक्षणाने व कामामुळे स्त्रियांना चिक्कार स्वातंत्र्य आहे

इंग्लंडमधील सर्वांचा मदतनीस ' पुलीस ' होय तेथील पुलीस ६ फुटाच्या वर उचीचे असतात सुशिक्षित असतात हळूहळू इकडून तिकडे फिरून सगळीकडे न्याहाळीत असतात कधीही त्याना मदत मागा–कधी हिडीसफिडीस नाही हसत मदत करतील कमरेभोवती एक लाकडी दडुका एवढेच त्याचे शस्त्र, पण त्याचा उपयोग फारच थोडा करावा लागतो कधी हप्ता नाही सिगरेट नाही कामावर असताना सिगारेट किंवा इतर व्यसने करताना पुलीस–(ज्याला 'बॉबी' म्हणतात) दिसले नाहीत

जेलखाने चागले गुण कमविण्याकरिता असतात अशी भावना असल्यामुळे तेथे स्वच्छ मुबलक जागा, उत्तम अन्न, व्यायाम व भरपूर नवीन कामे शिकण्याची व्यवस्था असते तिथून बाहेर पडल्यावर मार्ग चुकलेला सुमार्गीच लागतो कोर्ट कचेऱ्या भारताच्या मानाने कमी, पण न्यायाधीशाबद्दल किती मान असतो ! तसे ते निर्भीड पण असतात भारतातील न्यायपद्धती ही ब्रिटिशाची आपणाला देणगीच होय, असे वाटू लागते

ब्रिटिशाची सर्वात खटकणारी कोणती पद्धत असेल तर त्याची विशिष्ट वागणूक ओळख असल्यास 'हाऊ डू यू डू–' (आपण कसे आहात) हे ठरलेले वाक्य पण याच्या शेवटी 'डू' एवढेच उच्चारून तो पुढे जातो ओळख झाल्याशिवाय तो कधीही बोलणार नाही समोर वर्तमानपत्रात डोके खुपसून बसेल बोलायचे तर सुरवात पाणी पावसावरूनच होईल 'इट इज ऑफुल–' (फार वाईट आहे) म्हणजे ढग आले किंवा पाऊस पडत असेल तर–इंग्लडच्या हवेत केव्हा पाऊस पडेल याची निश्चिती नसल्यामुळे अशा बोलण्याला नेहमीच वाव मिळतो

थडी असल्यामुळे रोजची आघोळ नसतेच सकाळी मुखमार्जन व दाढी एवढाच कार्यक्रम व नतर लगेच ब्रेकफास्ट कपडे करताना मोजे, जोडे व पँट एवढे प्रथम व नतर पुढील वेशभूषा बायका तोडाला पावडर व रग फाशीत तासन् तास बसतात हाताला काळा कोळसा लागला तर पाण्याने धुणारे थोडेच सरळ थुकून ते पुसतील पोस्टातील तिकीटाला पाण्याने भिजविणे किंवा डिक लावणे इकडे माहितच नाही सरळ तिकीट जिभेवर घेऊन, थुकीने ओले करून डकवितात पोस्टात बहुतेक बायकाच क्लार्क असतात व मी नेहमी हा तिकीट चाटण्याचा कार्यक्रम पहात असे

जेवताना मेजवानी असली की 'डिनर जॅकेट' हा कार्यक्रम असावयाचाच हॅट बाहेर काढूनच आत जायचे टेबलावर बसल्यावर डावीकडे काटा व उजव्या हातात सुरी व पुढे काट्याने जेवण सूप पिताना आवाज अगदी नाही सूप प्लेटीचा आपल्याकडील भाग उचावूनच सूप मोठ्या चमच्याने घ्यायचे स्फेगेटी– (शेवया) काट्याने गुडाळून तोंडात टाकावयाच्या दर वेळी गळ्याभोवती असलेल्या टॉवेलने तोंड पुसायचे अशा वेळी हावरटपणा करीत नाहीत उपाशी राहतील आणखी मागणार नाहीत आपल्याकडे जेवताना श्लोक म्हणतात तिकडे विनोदी गप्पाच सागतात प्रथम 'हियर दज टू दी किंग–' (हे राजाला) म्हणून एक घोट मदिरा घ्यायची व नतर कित्येकदा नृत्य असे

येथील नृत्य सार्वजनिक असल्यामुळे प्रत्येकाला नाचात भाग घेताना व स्त्री हाताळताना आगळाच आनंद होतो

अशापैकी हे जीवन अठरा महिने जगलो संशोधनाचे कार्य संपत आले होते माझे गाईड श्री मेक्लेगन याना पहिला ड्राफ्ट दाखविला आता प्रश्न टायपिंगचा इंग्लंडला टायपिंग महाग पडते मला ती अडचण होती नशिबाने ३ पौंडाला एक सेकंडहँड ऑलीवर टाईपरायटर मिळाला तोसुद्धा हप्त्याने पैसे देण्याचा रोज पंधरापर्यंत पाने टाईप करू लागलो एकदरीत चारशे पाने टाईप केली बाहेर पानामागे दहा पेन्स पडले असते थीसिस् बांधून घेतले आता प्रश्न फीसचा उद्‌भवला लंडनला श्री राघवेन्द्रराव याना काकुळतीचे पत्र लिहिले त्यानी २० पौंड पाठविले फी दिली १५ दिवसानी बाजूच्या प्रोफेसरने सांगितले की बाहेरील परीक्षकाना निबंध पसत पडला तर ते मौखिक घेणार नाहीत रजिस्ट्रारने रुकार दिला

टाईपरायटर माझे मित्र श्री आसवाल्ड कुक् यांना दिला बांधाबाध केली १—मे ४० ला सुरू केलेले टायपिंग संपवून आता ७ जून ४० ला परीक्षकांचा निकाल आला होता लंडन येथील प्रसिद्ध वैज्ञानिक साप्ताहिक ‘ नेचर ’ मधे माझ्या संशोधनाचा पहिला गोषवारा आता प्रसिद्ध झाला होता व मला लंडनबद्दल विश्वविद्यालयाकडून भेटीचे आमंत्रण आले परीक्षकांचा रिपोर्ट श्री राघवेन्द्रराव यांना कळविला त्याचे पत्र आले ‘आय ॲम प्राऊड ऑफ यू ’ (तुमच्याबद्दल मला अभिमान आहे )

ता १२ जून ४० ला न्यू कॅसल शहर सोडले सोबत माझे मित्र आसवाल्ड हलपर्यंत होते स्टेशनवर माझे बंधु व श्री कोरे आणि बरीच मंडळी आली होती या १९ महिन्यात अगदी खिन्न व अर्थहीन वातावरणातून मी निघालो आल्याप्रमाणे संशोधन करून डॉक्टरेट मिळविली आता बेकारीच्या अंधःकारात ‘कुठे ठाव लागतो का—’ अशा विचाराने पीडित होतो पण हे ५४७ दिवसाचे स्वप्न अगदी सिनेमाप्रमाणे डोळ्यासमोर भराभर धावत होते डोळे थोडे पाणावले व तिकडे गार्डच्या शिटीमुळे गाडी सुरू झाली व मी भानावर आलो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२८
२५९९५
१५७०८

१९३९ साली लंडनला असताना विंडसर गावी गेलो होतो तिथूनच जवळच्या एटन खेड्याला भेट दिली तेथील प्रख्यात ' सार्वजनिक ' शाळेत अमीर आणि उमराव यांचीच मुले शिक्षण घेत इंग्लंडचा इतिहास ज्यांनी घडविला त्या सगळ्या व्यक्ति एटन किंवा हॅरो याच शाळांतून शिक्षण घेतलेल्या होत्या साम्राज्य विस्ताराचे विशेष बाळकडू घेऊन त्या राष्ट्राचे नेतृत्व करीत होत्या शाळेतील ग्रे यांची एलिजी वाचली ती तेथील भिंतीवर कोरली होती बाहेर प्रांगणात लांब शेपूटधारी काळा कोट व हॅप् हॅट् परिधान केलेली लॉर्ड, मारक्वीस, बायकांउट, अर्ल आदि उमरावाची मुले फिरत होती त्याना ' डेली मिरर ' या दैनिकाच्या त्याच दिवशीच्या अंकातील कात्रणे दाखविली हिटलर ब्रिटिश वसाहतशाहीचा नाश करणार अशी वाक्ये होती एका १४ वर्षीय तरुणाने उत्तर दिले, ' दी सन विल नेवर सेट ऑन दी ब्रिटिश एम्पायर '

या वाक्याचा माझ्या मनावर पक्का ठसा बसला या लहान तरुणाला केवढा आत्मविश्वास होता ! तसे त्या काळच्या भारतात हायस्कूलच्या भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांना हा प्रश्न परीक्षेला नेहमीच येत असे नागपूरला ब्रिटिश सरकारने काही भारतीय मंत्रिमंडळात घेतले व सेमिनरी हिल्सवरून शासन सुरू केले तरी पण ' सूर्यास्त ' होणार नाही अशीच अपेक्षा होती, त्याच काळात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची मुक्तता झाली होती ' रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळे ?' हे गीत नागपूरच्या आमसभात काही तरुण गात होते तिकडे शुभ्र टोपी परिधान केलेल्या दलांची माणसे ' हम हमके किया— ' या भावनेने फिरत होती अशा समयी, कॉंटोरासो या बोटीने मी मुंबईहून व्हेनिसला निघालो बोटीवरचे इटालियन ऑफिसर व खलाशी यांची मन:स्थिती ब्रिटिशांविरुद्ध होती ' लवकरच अस्त होईल, ' ' आम्ही तुम्हाला मदत करू ' अशी

वाक्ये ऐकू येत ब्रिटिशी शहरात प्रवेश केला, त्यावेळी शहरातील प्राथमिक शाळेतील मुले पळत आमच्याकडे आली होती त्यांनी लांब केसाची, कपाळाला कुंकू लावलेली, रेशमी साडी परिधान केलेली स्त्री कधी पाहिली नव्हती 'इंडियाना इंडियाना–' असे ओरडत ती मुले आमच्या सोबतच्या कु शेरू डुगाजी, शांता नारूळकर व मिसेस नारायणराव यांना झोंबू लागली आणि त्यांचे लांब केस व रेशमी साड्या हाताळू लागली. समोर भिंतीवर मोठी भित्तीपत्रके होती, ज्यावर 'डूचे-डूचे-डूचे' कोरलेले होते काळा गणवेष धारण केलेल्या युवकांचा मुखिया आला, हस्तांदोलन केले 'इंडियाना, ब्रिटिशनो, इटालियाना येस्, नो कोलोनीज' असे बरळला

पॅरिस शहरात इंग्लिश भाषेत प्रश्न विचारल्यास फ्रेंचमधेच उत्तर मिळे व हळूच ते ब्रिटिशांची नालस्ती करताना दिसत न्यूकासलच्या वास्तव्यात ब्रिटिश मुली व बरेच रहिवासी आमच्याशी अगदी फटकून वागत पण त्याच सुमारास जर्मन युवतींचा बराच मोठा तांडा आला होता त्यांच्या समवेत जर्मन युवकही होते युवती अगदी घरोघरी दिसत त्यांना इंग्रजी जेमतेम येत असे, पण भारतीयांशी त्या फारच सलगी करत अगदी अंगाखांद्यावर हात देऊन चालत भारतातील शहरे, भाषा, आचार, विचार याबद्दल कुतूहल दाखवीत एकीने भारतातील जर्मन कंपन्यांबद्दल विचारणा केली होती अगदी हसून–खिदळून, सलगी करून अशी संभाषणे होत तिकडे जर्मन युवकांचे जथे मोठमोठी वाद्ये घेऊन, नाचत बागडत ऱ्हाईन नदीच्या खोऱ्यातून व समुद्र किनाऱ्यावरून फिरत नंतर कळले की, या वाद्ययंत्रात कॅमेरे होते व वाद्याची बटणे दाबली की, चित्र टिपले जात असे याच खोऱ्यात प्रख्यात ब्रिटिश बॅटलशिप 'प्रिन्स ऑफ वेल्स' तयार केली जात होती म्युनिक शहरी चेंबरलेनवर हिटलरने मात करून बेनेश याचा बळी घेतला, तरी वाटे की 'अस्त' होणार नाही आमच्या कॉलेजचे रेक्टर लॉर्ड यूस्टेस परसी एका बैठकीत म्हणाले की, 'अवर मिनिस्टर्स आर नॉट रुलिंग फॉर दी लिक्विडेशन ऑफ दी एम्पायर अँड लीविंग ए बॅकवर्ड इंडिया टू दी विंड' ( आमचे शासनकर्ते साम्राज्याचा अस्त करण्यासाठी नाहीत व ते अपरिपक्व भारताला वाऱ्यावर सोडणार नाहीत )

रोजच्याच वर्तमानपत्रात हिटलर, गोबेल्स किंवा गोरिंगच्या भाषणाचे उतारे येत असत आम्हाला या जगात राहण्याला, जरा पसरण्याला थोडी जागा हवी' 'आम्ही ब्रिटिशांच्या विरुद्ध नाही ते उत्तम शासक आहेत– त्यांनी साम्राज्य स्थापन केले– आम्ही त्यांचे कौतुक करतो त्यांच्या राजघराण्यातील मंडळी आमचीच आहेत त्यांनी आमच्याबद्दल पूर्ण सहानुभूती दाखविली– पण जर युद्ध झाले, आणि त्यांनी आमच्या विरुद्ध युद्ध पुकारलेच तर याद राखा, हा हिटलर गेल्यास सगळे जग बेचिराख होईल ब्रिटिश साम्राज्य केव्हाच बुडेल'

या अशा भाषणाची ब्रिटिश जनता थट्टा करी चार्ली चॅपलीनने हिटलरबद्दल करमणुकीची फिल्म काढली इंग्लंडमध्ये 'हॅंग ऑन दी झिग्फ्रीड लाईन' 'आम्ही झिग्फ्रीड तटबंदीची पर्वा करीत नाही' अशी गाणी गायली जात होती तरी शहरात कुठे-कुठे खंदक मात्र खोदलेले दिसले व टाईन नदीच्या किनाऱ्यावर उंच तार लावलेले भव्य फुगे हवेत सोडले गेलेले दिसले गेल्या युद्धात जर्मनीने विषारी वायूचा उपयोग केला म्हणून प्रत्येकाला गॅस मास्क द्यावा अशी मोहीम सुरू झाली होती याच सुमारास जून महिन्यात माझ्या कॉलिजातील एक वयस्कर विद्यार्थी म्हणाला, 'जर्मनीची तयारी जबरदस्त आहे त्याची वायुसेना अजस्त्र असून, येणारे युद्ध हवेतच जिंकले जाईल इंग्लंडची अमाप हानी होईल आमच्या विश्वविद्यालयाचे खूप नुकसान होईल साम्राज्य तर जाऊद्याच, पण पुढे आमचे स्थान अगदी जगातील तिसऱ्या चौथ्या राष्ट्राच्या पातळीवर येईल व सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आज तुम्ही येथे ज्ञानोपार्जनाला आला आहात आमच्या प्रयोगशाळा नष्ट झाल्यावर आम्हाला भारतात येऊन शिकावे लागेल' ही दुसरी भविष्यवाणी एकाच वर्षात ऐकली, तसा जरा बुचकळ्यात पडलो

सर्वांचा निरोप घेऊन निवासस्थानाकडे निघालो वर्तमानपत्राचे वाचन व माझे सडकेवर येण यात ४० मिनिटाचा अवधी गेला होता तेवढ्यात रस्त्यावरून पोलिसपहारा सुरू झाला व रिझर्व सैन्याची पथके स्टेशनकडे जाताना दिसली दुपारभर या पथकांची ये–जा चालली होती ठिकठिकाणी सैनिकाना निरोप दिला जात होता प्रेयसीचे चुंबन जागोजागी दिसत होते जनतेत देशाभिमान, राष्ट्रप्रेम यांचे भलतेच उधाण आले होते म्हातारे डोळे पुसत 'गिव्ह देम हेल माय बॉय' म्हणत हुंदके देत मुलाला निरोप देत होते सैनिक चांगले प्यायलेले होते. 'रोल आऊट दी बॅरल' किंवा 'हॅंग आन दी सिग्फ्रीड लाईन' किंवा रन रॅबिट रन–' ही सामूहिक गाणी चोहीकडे गायली जात होती कडेला पिऊन झिंगलेले काही नवसैनिकही दिसले

रस्त्यावरील काही दिव्यावर काळा रंग फासला जात होता घरातील काचेच्या तावदानावर काळा रंग व काळा कागद लावला होता दुकाने लवकर बंद होणार म्हणून खरेदी भराभर होत होती कागद, इंक, मेणबत्त्या, आगपेट्या या वस्तू भराभर विकल्या गेल्या या सर्व रांगातून मार्ग काढीत हॉटेलवर आलो जेमतेम सामान बांधले व दिवस असतानाच स्टेशन गाठले जसजसा दिवस मावळू लागला तसतसा अंधार जास्तच जाणवला रस्त्यावरील दिवे लागलेच नाहीत मधूनमधून अंधुक प्रकाश दिसे तोपण रस्त्याच्या एका कोपऱ्याच्या बाजूला होता स्टेशनातील सर्व पाट्यावर रंग फासला होता शहराचे नाव, नकाशे, मार्गांचे नाव या सर्वांवर रंग फिरविला होता त्या अंधाऱ्या प्लॅटफॉर्मवर बसून आदल्या दिवशीच्या झगझगाटाची, प्रकाशाची आठवण करीत होतो आगगाडी आली इंजिनचा प्रकाश थोडासा रूळावर पडत होता डब्यात अंधार होता रिझर्व्ह बेंचावर ब्लॅंकेट घेऊन पाय पसरले सैनिक शिरले आरडाओरड झाली, पण मी उठलोच

नाही सकाळी न्यूकासलला ८ ला उतरलो सुट्टीचा दिवस होता दुकाने बंद होती पण प्रत्येक तावदानावर काळा रंग होता व स्टेशने आणि रस्त्याची नावे लुप्त झाली होती डिगवर आलो व मला पाहून लँडलेडी खूष झाली 'आय ॲम हॅपी, यू आर बॅक–आय वॉज सो वरीड'

थोड्याच वेळाने एरिया वॉर्डर घरी आला सर्वांची नावे टिपली विमान हल्ल्याच्या समयी कोणत्या खंदकात जावे याची आठवण करून दिली दुसऱ्या दिवशी रांगेत उभे राहून गॅसमास्क मिळविला प्रत्येक नागरिकाने चोवीस तास हा डबा शरीरावर बाळ-गावा, अशी ताकीद होती कॉलेजात वॉर्डन नेमले गेले जवळच्या खंदकात जाण्याबद्दलचे ड्रिल सुरू झाले दलप्रमुख एक कंदील, पाण्याची बॅग, काही बिस्किटे, फर्स्टएड, एवढे सामान घेऊन एका रांगेत सर्वांना खंदकात बसवी व ऑल क्लियर झाले की, सर्व परत येत ठिकठिकाणी सैन्यभरतीचे फलक आले बरेच विद्यार्थी तिकडे जाऊ लागले मीही गेलो व रणगाडा पलटणीत नाव नोंदविले दोन महिने परेड होऊन नंतर सेकंड लेफ्टनंट असा हुद्दा मिळणार होता पंधरा दिवस नुसती पायदळाचीच परेड झाली नागपूरला मी आर्मी इन इंडिया रिझर्व ऑफिसर्सच्या पथकात दाखल झालो होतो व १० व्या बटालि-यनमध्ये सार्जंट होतो शिवाय संघात परेड केलीच होती या सर्वांचा फायदा झाला मला परेडवर मान मिळू लागला, आणि दोन महिन्याचे पायदळ ट्रेनिंग एक महिन्यातच करावे, असा आदेश आला अवघ्या ३० दिवसात ब्रिटिश सैन्यात सेकंड लेफ्टनंट होणार होतो योग बरा होता तसे झाले असते तर एक तर डंकर्कला मेलो असतो किंवा जगलो असतो तरी कमीत कमी मेजर जनरलपर्यंत चढण्याचा चान्स होता सैन्यभरतीबद्दल मी कॉलेजला कळविले नव्हते लॉर्ड यूस्टेस पर्सी यांनी सर्व संशोधनकर्त्यांना बोलविले ब्रिटिश सरकारने वैज्ञानिक कोअर काढण्याचे ठरविले होते आम्हापैकी प्रत्येकाने तिथे जावे असा आदेश त्यांनी दिला माझ्या युनिटचे पत्र त्यांना आलेच होते त्यांनी माझी चांगलीच कानउघाडणी केली इंग्लंडला डिग्री घेण्यासाठी म्हणून आल्यावर ही हडेलहप्पी करताना परवानगी का घेतली नाही, असा सवाल केला त्यांनी ताबडतोब आमच्या बटालियन कमांडरला पत्र घातले व माझ्या सैन्य-महत्त्वाकांक्षेवर पाणी पडले पुढे इतर विद्यार्थ्यांना कमिशन मिळाल्यावर मला फार वाईट वाटले

कॉलेजातील माझे प्रयोग रात्रीपर्यंत चालत मला डिपार्टमेंटची किल्ली देण्यात आली होती मी नेहमीच रात्री दहापर्यंत काम करीत असे पण आता ब्लॅक आऊट होता घरी अंधारात अगदी चाचपडून जावे लागे मी याकरिता दिवसा पावलांनी अंतर मोजले व मधील खांब, खड्डे, फुटपाथ, ट्रामलाईन, यांची नोंद मनात ठेवली, तरी पण अधूनमधून कुणाचा तरी धक्का लागत असे एके दिवशी असाच घरी दहानंतर चाललो होतो कृष्ण पक्षाचे दिवस होते घराजवळच एक रेल्वे पूल होता व त्याच्या अलिकडे काही दुकाने होती दुकानांची ओळ संपेपर्यंत मला कुणी तरी फुटपाथच्या मध्यावर उभे असल्याचा

भास झाला रडण्याचाही आवाज आला त्या गडद अंधारात रिमझिम पाऊसही पडत होता 'हू देअर ?' मी म्हणालो 'दे नॉट अलाऊ मी इन' ती म्हणाली तोपर्यंत त्या बाईजवळच मी येऊन ठेपलो समोरच मदिरालय होते व ती दाराशी उभी होती 'यू कॅन ॲज वेल गो होम' मी म्हणालो माझे शब्द ऐकताच तिने 'हू ?' म्हणून तोंड उघडले— मला भपकन वास आला व मी तिच्या नादी न लागता झपाझप चालत घराकडे निघालो ती बया ओरडली, धावा, धावा, एक परदेशी दिसतो तू मला कोण घरी जा म्हणणार ?' ती मागे ओरडत व मी घराकडे असे चार मिनिटे चाललो. घरात जाऊन आतून दार लावले ती बया ओरडतच होती, 'धावा धावा परदेशी इथे शिरला, फितूर असला पाहिज मला घरी जा म्हणतो–'

आतून मी पोलिसला फोन केला तिच्या ओरडण्याने पोलिसाची गाडी आलीच त्यांनी तिच्या तोंडाचा वास घेतला व तिला गाडीत घातले संकट टळले

पोलंडवर स्वारी झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी चेंबरलेन यांनी जर्मनीशी युद्ध पुकारले. न्यू कासलला त्या घोषणेचे स्वागत झाले 'लँड ऑफ होप अँड ग्लोरी' (आशा आणि पराक्रमाचा देश) या सामूहिक गीताने रस्तोरस्ती देशाभिमानाला उधाण आणले चर्चिल यांना होरे बेलीशाच्या जागी संरक्षण मंत्री करण्यात आले शहरात रेशनिंग सुरू झाले आम्हाला सुरवातीला कार्डे मिळाली मटण, लोणी, अंडी व साखर यांचे नियंत्रण आले मी मटनाचा भाग बदलून लोणी घेत असे हे पदार्थ परदेशातून आयात करीत असत पुढे मार्गारिन येऊ लागले युद्धकालीन छाया बाजारपेठेत पसरली माझ्या एका मित्राने दोन ओव्हरकोट, चार सूट, आठ शर्ट आदि घेतले असाच साठा लोक जमवू लागले हॉटेलमध्ये चहा मिळे पण त्यासाठी साखर स्वतःला आणावी लागे रात्रीला चहूकडे गर्द अंधार असे मैदानातून उग्र प्रकाशझोत रोज आकाशात फेकला जाई दिवसा सर्व कारखान्यावर मोठे बलूनस् उंचपर्यंत उडत ते तारांना अडकवलेले असत वैमानिक हल्ल्याची तयारी सुरू झाली तसे नाटक सिनेमे चालूच होते पण त्या अंधारातून जाणे कठीण असे कुठेही जा गॅस मास्क प्रत्येकाच्या खांद्यावर दिसे मैदानापलिकडे सैन्याच्या प्रशिक्षणाची जय्यत कवायत होत असे सुरवातीला रायफली दिल्या, पण पुढील तुकड्यांना झाडूच्या काठ्याच मिळाल्या या काठीधारी सैनिकांना ड्रिल करीत असताना पाहिले व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची फार आठवण झाली

ऑक्टोबरच्या सुरवातीला, रात्री विमानहल्ल्याचा भोंगा झाला रात्रीचे १२ वाजले होते ठरल्याप्रमाणे आम्ही रांगेत नियंत्रित केलेल्या खंदकात गेलो साध्या हात–कंदिलाचा मिणमिण करणारा प्रकाशच तिथे होता दुरून धडामचे ध्वनी आले प्रत्येकाचा चेहरा बघण्यायोग्य होता काहींनी तोंडात रुमाल दाबला होता, तर काहींची दातखिळी खट्खट् वाजत होती बहुतांश लोक सिगारेट ओढीत सामूहिक गीत म्हणत होते व एकमेकांना 'चिअर अप्, चिअर अप्' म्हणत होते. एक दोन वेळा अशा प्रकारच्या हल्ल्याची लोकांनी

दखल घेतली पुढे कित्येकजण घरातच पडून रहात

हिटलरची व्याख्याने आम्ही रेडिओवर ऐकू लागलो मनाई होती तरी पण चोरून लोक ऐकत आमच्या कॉलेजात ब्रिटिशाखेरीज इतर देशाचे बरेच विद्यार्थी होते त्याच्या मनात सहानुभूती नव्हती इंग्लंडला धडा शिकवलाच पाहिजे असा सूर होता राष्ट्रीय चीनचे पथक, जपानी क्रूरता व राष्ट्रमुक्ती यांचा प्रचार करत फिरतच होते हेले सेलेसी सम्राटाचे दूत इटलीविरुद्ध प्रचार करत होते स्पेनच्या फ्रँकोविरुद्ध मोहिम जारीच होती नागपूरचे श्री बाळ हुद्दार स्पेनबद्दल बोलण्याला व युद्धात सामील होण्याला नुकतेच येऊन गेले हळूहळू डिसेंबर महिना आला नाताळची सुट्टी झाली. हिटलरचे सैन्य झिग्‌फ्रिड लाईन पलिकडे व फ्रान्सचे मॅजिनो लाईनच्या अलिकडे होते या दोन्ही तटबंदीची चित्रे आली होती मॅजिनो ही अभेद्य रेषा गणली जाई या चार मजली भुयारात रणगाडे फिरू लागले ठिकठिकाणी उत्तम तटबंदी होती ख्रिसमसच्या रात्री आम्हाला अगदी जर्मन खदकातील झिगफ्रीड लाईन मागील सैनिकाने गायिलेले (शांत रात्र, पवित्र रात्र) गीत रेडिओवर इंग्लंडमध्ये ऐकू आले

मी पुढे संशोधन पूर्ण करण्यात गर्क होतो मार्चपर्यंत हस्तलिखित तयार केले व एप्रिल व मे च्या सुमारास स्वत टाईप करून तयार केले दिवस फार खडतर होते युद्धामुळे घरून पत्रे येईनात लांब महासागरावर जर्मनीच्या यू बोटी फिरू लागल्या बोटी बुडवल्या जाऊ लागल्या त्या अडचणीत दुपारचे अवघे सूप घेऊनच दिवसभर कामावर जात असे मध्यप्रदेशाचे माजी गव्हर्नर श्री राघवेन्द्र राव इंडिया कौन्सिलवर होते त्यांनी मदत केली निबंध संपवून थीसिस दिले तशात मॅन्चेस्टरहून श्री बृन्दव ( हल्ली विवेकानंद स्मारक, कन्याकुमारी इथे इंजिनियर ) डॉ दाते व माझे बंधू (डॉ विष्णूपंत) येऊन गेले

याच सुमारास लढाईने कलाटणी घेतली हिटलरने बेल्जियम, हॉलंड, डेन्मार्क पादाक्रांत केला व वरून अगदी मॅजिनो लाईनमागे त्याचे सैन्य आले फ्रेंच तटबंदी पडली हळूहळू फ्रेंचांचा पाडाव झाला तिकडे त्या रणक्षेत्रात असलेले ब्रिटिश सैन्य डंकर्क बीचवर जमू लागले हिटलरच्या विमानांनी या सैन्याची दाणादाण केली चर्चिलने रेडिओवर भाषण करून इंग्लंडच्या प्रत्येक नागरिकाला कसल्या ना कसल्या प्रकारची होडी समुद्रात घेऊन येण्याचे आव्हान केले राष्ट्रावर भयंकर संकट होते सर्व ब्रिटिश सैन्य अडकले त्यांना जिवंत काढले पाहिजे या जिद्दीने प्रत्येक बोटीत लाटांच्या मान्यात कसेबसे ब्रिटिश सैन्य परत आणले लॉर्ड अर्नसाईड या ब्रिटिश सरसेनापतीना परत बोलावले फ्रान्सहून परत आलेल्या सैन्याची परिस्थिती दीन होती एकाच्याही अंगावर धड कापड नव्हते कुणी नुसता गजीफ्रॉक, कुणी चड्डीच तर कुणी उधारी ब्लाऊज, फ्रॉक जे मिळाले ते अंगावर घेऊन चिंब होऊन परतले अर्ध्यापेक्षा जास्त तिथेच धारातीर्थी पडले सैनिक सामान सोडून आले इंग्लंडचे अतोनात नुकसान झाले देशातील संरक्षणाचे साधनच संपुष्टात आले होते चेंबरलेनने राजिनामा दिला विन्स्टन चर्चिल मुख्य प्रधान झाले त्यानी भाषण व कृती

करून राष्ट्रात नवचैतन्य निर्माण केले. 'वुई विल फाईट ऑन दी बीचेस, बट नेवर सरेंडर !' (आम्ही समुद्रालगत लढू–लांब लढू, पण शरण येणार नाही) 'मी घाम, रक्त व खूप काम याशिवाय काहीही देऊ शकत नाही आपण जिंकूच व या नरराक्षसाचा नाश करू' इंग्लंडची फार केविलवाणी स्थिती झाली व तिकडे जर्मनीने बाँबहल्ले सुरू केले याच सुमारास हिटलरचा एक विश्वासू मित्र रुडाफ हेस स्कॉटलंडमध्ये विमानाने उतरला इंग्लंडशी तहाची बोलणी करण्याची त्याची इच्छा होती या वैमानिक हल्ल्यात बरेच जर्मन वैमानिक इंग्लंडवर पडले कितीतरी गुप्तहेर फिरू लागले. आता मात्र पोलिसानी स्क्रू फिरवला पडलेल्या राष्ट्राला आशेचा कंदील दाखवत चर्चिल उभे राहिले

१९४२ च्या जुलै महिन्यात मला हुकूम झाला की, माझी बदली दिल्लीहून जोधपूरला झाली आहे माझे दिल्लीचे वास्तव्य तसे सुखाचे होते मला चागले क्वार्टर्स होते इन्स्टिटच्यूटमधे उत्तम गाईचे दूध रुपयाला आठ शेर मिळे गहूपण रुपयाला बारा शेर मिळत असे घरकामाला बाई होती तिचा पगार मासिक पाच होता इतकी सुबत्ता सोडून रेताळ गावी जाणे जरा कठीणच वाटल तरी हुकूम आठ दिवसात अमलात आणायचा होता

दिल्ली ते जोधपूर त्या वेळी असा रस्ता नव्हता मला चार सैनिक लॉन्या मिळाल्या. सोबत चार राहुटयाचे सामान, पाण्याच्या टाक्या व फिरतीचे किरकोळ जिन्नस होते. लॉरीचे ड्रायव्हर मिलिटरीचे रांगडे सैनिक होते व माझे चपराशी दोन कोळी होते सर्व इडियाचा नकाशा घेतला व ऑगस्ट महिन्याच्या पहिल्याच आठवडचात दिल्ली सोडली माझे कुटुब त्या समयी लहान होते मुकुद चार वर्षाचा व माया अवघी दीड वर्षाची एका ट्रकमध्ये आम्ही बेडरूमप्रमाणे घर ठोकले व वाळवटातल्या धुळीचा आस्वाद घेत मार्ग काढू लागलो एक रात्र व एक दिवस जोधपूरला पोचण्याला लागला तेथील शेतकी विभागांनी रहाण्याची व्यवस्था केली होती पण प्रत्येकाला या रागडचा प्रवासाचे कौतुक वाटले व त्या गावी पोचल्यावर प्रवासवर्णन ऐकण्याची व जेवणाची आमत्रणे आली जोधपूरला तेव्हा राजेसाहेब होते वनश्री अगदीच कमी असल्यामुळे सडकाच्या दुतर्फा बाभळीची झाडे लावली होती व त्यांना पण उटावरून पाणी द्यावे लागे तिकडे पाऊस अगदीच कमी असे व गावाचे दोन विभाग होते एक रेसिडेन्सी व दुसरे परकोटचाच्या भिंतीने घेरलेले जुने जोधपूर आम्हाला घर रेसिडेन्सीत मिळाले घरी दोन शिपाई, एक घरकामाला गडी होता त्याना हाक मारली की ‘ हुकूम ’ म्हणत धावत येत साधे बोलतानासुद्धा येस सरप्रमाणे नुसते ‘ हुकूम ’ म्हणावयाचे

---

## कच्छचे रण व पीरपगारो

---

आमचे पहिले जेवण तेथील सरन्यायाधीश श्री मेहताकडे झाले. ते जुन्या गावात रहात त्या बोळी फरशीने मढलेल्या, उन्हाने तापलेल्या होत्या पुरुषाचे मोठे फेटे व बायकांचे जवळपास सपूर्ण थानकपडाचा घागरा व चादीचे दागिने होते मेहतासाहेबांच्या घरात तळमजल्यावर गोशाला, अश्वशाला, उटशाला व कडबा आदि भरलेले होते पहिल्या मजल्यावर जेवण व बैठकखाना आणि दुसऱ्या मजल्यावर शय्यागार जेवण आले ताटे टेबलावर होती बाहेर उन्हे होती व पानात वाढप्याने म्हैसूरपाक वाढला दुसऱ्याने या पाकावर ताजे तूप ओतले व बाजूला काश्याच्या वाटीत बासुदी (रबडी—फार आटवलेली) आली आता तो म्हैसूरपाक अर्ध्या इच तुपात तरगत होता व त्याला या रबडीसगे त्या उन्हाळयात खायचे होते लागलीच पकोडे आले म्हणजे मोठी कडक भजी, बटाटावडा, वागी, काकडी, मिरची आदिने भरलेली. आलू-मटरची भाजी आली चागल्या पुऱ्या आल्या, तीन डाळी आल्या व शेवटी पांढरा भात आला भात पाहून जरा बरे वाटले पण कायत्या वाढप्याने भातावर आंब्याचा रस ओतला, वरून तूप पेरले व त्यावर बर्फाचे चारपाच तुकडे टाकले जेमतेम चालले असताना मोठे भाजलेले व तळलेले मूग-तांदुळाचे पापड येण सुरू झाले जेवताना घरातील बायका नव्हत्या पडदा आणि बुरखा खाली होताच याची एक गमत अशी की, आमचा मुकुद जेवण सोडून गॅलरीतून खाली पहात होता ओरडला—'बाबा, किती बिनकेसांचे अस्वल चाललेत नाकात दोरी पण नाही' खाली पाहिले तर काळा बुरखा घेऊन मुस्लिम स्त्रिया चालल्या होत्या

तिसऱ्या दिवशी डॉ तक्शीर अहमद आले लाब ब्रिटिश सोजिराच्या बराकीत घेऊन गेले सगळे सोजिर उघडेबब होते अवघी चड्डी व डोक्यावर टोप होता लांब नवीन महाराचे शिल्पकाम चालू होते आम्हाला एक-दोन करत लाबच्या एअरफोर्सच्या ऑफिसात आणले फ्लाईंग ऑफिसर समशेर अहमद याची ओळख झाली त्यानी विचारले—आज प्रयोग कराल काय ?' मी रुकार देताच त्यांनी माझ्या पाठीवर पॅराशूट बांधले 'पुढे काय ?' म्हणताच 'मी सभाळून घेईन !' म्हणाला राजस्थानच्या भर उन्हात निघालो पाठीवर पॅराशूट होते व डोक्यावर हॅट डॉ अहमद 'मी येत नाही, तुम्हीच रिपोर्ट द्या' म्हणाले व सावलीत आत गेले लांब हूटर जातीचे एक छोटेखानी फायटर विमान दिसले पायलटने टोपी चढवली मला अलगद उचलून मागील '३ × ३' च्या कॉकपिटमध्ये उभे केले 'दांडी धरा व उभे रहा' अगदी समोर दोन फुटावर तो बसला, पण त्याचे बोलणे मला ऐकू येईना व माझे त्याला समजेना विमान सुरू केले २५० मैल ताशी चालू लागले डोक्याचा टोप केव्हाच बेफाम झाला वर आवरण मला काहीच नव्हते त्या वेगामुळे दृष्टीपण टिकत नव्हती तो वर चढायचा, मग एकदम खाली सूर घ्यायचा खाली उट, मेंढयाचे कळप सैरावैरा पळायचे त्याला आनद होत असे पण मला तोल साभाळता सांभाळता नाकी नऊ आले कित्येकदा अगदी फेकल्याप्रमाणे झाले पण पॅराशूटपासूनची री खाली बाधली होती असे प्रयोग ३० मिनिटे झाले टोळधाड व तिची पिले किती

खालून किंवा वरून दिसतील याचा अदाज घेतला खाली आल्यावर हातपाय अगदी थर-थर करत होते रात्रीला तोंडपण सुजून आले दुसऱ्या दिवशी पुन्हा डॉ अहमदने नकार दिला व मला जावे लागले पॅराशूट घातल्यावर मी विचारणा केली दोऱ्या ओढणे वगैरे दाखवले मी चालू लागलो हलकेच दोरी पहाताच ती ओढली गेली पॅराशूट उघडले समशेर अहमद म्हणाले, 'तुम्ही गडबड केली एकतर कार्यक्रम रद्द किंवा पॅराशूटशिवाय चलावे लागेल' मी कबूल केले त्यानी माझी सही घेतली व विमानात पुन्हा अलगद ठेवले विमान वर चढले व सूर सुरु झाले पाठीवर वजन नव्हते व खाली दोरपण नव्हता अगदी मळमळून आले व वांती झाली सावरलो, पण पुन्हा पाच मिनिटानी वांती झाली अशा सहा वांत्या झाल्यावर मी घाबरलो पायलटशी बोलता येईना एका काडीच्या टोकाला 'तब्येत ठीक नाही–' लिहून ती काडी त्याच्या तोंडासमोर आणली तो खेकसला, 'फ्यूसीलाजच्या आत शिरा' खाली बसलो व अगदी वाकून त्या दोन फूट रुद जागेत सामानाने भरलेल्या गुहेत पडून राहिलो वांत्या बंद झाल्या, पण अशक्तता होती तीस मिनिटाने विमान खाली आले मला स्ट्रेचरवरून खाली आणले व 'गुडबाय' म्हणून घरी पोहच-वले डॉ तश्कीर अहमद म्हणाले, 'इसलिये तो तयार न था !'

या दरम्यान दहा दिवसातच माझी बदली राजकोटला झाली आमचा ६ लॉन्यांचा ताडा निघाला श्री मेननसाहेबानी वाटेतील सर्व संस्थानिकांना माझ्या हालचालीचे कळ-विले होतेच गाडीचे सैनिकी ड्रायव्हर काही उडाणटप्पू होते त्रास देऊ लागले 'हम तीन फूलवाली की परवाह नही करते–' म्हणजे आम्ही कॅप्टनला पण जुमानत नाही मार्ग बदलून अंबाजीच्या डोंगराचा घाट पार केला वाटेत धनुष्यबाण घेऊन कित्येक भिल्ल दिसले– पण सैनिकी ड्रायव्हर पाहून काहीच त्रास दिला नाही दुसऱ्या दिवशी अंबाजीला आलो येथील देवीचे दर्शन घेतले चांगली जाज्वल्य मूर्ती आहे खूप भक्त येतात राजे-साहेब परमभक्त होते रोज सायकाळी ६ ला झोपून उठत शौच-मुखमार्जन करून ब्रेक-फास्ट चहा करीत व स्नानसंध्या करून रात्री ९–१० ला पूजेला जात जपजाप्य होई-पर्यंत १२ होत नतर जेवण पुढे थोडाफार राज्यकारभार । असे करीत सकाळचे चार होत काही खाऊन सकाळी ६ ला आरती करून शय्यागृहात प्रस्थान करीत व नतर झोप । असा याचा निशाचरी कार्यक्रम असे आम्ही ६ ला पोचलो स्नान वगैरे करून जेवणाची वाट पाहिली रात्री ११–३० ला जेवण आले कशी तरी रात्र काढली व दुसऱ्या दिवशी पालनपूर गाठले रेस्टहाऊस सुदर होते, पण जेवण तेथील मेहता कुटुंबाकडे घेतले त्यांचा फार घरोबा झाला हे कुटुब मद्रास आणि मुबईला जवाहराचा व्यापार करते या गावी अत्तरे चागली मिळतात नबाब मुलतानसाहेबांची भेट झाली नाही पुढ राधनपूरला गेलो वाटेत बाभळीचे वन चोहोकडे दिसले तेथील नबाबसाहेब यांना आमली (अफू) ची आवड होती, त्यामुळे भेटेनात अशा आवडी पुढे दिसल्या जुनागडच्या नबाबाने चक्क कुत्रा-कुत्रीच्या लग्नाची खूप वाजत गाजत वरात काढली होती मत्री व अफसर वरातीत

सामील होते कुत्र्याच्या डोक्यावर छत्र घेऊन एक अमलदार उभा होता तो बँड, ती आतषबाजी– सारे जुनागड ही श्वान जोडपी पहाण्याला लोटले होते

राजकोटला पोचल्यावर मुकुदला न्युमोनिया झाला तशात पुन्हा बदली झाली– ती आता भूजला दोन महिन्यात तीनदा बदली कच्छला बोटीने जावे लागे ड्रायव्हरने समुद्र ओलाडले नव्हते त्रास देऊ लागले राजकोटचे रेसिडेन्ट एक छान ब्रिटिश साहेब होते त्यांना तुलसीरामायणाचा फार नाद होता अध्यात्मावर व्याख्याने देत माझी गट्टी जमली व त्यानीपोलीसाकरवी ड्रायव्हरचा बदोबस्त केला मोरवीपर्यंत आगगाडीने गेलो सौराष्ट्रात कित्येक सस्थाने होती प्रत्येकाची आगगाडी वेगळी, वेशभूषा वेगळी व कार्यपद्धत वेगळी तेथील राजेसाहेब चागले डॉक्टर व नामांकित वैद्य होते त्यांनी मुकुदला औषधी देऊन बरे केले दोन दिवसात भूजला आलो

रेस्टहाऊसमध्ये वास्तव्य होते या स्टेटमध्ये तीन महाराष्ट्रीय पदाधिकारी होते एक श्री नायमपल्ली–रेवेन्यू मिनिस्टर, श्री पटवर्धन–चीफ जज्ज, डॉ तास्कर–मुख्य सर्जन, चीफ मिनिस्टर डॉ मुकर्जी होते ज्यांची पहिली पत्नी पुढे मिसेस मेनका सोखी झाली राजेसाहेबानी मोटार दिली होती, व सर्व स्टेटमध्ये फिरण्याला सोबत ऑफिसर दिले एके दिवशी भूज ते माडवी चाललो होतो लॉरी ड्रायव्हर जोराने हाकीत होता धीरे धीरे करीत करीत मी डुलक्या देऊ लागलो एकाएकी धक्का लागला. पहातो तर मी बाजूला पडलेला व वर आकाश दिसले ट्रक उलटला होता बाहेर आलो तबू व टाक्या आदळून उतारूवर (कॉन्स्टेबल व ऑफिसर) पडल्या त्याचे तोडावर पाणी थेंब थेंब गळत होते व तो कॉन्स्टेबल थू थू करीत होता कारण रमझानचे दिवस, ते लोक तोडात पाणी पण घेत नाहीत व इथे तर ते तोडात चालले

भूजला सोने २५ रु तोळा मिळे तिथे नाणी शुद्ध चादीची (कोरी) व सोन्याची होती बोस्की रेशमाचे कापड १२ आणे वार होते पेट्रोल १२ आणे गॅलन मिळे. सबंध तुपाचा टीन १२ रु पण त्या ड्रायव्हरने आमच्या स्वयपाक्याला गाठून आमचे तूप १० दिवसात सपविले– रोजचा शिरा खात त्याने काढले व त्यांनी माझ्याविरुद्ध रिपोर्ट पण केला येथील जीवन फार सुखासमाधानाचे होते या रिपोर्टनी इन्क्वायरी आली, पण तेवढ्यातच फिरून तार आली की, आमचे तीर्थरूप बिलासपूरला वारले फारच दुःख झाले इतक्या लाब एकदम जाता येईना व इकडे इन्क्वायरी येणार काही सुचेना घरी आम्ही दोघे व ही दोन मुले इन्क्वायरी आली व दहा दिवसानी सुटी मिळेल असे कळले वडिलांच्या निधनामुळे या नोकरीचा वीट आला, पण तिकडे ऑर्डर आली की, सगळ्या गाड्या कशातरी कराचीला पोचवा तिकडे कच्छच्या रणाशिवाय मार्गच नव्हता व तो मार्ग अतिशय भयानक त्या दलदलीत अवघी ४–५ फूट थोडी कोरडी जमीन कुठे कुठे आहे– सहा इच हुकले की, १५ फूट दलदलीत गडप होत मध्ये एक दोन बेटे आहेत, व पुढे थर पार्करचे मरुस्थल त्याच समयी मुबईचे मि सलीम अली मोठे फ्लेमिंगो पक्ष्याचा

अभ्यास करण्यास तिथे आले होते वर्षातून एकदाच हे पक्षी त्या रणात येतात मातीचे उचवटे करून अंडी देतात त्यावर बसून ती उबवतात व मोठे झाल्यावर सर्व पक्ष्यांचा थवा लांब रशियाकडे जात असतो

भूजला कर्नल बीलद मुख्यमंत्री होते त्यानी दोन कच्छी ड्रायव्हर दिले, एक पोलीस दिला चोहूकडे तारा केल्या व एका बाटाड्यासगे माझी बिदाई केली रणच्या टोका-पर्यंत कच्छ प्रदेश बरा होता इकडे पाऊस थोडा बाजरीचे पीक होते रणजवळ रानटी गाढवाचे कळप दिसले असे प्राणी इतरत्र नाहीत रण आले खाली उतरलो तो २० मैलांचा उजाड टापू चोहूकडे दलदल–लांब क्षितिजापर्यंत वाळवट–पक्षी पण कुठ दिसेनात मनुष्य तर नाहीच देवाचे ध्यान केले ड्रायव्हरच्या पाठीवर हात ठेवला व गाडीत मागे बसलो जीव कसा अगदी धुकधुक होत असे पुढे कितीतरी उटाचे, काही माणसांचे, गुराचे सापळेच मध्ये पडलेले दिसले या भागात तहान फार लागते, पण पाणी नाही वाजूला झाले की, दलदलीत मरण हमखास येत असे अगदी जीव मुठीत घेऊन १५ मैल तो वाकडा मार्ग ३ तासात सर केला दलदल संपली म्हणून खाली उतरलो हातात बंदूक घेतली देवाला धन्यवादरूपे नमस्कार केला व त्या वाळवटाकडील झुडुपाकडे लघवीकरिता वसलो एकाएकी घोड्याच्या टापाचा आवाज आला मी वळून पाहीपर्यंत माझ्या लॉरीला गराडा पडला होता लहान घोड्यांवर २० स्वार होते डोक्यावरील फेटा तोंड आणि नाकावरून पण घेतला होता प्रत्येकाच्या हातात बंदूक, कमरेला तलवार व पाठीवर भाला होता त्यानी ट्रकच्या आतील सामानाला ढकलून पाहिले ड्रायव्हरला विचारले, ‘ ब्रिटिश सरकार–’ ड्रायवरला हिंदी किंवा उर्दू येत नव्हते तो ‘ कच्छी राजनो छे ’ येव-ढाच बोले त्याच्या खिशातील कागद त्यानी पाहिले काही मिळाले नाही तलवारीने बाजूच्या झुडपाना हुंदडले भाला खोचला नशीब मी अगदी दडून होतो व बदुक पोटाशी होती त्याना लॉरीतली बदूक हवी होती लॉरीला लाथा, बुक्के मारल्यावर ती टोळधाड पळाली ते सर्व पीर पगारो या सिंधमधील पीराचे सैन्य होते ब्रिटिश व त्याच्या सेवका-वर उट्टे काढण्यासाठी आले होते पधरा मिनिटे पडून होतो तिकडून क्लीनर शोधीत आला ‘ चलिये ’ म्हणाला मग ट्रक असा भरधाव सोडला की, यँव ! १५ मैल थर पार-करची मरुभूमी ओलाडल्यावर पुन्हा अश्वारूढ सैनिक दिसले आमचा ट्रक पाहून त्याची गाडी जवळ आली मी चूप होतो गाडीतून डेप्युटी सुपरिटेंडेंट पोलीस बाहेर आले ‘आपणच का डॉ देवरस–’ ‘ कर्नल बीरलची तार आली पण पगारोचे लोक होते, म्हणून आपणाकरिता इथपर्यंत आलो मी ‘ निसटलो ’ सांगितले व त्याच्या गाडीत बसलो– पुढे घरापर्यंत त्यानी पोचविले

✿

'सौराष्ट्रे पंचरत्नानि' अशी एक म्हण आहे व या म्हणीत 'नदी, नारी, तुरंगमा' अशी अक्षरे आहेत. या तीन रत्नांचे दर्शन घ्यावे व सत्यता तपासावी अशी फार इच्छा होती. शासकीय कामानिमित्त ती तीन वेळा तरी पूर्ण झाली.

या तिसऱ्या वेळी अहमदाबादेहून राजकोटला आलो. आता सौराष्ट्र एक वेगळा विभाग झाला होता व बापुशाहीच्या (छोटे संस्थानिक) स्टेशनजवळच्या रेस्टहाऊसमधेच थांबावे लागले, कारण मोठे गेस्टहाऊस आगाखान यांच्याकरिता राखून ठेवले होते. एकदाचे हे धर्मगुरु आले. असंख्य खोजा समाजानी त्यांचे स्वागत केले. दुसऱ्या दिवशी समारंभ झाला. त्याच दिवशी कैक विवाह सामुहिकरित्या साजरे करण्यात आले. शामियान्यात गुरुदेव येताच मखमली पायघडीवरून आस्ते कदम चालू लागले. गार्ड ऑफ ऑनर पर हातत पण एक विशिष्ट सन्मान करण्यात आला. अगदी तरुण मुली बाजूला झोपल्या होत्या व त्यांच्या वेणीचे शपटे पायघडीवर सोडले होते. साहेब त्या शेपटांवरून समोरील वेधक सिंहासनाकडे निघून गेले. सौराष्ट्रातील सौंदर्याची (नारी) लयलूट तिथे दिसली.

बारा वर्षांपूर्वी राजकोटला मी मुक्काम केला होता तेव्हा राजेशाही होती. गावातील गेस्टहाऊसमधे मुक्काम ठोकला. रोजचे जेवण खिचडी, पुऱ्या, भाजी आदिंचे होते, पण सातव्या दिवशी मॅनेजर आले व माझ्या बिलाचा आकडा दाखवू लागले. त्यात चक्क मालपुवा, बर्फी, मगज, दूधपाक आणि व्हाईट हार्ट विस्कीचे बिल लावले होते. आता ते दिवस गेले. तेथील रेसिडेंट त्या समयी ब्रह्मचारी होता. त्याला तुलसीरामायण बरेच पाठ होते व कैक समयी या ग्रंथाबद्दल मी चर्चा करीत होतो. मुंबईच्या कु. लीला रावचे पती त्या समयी तिथे अंडर सेक्रेटरी होते. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांची सासुरवाडी पण

सौराष्ट्रातील फेरफटका

तिथेच होती व मराठी बोलणाऱ्या पंडित कुटुंबाला एका महाराष्ट्रीयाबद्दल फार आपुलकी वाटे आता हे सर्व पालटले होते काँग्रेस सरकारने राज्य सुरू केले जुनी शान नाहीशी झाली, तरी जेमतेम एक जीप घेऊन फिरतीवर निघालो

राजकोटला नदी आहे पण किरकोळ आणि खडकाळ पुढे शेंगदाण्याची शेती अगदी गोंडलपर्यंत दिसली जुन्या काळी प्रत्येकाची (छोटचा संस्थानिकाची) रेल्वे असे गोंडलचे राजे त्या रेल्वेत आपल्या संस्थानातले नागरिक कर्मचारी म्हणून नेमीत प्रत्येक कर्मचाऱ्याला त्याच संस्थानात घर बांधणे आवश्यक असे यामुळे स्टेटकडे सर्वांचा जीव लागला असे आता ते गेले राजेसाहेब मुंबईकर झाले व त्या स्टेटची शान तेथील देवालयाने ठेवली

दुसऱ्या दिवशी झाडा-झुडपाच्या मुलखातून वाट काढीत जसदनला आलो इथ मात्र अद्याप घोडचाची पैदास चालू आहे राजेसाहेबाचे शिकारीचे पिंजरे डोंगरावरील महालाभोवती ठेवले होते व पलीकडे घोडचाच्या पागा ओळीओळीने दिसल्या इथे थोडचा प्रमाणात घोडदौड तर होतेच व उत्तम जातीची निवड करून वाढ केली जाते बोटाडला राजपुत्राना भेटलो व पुढील मार्गावर निघालो भावनगरच्या सडकेवर गढडा नामक प्रसिद्ध छोटेखानी शहर आहे स्वामीनारायण पथाचे मुख्य पीठ दिसले स्वामी सहजानद सरस्वती यांची बसण्याची खोली रत्नजडित दागिन्यांनी भरली होती केशरी, धोतर, केशरी-(भगवा) साफा परिधान केलेले परिव्राजक चोहूकडे कार्यात मग्न होते देवाजवळ दक्षणा ठेवली इथे उत्तम तुपाचा बेसन लाडू प्रसाद म्हणून दिला जातो दोन तीन लाडू घेऊन सोनगडच्या जगलातून मार्ग काढीत भावनगर गाठले

राजकुमार धर्मेंद्रसिंग याना श्वापद व शिकारीचा फार शौक होता राजेसाहेबांचे हे कनिष्ठ बधू आहेत राजेशाही गेल्याचे दुःख व्यक्त करीत सुरक्षा आणि व्यवस्था किती ढासळली याची उदाहरणे त्यानी दिली १४ वर्षापूर्वी इथे फिरतीवर आलो तेव्हा राजकुमार निर्मलसिंग यानी शाही बाग दाखविली व २० जातीच्या सऱ्याचा रस पाजला सायकाळी गावात फिरताना भर रस्त्यावर शौचास गावकरी दिसायचे ते आता नव्हते आधुनिक इमारती व रस्ते आले व नगरीला नवीनच स्वरूप येत गेले

सासनगीरचे मावळते सिंह- धर्मेंद्रसिंगजींना सोबत घेऊन जुनागढ गाठले गावा जवळच गिरनारचा प्रख्यात डोंगर आहे पायथ्याशी सम्राट अशोककालीन शिलालेख असून वर पू गोरखनाथाचे पवित्र स्थान आहे गेस्टहाऊसची जुनी शान गेली भिंतीवरील प्लास्टर पडत होते व फर्निचरला चिरा पडल्यात याच जुनागडची केवढी शान होती १३ वर्षापूर्वी इथे आलो त्या दिवशी गावात एक भला मोठा जुलुस निघाला होता समोर शाही बँड, मागे सनई व देशी वाद्ये, नतर पुलिसचे पथक, सरकारी कर्मचारी व त्यामागे एका शुभ्र घोडचाच्या उघडचा बग्गीत दोन प्राणी भरजरी कपडे घालून बसलेले दिसले त्याचे डोईवर मखमली छत्री होती व मागून दोन तीन रोल्सराईल्स गाडचा मिरव

णुकीत होत्या दिव्याची आरास पण चांगली दिसली आणि मधून मधून दारूकामाचे प्रदर्शन पण झाले फार कुतुहलाने विचारपूस केली तेव्हा कळले की नवाबसाहेबाची मर्जी लग्नसोहळा करण्याची दिसली बस्स त्यांच्या नवीनतम श्वानपथकातील दोन-(नर-मादी) कुत्र्याची या कामी नेमणूक झाली व ती मिरवणूक या श्वानयुगुलांची होती

आता नवाब गेले व त्यांच्या जनानखान्यासगे 'श्वानखाना' पण गेला गावात तेव्हा नळ नव्हते पावसाचे पाणी छपराच्या मध्यावरून तळघरात साठवून ठेवीत व हाच गोडचा पाण्याचा पिण्याचा साठा होता आता नळ आले

जुनागढहून सासनगीरला पोचलो झाडी तशी गर्द नव्हती चंद्रपूरचे जंगल उंच झाडीने आहे या गीर जंगलातील रेस्टहाऊसची इमारत लॉर्ड लिनलिथगोच्या समयी त्यांच्याचकरिता बांधली होती ते उंच व धिप्पाड होते-याकरिता स्पेशल तब्बल ९ फूट लांब, चार फूट रुंद स्प्रिंगचा पलंग इग्लंडहून आणला होता आता त्या शय्यागाराचा उपभोग आम्ही घेतला

गेस्टहाऊसवर रात्र कशीबशी काढली व सकाळी ५-३० लाच जंगलात शिरलो थोडा अंधुक प्रकाश होता काही ढग पण आकाशात होते व पक्षीगण नुकतेच घरट्यातून बाहेर पडलेले दिसले ४ मैल गेल्यावर आमची जीप एका दरीत उतरली खाली नाला होता व त्यावर दगडी पूल पण होता जसजशी जीप पुलावर उतरू लागली तसतशी मोरांनी जोराने ओरडणे सुरू केले माकड पण हूप्हूप् करीत होते टिटवी सारखी ओरडत फिरताना दिसली त्या निमप्रकाशात एवढा गोंगाट का व्हावा याचे आश्चर्य वाटले व जीप मध्यावर थांबविली धर्मेंद्रसिंगजी उतरले व म्हणाले की, इथे जवळपास मांसाहारी प्राणी अवश्य आहेत व त्यांच्याकरिताच ही ओरडाओरड चालू आहे उभे राहून तब्बल दहा मिनिटे चोहोकडे दृष्टी फिरविली पण काही दिसेना गाडीत बसणार इतक्यात ३५० फूटावर एका वटवृक्षाखाली कुणीतरी शेपूट आपटताना नजरेला आले ती सिंहीण होती व एकटीच आमचेकडे पाठ करून बसली होती तिचे शेपूट तुटके दिसले कारण केसाचा झुबका दिसत नव्हता राजकुमार म्हणाले, 'चला जीप तिच्या जवळ नेऊ' ड्रायव्हर तयार होईना, म्हणून त्यांनी स्वत जीप खाली नाल्यात घातली व चिखल, झुडुपे तुडवीत अगदी त्या सिंहिणीच्या जवळ आणली आता ते श्वापद जीपमधून वर ७५ फूटावर दिसत होते ती आमचेकडे पाही, शेपूट आपटे पण उठत नव्हती आम्ही तब्बल १० मिनिटे तिला पाहिले पण ती हालेना जीप परत मागे घेतली व डोंगर चढलो त्या डोंगराच्या कडेला अगदी सिंहिणीच्या वर अदमासे २ फर्लांगावर नीलगाय आदींचा कळप उभा होता उंच माना करून सिंहिणीकडील वास घेत होता-त्या सिंहीणीला पण या प्राण्याची चाहूल लागली होती व पाणी पिण्याला येणाऱ्या जनावरांना गट्ट करण्यासाठी ती सिंहीण चुपचाप बसली होती

आम्ही तसेच ३ तास जंगलात फिरलो एका डोंगर कपारीवर गरुडाचे घरटे

दिसले अवळच्या स्वच्छ ओहोळात दिगंबर होऊन शिरलो पाणी थंड व उत्तम दिसले (सौराष्ट्राच्या 'नदी' शब्दाची आठवण झाली) पण पाण्यात लोळलो तो काय ? हळू-हळू माश्यांचे थवे आमच्या अंगाला भिडले त्यांचे दात आमच्या केसांना पकडू लागले एकाच स्थळी मानवशरीरावर तुटून पडणारे इतके मासे मी कधी पाहिले नव्हते

परत येताना जीप परत त्याच नाल्यावर उभी केली आता दुपारचे साडेअकरा वाजले होते त्या वटवृक्षाखाली सिंहीण नव्हती– पण वर दरीत नीलगाय आणि हरीण मात्र गवत हुंगत अद्याप उभे होते यावरून ती आता दुसरीकडे दडली असावी असा विचार करून आम्ही त्या वटवृक्षाच्या पलीकडील किनाऱ्यावर गेलो व झुडुपातून चालू लागलो मी डोईवर छत्री घेतली होती व हाती बारीकशी बाबूची काठी होती धर्मेन्द्रसिंगजी मागे होते परिसर न्याहाळत आम्ही चाललो होतो एकाएकी 'आँव-आँव' असा भयंकर आवाज झाला व आमच्या डोक्यावरून वरील खडकात लपलेली सिंहीण उड्या मारत सरळ डोंगरावर त्या नीलगाईंच्या कळपाकडे पळाली पळण्याला इतका वेग होता की दृष्टी टिकली नाही आवक् होऊन हळुहळू जरा पुढे गेलो तो काय ? दुसऱ्या जनावराने तशीच उडी घेतली व सरळ समोरील डोंगराच्या सपाट शिळेवरून 'पळाले'– हा चित्ता होता आता मात्र जरा हिम्मत खचली कारण काठीशिवाय दुसरे शस्त्र मजजवळ नव्हते व धर्मेन्द्रसिंगजीजवळ लहान बावीस बोअरचे रिव्हॉल्वर होते

परत येताना कैक हरिणाचे कळप दिसले जीप हळुहळू चालली की जीपभोवती फिरत व जीप थांबली की भरकन पळून जात दुपारी डुकराचे कळप पाहिले व पाचच्या सुमारास सहा सिंहाच्या परिवाराने जीप समोरूनच रस्ता ओलांडला त्याच मार्गाने निबिड जंगलात फिरताना रात्र झाली रात्रीचे आठ वाजले होते एका मालधारी खेडूताच्या– (म्हशीचा कळप पाळणारे) गावात जीप पोचली त्याने गरम दूध दिले खाटेवर बसलो तोच अवघ्या एक फर्लांगावरून भयानक गर्जना ऐकू आली तो म्हणे एक मोठा सिंह होता त्याने सबंध रेडा गोठ्यातून पाठीवर घेतला व कुंपणावरून उडी मारून पळाला होता चौथ्या मिनिटाला पुन्हा गर्जना झाली असा ३० मिनिटात तो सात वेळा गरजला पण ह्या गर्जना सरळ रेषेत होत्या रोज सायंकाळची गर्जना मान फिरवून करतात तशी असायची त्यामुळे श्वापदांना ती गर्जना चहूकडून आल्याचा भास होतो ही विशिष्ट गर्जना अशी का म्हणून झुडुपाकडे गाडी नेली 'आँव–आँव' असा शहारे आणणारा आवाज जोराने झाला तिथे सिंह संभोगरत होता।

तीन दिवस निसर्गात घालवले कैक चिमण्या पाखरांचे थवे, अंडी, घरटी तपासली सर्पांचा शोध घेतला त्या निबिड जंगलात मनुष्य जरी नसला तरी 'निसर्ग बोलतो' प्रत्येक पान, प्रत्येक डहाळी प्रत्येक आवाजात अर्थ असतो व दृष्टी, ध्वनी आणि संवेदना यानाच प्राधान्य देऊन हालपाय हलविले जातात हे सर्व तीन दिवसात पाहिले व चौथ्या दिवशी वीरावळला आलो. सोरटी सोमनाथाचे ज्योतिर्लिंग इथे प्रभास पाटण-

जवळ आहे या देवालयाचा नाश आठ वेळा झाला जुन्या शीला भगल्या, शिवलिंगाचे तुकडे गजनीच्या मशीदीच्या पायऱ्या बनल्या पण भारत स्वतंत्र झाल्यावर सोमनाथाचे मंदिर वर आले उत्तम शिल्पकारी चमकू लागली गर्भगृहात नबाबाच्या काळी मुसलमानानी शौचकूप केले होते व भग्न मूर्तीवर गाढव बांधीत काळ बदलला बाजूची मसजीद आता जुन्या भग्न शिल्पाचे आगर . म्युजियम- सूर्य मंदिर म्हणून गाजू लागली लांब समुद्रकिन्यावर एका पाषाण- स्तंभावर होकायंत्र बसविले आहे या यंत्रावरील दक्षिण दिशा दर्शविणारा बाण थेट दक्षिण ध्रुवापर्यंत अशी रेषा घेतो की मध्ये द्वीपसुद्धा येणार नाही ही कला कोपलनिकसच्या कैक वर्ष पूर्वी या देशात अवगत होती या शहरी भगवान कृष्णाने एका पिंपळ- ( वट ) वृक्षाखाली आपला देह सोडून इहलोकीची यात्रा संपविली ' संभवामी युगे युगे ' चा महामंत्र त्यांनी दिला व आज तरी या मंत्राने भारताला धीर दिला पाहिजे श्रीकृष्णाचा निरोप घेत माग्रोळजवळ आलो मार्गात जे काही पाषाण दिसले ते सगळे कोरल- ( पोवळे ) जातीचे होते गावाजवळ नारळाची बने होती केशरी आंब्याच्या बागा होत्या पण डास चिक्कार व पुढे हत्ती-पाय रोगी चहूकडे दिसले एका घरात तर मी बारा रोगी मोजले शिवाय दवाखान्यात डोकावलो तर ५० टक्के जनतेच्या पोटात जंत आहेत असे कळले आता रात्रीला मुक्काम करणे अयोग्य तेथील पाणी तरी कसे प्यावे ? विलिनीकरणापूर्वी माग्रोळला नवाब होते त्यांची मुस्लीम प्रजा इतकी मस्त होती की भर दिवसा हिंदू स्त्रियांना टांग्यातून जाणे कठिण होई ' बाये हाथसे जिसे पकडा वो हमारी हो गई-' असा कायदा होता लोकात विश्वास दिसला की नवाबाच्या महालात तळघरात देवीचे देवालय होते व तिथे दीप २४ तास तेवत असे आता नवाब गेले, महाल पाडला... पडके दालन गतवभवाची साक्ष देत उभे होते

तिथून चार मैलावर एका प्रचंड आमराईत उत्तम पाठशाळा हल्लीच निघाली आहे वर्ग वृक्षाखाली भरतो इमारत नाही पण लहान लहान उघडे वर्ग अमराईत इतस्तत पसरले आहेत मुलांना बागायती, गुराचे संगोपन, शेती, आपली संस्कृती व साधे शिक्षण शिस्तबद्धरित्या दिले जाते या रम्य स्थळी त्यावयातील जे विद्यार्थी वर्षे घालवतील ते चिर निसर्गभक्त होतील

पोरबंदर गांधीजींचे गाव त्यांच्या जन्मगृहाला भेट दिली

' सांस सास मे राम कहे, वृथा सास ना खोया । ना जाने आ सास की आवन या ना होय ।।' हे कवन जन्मखोलीत कोरलेले होते शिल्प, पुस्तक आदि सर्व होते .. पण माझ्या मते पोरबंदर जर कशाकरता प्रसिद्ध असेल तर ते फायलेरियाकरिता मी केव्हाही कुठेही डास पकडला व लेन्सखाली ठेवला की फायलेरियाचे जंतू तिथे हटकून असावयाचे जवळ पास ८० टक्के घरात हत्तीपाय असलेले रोगी होते मी तर पळता पायच काढला.

जामनगरचे जामसाहेब सौराष्ट्राचे पहिले राजप्रमुख होते .. पण आता सगळे

वैभव गतप्राण झाल्यासारखे दिसले या शहरी अजाणी नावाच्या व्यापाऱ्याकडे अडकित्ता चागला मिळतो एवढेच एक आकर्षण त्या सौंदर्ययुक्त देशात दिसत होते राजवाडा आता गेस्ट हाऊस झाला एका हॉलला पार्टिशन करून वीस खोल्या केल्या क्लास वन् ऑफिसरला पाच रुपये तर क्लास थ्रीला दोन रुपये भाडे पडे जे अन्न घेतल्यावर आम्हाला तीन रुपये पन्नास पैसे लावले तेच अन्न आमच्या ड्रायव्हरला आठ आण्यात दिले नुकतेच मेडिकल कॉलेज निघाले होते व आयुर्वेदाचे अध्ययन व सशोधन सुरू झाले होते जवळपास शेती व उजाड प्रदेश बराच दिसला

सुरेन्द्रनगरहून धागध्राकडे निघालो मार्गात एक कवेलूवजा देऊळ दिसले इथे नागाची काळचा पाषाणाची मूर्तीपण आहे. धागध्राचे राजेसाहेब एका विशिष्ट दिवशी इथे येतात व पगडी उपडी करून मूर्तीजवळ ठेवतात म्हणे एक जिवंत नागसर्प पगडीत येतो, बसतो व प्रसाद ग्रहण करून निघून जातो मी तरी पाहिला नाही सौराष्ट्रात ‘ सूर्य ’ मंदिरे आहेत व तिथेच नागसर्पाकृतीपण दिसते वरील देवालयामागे सती गेलेल्या स्त्रियाचे कैक पाषाण दिसले काही नावे कोरली होती पण प्रत्येक पाषाणावर उजवा हात कोरलेला असून वर चद्र आणि सूर्य यांच्या आकृत्या होत्या त्या आकृत्या मी तपासल्या व मला एका पाषाणावर सूर्यप्रतिमेच्या स्थळी कासव दिसला कासव हा सूर्याचे प्रतीक आहे काय असा विचार मनात आला तसेच नावे तपासताना देवराव नाव एके स्थळी दिसले आमचे कुणी देवरस इकडे आले होते काय ?

उन्हाळा सुरू झाला होता नद्या तर चिक्कार शुष्क दिसल्या पाणी स्वच्छ मिळेना म्हणून पाच दिवस नुसते कलिगड, मोसबी व नारळाच्या पाण्यावरच गुजराण केली सहाव्या दिवशी पोटात जणू भूकपच झाला व डॉक्टरकडे जावे लागले त्या गावी लेडी डॉक्टरच होती तिला सौराष्ट्राच्या पचरत्नाची आठवण केली ‘ कालांतराने नद्या वाळल्या, बापूशाही आता सपुष्टात आली घोडे— ( तुरग ) कोण पाळणार ? नारी अद्याप आहेत— पण मुहम्मद गजनीनतर एकसारखे धर्मांतर होऊ लागले ‘ आता आपणाला नारी बुरख्यातच दिसतील किंवा खोजाघरी त्या जुन्या आठवणी गतकालाचे दर्शन देतील—’ डॉक्टरीणबाई म्हणाल्या

जवळ आहे या देवालयाचा नाश आठ वेळा झाला जुन्या शीला भगल्या, शिवलिंगाचे तुकडे गजनीच्या मशीदीच्या पायऱ्या बनल्या .. पण भारत स्वतंत्र झाल्यावर सोमनाथाचे मदिर वर आले उत्तम शिल्पकारी चमकू लागली गर्भगृहात नबाबाच्या काळी मुसल-मानांनी शौचकूप केले होते व भग्न मूर्तीवर गाढव बांधीत काळ बदलला बाजूची मसजीद आता जुन्या भग्न शिल्पाचे आगर . म्युजियम- सूर्य मदिर म्हणून गाजू लागली लाब समुद्रकिन्यावर एका पाषाण– स्तभावर होकायत्र बसविले आहे या यत्रावरील दक्षिण दिशा दर्शविणारा बाण थेट दक्षिण ध्रुवापर्यंत अशी रेषा घेतो की मध्ये द्वीपसुद्धा येणार नाही ही कला कोपलनिकसच्या कैक वर्षे पूर्वी या देशात अवगत होती या शहरी भगवान कृष्णाने एका पिंपळ– ( वट ) वृक्षाखाली आपला देह सोडून इहलोकीची यात्रा सपविली ' सभवामी युगे युगे ' चा महामत्र त्यांनी दिला व आज तरी या मत्राने भारताला धीर दिला पाहिजे श्रीकृष्णाचा निरोप घेत मांग्रोळ-जवळ आलो मार्गात जे काही पाषाण दिसले ते सगळे कोरल– ( पोवळे ) जातीचे होते गावाजवळ नारळाची बने होती केशरी आंब्याच्या बागा होत्या पण डास चिक्कार व पुढे हत्ती–पाय रोगी चहूकडे दिसले एका घरात तर मी बारा रोगी मोजले शिवाय दवाखान्यात डोकावलो तर ५० टक्के जनतेच्या पोटात जत आहेत असे कळले आता रात्रीला मुक्काम करणे अयोग्य तेथील पाणी तरी कसे प्यावे ? विलिनीकरणापूर्वी माग्रोळला नवाब होते त्याची मुस्लीम प्रजा इतकी मस्त होती की भर दिवसा हिंदू स्त्रियाना टाग्यातून जाणे कठिण होई ' बाये हाथसे जिसे पकडा वो हमारी हो गई–' असा कायदा होता लोकात विश्वास दिसला की नवाबाच्या महालात तळघरात देवीचे देवालय होते व तिथे दीप २४ तास तेवत असे आता नवाब गेले, महाल पाडला.. पडके दालन गतवभवाची साक्ष देत उभे होते

तिथून चार मैलावर एका प्रचड आमराईत उत्तम पाठशाळा हल्लीच निघाली आहे वर्ग वृक्षाखाली भरतो इमारत नाही पण लहान लहान उघडे वर्ग अमराईत इतस्तत पसरले आहेत मुलाना बागायती, गुराचे सगोपन, शेती, आपली सस्कृती व साधे शिक्षण शिस्तबद्धरित्या दिले जाते या रम्य स्थळी त्यावयातील जे विद्यार्थी वर्षे घालवतील ते चिर निसर्गभक्त होतील

पोरबदर गाधीजींचे गाव त्यांच्या जन्मगृहाला भेट दिली

' सांस सांस में राम कहे, वृथा सांस ना खोया । ना जाने आ सास की आवन या ना होय ॥' हे कवन जन्मखोलीत कोरलेले होते शिल्प, पुस्तक आदि सर्व होते . पण माझ्या मते पोरबदर जर कशाकरता प्रसिद्ध असेल तर ते फायलेरियाकरिता मी केव्हाही कुठेही डास पकडला व लेन्सखाली ठेवला की फायलेरियाचे जतू तिथे हटकून असावयाचे जवळ पास ८० टक्के घरात हत्तीपाय असलेले रोगी होते. मी तर पळता पायच काढला.

जामनगरचे जामसाहेब सौराष्ट्राचे पहिले राजप्रमुख होते पण आता सगळे

वैभव गतप्राण झाल्यासारखे दिसले या शहरी अजाणी नावाच्या व्यापाऱ्याकडे अडकित्ता चांगला मिळतो एवढेच एक आकर्षण त्या सौंदर्ययुक्त देशात दिसत होते राजवाडा आता गेस्ट हाऊस झाला एका हॉलला पार्टिशन करून वीस खोल्या केल्या क्लास वन् ऑफि-सरला पाच रुपये तर क्लास थरीला दोन रुपये भाडे पडे जे अन्न घेतल्यावर आम्हाला तीन रुपये पन्नास पैसे लावले तेच अन्न आमच्या ड्रायव्हरला आठ आण्यात दिले नुकतेच मेडिकल कॉलेज निघाले होते व आयुर्वेदाचे अध्ययन व संशोधन सुरू झाले होते जवळ-पास शेती व उजाड प्रदेश बराच दिसला

सुरेन्द्रनगरहून धागध्राकडे निघालो मार्गात एक कवेलूवजा देऊळ दिसले इथे नागाची काळ्या पाषाणाची मूर्तीपण आहे धागध्राचे राजेसाहेब एका विशिष्ट दिवशी इथे येतात व पगडी उपडी करून मूर्तीजवळ ठेवतात म्हणे एक जिवंत नागसर्प पगडीत येतो, बसतो व प्रसाद ग्रहण करून निघून जातो मी तरी पाहिला नाही सौराष्ट्रात ‘ सूर्य ’ मंदिरे आहेत व तिथेच नागसर्पाकृतीपण दिसते वरील देवालयामागे सती गेलेल्या स्त्रियांचे कैक पाषाण दिसले काही नावे कोरली होती पण प्रत्येक पाषाणावर उजवा हात कोरलेला असून वर चंद्र आणि सूर्य यांच्या आकृत्या होत्या त्या आकृत्या मी तपासल्या व मला एका पाषाणावर सूर्यप्रतिमेच्या स्थळी कासव दिसला कासव हा सूर्याचे प्रतीक आहे काय असा विचार मनात आला. तसेच नावे तपासताना देवराव नाव एके स्थळी दिसले आमचे कुणी देवरस इकडे आले होते काय ?

उन्हाळा सुरू झाला होता. नद्या तर चिक्कार शुष्क दिसल्या पाणी स्वच्छ मिळेना म्हणून पाच दिवस नुसते कलिंगड, मोसंबी व नारळाच्या पाण्यावरच गुजराण केली सहाव्या दिवशी पोटात जणू भूकंपच झाला व डॉक्टरकडे जावे लागले त्या गावी लेडी डॉक्टरच होती. तिला सौराष्ट्राच्या पंचरत्नाची आठवण केली ‘ कालांतराने नद्या वाळल्या, बापूशाही आता संपुष्टात आली घोडे– ( तुरंग ) कोण पाळणार ? नारी अद्याप आहेत– पण मुहम्मद गजनीनंतर एकसारखे धर्मांतर होऊ लागले ‘ आता आप-णाला नारी बुरख्यातच दिसतील किंवा खोजाघरी त्या जुन्या आठवणी गतकालाचे दर्शन देतील–’ डॉक्टरीणबाई म्हणाल्या

एप्रिल १९६२ ला एका दुपारी संरक्षण मंत्री श्री कृष्ण मेनन यांचे केबिनमध्ये 'नेफा' बद्दल दोन सेनाधिकाऱ्यांची भेट झाली मंत्री महोदयांनी, वैद्यकीय, व स्वास्थ्य खात्यातील काही अडचणी सांगितल्या, व मला त्या अधिकाऱ्यांशी पुढील बोलणी व प्रवास-व्यवस्थेविषयी चर्चा करण्यास मुभा दिली

माझे तेजपूरला जाण्याचे ठरले व मी ताबडतोब कलकत्ता मार्गे जाणारे विमान गाठले तेजपूर विमानतळावर चौथ्या डिविजनच्या एका कॅप्टनने स्वागत केले त्याच दिवशी सकाळी श्री कृष्ण मेनन आले होते व भारताचे पंतप्रधान पं जवाहरलाल नेहरू यांनी एका नवीन 'बाशा' वसाहतीचे उद्‌घाटन पण केले होते. या समारंभानंतर एक छोटा खाना झाला व तो संपत असताना माझी जीप एच क्यू ला आली उरलेल्या जमावाची ओळख व नं २१ फील्ड ॲम्ब्युलन्स तुकडीत प्रवेश मिळाला. सगळीकडे 'बाशा' चे कौतुक व त्याबद्दलच्या काही गमती अधिकारी सांगत होते तिथेच 'बाशा' चे निरीक्षण करण्याचा आदेश मिळाला

नवीन सैनिक वसाहत सुरू करताना बांधकामात बरेच पैसे गुंतवावे लागतात शिवाय ते तयार होण्याला पण बराच अवधी लागतो. 'नेफा' च्या जंगलात बांबूची विविध लागवड असून तेथील जनता घरे बांधताना त्याचाच उपयोग करते याकरता खर्च कमी व घरे आठ दिवसात तयार होतात हीच विचारसरणी घेऊन बांबूच्याच तट्ट्यांची घरे, दारे, खिडक्या, पलंग, कपाट, छपरे आदि करून सैन्यास तात्पुरती वसाहत करून दिली त्या घरांना 'बाशा' अशी नावे दिली सैनिकांनीच जंगलातून बांबू आणले, घरे त्यांनीच बांधली, व पंडितजी आले त्या दिवशी गृहप्रवेश झाला हे कार्य करताना डिम-डिम माशा, जळवा व सर्प यांचा जरा त्रास झाला

बांशाचे दर्शन घेऊन बाबूवनाकडे नेण्यात आले तिथे काही आदिवासी बांबूच्या चटया विणीत होते आम्ही येताच त्यानी एक दोन फूटी बाबू कापला, त्यात पाणी भरले, चहाची पूड टाकली बाबूच पेटविला बांबू जळेपर्यंत आतील चहा चागला उकळून तयार झाला होता दुसऱ्या बाबूच्या तुकड्यात तो पिण्यास दिला सांधेरहित बाबू एकमेकाला लावून लांबच लांब पाईप तयार करतात व पाणी लावून आणता येते स्वयपाक म्हणजे भात किंवा मास सगळे बाबूतच शिजवावे उत्तम चटया, कुटून केलेले बाबू परिधान वस्त्र डोक्यावरील हॅट, दारे, कब्जी सगळे बांबूचेच कोवळ्या बाबूचे कोंब, कोवळी पाने, आतील पाढरा गर-(वशलोचन) हे तर नेहमीचे त्यांचे अन्नच होय शेजारच्या घराला भेट दिली आठ-दहा जाड बाबूच्या खाबावर हे खोपटे उभे होते छप्पराचे तळ जमिनी-पासून ५ फूट उच होते पायऱ्या बाबूच्या, आतली फरशी बाबूची, भिंती, छप्पर, खुट्या, रॅक, अल्मारी सगळे बाबूचेच खोलीच्या मधोमध मातीचा ढिगारा होता इथे विस्तव पेटलेला असे या विस्तवाभोवती उचावर बाबू बाधले होते तिथून आणलेले अन्न, धूर आणि उष्णता देऊन सुकवीत होते तेवढ्यात गृहिणी आली तिने पाठीवर लांब निमुळती बांबूची टोपली घेतली होती व त्या टोपलीत मारून आणलेले मांजर, साप, उदीर, विंचू, किडे, काही बिया, फळे व पाने होती दिवसभर गोळा करून आणलेला तिचा किराणा माल होता त्याच्यावर ते कुटुब गुजराण करीत असे

खाली कोंबडी, डुक्कर, कुत्रा, व एक मिथुन-(बैलाप्रमाणे असलेले जनावर) फिर-ताना दिसले

भारतातून एक ऑफिसर आलाय, त्याला खेड्यातील परिस्थिती दाखवावी, या निमित्ताने एक 'गावबोरा' आला आपल्याकडील पाटील किंवा कोतवालाप्रमाणे हा मुखिया असतो हुद्याच चिन्ह म्हणून तो एक लाल कोट घालतो गावात त्याची चागली बडदास्त करतात दुपारी आम्ही खेड्याला भेट द्यायला निघालो गावाच्या वेशीवर अगदी तरुण मुलींनी नाचत-हासत आमचे स्वागत केले आत शिरताच छन् छन् आवाज कर-णारे घुगरू कमरेला बांधलेल्या मुली दिसल्या कुमारिका व अविवाहित मुली हे असे बाधून फिरतात 'लग्न करणे आहे-' याची ही जाहिरात होय

गावकऱ्यांनी ओळखी करून दिल्या वेगवेगळ्या केशभूषा करूनच आपल्या टोळ्या ओळखतात डाफला तर उच अबाडा बांधून एक सळई आडवी ठेवीत, अप्पातानी केस वेगळेच होते पण प्रत्येकाच्या कमरेला एक डाह होता डोळे लहान असून मिचमिच करीत पायात जोडे नाहीत गुडघ्यापर्यंतच वस्त्र, उघडे अंग व खाद्यावर कांबळी तरुण मुले पण आली ती गोरी व गोंडस होती मुली तर देखण्याच होत्या (नाक आणि डोळ्यांखेरीज) पुरुषाच्या अगावर धुरळा दिसला मुलींना व मुलीना नुकतेच शाळेत पाठवू लागले होते शिक्षणाकरिता तेव्हा बोर्डिंग उघडले होते. तिथे शिक्षण व शिवण विणकामाचे वर्ग असून त्या भागात या कलेला चांगले प्रोत्साहन मिळत असे काही मुलानी 'नमस्ते' म्हणून

भूगोलाचा पाठ हिंदी भाषेतून म्हणून दाखविला

छपरे बाबूचीच लांबट घरात प्रत्येक खोलीत एक कुटुंब नांदत होते अन्न गोळा करीत, व मीठ, तबाखू, चहा, सातूचे पीठ लाबून आणीत शेती थोडी होती ह्या 'झुम्' पद्धतीच्या शेतीत जमीन, वृक्ष कापून स्वच्छ करतात. पुढे ती भाजतात व पेरतात दोन तीन वर्षांनी असे झुम् दुसरीकडे होते इकडे अतिगोड लहान सत्र्याची बरीच झाडे दिसली लोक इतके प्रामाणिक की दुसऱ्याच्या फळाला कधी हात लावणार नाहीत

आजार आला की त्यांचा वैद्य प्रथम कोंबडीचा बळी मागतो मग बोकड व शेवटी मिथून म्हातारे फार आजारी पडले की गावाबाहेर त्याचे झोपडे करतात रोज अन्न पोचवतात मरेपर्यंत तो तिथेच असतो व शेवटी झोपडीसहित जाळला जातो या विभागात बारीक डिमडिम माशा बऱ्याच आढळतात त्यांनी चावा घेतला की सूज येते व दुसऱ्याच दिवशी त्या बारीक मखमेतून पू वाहू लागतो आमच्या सैनिकाना यांचा फार त्रास होतो, पण आदिवासियाना ना माशाचा, ना डासांचा त्रास जणू काही होतच नसे प्रतिकार शक्ती निर्माण झाली असावी तसेच इकडील जळवा अवघ्या अर्धा से मी लांब असून अक्षरश झाडावरून पावसाप्रमाणे पडतात दशाचे दुःख नसते, पण रक्त शोषून वाहू लागले की माणूस रक्तबबाळ होतो व पुढे जळजळते या जळवांचा पण आम्हाला त्रास याना मात्र जणू काहीच त्रास नाही काटक, साहसी व प्रतिकारशक्तियुक्त अशा या आदिवासीयाचा उपयोग झाला पाहिजे

तिबेटहून शरणार्थी आले. काही चिनी लोक पण दिसले गावातील लोक म्हणत की 'हे दोघेही आमच्याच तोंडवळणीचे व आम्ही एकाच धर्माचे, मग ते आम्हास तुमच्यापेक्षा जास्त जवळ आहेत'

अलांग इथे आल्यावर एका छोटया अधिकाऱ्याशी भेट झाली या आदिवासी परिसरात हा गरम कोट, पॅन्ट व नेकटाय घालून आला नाव सागितले जोसेफ तो लुशाई जमातीचा होता म्हणे की अमेरिकन आहे होता लुशाई ख्रिश्चन चागला गोरा, उत्तम बांध्याचा त्याची पत्नी उंच, गोरीपान, कोरीव नाक लालबुद गाल व अमेरिकन स्कर्ट नेसलेली फारच मोहक होती, पण आपण कुणीतरी आगळे आहोत हीच भावना आपण परकीय आहोत हाच अट्टहास होता याना पाहून व त्या गोडस मुलामुलीना पाहून वाटले की शासनाने अशा प्रदेशात भारतातील तरुण अविवाहीत युवा–युवतीना बऱ्याच सख्येत येऊ द्यावे रोटी–बेटी व्यवहार, सस्कृतीची देवाण–घेवाण व्हावी यामुळे तिथे जी नवी पिढी निर्माण होईल त्यांना तो देश आपलाच वाटेल, भारताबद्दल आत्मीयता निर्माण होईल व त्या विभागाचे सरक्षण ते कमी खर्चात व उत्तम रीतीने करू शकतील ही आपली सीमा तेच सभाळतील माझ्या मते भारतातील प्रत्येक प्रांतात अशा रोटी–बेटी व्यवहार झाला तर राष्ट्राला चांगली एकात्मता येईल

'वाशा' तयार झाला व त्या बाबूसगे सर्प पण घरात आले एक शिपाई सकाळी

अथरूण गुडाळू लागला उशाखालून तीन सर्प निघाले तबूत सैनिकानी रात्री बूट काढून ठेवले सकाळी पाय टाकताच सळसळत सर्प पळाले एक कॅप्टन कॅम्प कॉटवर झोपला कॅन्वास जरा सैल होता, व यामुळे जमिनीपर्यंत शरीर येत असे. रात्रभर त्याला खालून गुदगुल्या झाल्या सकाळी उठल्यावर एक नागसर्प तिथून बाहेर पळाला अघोळीला कॅनवासच्या टाक्या ऑफिसर्सना दिल्या होत्या एक मेजर उडचा टाकीत उतरला तीन दिवस सळसळू लागले कॅम्प नवीन जागी आला, की तबू रोवीत त्या तबूभोवती एक फूट रुद, एक फूट खोल असे खदक चोहूकडे खणले जात यामुळे म्हणे सर्प येत नसत पण इकडे जरा पाऊस आला की खदक भरून जाई व बाहेरील सर्प पोहून तबूत शिरू लागले

या विभागात चहाचे बरेच मळे आहेत मोगऱ्याच्या पानासारखी चहाची पाने असतात या चहाच्या झुडुपान अगस्ति वृक्षाचे रोपण छायेकरिता केलेले असे त्या हजार एकर मळ्यामध्ये मॅनेजरचा सुदर प्रशस्त बगला दिसे तिथे अगदी मुबईच्या मोठ्या हॉटेलसारख्या सुखसोयी, नोकर, मोटार, बग्गी घोडे, कितीतरी होते पण तिकडे सर्पाचा सुकाळ झुडूपा झुडूपातून सर्प निघत आठ दहा मळे मिळून एकादा डॉक्टर असे तो दिवसातून १०० मैल फिरून सगळ्या मळ्यांना भेट देई पण सर्पदश झाल्यावर ताबडतोब मदत नसे

आघाडीवर गेलेल्या ऑफिसर व सैनिकाना सर्पाशी तोंड द्यावे लागे या सगळ्या परिस्थितीचा विचार केला व एका चहाच्या क्लबमध्ये भाषण दिले लाबलांबहून सैनिक आले होते कक मळ्याच्या मॅनेजरनी आपल्या अमेरिकन–फिल्म रहित केल्या पार्टी–नृत्यसुद्धा बद करून बरेच मालक पण स्वत:च्या विमानाने आले सर्वांची भीती सारण्याचा प्रयत्न केला या भीतीला आळा घालावा म्हणून नतर काही योजना आखून अधिकाऱ्यांना दिल्या याची अमलबजावणी झाली असे नतर कळले

आठ वर्षांनी मला महू येथील इन्फन्ट्री स्कूलकडून पत्र आले. मला महूला येण्याचे आमत्रण होते दिलेल्या नियमाची अमलबजावणी कैक ऑफिसर्सना किळसवाणी वाटे तीन दिवस मुक्काम केला परेड व नियम बसविले. शेवटच्या दिवशी ५०० ऑफिसर्सनी मीटिंग घेऊन माझे भाषण ठरविले मला २० लेखी प्रश्न आले उत्तर देण्यापूर्वी प्रत्येक ऑफिसरला त्यांच्या डायरीत खालील शब्द टिपून घेण्यास सांगितले होते, 'भयगाम् भयम्, भीषणाम् भीषणानाम्' ज्याची तुम्हाला भीती वाटते, त्यालाच तुमची भीती वाटावी, असे वागावे व असे केल्यानेच तुमची भीती नक्की जाईल व तुम्ही निर्भय बनाल'

याकरिताच सगळ्याना शिजवलेला सर्प–मुडके छाटून–द्या व परेड 'खा' म्हणताच प्रत्येकाने सामूहिकरित्या त्याचा एक तुकडा घ्यावा व खावा ही प्रथा आता नक्की झाली आहे

घरापासून हजारो मैल दूर असलेल्या सैनिकाना कुटुंबाची आठवण येत असते. काळजी, अडचणी आदिंचा त्याच्या मनावर परिणाम होतो विशेषत: निर्जन किंवा बर्फाच्छादित प्रदेशात एकाकी उभा असलेला पहारेकरी कितीतरी दुःखी व मानसिक ताणाने पछाडलेला असतो एका सैनिकाने ड्यूटी संपल्यावर दवाखान्यात प्रवेश केला प्रकृतीची नादुरुस्ती सांगून पलंगावर लोळला. जवळ असलेल्या रिकाम्या रम बाटलीने आपले मस्तक फोडू लागला. त्याला घराची फार काळजी लागली होती दुसऱ्या एकाने रेजिमेन्टची बदली होत असताना सेन्ट्रीच्या संगिनीवरच शरीर टाकले असे होऊ नये म्हणून करमणूकीचे कार्यक्रम आयोजित करतात. हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल शिवाय इतर सामूहिक खेळात भाग घेतात.

चारद्वारला एक दिवस काढला सकाळी दरबार भरला होता सगळे बटालियनचे सैनिक मुफती घालून पटांगणात आले ठीक आठला ऑफिसर कमांडिंग भरधाव जीप गाडीने पोचले त्याचे यथोचित स्वागत होऊन उभारलेल्या शामियानात ते विराजमान झाले कैक सैनिकानी आपापली गाऱ्हाणी मांडली त्यांचे निरीक्षण करण्यात आले ज्या सैनिकानी चांगले कार्य केले त्याचे नामोच्चारण होऊन वाहवा झाली. अध्यक्षानी सर्वांच्या कार्याचा गौरव केला, प्रत्येकाला अंगावर मूठभर मास चढल्याचा भास झाला. दुपारी मोठा खाना आणि रात्रीला विविध नृत्य, गाणी, नकला, वाद्य, छोटे छोटे नाटकाचे प्रवेश असा भरगच्च कार्यक्रम आटोपला सैनिकांना तेवढाच विरगुळा मिळाला

आघाडीवर किंवा नवीन जागी गेल्यावर तेथील झाडे, वनस्पती, शिला, कीटक, पाखरे, नद्या, डोंगर यांचे व्यवस्थित निरीक्षण व थोडाफार अभ्यास व्हावा, त्यामुळे नवीन ज्ञान तर मिळतेच, शिवाय तेवढा वेळ चांगला जातो तरुण ऑफिसर्सनी याबद्दल बरीच उत्सुकता दाखविली व कार्याला चांगला प्रतिसाद मिळाला

'झिलो' गावी टेकडीवर आपलेकडील ऑफिस होते मुंबईचे श्री हळदीपूर तिथे पोलीटिकल एजंटप्रमाणे कार्य करीत असत नवीन रस्तेबांधणी सुरू झाली होती त्या कार्याला तिबेटचे शरणार्थी कामावर आले पण ते चिनी होते की तिबेटी मला तरी उमगले नाही अगदी सीमेजवळ एक खपा शिपाई दिसला शरणार्थीच होता अंगाने खूप सशक्त, डोक्यावर केस बांधलेले व तोंडावळा कसा क्रूर होता आमच्या एका सिविलियन ऑफिसर्सच्या कोटातील तीनपैकी एक चकाकणारे पेन त्याने काढले 'ही चोरी आहे' असे दुभाषाने सांगताच तो म्हणाला, 'मला ते आवडले व तुमच्या समोरच मी काढले, मग चोरी कसली ?' हा एक वेगळाच दृष्टीकोन दिसला

फादर एलविन तिकडे येणार होते. त्याच्या स्वागताकरिता बरीच आदिवासी मंडळी विमानतळावर आली होती दुसऱ्याशी ती बोलण्यास पण तयार नव्हती झिलोनंतर अलांग, दापरीजो, बोमडीला आदि स्थळाना भेटी दिल्या अलाग इथे अगदी आधुनिक गेस्ट हाऊस बांधण्यात आले आहे. तेथील फर्निचर व सामान कलकत्त्याहून आले जवळच

एक छोटीशी बाजारपेठ निघाली पण त्या दुकानात प्लास्टिकच्या बादल्या, मग, मुबईच्या छत्र्या, नायलॉन कापड, साबण, पोमेड, टिन्ड अन्न आदि विकण्याला ठेवले असून, दुकानदार मात्र कलकत्ता, राजस्थानचे होते त्या आदिवासियाना हे एक कुतूहल वाटले व फादर एलविनच्या अनुयायाना एक मुद्दा विवादाचा मिळाला

एके दिवशी मेजर सिंग सगे त्या मार्केटला भेट दिली दुकानातले सामान बघत एक आदिवासी युवती खिदळत चालली होती तिने स्वत विणलेले सुदर स्कर्ट परिधान केले होते शासकीय बोर्डिंग हाऊसमधे ती काही काळ होती मेजर सिंगने तिला थांबविली 'हमे स्कर्ट का कपडा बुन देगी ?' त्यांनी विचारले

'हा !' ती म्हणाली

'कितना रुपया मांगेगी–' मेजर सिंग

'सौ रुपया–' ती म्हणाली

'सौ तो बहोत होता है–' मेजर सिंग

'तो पाच सौ देना–'

हिला पाचशे, शभरापेक्षा जास्त असतात याची कल्पनाच नव्हती अशा मडळीत कलकत्ता, मुबईच्या मार्केट मधल्या अत्याधुनिक वस्तूचा काय परिणाम होत असेल व दुकानदार त्याचा लाभ कसा घेत असतील याची कल्पना मला आली

त्या प्रदेशात लाब लाब जाऊन परिस्थिती पाहण्याला एक आटर जातीचे विमान दिले होते. सोबत एक मेजर परेरा व एक ले क वसुराय हे होतेच बरीच परिस्थिती पाहता पाहता एके दिवशी चागले ढग आले पाऊस जरा कमीच होता पण वारे जोराचेच होते

ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातून विमान चालले असताना जोराने हेलकावे खाऊ लागले दोन्हीकडे उच पर्वतराजी होती व वाऱ्यामुळे केव्हा कुणीकडे जाईल याची शाश्वती नव्हती पायलट आत आला 'पुढे जाणे फार धोक्याचे आहे आता परत फिरावे,' असे म्हणू लागला या महिन्यात इकडच्या वाऱ्यावादळाला 'कालवैसाखी' म्हणतात व ती फार धोक्याची असते हा विचार चालू असतानाच विमान कलले अगदी डोंगरावर आपटणार हे दिसत होते, पण त्या फ्लाईट लेफ्टनटने ते वर घेतले आता उड्डाण बद करावे व अगदी जवळच्या विमानतळावर जावे असा निर्णय झाला विमान खाली सुखरूप आले

तेजपूरला निरोप गेला व आता इथे रात्र काढण्याची व्यवस्था पाहू लागलो हा कमाड दुसरा होता, यामुळे जरा त्रास पडला गावात व्यवस्था झाली इकडे जगल कमी होते, पण जवळपास दलदल असल्यामुळे माश्या आणि डासाचा सुकाळ होता. सगळी पाहणी सपविली नोटस् झाल्या, रिपोर्ट तयार केला, तोपर्यंत रात्रीचे आठ वाजले थकल्यावर मेसची गडबड नको होती

मी सरळ भोजन करून व्यवस्थेच्या जागी गेलो. दोन पलग अथरले होते व फिना-

ईलने तळ धुतला होता मी मच्छरदाणीशिवाय निजण्याचे नाकारले मेजर सा मेसच्या खाण्यापिण्याला भाळले व ड्रेस करून निघाले मी झोपलो. रात्री अदमासे १२ ला आवाज आला 'डोन्ट प्रिक मी' 'ओ डोन्ट स्टॅब मी–' उठून लाईट लावला, तो मेजरसाहेब जरा तर्रर असून आगाखाद्याला स्वत थापडा मारीत होते त्याना उठविले उठताच त्यानी थोडे 'तीर्थपान' आणखी केले व निजले

सकाळी उठलो तेव्हा त्यांच्या शरीरावर डासाचे थवे बसलेले दिसले सूज आणि रक्ताचे थेंब चहूकडे झळकत होते त्याना उठवेपर्यंत, बाहेर गाईंचा हबरडा ऐकू आला

उजेड होताच दिसले की आम्ही गोठ्यात निजलो होतो तेथील वास काढला, पण डास तसेच होते या वास आणि डासाच्या सान्निध्यात रात्र काढली असे हे कष्टी जीवन सैनिकाचे असते–याची आम्हाला जाणीव नाही

'मिसीमारी' तळाजवळच तिबेटी शरणार्थींना ठेवले होते याच घाटातून श्री दलाई-लामा भारतात आले घाटमाथ्यापर्यंत या तळापासून पक्के रस्ते करीत होते त्या शर-णार्थी कॅम्पला भेट दिली घरे तशी पक्कीच, एक मजली बांधली होती दोन घरांमध्ये पक्का डांबरी रस्ता व दोन्हीकडे मोऱ्या होत्या, वसाहतीच्या मध्यभागी संडास व धुण्याची व्यवस्था होती

ज्याच्याकरिता घरे केली त्याची विचारसरणी व राहणी याचा विचार झाला नव्हता त्यामुळे सगळ्या कॅम्पमधले शरणार्थी सडक आणि समोरील मोऱ्याच संडास म्हणून वापरीत यामुळे डास, माशा व त्या अनुषगाने ग्रॅस्ट्रो, ताप व काही टी बी चे पेशट दिसले यांच्यावर उपचार करून सगळी व्यवस्था केली पण त्यांच्या मनात राग आणि द्वेष मात्र भडकत होता याच भावनेने ग्रासलेले हे लोक, सडकेचे काम करीत व जणू मनात जळफळत होते आपल्या या सीमेवर व या घाटीजवळ असलेली ही परिस्थिती धोकादायक होती

आसाम प्रांतात परप्रांतीयाबद्दल सद्भावना दिसत नव्हत्या सैन्याचे तळ आल्यामुळे बाजाराला भाव मिळाला पण गावातला माल कमी झाला अगदी पुराने खवळणाऱ्या ब्रह्मपुत्रेच्या दोन्हीकडे याच भावना भडकत होत्या

ही सगळी पाहणी करून जनरल अम्रिकसिंग याना रिपोर्ट दिला त्या दिवशी ते खेचराच्या मार्गे डोंगरावर तोफा नेण्याच्या प्रयोगात गुतले होते त्या विभागात लवकरच सावट येईल याची त्याना अधुक कल्पना होती की नाही मला समजले नाही शेवटच्या दिवशी त्या मोठ्या मेसमध्ये लच घेतले इंजिनियर, वैद्यक, वाहतुक, दळणवळण व इतर विभागाचे अधिकारी भोजनाला होते तिथेही रिपोर्टवर थोडेफार बोलणे झाले निरोप घेताना 'विश यू ऑल गुडलक–' म्हणत मी जनरलसाहेबांचा हात धरला 'वुई सॅडली नीड इट' म्हणत त्यांनी हस्तांदोलन करीत मला जीपपर्यंत पोचविले

त्याचे शब्द विचाराधीन करून गेले आक्टोबरमध्ये पुण्यास एका मित्राकडे असताना

सकाळचा टाईम्स वाचला ते मोठे शब्द, 'चीनने भारतावर केलेली स्वारी' अगदी माझ्या वर्मी लागले जनरलसाहेबाना 'लक्' ने धोका दिला काय? ते मिसीमारीचे तिबेटी स्थळ, लुशाई गृहस्थाचे शब्द, सगळे समोर आले हा उत्तुंग पर्वताचा प्रदेश 'गेला' काय, याचीच धास्ती वाटली

सन १९२९ पर्यंत मध्यप्रदेशात, विशेषत नागपूर शहरात 'कोचिंग क्लास' नावाच्या काही शैक्षणीय सस्था स्थापन झाल्या होत्या नागपूरचे सोमलवार अॅकॅडमी त्या समयी प्राथमिक ४ वर्षाच्या शिक्षणानतर तीन किंवा चार वर्षात विद्यार्थ्याला मॅट्रिकच्या परीक्षेला बसवीत असत तसेच रायकर कोचिंग क्लासेसचे विद्यार्थी तीन वर्षात मॅट्रि-कच्या परीक्षेला पजाब विश्वविद्यालयाच्या लाहोर केन्द्राचा आश्रय घेत असत या जल्द-गती परीक्षेमुळे कक विद्यार्थी अवघ्या १२ व्या वर्षीच मॅट्रिक होत

असाच एक विद्यार्थी चि विष्णू तो माझा चुलत भाऊ होता (तो पुढे १८ व्या वर्षी एम ए झाला व २१ व्या वर्षी लडन विश्वविद्यालयाचा पीएच डी होऊन नुक-ताच विदर्भ विद्यालयाचा प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झाला) वय लहान असल्यामुळे लाहोर शहरी त्याची देखभाल करण्याला प्रथम माझे काका गेले त्यानी सुरवातीची व्यवस्था केल्यावर मग मला एप्रिल १९२९ मध्ये जावे लागले माझे वय त्यावेळी १९ वर्षांचे होते

मद्रास ते पेशावर एक थेट गाडी दिल्लीला बदलून जात असे त्या गाडीने प्रवास केला हल्लीच्या रिझर्वेशनची भानगड त्यावेळी नव्हती प्रवासी पण बेताचेच असत आग-गाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात लाब लाब बाके होती या शिवाय सामान ठेवण्याला वर मोठे लाब रॅक असत हे रॅक तर अगदी बाकाप्रमाणे मजबूत असल्यामुळे, झोपण्या-करिताच यात्री त्यांचा उपयोग करीत कैक स्टेशनावर पुरी-भाजी किंवा वरण पोळीचे जेवण दीड आण्यात मिळत असे उन्हाळ्यातील शीत पेये म्हणून, सरबत, लस्सी, शिकजी पन्हे व कुठे कुठे माठातले गाजर-मोहरीचे पाणी विकण्याला आणीत त्यावेळी गाड्यांना स्लीपर कोच किंवा डायनिंगकार असे प्रकार नव्हते यामुळे डब्यातच निजायचे व स्टेशना-

## लाहोरची सफर व बॉबफेक

वरील शीत पेये व अन्न घेत प्रवास करायचा असा प्रवास करीत मी तीन दिवसांनी लाहोर गाठले तिथे स्टेशनवर काका आले होते त्यानी व्यवस्था केलेल्या खोलीवर गेलो तसा मी लाहोरचा प्रवास १९२७ साली केला होता व त्या शहरात स्टेशनरोडवरील एका हॉटेलमध्ये महिनाभर वास्तव्य केले होते यामुळे शहराची थोडीफार माहिती होतीच

त्या शहरातील टाग्याचे घोडे खूप धष्टपुष्ट होते व सडकेवरील या मुख्य वाहनात पाचसहा प्रवासी अगदी कोंबून बसवीत असत टागेवाला अगदी घोड्याच्या शेपटीजवळील दांडीवर जेमतेम बसून घोडा भरधाव सोडीत असे सारखा 'ए भाय, सभल,' असा ओरडत वाहतुकीच्या नियत्रणाविरुद्ध इकडून–तिकडे वाहन नेत असे त्या वेळी,, एखादी मोटर दिसावयाची, पण सडकेवर टागे, सायकली काही रिक्षा व पादचारी यांचाच भरणा अधिक सडकाच्या दोन्ही कडेला पक्की घरे होती व प्रत्येक घराला गच्ची होती. मधून मधून म्हशींचे गोठे उघड्यावर होते शिवाय गावामधून कालवा जात होता तिथे या म्हशी व मुले डुबत पडलेली असत अधुनमधून व्यायाम करणारे कडेच्या हिरवळीवर दड–बैठका काढीत व तेल मालिश करून त्याच कालव्यात स्नान करीत हा असा देखावा बघत डी, ए व्ही कॉलेजच्या परिसरात पोहचलो इथेच एक खोली, एक नोकर, इधन, धान्य, खाट आदिची व्यवस्था होती टांग्यातून सामान काढून खोलीत प्रतिष्ठान ठेवले

आमची खोली एका गोठ्याजवळच होती कडुलिंबाच्या झाडाखाली म्हशी बाधल्या होत्या व अगदी लागूनच यव धान्याच्या शेतात लुगीवाले शेतकरी मोटेतून विहिरीचे पाणी घालीत होते जवळच एक मेंढ्याचा कळप होता पण या मेंढ्या नसून 'दुबा' होत्या हा प्राणी मेंढीप्रमाणेच असतो पण शेपटापासून अगदी जमिनीला लागेल एवढी मासाची पिशवी खाली लोंबत असते यात चरबी खूपच भरलेली असते तिकडील लोक अगदी अफगाणिस्तानपर्यंत– या प्राण्यांचे चागले सगोपन मांसाकरिता करतात

नोकराला दरमहा अवघा ७ रुपये पगार होता त्याचे काम झाड–लोट, बाजार-हाट व दोन्ही वेळचा स्वयपाक हा तर होताच शिवाय आम्ही दोघे इतर सर्व कामाला त्याच्यावरच अवलबून होतो सकाळी नऊच्या आत भावाला जेवण देऊन तो गडी बाहेर पडला की मी भावाला परीक्षा सेन्टरवर घेऊन जाई तिथे झाडाखाली, अपेक्षित प्रश्नाची उत्तरे, विचार करून उत्तरे लिहिण्याचा आदेश देणे, पेन्सिल–रबर, टाक, निब, याची झडती घेणे, हे करीत असतानाच घटा वाजे त्याला आत त्याच्या सीटवर बसवून माझा गावात फेरफटका होत असे तरुणपण होते, स्वातत्र्याकरिता जिवाची पर्वा न करणाऱ्या देशाभिमानी भारतीयांची त्या समयी एक उत्तम पिढीच तयार झाली होती मी लाहोरला पोचण्यापूर्वीच कै लाला लजपतराय यांना पोलिसानी छडीचा मार दिल्याचे वाचले होते त्या सार्डर्स नावाच्या पोलीस ऑफिसरचा या डी ए व्ही कॉलेजजवळच खून झाला होता सन १९२७ च्या यात्रेत मी अमृतसर शहरातील जालीयनवाला बाग पाहिला होता तिथे त्या छोटचाशा बोळीवजा मार्गाच्या बाजूच्या भिंतीवर बदुकाच्या गोळ्याचे

चिन्ह– (लहान छिद्र) लोकानी दाखविले होते बागेच्या मार्गावरील तो रक्तपात कैक भारतीय तरुणाचे डोके भडकवीत असे याच भावनेतून मी लाहोरचा परिसर, अनारकली, शासकीय कॉलेज, कँटोन्मेन्ट, आदि जागी फिरलो शिवाय शाही मसजिद–तिला लागूनच राजा रणजितसिंगचा गुरुद्वारा, जहाँगीरची कबर, शाही–बाग आदि स्थळी फिरत होतो

हे फिरणे दोन तास सकाळी चाले परत डी ए व्ही कॉलेजच्या दाराजवळ भावाची प्रतीक्षा दुपारची न्याहरी, दुसऱ्या पेपरचा अभ्यास आदि करून एकदा तो आत गेला की पुन्हा भटकणे करून पाहिलेले क्षण टिपून घेत होतो

अशा दैनंदिन कार्यक्रमात अनारकली व स्टेशन रोड या चौकातील दुकानातून खरेदी करीत असे त्यावेळी किसमिस (बेदाणा) आठ आणे शेर, अक्रोड चार आणे शेर बदाम रुपया शेर व द्राक्षे–(अफगाणिस्तानची) चार आणे शेर होती उत्तम शिरा व पुरी प्लेट एक आण्याला मिळे एका पैशाला एक चपाती व त्याबरोबर भाजी, लोणचे फुकट असे चार ते पाच पैशात माझे तरी जेवण होई तेथील लस्सी म्हणजे अख्खा टम्बलर भरून पेढा, व साखर टाकलेले अर्धा लीटरचे पेय होते

आमच्या बधूचे पेपर सपत आले एप्रिल महिन्याची ७ तारीख असावी बधूला सकाळी परीक्षा सेंटरवर पोचवून अनारकली रस्त्यावरील एका पुस्तक विकणाऱ्या बोळीत शिरलो चुडीदार पायजमा, लाब राखाडी शेरवानी आणि त्याच रगाची टोपी घातलेल्या एका दुकानदाराला 'रगीला रसूल' नामक पुस्तकाबद्दल विचारू लागलो रोल्डगोल्ड फ्रेमचा चष्मा वर करून हातातील हिशोबाची वही सारीत त्या गृहस्थाने मला खाल–पासून वरपर्यंत पाहिले मी तेव्हा धोतर नेसत होतो व डोक्यावर टोपी असे हा कोणी परदेशी दिसतो हे लक्षात घेऊन, 'इधर आव, तुम्हारा नाम क्या है, कहाँसे आये हो' आदि विचारून घेतले मग 'ठीक' म्हणत तो उठला पुस्तक काढणार तोच, कि पाय चौधरी–की गल्' असा आवाज दारातून आ ला काळी सलवार, शेरवानी व डोईवर अफ–गाणी फेटा घातलेले दोन दाढीवाले आत शिरत होते पुस्तक विक्रेता जरा विस्मित झाला व मला म्हणाला, 'अढाई–तीन बजे आवो–' आणि मला सारून त्या दोघांना तिथ बस–विले त्या आडदाड पेशावरी लोकांकडे व त्याच्या हातातील भल्या मोठ्या चामडी चाबकाकडे पहात मी घरी आलो

बधूला घरी आणले जेवू घातले व दुपारची बरेच दिवसाची उरलेली झोप घेण्यास सागून पुन्हा अनारकलीकडे गेलो तिथे पोचलो तर काय– पुलिस घोडेस्वार सडकेवरील गर्दी हटवीत होते त्या बोळीच्या रस्त्यावर तुफान गर्दी होती आत जाणे मला अशक्य दिसले धोतर नेसलेल्या शिरा करणाऱ्या एका दुकानदाराला विचारले त्याने घाबरतच सागितले, पडितजी का (म्हणजे तो पुस्तक विक्रेता) दो गुडोने खून कर दिया– उनकी लाश दुकान मे ही पडी है, पुलिस तहकीकात कर रहें है– दगा फिसाद होने का अदेशा है। तुम लाहोर से आज बाहर निकल जाव

हिंदु–मुस्लिम दंग्याची मला नागपूरची आठवण होतीच या शहरात असे काही झाले तर कोवळ्या वयाच्या माझ्या भावाला घेऊन कुठे जावे हाच एक प्रश्न भेडसावू लागला गर्दी वाढू लागली मी चक्क धावतच सुटलो व तसाच खोलीवर आलो बघूला याबद्दल काही समजत नव्हते त्याची इच्छा लाहोर पहाण्याची होती, पण मी मोडता घातला 'सामान बांधले नोकराला त्याचा पगार, उरलेले धान्य, शिधा काही भाडी देऊन टाकली टांगा बोलावून सामान भरले व स्टेशनकडे लवकर नेण्यास सांगितले अनारकली-जवळील गर्दीतून जेमतेम मार्ग काढीत आम्ही स्टेशनवर सायकाळी सहाला आलो माझ्या-प्रमाणेच बरेच लोक लाहोर सोडीत होते कसेबसे दिल्लीपर्यंतचे तिकीट घेतले व हुश्श करून सामानाजवळ आलो, तर काय– माझ्या भावाला चागला ताप भरला होता तो घाबरला होता व रडत पण होता त्यावेळी लोक मदत करीत त्याला एकाने डॉक्टरकडे नेले– औषध घेतले– डोस दिला तोपर्यंत गाडी प्लॅटफॉर्मवर आली

रात्री चि विष्णूचा ताप उतरला सकाळी सात वाजता गाडी दिल्ली स्टेशनवर आली अर्न–वेस्टन रोडवरील महाराष्ट्र मडळाच्या हॉलपर्यंत बैलगाड्या, उटगाड्या व हातगाड्यांची गर्दी सारीत रिक्षाने आणून सोडले, या मडळात त्यावेळी एक मोठा हॉल होता व तिथेच कैक मराठी प्रवासी अथरूण पसरून आराम करीत होते जेवण आमटी–भाताचे मिळत होते व चहाची पण व्यवस्था चांगली होती मात्र प्रातर्विधीकरिता गच्ची-वर उघड्यावर बसले की, नरक म्हणजे काय याचा अनुभव येत असे

जवळच्या डॉक्टरकडे भावाची तपासणी झाली बाटलीभर मिक्श्चर बारा तासात देण्यास सांगितले शिवाय त्याला दिवसभर पडून रहाण्याचा आदेश मिळाला सकाळी साडेनऊला मराठी जेवण घेतले व भावाला झोपवून पार्लमेन्ट हाऊसकडे जाण्याची तयारी केली मी निघणार तोच विष्णू जागा झाला व 'मी एकटा रहाणार नाही,' म्हणत रडू लागला आता पचाईत आली ताप तसा नव्हता– म्हणून औषधाची बाटली पिशवीत घेतली, त्याच्या कानाभोवती मफलर गुडाळला व रिक्षा करून नई दिल्लीच्या पार्लमेंट हाऊसजवळ आलो पास असल्याशिवाय आत सोडेनात त्या वेळी डॉ मुजे ससदेचे सदस्य होते वडिलापासून ओळख होती त्याचा फायदा घेऊन त्याच्या खोलीत गेलो. नाव सांग-ताच, 'तू दाजीबाचा लेक का रे !' म्हणत त्यानी दाढीवरून हात फिरविला 'काही रीत-भात आहे की, नाही–येवढ्या उन्हात लहानग्या पोराला घेऊन फिरतोस येतोयस म्हणून लिहिले पण नाहीस–' असे रागाने बोलले मग राग थोडा शात झाला 'तिकडे सेठ घनश्यामदासजी बिर्ला बसले आहेत व्यवस्थित अभिवादन करून त्यांना पास माग' असे डॉ मुजे म्हणाले श्री सेठजीना पालागी केली व आत जाण्याचा पास मागितला 'ठीक आहे, यही उमर है देश के नेताओंको देखो और देशप्रेम का पाठ पढो' असे म्हणत त्यानी चिठ्ठी दिली

ती एप्रिल महिन्याची आठ तारीख होती मध्यान्ह समयी १९२९ साली ससद

भवनाच्या वरील गॅलरीत प्रवेश केला भावाला गॅलरीच्या दाराजवळील बाकावर बसविले औषधाचा डोस दिला जरा बावरला होता व तिथेच निजतो म्हणाला तो झोपला व मी भराभर बाकावरून उतरून अगदी खालच्या बाकावर आलो तो भव्य हॉल, समोरील उच्चावर असलेले उत्तुंग घुमट, भरलेल्या गॅलऱ्या, लाल दगडाची भोवतालची वास्तु व खाली सुबक बाकावर बसलेले प्रतिनिधी पाहून मन कसे भारावून गेले खाली समोर डोईवर विग घातलेले अध्यक्ष श्री विठ्ठलभाई पटेल होते त्यांच्या उजव्या बाजूला बाकावर विलायती वेषधारी ब्रिटिश ऑफिसर व त्याचे अग्रणी सर जेरमी रेजमान होते मागे तशाच वेषात एक-दोन भारतीय दिसले. डावीकडे खादी घातलेले पंडित मोतीलाल नेहरू, पं मदन मोहन मालवीय, डॉ बाळकृष्ण शिवराम मुंजे आदि देशाभिमानी मंडळी बसली होती प्रत्येक बेंचच्या टोकाला पख्याचा खुंटा होता व त्यावर विजेचा पंखा फिरत होता, खाली उत्तम सतरंज्यांचे पायपोस रंग भरत होते. भाषणे सुरू झाली डावीकडील बाका-वरील पंडित नेहरू व पं मालवीय याखेरीज कुणाची मला ओळख नव्हती मी अगदी खालच्या बाकापर्यंत आलो— पण बाके भरल्यामुळे उभेच रहावे लागले माझ्याप्रमाणे आणखी एक-दोन गृहस्थ खांबाला टेकून उभे होते एक धोतर परिधान केलेला बंगाली तरुण डाव्या हातात पिशवी घेऊन खाली डोकावत होता त्याला सहज विनंती केली की, पंडित नेहरूंच्या मागील सदस्याची नावे सांगावी तो काही गूढ विचारात होता मी दोन-तीनदा विचारल्यावर अंगावर खेकसला व पटकन 'आय डोन्ट नो' म्हणत खांबापलीकडे गेला त्याच्या सोबतीला पॅंट-शर्ट व फेल्ट हॅट घातलेला धारदार मिशीवाला तरुण उभा होता सारखा मिशीला पीळ देत होता त्याला प्रश्न विचारताच डोळे वटारून 'शट अप' म्हणाला अपमान सहन करीत संसदेचा संवाद ऐकू लागलो पं मालवीयांचे धीरगंभीर शब्द, पंडित मोतीलालाचे वकिली भाषण व कडक इंग्लिश बोलणारे इंग्लिश ऑफिसर या सर्वांचे अर्थ लावीत असता अध्यक्षांनी मतमोजणीची घंटा वाजविली आता रस्सीखेच सुरू झाली सरकारी पक्षवाले व एक हिंदी शासक उजव्या हाताने प्रतिपक्षाच्या सदस्यांना होकारार्थी मत देण्यास एकीकडे ओढीत होते, तर 'बिवेयर ऑफ ट्रेटर्स' असा आवाज दुसरीकडून निघत होता

एकंदरीत मतदान संपले मजूर विधेयक सरकारतर्फे मांडण्यात आले होते. ते मजूर झाल्याचे अध्यक्षानी जाहीर केले विरोधी पक्षाने 'शेम शेम' च्या आरोळ्या ठोकल्या सरकार पक्षाच्या सदस्यांनी बाके वाजवून विजय व्यक्त केला असेच बाक हाताने व पायाने बडवीत असलेल्या दुसऱ्या रांगेतील सरकारी पक्षाच्या हिंदी (मंत्री) मेंबरला त्या आनंदोत्सवात जबरदस्त धक्का बसला. ज्या हाताने प्रतिपक्षाच्या सदस्याला ओढले होते त्याच हाताखाली मोठा 'धडाम' असा आवाज झाला व ठिणग्या आणि धूर निघू लागला मला वाटले की, विजय व्यक्त करण्यासाठी पिस्तुलबार केला असेल, पण नाही, ते गृहस्थ कोलमडले त्यांच्या उजव्या हातातून रक्त वाहताना दिसले तोपर्यंत दुसरा

आणखी जोराचा धडाका झाला कडेला उभा असलेला बंगाली तरुण लाल छापील कागदाचे परिपत्रक वर घुमटाकडे फेकीत होता मला प्रथम वाटले की, वरपर्यंत रक्ताची चिळकांडी उडाली असावी– पण हे तर परिपत्रक होते दोघेही तरुण दोलायमान मन:स्थितीत होते, पण तिथेच स्तब्ध उभे होते मी त्याच्याकडे पाहिले, एक जण मिशीवर अद्याप पीळ देत होता व तिकडे बाकावरील प्रेक्षक घोळका करून बाहेर पळत होते खालचे सदस्य पण बैठक सोडून चालले पळण्याची लागण मला पण झाली मी पण धूम पळू लागलो पुलिसने दारे बंद केली होती खिडक्या बंद करीत होते. लोकांनी खिडक्यांची तावदाने फोडली व त्या फुटक्या काचफटीतून बाहेर उड्या घेऊ लागले काचेचा ढिगारा पडला होता काच लागून हातपाय चिरले गेले व तशाच रक्तबंबाळ स्थितीत प्रेक्षक पळू लागले मी पण जरा मागे वळून पाहिले– तो ते दोघे तरुण छातीवर हात ठेवून खाली गॅलरीच्या खांबाजवळ उभे होते मीसुद्धा उडी मारली व त्या गर्दीसह पळत सुटलो वरून खाली आलो व मोठ्या दारापर्यंत येत असताना पुलिस आडवे झाले व दार जोराने बंद करू लागले जेमतेम दोन पायाच्या फटीतून सरपटत बाहेर पडलो व पुलिसने दार बंद केले धोतर, कोट, टोपी सभाळून बाहेरील पायरीवर हुश्श करून बसलो स्तब्ध होतो, काही सुचेना व काही क्षणानी स्मरण झाले की, गॅलरीच्या दाराशी विष्णूला निजविले होते आता मनात विषण्णता, घबराट, कालवाकालव सुरू झाली दार तर बंद झाले आता आत जाऊ कसा ! पायाने जमीन खरडीत काही न सुचण्याच्या मन:स्थितीत असताना त्या कोलाहलात जोराने टाहो फोडून रडण्याचा ध्वनी ऐकू आला आवाज ओळखीचा वाटला व लक्ष दिल्यावर 'भय्या, भय्या–' शब्द पुन्हा, पुन्हा ऐकू आले त्या आवाजाच्या दिशेला पाहिले धडधडत्या काळजाला आणखी गती मिळाली व मी तिकडे पळत सुटलो एका फर्लांगावर कंपाऊंडच्या भिंतीशेजारी एका झुडपाच्या आड आमचे विष्णुपंत लपून बसले होते हातात फुटकी बाटली होती व पिशवीने डोळे पुसत होते त्याला कवटाळले त्याक्षणी त्याचा दु:खाचा वेग वाढला ओक्साबोक्शी रडू लागला त्याची बाटली फेकून दिली आणि हातरिक्षात त्याला ठेवले बर्न–बेस्टन रोडवर आलो गावात अपघाताची बातमी अद्याप आली नव्हती त्यामुळे चहुकडे नेहमीची गर्दी व वाहतूक दिसली ताबडतोब सामान गोळा केले व थेट दिल्ली स्टेशन गाठले, जी गाडी पहिली सुटणार होती, त्याची दोन तिकिटे काढली व कडेला असलेल्या गाडीच्या डब्यात ठाण मांडले अद्याप स्टेशनवरसुद्धा बातमी आली नव्हती थोडी पुरी-भाजी खाऊन घेतली भीतीने ती घशाखाली उतरत नव्हती दोन घोट पाणी प्यालो तेवढ्यात वर्तमानपत्राचे विशेषांक विक्रीस आले शहीद भगतसिंग व शहीद बटुकेश्वर दत्त यानी संसदेत बाँब फेकले व स्वत पुलिसाच्या हवाली झाले, असे शीर्षक होते

ग्रंथालय
२५९५५
९८।९०।८८

# आमची प्रकाशने

| | मूल्य—रुपये |
|---|---|
| सौ शैलजा राजे | |
| भोवळ | ६० |
| कुमुदिनी रागणेकर | |
| गोड बधन | ४० |
| गिरजा कीर | |
| आभाळमाया | २५ |
| अनिल बर्वे | |
| तिसरा डोळा | २५ |
| चर्मणावती चबळ | २८ |
| सुरेश वैद्य | |
| वास्तव | ५० |
| बा. य गाडगीळ | |
| हिरव्या चादरीवर | |
| भाग १ | ५० |
| भाग २, ३ | ६० |
| दीपक | |
| अजब बदला | ४० |
| वळण | ३० |
| प्रतिमाद | ४० |
| अजली सभूस | |
| पर्व | |
| क्षिप्रा | |

| | मूल्य—रुपये |
|---|---|
| चंद्रकांत काकोडकर | |
| अन्नपूर्णा | ४० |
| बा. सी अष्टीकर | |
| पिसाट खुनी | ४० |
| कमला भागवत | |
| झाकली मूठ | ४० |
| सौ शुभांगी भडभडे | |
| आंधळी कोशिबीर | ४० |
| स्वप्नगधा | ४० |
| पद्मगधा | १२० |
| सौ छाया वाड | |
| सुखी माणसाचा सदरा | ३५ |
| हेमत सावत | |
| अफलातून | ४० |
| प्रतिभा मराठे | |
| डेड एड | |
| डॉ पु ज देवरस | |
| अनुभवाचे जग | ४५ |
| सौ. मदाकिनी भारद्वाज | |
| धोक्याचे वळण | ३० |

REFBK-0025155

वसत बुक स्टॉल
हनुमान मदिराजवळ, न. चि केळकर रोड, दादर, मुबई ४०० ०२८